कांड ७

प्रपाठक १

प्रजोत्पादन केलेला पुरुष हा मनुष्यसमाजात स्वयंप्रकाश समजला जात असून देवसमुदायात अग्नी हा स्वयंप्रकाश आहे. छंदांमध्ये विराट् छंद हा प्रकाशरूप असून विराट्छंदाची उपलक्षक अशी दशसंख्यात्मक वाणी अग्नीच्या ठिकाणी संपूर्ण होत असते. सोमयागातील अग्निदेवतात्मक अशा अंतिम स्तोत्राच्या ठिकाणीच विराट्छंदाची उपलक्षक अशी दहा ही संख्या पूर्ण होत असल्यामुळे सोमयाग हा विराट्रूपाला प्राप्त होत असतो. शिवाय, अग्निरूपत्व, विराट्रूपत्व आणि प्रजोत्पत्तिहेतुत्व हे तीनही गुण सोमयागात अंतर्भूत झाले असल्यामुळे त्यास ज्योती म्हणजे स्वयंप्रकाश असे म्हटले जाते.

मनुष्याच्या जीवनाचे प्राण व अपान हे दोन वायू जसे निर्वाहक असतात, त्याचप्रमाणे सोमयागातील प्रातःसवनाचे त्रिवृत् व पंचदश हे दोन स्तोम निर्वाहक असतात. नेत्र आणि कान हे जसे मनुष्याच्या रूपदर्शनाचे व श्रवणव्यवहाराचे निर्वाहक असतात, त्याचप्रमाणे सोमयागातील माध्यंदिन सवनाचे पंचदश व सप्तदश हे दोन स्तोम निर्वाहक असतात. मनुष्याच्या संभाषणाची व गमनागमनाची ज्याप्रमाणे वाणी आणि पाय ही दोन इंद्रिये निर्वाहक असतात, त्याचप्रमाणे सोमयागातील तृतीय सवनाचे सप्तदश व एकविंश हे दोन स्तोम निर्वाहक असतात. जीवनक्रमास आवश्यक अशा इंद्रियसमुदायाच्या योगाने मनुष्य जसा अव्यंग अर्थात् सर्वांगपरिपूर्ण असतो, त्याचप्रमाणे तीनही सवनांच्या निर्वाहास आवश्यक अशा स्तोमसमुदायाच्या योगाने सोमयागही अव्यंग म्हणजे सर्वांगपरिपूर्ण असा असतो. सोमयागाचा निर्वाह करणारे त्रिवृत् इत्यादि चार स्तोम हे ज्योतिरूप असल्यामुळे प्रकृतिभूत अशा सोमयागास ज्योतिष्टोम ही संज्ञा प्राप्त झाली आहे. कोणतेही कार्य सर्वांगपरिपूर्ण अशा साधनाने जसे सफल होते, त्याचप्रमाणे, सर्वांगपरिपूर्ण अशा ज्योतिष्टोमसंज्ञक सोमयागरूप साधनाने यजमान जी जी कामना करतो, ती ती सफल होत असते.

अग्निदेवतात्मक अशा स्तोत्रानेच ज्योतिष्टोमसंज्ञक सोमयागाची परिपूर्णता होत असल्यामुळे त्यास अग्निष्टोम अशीही अवांतर संज्ञा आहे.

ह्या अग्निष्टोमसंज्ञक सोमयागाच्या साधनानेच प्रजापतीने प्रजा निर्माण

केल्या व अग्निष्टोम यज्ञाच्या योगानेच त्याने त्या प्रजा आपल्या स्वाधीन करून ठेवल्या. प्रजापतीच्या स्वाधीन होऊन राहिलेल्या प्रजांच्या पैकी गर्दभ व अश्व या दोघांच्या वीर्यापासून उत्पन्न झालेला अश्वतर म्हणजे खेचरजातीचा प्राणी प्रजापतीच्या स्वाधीन न राहता, अत्यंत दूर निघून गेला. तेव्हा प्रजापती त्याच्या पाठीमागे धावत गेला, आणि त्या अश्वतराच्या (खेचराच्या) शरीराच्या ठिकाणी असलेले सारभूत रेत (वीर्य) त्याने काढून घेतले आणि ते गर्दभाच्या शरीरात समाविष्ट केले. त्यामुळे गर्दभ हा प्राणी द्विरेता म्हणजे दोन रेतांनी युक्त, अर्थात् दुप्पट वीर्यवान् झाला. कोणी विद्वान् असे म्हणतात की, प्रजापतीने अश्वतराच्या शरीरातील जे रेत काढून घेतले, ते त्याने वडवेच्या म्हणजे घोडीच्या शरीरात समाविष्ट केले. यामुळे वडवा (घोडी) ही द्विरेता म्हणजे दोन रेतांनी युक्त अशी झाली. कोणी विद्वान् म्हणतात की, प्रजापतीने अश्वतराच्या शरीरातील काढून घेतलेले रेत ओषधींच्या ठिकाणी म्हणजे धान्यांच्या ठिकाणी समाविष्ट केले. त्यामुळे औषधी किंवा धान्ये, मनुष्याप्रमाणे तैलाभ्यंगासारखा उपचार न करताही साराधिक्यतेने निर्माण होतात व तुळतुळीत दिसतात. आणखी कोणी विद्वान् असेही म्हणतात की, प्रजापतीने ते अश्वतराच्या शरीरातील रेत मनुष्याच्या ठिकाणी समाविष्ट केले. अर्थात् मनुष्य हा अधिक वीर्यवान् झाला. आणि म्हणूनच एखादा मनुष्य एकाच गर्भाच्या ठिकाणी दोन अपत्ये निर्माण करू शकतो. सारांश, अश्वतर किंवा खेचर हा प्राणी त्याच्या ठिकाणचे रेत प्रजापतीने काढून घेतल्यामुळे प्रजोत्पादन करण्याला असमर्थ असा असतो. आणि याच कारणाने ज्योतिष्टोमासारख्या सोमयज्ञात दक्षिणा म्हणून देण्याला हा अश्वतर जातीचा प्राणी अयोग्य असतो. खेचर हा प्राणी प्रजोत्पादनाविषयी असमर्थ असला, तरी तो घोड्यापेक्षाही अधिक मजल चालून जाणारा आहे. घोड्यांच्या गतिमर्यादेचे उ[illegible] करून अधिक चाल करण्याच्या या गुणामुळेच, ज्योतिष्टोमासारख्या सोमयागात जरी तो दक्षिणार्ह नसला तरी, प्रकृतिभूत अशा सोमयागविषयक दक्षिणेच्या संख्येचे उल्लंघन करून अधिक अशा हजार संख्येने दक्षिणा द्यावी लागणाऱ्या किंवा दक्षिणा म्हणून सर्वस्वाचेच दान करावे लागणाऱ्या यज्ञात अश्वतर किंवा खेचर हा प्राणी दक्षिणा म्हणून दान करावयास योग्य आहे.

एवं च, अग्निष्टोम यज्ञाचे महत्त्व जाणणारा जो कोणी विद्वान् आहिताग्नी अग्निष्टोम यज्ञाचे यजन करतो तो पूर्वी अनुत्पन्न अशा प्रजा उत्पन्न करतो

व उत्पन्न झालेल्या प्रजा आपल्या स्वाधीन ठेवू शकतो. विकृतिस्वरूप अशा सर्व सोमयागांच्या पेक्षा प्रजापतीने प्रथमच अनुष्ठित केलेला हा ज्योतिष्टोम किंवा अग्निष्टोम हा ज्येष्ठ यज्ञ आहे, असे म्हणत असतात. प्रजापती हा सर्व प्रजांच्याहून ज्येष्ठ आहे व त्याने अग्निष्टोम यज्ञानेच प्रथम यजन केले असल्यामुळे सर्व यज्ञांमध्ये अग्निष्टोमसंज्ञक सोमयज्ञ हा ज्येष्ठ म्हटला जाणे युक्तच आहे.

प्रजापतीने 'प्रजा निर्माण करावी' अशी इच्छा केली. व ती सफल होण्याचे साधन म्हणून त्याने अग्निष्टोम यज्ञ केला. त्या यज्ञाच्या सामर्थ्याने प्रजापतीने आपल्या मुखापासून त्रिवृत् नांवाचा स्तोम उत्पन्न केला. त्यामागून अग्निनामक देवता, तिच्या मागून गायत्री नांवाचा छंद, त्यामागून रथंतर नांवाचे साम, त्याच्या मागून मनुष्यांपैकी ब्राह्मण, आणि त्याच्यामागून पशूंच्यापैकी अज म्हणजे बोकड उत्पन्न केला. यामुळे प्रजापतीच्या मुखापासून उत्पन्न झालेले त्रिवृत् स्तोम वगैरे, हे पुढे सांगितल्या जाणाऱ्या स्तोमादिकांच्यामध्ये प्रमुख होत.

वीर्ययुक्त अशा दोन्ही बाहूंपासून (दंडापासून) प्रजापतीने पंचदश स्तोम, त्यामागून इंद्रनामक देवता, तिच्या मागून त्रिष्टुप् नांवाचा छंद, त्यामागून बृहत् नांवाचे साम, त्यानंतर मनुष्यांपैकी राजा, आणि त्यामागून पशूंच्यापैकी मेंढा निर्माण केला. सारांश, बलशाली अशा प्रजापतीच्या बाहूंच्या पासून निर्माण झालेले पंचदश स्तोमादिक हे इतरांच्याहून अधिक बलवान् आहेत.

प्रजापतीने आपल्या उदरापासून सप्तदशनामक स्तोम उत्पन्न केला. त्यामागून विश्वेदेव नांवाच्या देवता, त्यांच्यामागून जगती नांवाचा छंद, त्यामागून वैरूप नांवाचे साम, त्यामागून मनुष्यांपैकी वैश्य, आणि त्यानंतर पशूंच्यापैकी गाई निर्माण केल्या. एवं च, अन्नाला आधारभूत अशा आपल्या उदरापासून प्रजापतीने निर्माण केलेले सप्तदश स्तोम इत्यादिक हे इतरांच्याहून अधिक भोग भोगणार आहेत. विश्वेदेवांच्या सारख्या भूयिष्ठ म्हणजे बहुसंख्याक देवताच्या मागोमाग उत्पन्न झालेले वैश्य हे इतरांच्याहून अधिक धन संपादन करणारे असल्यामुळे ते इतरांच्याहून अधिक भोग भोगणारे असणे, हे साहजिकच आहे.

प्रजापतीने आपल्या दोन्ही पायांपासून एकविंश नांवाचा स्तोम, त्यामागून अनुष्टुप् छंद, त्यामागून वैराज साम, त्यामागून मनुष्यांपैकी शूद्र आणि त्यानंतर

पशूंच्या पैकी अश्व म्हणजे घोडा निर्माण केला. मनुष्यांपैकी शूद्र हा पूर्वोत्पन्न ब्राह्मणादि तिघांच्या मागून उत्पन्न झाला असल्यामुळे, व अश्व हा पूर्वोक्त तीन प्रकारच्या पशूंच्या मागून उत्पन्न झाला असल्यामुळे शूद्र व अश्व हे दोघे भूतसंक्रामी म्हणजे पूर्वोत्पन्न अशा त्रैवर्णिकांच्या आधीन होऊन राहणारे आहेत. त्रैवर्णिकांची सेवा करण्याच्या कर्तव्यामुळे शूद्र हा त्रैवर्णिकांच्या आधीन होऊन राहिलेला, अर्थात् परावलंबी असा असतो. आणि अश्वाला चारही वर्णांच्या लोकांना आपल्या पाठीवर वहावे लागत असल्यामुळे तोही परावलंबी असतो. शिवाय, शूद्र व अश्व हे प्रजापतीच्या पायापासून उत्पन्न झालेले असल्यामुळे, त्या दोघांचाही जीवनक्रम मुख्यत: पायांच्या जिवावर चालतो. पायांनी हेलपाटे घालीत राहणे हेच त्यांच्या जीवनक्रमाचे प्रमुख साधन होऊन राहिलेले असते. याशिवाय, कोणत्याही देवतेच्या मागोमाग शूद्राचा उद्भव झालेला नसल्यामुळे देवतेच्या अनुगामित्वाच्या अभावी तो यज्ञामध्ये प्रवर्तन करण्यास अयोग्य ठरला आहे. अश्वाला तर प्रसंगविशेषी आपल्या पाठीवर स्वारी घेऊन चालता चालताच आढळेल तेथे गवत खाण्याची पाळी येते. तात्पर्य, शूद्र व अश्व यांचे जीवन सर्वस्वी परावलंबी आहे.

त्रिवृत् स्तोम हा प्राण, अपान व व्यान या तीन प्राणांच्या स्वरूप आहे. पंचदश स्तोम हा अर्धमास म्हणजे पंधरा दिवसांच्या समुदायाच्या स्वरूप आहे. सप्तदश स्तोम हा सप्तदशाक्षरात्मक अशा प्रजापतीच्या स्वरूप असून एकविंश स्तोम हा आदित्यरूप आहे. आकाशात तळपत असणारा आदित्य हा बारा महिने, पांच ऋतू आणि तीन लोक या विसांना आधारभूत असणारा एकविसावा आहे. शेवटच्या एकविंशसंज्ञक स्तोमाच्याच ठिकाणी इतर त्रिवृत् इत्यादि स्तोम अंतर्भूत झाले आहेत व एकविंश स्तोमाच्याच ठिकाणी ते प्रतिष्ठेलाही प्राप्त झाले आहेत. सारांश, एकविंश स्तोमाचे हे माहात्म्य जो जाणतो, तो एकविंश स्तोमाचा आश्रय करणारा व त्या स्तोमाच्या ठिकाणी प्रतिष्ठा पावणारा होतो. म्हणजे एकविंश स्तोमाच्या योगाने परिपूर्ण होणाऱ्या अग्निष्टोम यज्ञाचे अनुष्ठान करण्याला व त्या अनुष्ठानापासून प्राप्त होणारे फल भोगण्याला तो विद्वान् समर्थ होतो. (अनुवाक १).

प्रजापतीने जेव्हा अग्निष्टोम यज्ञ केला तेव्हा त्यातील प्रात:सवनामध्ये बहिष्पवमान स्तोत्र 'उपास्मै गायत' या गायत्री छंदातील ऋचेच्या आधाराने

गाइले जावे व ते गाताना त्रिवृत् नामक स्तोमाचा अवलंब करावा, अशी प्रजापतीच्या मनाची प्रवृत्ती झाली. त्याप्रमाणे त्याने बहिष्पवमानस्तोत्रप्रसंगी त्रिवृत् स्तोमाचा उपयोग केला. त्रिवृत् स्तोम हा ब्रह्मवर्चसरूप असल्याने त्याचा उपयोग बहिष्पवमानप्रसंगाने केल्याबद्दल प्रजापतीला संतोष वाटला. परंतु, तेवढ्या संतोषाने त्याची तृप्ती न झाल्यामुळे अग्निष्टोमाच्या माध्यंदिन पवमान स्तोत्राच्या गायनाचे प्रसंगी पंचदशसंज्ञक स्तोमाचा उपयोग करण्याकडे त्याचे मन प्रवृत्त झाले व त्याप्रमाणे शरीरबल व इंद्रियसामर्थ्य यांची प्राप्ती करून देणाऱ्या पंचदश स्तोमाचा माध्यंदिन पवमान स्तोत्राच्या प्रसंगी त्याने उपयोग केला. तथापि, तेवढ्यानेही त्याची तृप्ती झाली नाही. तेव्हा, तृतीय सवनातील शेवटच्या यज्ञायज्ञिय किंवा अग्निष्टोम आर्भवपवमाननामक स्तोत्राचे गान करताना सप्तदश या नांवाच्या स्तोमाचा उपयोग करावा, अशी प्रजापतीच्या मनाची प्रवृत्ती झाली. सप्तदश स्तोम हा प्राजापत्य म्हणजे सप्तदशाक्षरात्मक प्रजापतिस्वरूपाचा व प्रजोत्पत्तीला कारणभूत होणारा असल्यामुळे प्रजापतीने तृतीय सवनातील आर्भव पवमान स्तोत्राच्या गानाचे वेळी त्या सप्तदश स्तोमाचा उपयोग केला व तो संतोष पावला. तथापि, तेवढ्यानेही त्याची पूर्ण तृप्ती न झाल्यामुळे एकविंशनामक स्तोमाचाही आपल्या अग्निष्टोमात उपयोग करावा, अशी त्याच्या मनाची प्रवृत्ती झाली व त्या प्रवृत्तीस अनुसरून त्याने तृतीय सवनाच्या शेवटी गाइल्या जाणाऱ्या यज्ञायज्ञिय किंवा अग्निष्टोम नांवाच्या स्तोत्राच्या गानाच्या प्रसंगी एकविंशनामक स्तोमाचा अवलंब केला, व त्या योगाने त्याच्या मनाची पूर्ण तृप्ती झाली. सारांश, प्रजापतीने त्रिवृत्नामक पूर्वोक्त स्तोमाचे स्वरूप धारण केलेले असतानाच पुढच्या पुढच्या पंचदशादि स्तोमांचे स्वरूप धारण करण्याची प्रवृत्ती ठेवली आणि शिवाय, त्रिवृत् स्तोमाचा उपयोग करण्यास प्रवृत्त असतानाच पुढच्या पुढच्या स्तोमांचा उपयोग करण्यास तो अभिमुखतेने प्रवृत्त झाला.

एवं च, अग्निष्टोम सोमयागात जितके स्तोम उपयोगात आणले जातात, तितक्याच काम्य फलांची त्या स्तोमांच्या योगाने निष्पत्ती होत असते. जितकी काम्य फले निष्पन्न होतात, तितकेच ती फले भोगावयास आश्रयभूत असे देहधारी लोक निर्माण होत असतात, आणि त्या त्या देहधारी लोकांच्या ठिकाणी त्या त्या काम्य फलोपभोगांचा अनुभव घडत असतो. यास्तव, जो कोणी विद्वान् अग्निष्टोम नांवाच्या सोमयागाचे यजन करतो, तो त्रिवृत् इत्यादि

चार स्तोम, त्या त्या स्तोमापासून निष्पन्न होणारी काम्य फले, ती ती फले भोगण्यास योग्य असे देह व त्या देहांच्या द्वारा त्या फलांचे उपभोग यांचे संपादन करतो. (अनुवाक २).

ब्रह्मवादी असे म्हणतात, की, जो कोणी अग्निष्टोम यज्ञ करील त्याने त्यानंतर जर सर्वस्तोम यज्ञ केला तर तो यजमान यज्ञकर्त्यांमध्ये प्रमुख गणला जातो. यास्तव, जो यजमान त्रिवृत्, पंचदश, सप्तदश व एकविंश या चार स्तोमांनी युक्त असा अग्निष्टोम यज्ञ करतो, त्या यजमानाने त्रिवृत् इत्यादि चार स्तोमांशिवाय त्रिणव व त्रयस्त्रिंश ह्या दोन स्तोमांनी अर्थात् सात स्तोमांनी युक्त असा सर्वस्तोमसंज्ञक अतिरात्र यज्ञ करावा.

त्रिवृत् स्तोम हा प्राणरूप आहे. ज्या यजमानाच्या यज्ञात असलेले ऋत्विज त्रिवृत् स्तोमाचा अवलंब करीत नाहीत त्यांनी जणू काय यजमानाच्या प्राणांनाच त्याच्या पासून दूर केल्यासारखे होते. कारण, यजमान हा प्राणांच्या ठिकाणी मला उपभोक्तृत्व लाभावे, असा अभिप्राय मनात ठेवूनच यज्ञाचे अनुष्ठान करीत असतो. त्याच्या यज्ञात ऋत्विजांनी त्रिवृत् स्तोमाचा न विसरता अवलंब करणे अत्यावश्यक आहे.

पंचदश स्तोम हा वीर्यप्राप्तीचे साधन आहे. कोणीही यजमान यज्ञ करतो तो, मला वीर्यलाभ व्हावा, असा हेतू आपल्या मनात धरूनच करीत असतो. यास्तव, ज्या यजमानाचे ऋत्विज त्याच्या यज्ञात पंचदश स्तोमाचा उपयोग करण्याचे विसरतात, ते जणू काय आपल्या यजमानाला वीर्यापासून दूर करतात. यास्तव, यजमानाला वीर्याचा लाभ व्हावा म्हणून त्याच्या यज्ञात पंचदश स्तोमाचा उपयोग ऋत्विजांनी अवश्य करावा.

ज्या यजमानाचे ऋत्विज त्याच्या यज्ञात सप्तदश स्तोमाचा उपयोग करावयाचे विसरतात ते त्या यजमानाला प्रजांच्या पासूनच जणू दूर करतात. कारण, प्रजांच्या ठिकाणी माझे उपभोक्तृत्व असावे, अशा हेतूनेच यजमान यज्ञ करीत असतो. यास्तव, आपल्या यजमानाला प्रजांचा उपभोग लाभावयासाठी ऋत्विजांनी त्याच्या यज्ञात न विसरता सप्तदश स्तोमाचा अवलंब अवश्य करावा.

ज्या यजमानाचे ऋत्विज त्याच्या यज्ञात एकविंश स्तोमाचा उपयोग

करण्यास अंतरतात ते जणू त्या यजमानाच्या प्रतिष्ठेसच अंतरतात. अर्थात् त्यांच्या यजमानास प्रतिष्ठा प्राप्त होत नाही. आणि तो यजमान तर, समाजात आपणास प्रतिष्ठा प्राप्त व्हावी या आंतरिक भावनेने यज्ञ करीत असतो. ऋत्विजांनी त्याच्या यज्ञात न विसरता एकविंश स्तोमाचा उपयोग अवश्यमेव करावा.

त्रिणव स्तोम हा ऋतुरूप असल्याचे श्रुतीने वर्णिले आहे. ज्या यजमानाचे ऋत्विज त्याच्या यज्ञात त्रिणव स्तोमाचा उपयोग करीत नाहीत, ते आपल्या यजमानाला ऋतूंच्यापासून अंतरित करतात. ऋतूंमध्ये सत्तावीस नक्षत्रे अंतर्हित झालेली असतात. 'विराट्' शब्द विविध प्रकारच्या राज्यांचा वाचक आहे. विविध प्रकारच्या राज्यांची प्राप्ती, हे 'विराट्' शब्दाने उपलक्षित होणारे नक्षत्रेष्टींचे फल होय. यज्ञ करणारा यजमान ऋतू व त्यांमध्ये सत्तावीस नक्षत्रांच्या समूहाने अंतर्भूत असणाऱ्या विराट्संज्ञक विविध प्रकारच्या राज्यांचा उपभोग व्हावा, अशी इच्छा धारण करूनच यज्ञ करीत असतो. त्रिणव सोमामध्ये 'स्तोत्रीया' संज्ञक सत्तावीस ऋचा समाविष्ट झालेल्या असल्यामुळे तो ऋतुरूप आणि सत्तावीस नक्षत्रांच्या समूहरूपाने उपलक्षित होणाऱ्या विराट् म्हणजे विविध प्रकारच्या राज्यांच्याही स्वरूपाचा आहे. अर्थात् आपला यजमान त्रिणव स्तोमापासून, म्हणजे सहा ऋतू व सत्तावीस नक्षत्रांच्या समूहाने उपलक्षित असलेल्या विराट् किंवा विविध प्रकारच्या राज्यांपासून अंतरित होऊ नये म्हणून त्याच्या यज्ञात त्रिणव स्तोमाचा उपयोग करणे ऋत्विजांना अत्यंत अवश्य आहे.

त्रयस्त्रिंश स्तोम हा त्रैलोक्यात राहणाऱ्या तेहतीस देवतांच्या स्वरूप आहे. ज्या यजमानाचे ऋत्विज त्याच्या यज्ञात त्रयस्त्रिंश स्तोमाचा उपयोग करण्याच्या कर्तव्यास अंतरतात, ते आपल्या यजमानाला तेहतीस देवतांच्यापासूनच जणू अंतरित करतात. यजमान यज्ञ करण्यास प्रवृत्त झालेला असतो, तो तर तेहतीस देवतांच्या ठिकाणी आपला निकट संबंध राहावा, या हेतूने प्रवृत्त झालेला असतो. यास्तव, ऋत्विजांनी आपल्या यजमानाच्या यज्ञात त्रयस्त्रिंश स्तोमाचा उपयोग करण्याचे विसरू नये. त्या स्तोमाचा उपयोग अवश्य करावा. सारांश, त्रिवृत् इत्यादि एकविंश स्तोमापर्यंतच्या सहा स्तोमांनी युक्त असलेल्या 'अतिरात्र' शब्दोपलक्षित अशा सर्वस्तोम यज्ञाचे यजन अग्निष्टोम

यज्ञ केलेल्या यजमानाने अवश्य करावे.

ज्या यज्ञामध्ये स्तोत्रियांची संख्या अगदीच कमी असलेल्या अर्थात् इतर स्तोमांच्याहून निकृष्ट असलेला त्रिवृत्संज्ञक स्तोम प्रथम उपयोगात आणला जांत असून तोच त्रिवृत्संज्ञक स्तोम, ज्या यज्ञात अंतिम स्तोमाच्या वेळी उपयुक्त केला जात असल्यामुळे परमतेला म्हणजे श्रेष्ठतेला प्राप्त होत असतो, अशा सर्वस्तोमरूप अतिरात्र यज्ञाचे माहात्म्य जाणून जो यजमान त्या यज्ञाचे अनुष्ठान करतो, तो समाजामध्ये सर्वोच्च अशा श्रेष्ठतेला प्राप्त होत असतो. (अनुवाक ३).

अंगिरस महर्षींनी सत्र केले. आणि त्या सत्रानुष्ठानाच्या प्रभावाने ते स्वर्गलोकाला गेले. परंतु, त्यांच्यापैकी 'हविष्मान्' व 'हविष्कृत' या नांवाचे दोघे पुरुष स्वर्गलोकी चिरकाल टिकले नाहीत. त्यांच्या ठिकाणी काही पुण्यांश कमी असल्याने ते पुन्हा खाली मृत्युलोकी आले. नंतर आपण पुन्हा स्वर्गलोकाला जावे, अशी त्या दोघांनी इच्छा केली. तेव्हा द्विरात्र या नांवाचा क्रतू आपणास स्वर्गप्राप्तीविषयी साधनभूत होईल, असे त्यांच्या नजरेस आले. त्याप्रमाणे त्यांनी द्विरात्रसंज्ञक क्रतू करण्याचा निश्चय केला व त्या क्रतूचे त्यांनी अनुष्ठान केले. त्या अनुष्ठानाच्या प्रभावाने ते दोघेही पुन: स्वर्गलोकी गेले. द्विरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणून जो कोणी द्विरात्र क्रतूचे अनुष्ठान करतो, तो निश्चयाने स्वर्गलोकाला प्राप्त होतो.

द्विरात्र क्रतूपैकी मुख्यत: पहिल्या दिवसाच्या म्हणजे पहिल्या दिवशी होणाऱ्या एकदिनसाध्य अशा स्तोमप्रयोगाच्या अनुष्ठानाच्या योगाने हविष्मान् व हविष्कृत् हे दोघे स्वर्गलोकी प्रविष्ट झाले. सहा दिवसांत पूर्ण होणारा 'अभिप्लव' या नांवाचा एक क्रतू असून त्यामध्ये पहिला ज्योतिष्टोमसंज्ञक प्रथमसंख्यारूप अग्निष्टोम केला जात असतो. तो अग्निष्टोमच या ठिकाणी अभिप्लव या शब्दाने उपलक्षित झाला आहे. एवं च, हविष्मान् व हविष्कृत् या दोघांनी जो द्विरात्र क्रतू केला, त्यामध्ये पहिल्या दिवशी त्यांनी अभिप्लवशब्दोपलक्षित अग्निष्टोम केला व दुसऱ्या दिवशी स्वर्गलोकाला अवगत करून देणारा असा 'गति' नांवाचा अतिरात्र क्रतू केला. आता सांगितल्याप्रमाणे पहिल्या दिवशी जो अभिप्लव षडहान्तर्गत ज्योतिष्टोमसंज्ञक अग्निष्टोम क्रतू केला जातो, त्यामध्ये त्रिवृत् इत्यादि चार स्तोम उपयोगात आणले जातात.

या अग्निष्टोम क्रतूच्या प्रभावाने यजमानाला तेजाची प्राप्ती होते. दुसऱ्या दिवशी होणाऱ्या अतिरात्र क्रतूत 'त्रिणव' व 'त्रयस्त्रिंश' या स्तोमांच्या सह पूर्वोक्त सर्व स्तोम उपयोगात आणले जात असल्याने त्यास 'सर्वस्तोम' अशी विशिष्ट संज्ञा आहे. हा सर्वस्तोमसंज्ञक अतिरात्र क्रतू यजमानाला सर्व काही प्राप्त करून देण्याला व सर्व काही त्याच्या स्वाधीन राहण्याला कारणभूत होत असतो. गायत्रीछंदात्मक ऋचेच्या आधाराने गाइले जाणारे गायत्र नांवाचे साम प्रथम दिवशी उद्गात्यांनी गावे. गायत्री छंद हा अग्नीच्या बरोबर उत्पन्न झाला असल्यामुळे तो तेजोरूप व ब्रह्मवर्चसरूप आहे. या सामाचे प्रथम दिवशी गान करण्याच्या योगाने यजमान आपल्या ठिकाणी तेज व ब्रह्मवर्चस् यांचे संपादन करतो. दुसऱ्या दिवशी त्रिष्टुप् छंदातील ऋचेच्या आधारे गाइले जाणारे साम उद्गात्यांनी गावे. हे साम ओजस्वरूप असून सामर्थ्यस्वरूप आहे. या सामाच्या योगाने यजमान आपल्या शरीराचे ठिकाणी कांती व सामर्थ्य ही दोन्ही संपादन करतो. पहिल्या दिवशी होणाऱ्या अग्निष्टोम क्रतूत 'रथंतर' नामक सामाचे 'पृष्ठ स्तोत्र' म्हणून गान करावे. रथंतरसंज्ञक पृष्ठसाम हे पृथ्वीरूप आहे. या सामाच्या गानप्रभावाने यजमान पृथ्वीच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. दुसऱ्या दिवशीच्या अतिरात्र क्रतूत पृष्ठसाम या नांवाचे बृहत् साम गावे. बृहत् साम हे द्युलोकरूप आहे. या सामाच्या गानप्रभावाने यजमान द्युलोकामध्ये प्रतिष्ठित होतो. या ठिकाणी ब्रह्मवादी असा प्रश्न उपस्थित करतात की, पूर्वोक्त द्विरात्र क्रतूमध्ये पहिल्या दिवशी गायत्री छंदाचा व दुसऱ्या दिवशी त्रिष्टुप् छंदाचा उपयोग सामगानाच्या रूपाने केला जातो, पण मुख्य असलेल्या चार छंदांपैकी जगती व अनुष्टुप् हे दोन छंद उपयोगावाचून राहतात, त्यांची वाट काय? त्यावर दुसरे ब्रह्मवादी अशी तडजोड सुचवितात की, पहिल्या दिवशी बृहती छंदाच्या आधारे गाइले जाणारे वैखानससंज्ञक साम गावे. बृहती छंदाची अक्षरे छत्तीस असतात. जगती छंदाचा प्रत्येक चरण बाराअक्षरी असतो. अर्थात् बृहती छंदाच्या आधारे वैखानस साम गाण्यात चरणरूपाने का होईना, पण जगती छंदाचा अंतर्भाव केल्यासारखे होते. दुसऱ्या दिवशीच्या अतिरात्र क्रतूत षोडशी म्हणजे सोळावे साम गाताना 'गौरिवीत' नांवाचे साम गावे. हे साम ज्या ऋचेच्या आधाराने गाइले जाते, त्या ऋचेमध्ये अनुष्टुप् छंद अंतर्भूत होत असतो. एवं च, अशा प्रकारे सामगानाची व्यवस्था केल्याने गायत्री, त्रिष्टुप्, जगती व अनुष्टुप् हे चारही मुख्य छंद उपयुक्त केल्याचे

श्रेय मिळते.

दुसरे कोणी ब्रह्मवादी असे म्हणतात की, शुक्ल पक्ष किंवा कृष्ण पक्ष हे एका महिन्याचे समसमान असे दोन अर्ध विभाग आहेत. वास्तव, या दोन पक्षांपैकी कोणत्याही अर्धमासरूपी एकाच विभागात जर द्विरात्र क्रतूच्या दोनही दिवसांचे अनुष्ठान झाले तर एकाच अर्धमासाने जितके वीर्य निष्पन्न व्हावयाचे तेवढेच होईल व एका अर्धमासाचे वीर्य निष्पन्नच होणार नाही. वास्तव, कृष्णपक्षाच्या शेवटच्या म्हणजे अमावास्येच्या दिवशी द्विरात्र क्रतूच्या पहिल्या दिवसाचे, आणि शुक्लपक्षाच्या प्रथम दिवशी म्हणजे प्रतिपदेच्या दिवशी दुसऱ्या दिवसाचे अनुष्ठान करावे. असे केल्याच्या योगाने निरनिराळ्या दोन अर्धमासांमध्ये मिळून द्विरात्र क्रतू केल्यासारखे होऊन दोनही अर्धमासांच्या योगाने जे वीर्य निष्पन्न व्हावयाचे ते होईल. कोणतेही साम पांच विभागांनी गाइले जात असून पांचव्या विभागास 'निधन' असे नांव आहे. द्विरात्र क्रतूच्या पहिल्या दिवशी 'हावस्मत्' या शब्दाने युक्त असलेले 'निधन' गावे व दुसऱ्या दिवशी 'हविष्कृत्' या शब्दाने युक्त असलेले निधन गावे. अशाप्रकारे दोन पायांच्या सदृश असलेली ही दोन 'निधने', अनुक्रमाने दोन दिवसांमध्ये गाईली असता ती यजमानाला प्रतिष्ठित समाजात प्रतिष्ठित करण्याला कारणभूत होतात. (अनुवाक ४).

हे जगत् किंवा आज दिसणारी ही पृथ्वी उत्पन्न होण्यापूर्वी सलिल संज्ञक उदक तेवढेच एक होते. त्यावेळी प्रजापतीला मूर्त शरीर धारण करून राहावयास कोठेच स्थान नसल्यामुळे त्याने वायूचे रूप धारण केले आणि तो त्या अथांग उदकात वायुरूपाने इतस्ततः संचार करीत राहिला. अशा प्रकारे संचार करीत असता, त्याला उदकांच्या तळाशी भूमी असल्याचे आढळून आले. त्याबरोबर त्याने वराहाचे म्हणजे रानडुकराचे रूप धारण करून आपल्या तीक्ष्ण दाढेने उदकाच्या तळाशी असलेली भूमी उकरून वर काढली. मग वराहरूपाचा त्याग करून प्रजापती विश्वकर्मा झाला आणि त्याने उदकपृष्ठावर आणलेल्या त्या भूमीच्या ठिकाणचा सर्व ओलेपणा पुसून तिला कोरडी केली आणि तिचा विस्तार केला. अशा प्रकारे प्रजापतीने भूमीचे प्रथन म्हणजे विस्तार केल्यापासून भूमीलाच 'पृथ्वी' हे नांव पडले. प्रजापतीच्या हातून प्रथन किंवा विस्तृत रूपाला प्राप्त होणे, हेच पृथ्वीत्व होय.

प्रजापतीने शरीर धारण केले व त्या पृथ्वीवर तो बसला व सृष्टी निर्माण करण्याच्या हेतूने परिश्रमपूर्वक त्याने तप केले. त्या तपःप्रभावाच्या योगाने त्याने वसू, रुद्र व आदित्य नांवाचे तीन देवसमुदाय निर्माण केले. त्या देवांनी प्रजापतीला प्रश्न केला की, आमच्यापासून प्रजा उत्पन्न व्हावी, यास्तव आम्ही काय उपाय करावा? प्रजापती त्यांना म्हणाला की, हे देव हो, सृष्टी निर्माण करण्याचा उपाय म्हणून मी जसे प्रथम तप केले, तसेच तुम्हीही तप करा. त्या तपश्चर्येमध्येच तुम्ही प्रजोत्पत्तीची तीव्र इच्छा प्रतिबिंबित करा. नंतर प्रजापतीने त्या वस्वादि देवांना तपश्चर्येचे आधारभूत साधन म्हणून अग्नी दिला. व त्या अग्नीच्या ठिकाणी तुम्ही होमरूप तपश्चर्या करा, असे त्यांना सांगितले. त्या देवांनी एक वर्षभर त्या अग्नीच्या ठिकाणी होमरूप तप केले व त्या तपःप्रभावाने एक वर्षाच्या शेवटी त्या सर्व देवांनी मिळून एक गाय उत्पन्न केली. प्रजापतीने ती गाय रक्षण करण्यासाठी वसूंना दिली. वसुसंज्ञक देवांनी त्या गाईचे रक्षण उत्तम प्रकारे केले. तेव्हा त्या गाईने वसूंच्या करिता आपणापासून तीनशे तेहतीस गाई उत्पन्न केल्या. नंतर ती गाय प्रजापतीने रुद्रांना रक्षण करण्यासाठी दिली. रुद्र त्या गाईने संरक्षण करीत असता त्या गाईने रुद्रांच्या करिता आपणापासून तीनशे तेहतीस गाई उत्पन्न केल्या. नंतर प्रजापतीने ती गाय आदित्यसंज्ञक देवांना रक्षणासाठी दिली. आदित्य त्या गाईचे संरक्षण करीत असता, तिने आदित्यांच्या करता पुनः स्वतःपासून तीनशे तेहतीस गाई उत्पन्न केल्या. सारांश, प्रजापतीने वस्वादि देवगणांना दिलेली ती एकच गाय कालांतराने 'सहस्रतमी' म्हणजे स्वतःच हजार गाईंची निर्माणकर्त्री झाली.

वसू, रुद्र व आदित्य हे तिन्ही देवगण एकत्र होऊन प्रजापतीला म्हणाले की, तू आमच्याकडून सहस्रदक्षिणात्मक सोमयागाचे यजन करीव. तेव्हा प्रजापतीने त्या तिघा देवगणांच्याकडून त्रिरात्रसंज्ञक याग करविला. प्रथम दिवशी वसूंच्या कडून द्वादशस्तोत्रात्मक अग्निष्टोम यज्ञ करविला. त्या यज्ञाच्या प्रभावाने वसूंनी हा भूलोक संपादन केला. वसूंनी आपल्या जवळच्या तीनशे तेहतीस गाई अग्निष्टोम यज्ञाची दक्षिणा म्हणून दिल्या. दुसऱ्या दिवशी प्रजापतीने रुद्रांच्या कडून पंचदशस्तोत्रात्मक उक्थ्य यज्ञ करविला. त्या यज्ञाच्या प्रभावाने रुद्रांनी अंतरिक्ष लोक संपादन केला. आपल्या जवळच्या तीनशे तेहतीस गाई त्यांनी उक्थ्य यज्ञाची दक्षिणा म्हणून ऋत्विजांना दिल्या. प्रजापतीने

तिसऱ्या दिवशी आदित्यांच्याकडून एकोणतीस स्तोत्रांनी युक्त असा अतिरात्रसंज्ञक यज्ञ करविला. त्या यज्ञाच्या प्रभावाने त्यांनी द्युलोक संपादन केला. आपल्या जवळच्या तीनशे तेहतीस गाई आदित्यांनी अतिरात्र क्रतूची दक्षिणा म्हणून दिल्या. या गाईंच्या बरोबर मूळची असलेली सहस्रतमी गायही दक्षिणा म्हणून त्या तिघा देवगणांनी दिली. सारांश, अशा रीतीने त्या तिघा देवगणांच्या कडून प्रजापतीने सहस्रदक्षिणात्मक अशा त्रिरात्र क्रतूचे यजन करविले.

रुद्रांनी जे अंतरिक्ष जिंकले होते, म्हणजे संपादन केले होते, ते विशीर्ण अर्थात् छिन्नविच्छिन्न झाले. त्यामुळे त्या ठिकाणी रुद्रांना राहण्यासाठी स्थान मिळेनासे झाल्यामुळे रुद्र क्रुध्द झाले. व त्या क्रोधाच्या भरात ते प्राण्यांचा घात करण्यास प्रवृत्त होऊ लागले. त्रिरात्र यागापैकी मधल्या दिवशीच्या रुद्रांच्याकडून झालेल्या उक्थ्यसंज्ञक यागाच्या अनुष्ठानात काही तरी शैथिल्य झाले असले पाहिजे, व त्या शैथिल्यदोषामुळेच रुद्रांनी त्या क्रतूपासून संपादन केलेल्या अंतरिक्षात शैथिल्य अर्थात् छिन्नविच्छिन्नता उत्पन्न झाली असावी, असे अभिज्ञ याज्ञिक म्हणतात. अर्थात् त्रिरात्र क्रतूच्या मधल्या दिवशी होणाऱ्या उक्थ्य यागाच्या अनुष्ठानात कोणतेही शैथिल्य उत्पन्न न होता दृढता निर्माण व्हावयासाठी होत्याने त्रिष्टुप् छंदातील ऋचांपासून निष्पन्न झालेले 'आज्य' संज्ञक 'शस्त्र' पठण करावे. त्याचप्रमाणे 'संयान' नांवाच्या सूक्तांचे व 'षोडशी' नांवाच्या शस्त्राचे त्या दिवशी प्रयोगानुक्रमाने पठण करावे. अशा प्रकारे पठण केलेले 'आज्य' शस्त्र, 'संयान' नामक सूक्ते व षोडशी शस्त्र, ही त्या दिवशी होणाऱ्या उक्थ्य यागाच्या ठिकाणी शैथिल्यरहित अशा प्रकारची दृढता निर्माण करण्यास कारणभूत होतात. सारांश, वस्वादि देवांनी अनुक्रमे एकेक दिवस एकेका यागाचे अनुष्ठान करून तीन्ही लोकांचे संपादन केले असल्यामुळे त्रैलोक्यसंपादनेच्छू यजमानानेही 'त्रिरात्र' संज्ञक यागाचे अनुष्ठान करावे. या त्रिरात्र यागातील पहिल्या दिवशी अग्निष्टोमच करावा आणि दुसऱ्या दिवशी उक्थ्य व नंतर तिसऱ्या दिवशी अतिरात्र करावा. अशा प्रकारे केलेला त्रिरात्र याग यजमानाच्या ठिकाणी तीन्ही लोकांचे धारण करण्यास कारणभूत होतो.

त्रिरात्र क्रतूतील तीन दिवसांमध्ये अनुक्रमे एकेक दिवस होणाऱ्या अग्निष्टोमादि तीन यागांच्या प्रसंगाने दररोज खंड न होऊ देता, तीन तीनशे । गाई दक्षिणा म्हणून देत जाव्यात. या विधानामध्येच तीनशेंच्या संख्येबरोबरच आणखी

तेहतीस गाई दररोज देत जाव्यात, हेही उपलक्षणाने सूचित आहे असे समजावे. अशा प्रकारे तीन दिवसांत मिळून नऊशे नव्याण्णव गाईंचे दक्षिणादान यजमानाच्या ठिकाणी तीन्ही लोकांचे धारण सांतत्याने व्हावयास कारणभूत होते.

दहा गाईंच्या वर्गाला 'दशत' अशी संज्ञा आहे. वेदीच्या दक्षिणेस उभ्या केलेल्या गाई दक्षिणा म्हणून देण्यासाठी प्राग्वंश व सद या दोन मंडपांच्या मधून उत्तर दिशेस नेताना गाईंचे एक एक दशत एकदम घेऊन जावे. त्यात न्यूनाधिक्य होऊ देऊ नये. कारण दहा ही संख्या चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने 'विराट्' छंदस्वरूप आहे. अर्थात् विराट् छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या दशतात म्हणजे दहा गाईंच्या समुदायात मी विच्छेद करणार नाही, हाच दहा दहा गाई एकदम घेऊन जाणाराचा मनोभाव असतो. दहा दहा गाई समुदायाने नेत असताना शेवटी तीन गाई उरतात. त्या शेवटच्या दशताबरोबर न्याव्यात. याप्रमाणे दररोज तीनशे तेहतीस गाई तीन दिवसात दक्षिणा म्हणून दिल्या असता सहस्रतमी या नांवाची एक गाय शिल्लक राहते. तिच्या दानाविषयी जे निरनिराळे विकल्प श्रुतीमध्ये प्रदर्शित केले आहेत, ते असे. शिल्लक राहिलेल्या सहस्रतमी गाईविषयी इंद्र व विष्णू या दोघांच्यामध्ये कलह उत्पन्न झाला. इंद्र म्हणे, ही गाय माझी आहे आणि विष्णू म्हणे ही गाय माझी आहे. इंद्राला वाटे की, ही गाय एकट्या विष्णूने घेतली तर या गाईपासून तो हजार गाई उत्पन्न करील व त्यांतल्या मला काहीच देणार नाही. आणि मला तर त्या गाईंपैकी अधिक भाग मिळाला पाहिजे. शेवटी दोघांनी परस्परांमध्ये अशी तडजोड ठरविली की, ही गाय दोघांची समाईक समजावी. या गाईपासून होणाऱ्या संततीमध्ये दोन भाग इंद्राचे असावेत व तिसऱ्या भागावर विष्णूची सत्ता असावी. अशा प्रकारे सहस्रतमी गाई विषयी इंद्र व विष्णू यांमध्ये झालेल्या तडजोडीचे प्रतिपादन करणारी 'उभा जिग्यथुर्न परा जयेथे' असा प्रारंभ असलेली एक ऋचा वेदांमध्ये पठित झालेली आहे. या ऋचेचे शंसन म्हणजे पठण 'अच्छावाक' नांवाचा ऋत्विज करीत असतो.

दररोज तीनशे तेहतीस गाई दिल्यानंतर सहस्रतमीसंज्ञक जी गाय शिल्लक उरते, ती होत्याला द्यावी. कारण यागांमध्ये अतिरिक्त अर्थात् उरलेले जे द्रव्य असते, ते होत्याला अनुलक्षूनच उरलेले असते. शिवाय, जे फळ

अप्राप्त असेल ते यजमानाला होता प्राप्त करून देत असतो. यास्तव, उर्वरित असलेली गाय होत्याला द्यावी हे योग्य आहे.

कोणी म्हणतात की, ही गाय उन्नेत्याला द्यावी. कारण, हजार गाईंमध्ये हीच गाय इतरांच्याहून अधिक वीर्यसंपन्न असते. व ऋत्विजांमध्ये 'उन्नेता' हा इतरांहून अधिक वीर्यवान् असतो. अर्थात् अधिकवीर्यसंपन्न गाय अधिक वीर्यवान् अशा उन्नेत्याला देणे युक्त होय.

कोणी म्हणतात की, ही गाय सदोमंडपात जे कोणी बसले असतील त्या सर्वांना द्यावी. दुसरे कोणी म्हणतात की, तीन दिवस समविभाग अशा गाईंची दक्षिणा देऊन , शेवटी उरलेली ही गाय कोणालाच न देता यज्ञभूमीच्या ठिकाणी तिला यथेच्छ संचार करता येईल अशा प्रकारे मोकळीच सोडून द्यावी. कोणी म्हणतात की, ब्रह्मा व आग्नीध्र या दोघांना मिळून ती गाय विभागून द्यावी. दोन भाग ब्रह्माला द्यावेत व तिसरा भाग आग्नीध्राला द्यावा. ब्रह्मा हा इंद्राचा उपलक्षक समजावा व आग्नीध्र हा विष्णूचा उपलक्षक समजावा. अर्थात् या दोघांना ती गाय दिल्याने श्रुतीमध्ये प्रतिपादित झाल्याप्रमाणे इंद्र व विष्णू या दोघांनाच जणू ती गाय दिल्यासारखे होईल.

कोणी म्हणतात, ही सहस्रतमी गाय कोणालाच देऊ नये. तिचा प्रतिनिधी म्हणून पुष्कळ दूध देणारी व विचित्र रंगाची अशी दुसरीच एखादी गाय कोणास द्यावयाची ती द्यावी. कोणी असेही म्हणतात की, सहस्रतमी गाय कोणास न देता तिच्या ऐवजी सहस्र गाईंची भरती होण्यासाठी दुरंगी म्हणजे पांढऱ्या व तांबड्या रंगाची असून जिच्या दोन्ही बरगड्यांवरील केस पांढरे असतील अशी जी गाय असेल ती द्यावी.

सारांश, त्रिरात्रसंज्ञक क्रतूसंबंधी आतापर्यंत जे कर्म प्रतिपादित केले, ते यजमानाला हजार संख्येने फलप्राप्ती करून देण्यास हेतुभूत असे आहे. कारण, तीन दिवसांत पूर्ण होणाऱ्या या क्रतूत 'स्तोत्रीया' संज्ञक हजार ऋचा अंतर्भूत झालेल्या असतात. दक्षिणाही हजार गाई देण्यात येते. सुखाच्या अधिकत्वामुळे स्वर्गलोक हा हजारभूलोकांसमान आहे. अर्थात् यजमानाला स्वर्गलोकाचा अभिजय प्राप्त करून देण्याला 'त्रिरात्र' क्रतूविषयक कर्म हे सर्वथैव योग्य आहे. (अनुवाक ५).

पूर्वी एकदा सोमाने हजार गाई मिळविल्या. त्याच्या मागोमाग इंद्रानेही हजार गाई मिळविल्या. सोम व इंद्र या दोघांच्याकडे यमही गाईंचा काही भाग मिळविण्याच्या इच्छेने आला, व तुम्ही मिळविलेल्या गाईंमध्ये मलाही काही भाग असावा, असे त्या दोघांना म्हणाला. तेव्हा सोम व इंद्र या दोघांनी, ठीक आहे, या हजार गाईंमध्ये तुलाही काही भाग असावा, हे आम्हाला मान्य आहे, असे यमाला सांगितले. नंतर यमाने त्या हजार गाईंचे परीक्षण केल्यावर सहस्रतमी ही एकच गाय हजार गाईंचे सामर्थ्य धारण करणारी आहे, असे त्याला आढळून आले. नंतर यम सोम व इंद्र या दोघांनाही म्हणाला की, सहस्रतमी ही एकच गाय माझी असावी. शेवटी आपण सर्व मिळून उत्कृष्ट अशा या 'सहस्रतमी' गाईच्या ठिकाणी असलेल्या सामर्थ्याची परीक्षा करू. आणि नंतर तिच्या सामर्थ्याचा एक एक अंश आपण घेऊ, असे त्यांनी ठरविले व त्याप्रमाणे त्या गाईच्या सामर्थ्याचा एक एक अंश तिघांनी घेतला. त्याचा प्रकार असा त्या तिघांनी एकत्र होऊन उत्तम अशा त्या सहस्रतमी गाईला उदकामध्ये घातली आणि तिला ते म्हणाले की, सोमाला योग्य वाटेल अशा प्रकारचे स्वरूप धारण करून तू जलप्रवाहाबाहेर ये. नंतर उदकामध्ये प्रविष्ट झालेली ती गाय शरीराचा रंग तांबडा, डोळे पिंगट व वयाने एक वर्षाची, अशा प्रकारचे रूप धारण करून आपल्या सोबत इतर तीनशे तेहतीस गाईंना घेऊन उदकाबाहेर आली. एवं च, सहस्रतमी गाईने ज्या अर्थी सोमाकरिता पूर्वोक्त रूप धारण केले, त्या अर्थी ताम्रवर्णी, पिंगट नेत्राची व वयाने एक वर्षाची असेल त्या गाईच्या मोबदल्यानेच सोमविक्रयी माणसाकडून यजमानाने सोम विकत घ्यावा. अशा प्रकारच्या सोमक्रयाचे माहात्म्य जाणून जो यजमान तांबड्या रंगाच्या, पिंगट नेत्राच्या व एक वर्ष वयाच्या गाईच्या मोबदल्याने सोम विकत घेतो, त्याने तीनशे तेहतीस गाई देऊन सोम विकत घेतल्यासारखे होते. आणि तो यजमान सुक्रीत म्हणजे उत्तम असा मोबदला देऊन घेतलेल्या त्या सोमाने यथासांग यजन करतो.

त्या तिघा देवांनी, पुन्हा ती गाय उदकामध्ये पोहणीस घातली व ते तिला म्हणाले की, इंद्राला योग्य असे स्वरूप धारण करून तू उदकाबाहेर ये. त्या गाईने तांबूस रंगाचे शरीर सर्वांगसुंदर अशा अवयवरूप लक्षणांनी संपन्न, पाहताक्षणीच मनाचे क्लेश दूर करणारी व वयाने चार वर्षांची असणाऱ्या

गाईचे स्वरूप धारण करून व आपल्या बरोबर तीनशे तेहतीस गाई घेऊन ती उदकाबाहेर आली. यास्तव यजमानाने आपल्या यज्ञात तांबूस रंगाची, सर्वांगसुंदर, मन:क्लेशहारक व चार वर्षे वयाची गाय दक्षिणा म्हणून द्यावी. हे जाणणारा जो यजमान आपल्या यज्ञात तांबड्या रंगाची, सुलक्षण, मनोहर व चार वर्षे वयाची गाय देतो त्याने इंद्राला प्रिय अशा गाईचे तीनशे तेहतीस गाईंसह दक्षिणादान केल्यासारखे होते.

पुन्हा त्या तिघा देवांनी त्या गाईला उदकामध्ये पोहणीस घातली व तिला म्हणाले की, यमाला प्रिय असे स्वरूप धारण करून तू उदकाबाहेर ये. तेव्हा त्या गाईने वयोवृद्ध, स्वभावाने रागीट व अनन्य अशा प्रकारे अत्यंत कुरूप अशा गाईचे रूप धारण करून आणि आपल्या बरोबर तीनशे तेहतीस गाई घेऊन ती उदकाबाहेर आली. यास्तव, वयाने म्हातारी, मूर्ख म्हणजे रागीट स्वभावाची व कुरूपांतली कुरूप अशी गाय अनुस्तरणी करावी. म्हणजे मृत पुरुषाच्या अवयवांवर अवयव ठेवण्यासाठी मारावी. हे जाणून जो आता सांगितलेल्या लक्षणांची गाय अनुस्तरणी म्हणून नियोजित करतो, त्याला तीनशे तेहतीस गाईंच्यासह ती गाय परलोकी उपभोगावयास मिळते.

आता वर्णन केल्याप्रमाणे जी सहस्रतमी गाय निरनिराळी रूपे धारण करून उदकाबाहेर आली, ती वाग्देवताच होय. यास्तव, सहस्रदक्षिणात्मक यागात श्रेष्ठ असा गोविशेषरूप वर द्यावा. सहस्रतमीसंज्ञक गाय म्हणजेच गोविशेष होय. तो वर सहस्रस्वरूप असा असल्याने तो दिला असता सहस्रतमी गाईचे दान दिल्यासारखे होते. मात्र श्रेष्ठ असा हा गोविशेषरूप 'वर' सहस्रस्वरूप असल्यामुळे त्या वराचा प्रतिग्रह विचारी ब्राह्मणाने करू नये. कारण, त्याचा प्रतिग्रह केल्यास हजार गाईंचा प्रतिग्रह केल्याचा दोष लागतो. कदाचित् प्रतिग्रह करावयाचा झाल्यास हा जो 'वर' आहे, तीच ही सहस्रतमी गाय आहे, असा त्या वराविषयी निर्देश करावा आणि दुसऱ्या गाईला उद्देशून वराव्यतिरिक्त असणारी ही गाय माझी आहे, असे म्हणावे. म्हणजे या वराचा प्रतिग्रह करणाऱ्याला हजार गाईंचा प्रतिग्रह केल्याचा दोष लागत नाही.

सहस्रतमी म्हणून जी गाय द्यावयाची ती गाय, जिच्या दोनही बरगड्यांवर पांढऱ्या रंगाच्या रेषा आहेत, अशी असावी. कोणी अभिज्ञ असे म्हणतात की, जिच्या एकाच बरगडीवर पांढऱ्या रंगाच्या रेषा असतील, अशी ती

गाय असावी. कारण, सहस्ररूप अशा गोविशेषात्मक वराच्या पलीकडे दक्षिणा दिल्या जाणाऱ्या हजार गाईचा समुदाय उभा असल्यामुळे त्या सहस्रतमी गाईंच्या दोन्ही बरगड्यांच्या ठिकाणी पांढऱ्या रेघा असण्याची अवश्यकता नाही.

जी गाय कल्याणी म्हणजे भरपूर दूध देणारी व सर्व अवयव रेखीव असलेली असेल ती गाय सहस्रतमी गाईची प्रतिनिधी म्हणून वर देण्यास योग्य असते. तिचे दान यजमानाच्या समृद्धीला कारणभूत होत असते. जी गाय दक्षिणा म्हणून द्यावयाची असेल ती आग्नीध्रशालेच्या उत्तर बाजूने प्रदक्षिणाकार वळवून आहवनीयाच्या समीप ठेवलेल्या द्रोणकलशातील सोमरसाचे तिच्याकडून अवघ्राण करवावे. म्हणजे तो सोमरस तिच्याकडून हुंगवावा. ती सोमरस हुंगत असताना, 'हे मही, द्रोणकलशात साठविलेला सोमरस तू सर्व बाजूंनी हुंग, तू लांब लांब अशा धारांच्या योगाने भरपूर दूध देणारी आहेस, नद्या जश्या समुद्रात प्रविष्ट होतात त्याप्रमाणे सोमबिंदू तुझ्या ठिकाणी प्रविष्ट होवोत, अत्यंत उत्कृष्ट अशी तू सर्व बाजूंनी मला हजार गाई मिळवून दे, त्याच प्रमाणे प्रजा व पशू यांच्या सहित धन पुन्हा माझ्या ठिकाणी सतत टिकून राहो,' अशा अर्थाचा, 'आजिघ्र कलशं' हा मंत्र म्हणावा. द्रोणकलशातील सोमरसाचे गाईकडून केले जाणारे अवघ्राण प्रजा, पशू व धन यांच्या योगाने यजमानाला समृद्ध करते. गाईकडून केल्या जाणाऱ्या सोमरसाच्या अवघ्राणाचे महत्त्व जो जाणतो तो प्रजावान् पशुवान, व धनसंपन्न होतो. त्या गाईसह पुन्हा आग्नीध्रशालेत परत यावे आणि आग्नीध्रशाळेतील अग्नीच्या पूर्वेस ती गाय पश्चिमाभिमुख असताना 'हे इंद्राविष्णू हो, तुम्ही सर्वत्र विजय मिळविलेला आहे, तुम्ही केव्हाही पराजित झालेले नाही, तुम्हा दोघांपैकी एकही कोणी कधी पराजित झालेला नाही, हे विष्णो, तू आणि इंद्र जेव्हा एकमेकांशी भांडलात, तेव्हा हजार गाईंचा समूह तीन ठिकाणी विभागला गेला व त्यांपैकी दोन भाग इंद्राला व एक भाग तुला प्राप्त झाला आहे', अशा अर्थाचा 'उभा जिग्यथुर्न पराजयेथे' हा मंत्र म्हणून आग्नीध्रशाळेतील अग्नीवर एक आहुती द्यावी.

त्रिरात्र क्रतूमध्ये दररोज तीनशे तेहतीस गाई, याप्रमाणे यजमान जी दक्षिणा देतो, तीमध्ये शेवटच्या दिवशी सहस्रतमी गाईची भरती घालून तो

गाईंची हजार ही संख्या पूर्ण करतो. म्हणजे त्या सहस्रतमी गाईलाच जणू तो सहस्रसंख्येने युक्त करतो. इतकेच नव्हे तर हजार गाईंच्या ठिकाणी मिळून जितके महत्त्व असू शकते, तितक्याने तो त्या सहस्रतमी गाईला युक्त करतो. नंतर 'रोहिण्यै स्वाहा' अशा प्रकारे मंत्रयोजना करून सहस्रतमी गाईने धारण केलेल्या रूपांचे हवन करावे. म्हणजे त्या योगाने अध्वर्यूने त्या सहस्रतमी गाईला त्या त्या रूपांनी समृद्ध केल्यासारखे होते. मग त्या गाईच्या जवळ यावे आणि तिच्या कानात 'इडे रंतेऽदिते' हा मंत्र जपावा. 'कोणाकडूनही अवध्य असलेल्या हे सहस्रतमी तू निष्पाप आहेस, इडे, रन्ते, अदिते, सरस्वति, प्रिये, प्रेयसि, महि, विश्रुति, अशा अनेक नांवांनी तुला हाका मारल्या जात असतात, त्याप्रमाणे मी देखील तशाच रीतीने तुला हाका मारीत आहे, तू देवसमुदायात मज यजमानाला पुण्यकर्मा असे म्हणून माझा गौरव कर'. एवं च, यजमानाने सहस्रतमी गाईच्या कानात आता सांगितलेल्या अर्थाचा मंत्र जपला असता, ती त्या यजमानाला देवसमुदायात वाखाणते व देवही त्या यजमानाला पुण्यकर्मा म्हणून ओळखतात (अनुवाक ६).

सहस्रतमी गाईच्या योगाने यजमान स्वर्गलोकाला जातो. ती सहस्रतमी गाय, त्याला स्वर्गलोकी पोचविते. यास्तव, 'हे सहस्रतमी, गोसहस्रतुल्य अशी तू मला स्वर्गलोकी पोचीव', अशा अर्थाचा 'सा मा सुवर्गं लोकं गमय' हा मंत्र म्हणून यजमानाने सहस्रतमी गाईचे अभिमंत्रण करावे. म्हणजे तिला स्पर्श करावा. असे केले असता ती सहस्रतमी गाय यजमानाला स्वर्गलोकी नेऊन पोचविते. तिला स्पर्श करून 'सा मा ज्योतिष्मंतं लोकं गमय' हा मंत्र म्हणावा. 'गोसहस्रतुल्य अशी तू मला प्रकाशमान अशा आदित्यलोकात पोचीव', असा त्या मंत्राचा अर्थ आहे. या मंत्राने सहस्रतमीला स्पर्श केला असता ती यजमानाला प्रकाशमान अशा आदित्यलोकी निश्चयाने पोचविते. नंतर तिला स्पर्श करून 'सा मा सर्वान् पुण्यान् लोकान् गमय' हा मंत्र म्हणावा. 'गोसहस्रतुल्य अशी तू मला पुण्यरूप अशा इंद्रलोकादि सर्व लोकांना पोचीव', असा पूर्वोक्त मंत्राचा अर्थ आहे. या मंत्राने स्पर्श केला असता ती सहस्रतमी गाय यजमानाला पुण्यरूप अशा इंद्रादि सर्व लोकांना पोचविते. नंतर 'गोसहस्रतुल्य अशी तू मला प्रतिष्ठेला प्राप्त कर आणि प्रजा व पशू यांच्यासह धन माझ्या ठिकाणी पुन्हा प्राप्त होऊन सतत टिकून राहो',

अशा अर्थाचा 'सा मा प्रतिष्ठां........रयि:' हा मंत्र म्हणावा. असे केले असता ती सहस्रतमी गाय यजमानाला प्रजा व पशू यांच्या सहवर्तमान असलेल्या धनाच्या ठिकाणी प्रतिष्ठित करते.

अशा प्रकारे सहस्रतमी गाईला मंत्रपूर्वक अभिमंत्रण करण्याचे माहात्म्य जो जाणतो तो, प्रजावान्, पशुवान् आणि धनसंपन्न होतो.

ही सहस्रतमी गाय आग्नीध्राला, ब्रह्म्याला, होत्याला, उद्गात्याला किंवा अध्वर्यूला द्यावी. ही गाय दिल्याने त्या ऋत्विजाला हजार गाई दिल्याचे श्रेय लागते. गोसहस्रतुल्य अशा सहस्रतमी गाईच्या प्रतिग्रहाचा मंत्र जाणत नसलेला जो कोणी ऋत्विज त्या गाईचा प्रतिग्रह करील त्याला हजार गाईंचा प्रतिग्रह केल्याचा दोष लागेल. यास्तव, त्या गाईचा प्रतिग्रह करते वेळी, 'तू एकच आहेस, तू हजार गाईंचा संघ नाहीस, यास्तव, एकमेव अशा तुझाच मी प्रतिग्रह करीत आहे, हजार गाईंच्या संघाचा मी प्रतिग्रह करीत नाही, यास्तव, तू एकटीच माझ्या सन्निध प्रवेश कर, गोसहस्ररूप होऊन तू माझ्या सन्निध येऊ नकोस', अशा अर्थाचा 'एकासि न सहस्रं' हा मंत्र म्हणावा, सारांश, या प्रतिग्रह मंत्राचे ज्ञान असलेला जो ऋत्विज हा मंत्र म्हणून सहस्रतमी गाईचा प्रतिग्रह करतो, त्याने एकट्याच सहस्रतमी गाईचा प्रतिग्रह केल्यासारखे होते, व सहस्र गाईंचा प्रतिग्रह केल्याचा दोष त्याला लागत नाही.

सहस्रतमी गाईचा प्रतिग्रह केल्यानंतर, 'हे सहस्रतमी, तू मला सुखप्रद आहेस, धार काढण्याचे वेळी तू सुखाने माझ्याजवळ येणारी आहेस, त्याचप्रमाणे तुझे शरीर खाजवून तुझे चोज तू मला सुखाने करू देणारी आहेस', अशा अर्थाचा 'स्योनासि सुषदा' हा मंत्र म्हणावा. म्हणजे ती गाय प्रतिग्रह करणाराला सुखप्रद, धार काढण्याचे वेळी त्याच्याजवळ सुखाने जाणारी व सुखाने खाजवू देणारी अशी होऊन त्याच्याजवळ राहते व त्याला कधीही ढुशा देऊन त्रास उत्पन्न करीत नाही.

ब्रह्मवादी असा विचार करतात की, हजार गाईंचा समुदाय सहस्रतमी गाईच्या पुढे चालवावा किंवा हजार गाईंच्या पुढे सहस्रतमी गाईला चालवावी? जर त्या गाईला पूर्वाभिमुख सोडली तर हजार गाईंचा संघ पुढे जाईल व त्याच्या पाठीमागून सहस्रतमी गाय चालेल. असे झाले म्हणजे अज्ञानी

असलेल्या हजार गाईंच्या संघाला स्वर्ग जाणता येणार नाही. यास्तव, सहस्रतमी गाईला पश्चिमाभिमुख सोडावी. असे केल्याने सहस्रतमी गाय पुढे अग्रमागी चालेल व तिच्या मागून हजार गाईंचा संघ चालेल आणि मग सहस्रतमी गाय स्वर्गलोकाचा मार्ग जाणणारी असल्याने ती आपल्या मागोमाग येणाऱ्या गोसमुदायासह स्वर्गलोकी जाऊन पोचेल.

सहस्रतमी गाईची किंमत म्हणून ऋत्विजांना शतमान हिरण्य देऊन विकत घेतलेली ती सहस्रतमी गाय यजमानाच्या घराकडे तोंड करून चालवावी व त्याच्या गोठ्यात पोचवावी म्हणजे ती यजमानाच्या घरी अल्प कालातच हजार गाई उत्पन्न करते. ही सहस्रतमी गाय दक्षिणा देण्यासाठी नेताना सर्वांच्या मागून नेण्यात येते. परंतु, स्वर्गप्राप्तीच्या वेळी हीच गाय पहिली होऊन, अर्थात् इतरांच्याहून पुरोगामी होऊन यजमानासह देवांच्या जवळ जाते. (अनुवाक ७).

उर्व ऋषीचा पुत्र और्व. याला पुत्र नव्हता. त्याला आपल्याला पुत्र असावा अशी इच्छा झाली. व त्याने अत्रिनामक ऋषीजवळ पुत्राची मागणी केली. तेव्हा अत्रिऋषींनी त्याला आपली पुत्ररूपी सर्व प्रजा देऊन टाकली. त्यामुळे अत्री ऋषी प्रजेच्या दृष्टीने अगदी रिकामा झाला. त्याला असे वाटू लागले की, आपण आता निर्वीय म्हणजे प्रजोत्पादनसामर्थ्यरहित झालो आहो, आपल्या ठिकाणी आता शैथिल्य उत्पन्न झाले आहे. इतकेच नव्हे तर आता आपल्या ठिकाणी सारभूत अशी शक्तीच उरली नाही. यास्तव, आपल्याला पुन्हा प्रजा उत्पन्न करता येईल असे काहीतरी साधन शोधून काढले पाहिजे, असा त्याने विचार केला. तेव्हा 'चतूरात्र' नांवाचा क्रतू आपल्याला प्रजोत्पादनास साधन होईल असे त्याला आढळून आले. लागलीच त्याने चतूरात्र क्रतूची सामग्री जमा केली आणि चतूरात्र क्रतूचे यजन केले. नंतर त्या यजनाच्या प्रभावाने त्याला सुहोता, सूद्गाता, स्वध्वर्यू व सुसभेय या नांवाने चार पुत्र झाले. हे चौघेही पुत्र आपापल्या नांवाप्रमाणे अनुक्रमे हौत्र, औद्गात्र, आध्वर्यव व यज्ञप्रयोगोपदेश या कर्मांमध्ये अत्यंत कुशल असे होते. चतूरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणून जो कोणी त्या क्रतूचे यजन करतो त्याला चार पुत्र होतात व ते हौत्र, आध्वर्यव इत्यादि कर्मांमध्ये कुशल असल्यामुळे सुहोता, सूद्गाता, स्वध्वर्यू व सुसभेय ही नांवे धारण करण्यास पात्र होतात.

चतूरात्र क्रतूमध्ये बहिष्पवमान, माध्यंदिन पवमान व आर्भव पवमान ही तीनही 'पवमान' स्तोत्रे चतुर्विंशस्तोमयुक्त करावीत. गायत्री छंदाची चौवीस अक्षरे असतात. गायत्रीमंत्रजपाने ब्रह्मवर्चस् प्राप्त होत असते. यास्तव, गायत्री छंदाशी स्वरूपसाम्य असलेला 'चतुर्विंश' उपयोगात आणला असता तीन्ही पवमानांना ब्रह्मवर्चसाचे रूप प्राप्त होते.

उत्तरोत्तर उत्कर्षाला प्राप्त होणाऱ्या स्तोमांना 'उद्यत्' अशी संज्ञा आहे. हे स्तोम श्रीची म्हणजे धनसंपत्तीची प्राप्ती करून देणारे असल्यामुळे श्रीरूपच आहेत. यास्तव, चतूरात्र क्रतूतील पहिल्या दिवशी प्रात:सवनामध्ये 'त्रिवृत्', माध्यंदिन सवनामध्ये 'पंचदश' व तृतीय सवनामध्ये 'सप्तदश' स्तोमाचा उपयोग करावा. दुसऱ्या दिवशी प्रात:सवनात पंचदश, माध्यंदिन सवनात 'सप्तदश' व तृतीय सवनात 'एकविंश' स्तोमाचा उपयोग करावा. तिसऱ्या दिवशी प्रात:सवनात 'सप्तदश', माध्यंदिन सवनात 'एकविंश' व तृतीय सवनात 'त्रिणव' स्तोमाचा उपयोग करावा. चौथ्या दिवशी प्रात:सवनात 'एकविंश', माध्यंदिन सवनात 'त्रिणव' व तृतीय सवनात 'त्रयस्त्रिंश' स्तोमाचा उपयोग करावा. 'त्रिवृत्' पासून 'त्रयस्त्रिंश' स्तोमापर्यंतचे सहा स्तोम उत्तरोत्तर उत्कर्ष पावणारे अर्थात् श्रीरूप असल्याने चतूरात्र क्रतूमध्ये आता सांगितलेल्या पद्धतीने त्या स्तोमांचा उपयोग केला असता ते यज्ञकर्त्या यजमानाला श्रीची प्राप्ती करून देतात.

श्रद्धेच्या ठिकाणी देवतेप्रमाणेच आदर ठेवणारा अत्री ऋषी हा यजमान होऊन नेहमी याग करीत असे. परंतु, त्याला तेज म्हणजे शरीरकांती, इंद्रिय म्हणजे चक्षुरादि इंद्रियांचे स्वकार्यक्षमत्व, ब्रह्मवर्चस् म्हणजे वेदाध्ययनजन्य तेज:संपत्ती व अन्नाद्य म्हणजे स्वादिष्ट अशा अन्नाची समृद्धी, या चार प्रकारचे सामर्थ्य प्राप्त झाले नाही. तेव्हा अशा प्रकारचे सामर्थ्य प्राप्त करून देणारे असे चार 'चतुष्टोम' त्याच्या विचारदृष्टीला आढळून आले व त्या चतुष्टोमांचा म्हणजे चार स्तोमांचा पूर्वी दर्शविल्याप्रमाणे चतूरात्र क्रतूमध्ये चार दिवसांत उपयोग करण्याची योजना त्याने निश्चित केली व त्या योजनेस अनुसरून त्याने चारही चतुष्टोमांच्या योगाने चतूरात्र क्रतू केला. तेव्हा पहिल्या स्तोमाने तेज, दुसऱ्या स्तोमाने इंद्रियशक्ती, तिसऱ्या स्तोमाने ब्रह्मवर्चस् व चौथ्या स्तोमाने अन्नाद्य म्हणजे स्वादिष्ट असे भरपूर अन्न त्याला प्राप्त झाले.

चतुष्टोमांचे हे माहात्म्य जाणून चार दिवसांत अनुक्रमे चार स्तोमांचा

उपयोग करून जो कोणी चतूरात्र क्रतू करतो, तो यजमान पहिल्या दिवसाच्या अनुष्ठानप्रभावाने तेज, दुसऱ्या दिवसाच्या अनुष्ठानाने इंद्रियसामर्थ्य, तिसऱ्या दिवसाच्या अनुष्ठानाने ब्रह्मवर्चस् व चौथ्या दिवसाच्या अनुष्ठानाने जी जी म्हणून समृध्दी संपादनयोग्य असते, ती ती सर्व प्रकारची समृध्दी संपादन करतो. (अनुवाक ८).

प्रजा, पशू व धन या तीनही प्रकारची पुष्टी म्हणजे भरपूर प्राप्ती व्हावी अशी इच्छा करणाऱ्या जमदग्नीने चतूरात्र क्रतूचे यजन केले व त्या यजनाच्या प्रभावाने प्रजा, पशू व धन त्याने भरपूर संपादन केले. जमदग्नीपासून उत्पन्न झालेला पुत्र व त्या पुत्राचा पुत्र, हे दोन पुरुष वृध्दापकालापर्यंत केव्हाही दरिद्री झाले नाहीत. जमदग्नीप्रमाणे ते दोघेही प्रजा, पशू व धन यांचे भरपूर संपादन करणारेच झाले. सारांश, चतूरात्र क्रतूच्या योगाने स्वत: जमदग्नीला व त्याच्या पुढच्या दोन पिढ्यांना केव्हाच दारिद्य भोगण्याचा प्रसंग आला नाही. सर्व प्रकारची पुष्टी त्यांना भोगावयास मिळाली.

चतूरात्र क्रतूचे हे महत्त्व जाणून जो कोणी यजमान चतूरात्र क्रतू करतो तो सर्व प्रकारचे पोष म्हणजे भोग भरपूर संपादन करतो.

चतूरात्र क्रतूमध्ये केल्या जाणाऱ्या बारा 'उपसत्' इष्टी या 'पुरोडाशिनी' असतात. म्हणजे या उपसदिष्टीतील प्रधान देवतांचे यजन आज्याने न करता पुरोडाशरूप हविर्द्रव्याने करावयाचे असते. कारण, पुरोडाश हा पशुरूप आहे. यास्तव, पुरोडाशद्रव्याने उपसदिष्टी करणारा यजमान पशूंचे संपादन करतो. पुरोडाश हा अन्नरूप आहे. म्हणून पुरोडाशाने उपसदिष्टींचे यजन करणारा भरपूर अन्न संपादन करतो. एवं च, चतूरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणून जो कोणी चतूरात्र क्रतू करतो, तो स्वादिष्ट अन्नाचे सतत सेवन करणारा व पशुसंपत्तीने युक्त असा होतो. (अनुवाक ९).

वसंतादि ऋतू उत्पन्न होण्यापूर्वी संवत्सरस्वरूप असा एकटा प्रजापती होता. त्याला ऋतू उत्पन्न करण्याची इच्छा उत्पन्न झाली. विचार करता करता ऋतूंना उत्पन्न करण्यास साधनभूत असा 'पंचरात्र' क्रतू त्याला आढळला. मग त्याने पंचरात्र क्रतूच्या साहित्याची जमवाजमव केली व पंचरात्र क्रतूचे यजन केले. तेव्हा त्या पंचरात्र क्रतूच्या प्रभावाने प्रजापतीने वसंतादि सहा किंवा हेमंत व शिशिर हे दोन ऋतू मिळून एकच ऋतू मानल्यास पांच

ऋतू उत्पन्न केले. हे जाणून प्रजाकाम असा जो कोणी पंचरात्र क्रतू करतो. तो त्या यागाच्या प्रभावाने पुत्रपौत्रादि प्रजा उत्पन्न करतो.

प्रजापतीने उत्पन्न केलेले ऋतू भिन्न भिन्न लक्षणांनी ओळखता येत नव्हते. वृक्षांना नवी पालवी फुटल्याच्या चिन्हावरून आज जशी वसंत ऋतूची ओळख पटते, किंवा अत्यंत उष्मा उत्पन्न झाल्यामुळे आज जसा ग्रीष्म ऋतू ओळखता येतो, अशा प्रकारे प्रजापतीने निर्माण केलेल्या ऋतूंच्या ठिकाणी त्यांची ओळख पटण्याजोगी विशिष्ट अशी कोणतीच चिन्हे उत्पन्न झालेली नव्हती. तेव्हा त्या ऋतूंना आपण वेगवेगळ्या चिन्हांनी युक्त व्हावे अशी इच्छा झाली. विचाराअंती, आपली इच्छा पूर्ण होण्यास 'पंचरात्र क्रतू' उपयोगी पडेल, असे त्यांना आढळले. व त्याप्रमाणे त्यांनी सामग्री तयार करून पंचरात्र क्रतू केला व त्या क्रतूच्या प्रभावाने ते सहाही ऋतू निरनिराळ्या चिन्हांनी युक्त होऊन आज दिसत असलेल्या स्वरूपांना प्राप्त झाले. हे जाणून जो पंचरात्र क्रतूचे यजन करतो तो कुविचाररूप पातक व शत्रू यांच्यापासून वियुक्त अशा स्वरूपाला प्राप्त होतो.

'सर्वसेन' नांवाच्या पुरुषाचा व 'शुची' नामक स्त्रीचा पुत्र असलेल्या एका पुरुषाने 'मी पशुमान व्हावे', अशी इच्छा धारण केली. ही इच्छा पूर्ण करण्याचे साधन पंचरात्र क्रतू आहे, असे त्याला विचाराअंती आढळून आले. त्याने सामग्री तयार केली आणि पंचरात्र क्रतूचे यजन केले. त्या क्रतूच्या प्रभावाने त्याने हजार पशू संपादन केले. हे जाणून जो पंचरात्र क्रतूचे यजन करतो, तो हजार पशू मिळवितो.

'प्रवाहण' नांवाच्या पुरुषाचा 'बबर' नांवाचा पुत्र होता. त्याला 'आपण सभेमध्ये उत्कृष्ट वक्ता व्हावे', अशी इच्छा उत्पन्न झाली. त्याच्याही विचारदृष्टीला आपली इच्छा सफल होण्यास पंचरात्र क्रतू उपयोगी पडेल असे आढळले व त्याने तद्विषयक साहित्य जमा करून पंचरात्र क्रतूचे यजन केले. त्यामुळे तो सभेमध्ये उत्कृष्ट भाषण करणारा असा वक्ता झाला. हे जाणून जो कोणी पंचरात्र क्रतूचे यजन करतो, तो सभेमध्ये उत्कृष्ट वकृत्व करणारा होतो. इतकेच नव्हे तर सभेतील सर्व लोक 'वाचस्पती' असे म्हणून त्याचा गौरव करतात.

बहुविध फलसाधनाच्या दृष्टीने चतूरात्र हा क्रतू अपुरा पडत असून

'षड्रात्र' क्रतू हा अतिरिक्त म्हणजे अपेक्षेहून अधिक पडतो. पंचरात्र क्रतू मात्र इच्छित फलपूर्तीला सर्वथैव योग्य असा आहे. हे जाणून जो पंचरात्र क्रतूचे यजन करतो, त्याने फलापेक्षेच्या दृष्टीने अत्यंत योग्य अशा यज्ञाचे यजन केल्यासारखे होते.

पंचरात्र क्रतू हा पांच सुत्याहांनी युक्त असतो. म्हणजे त्या क्रतूमध्ये पाच दिवस दररोज सुत्या केली जाते. कारण, हेमंत व शिशिर हे दोन मिळून एकच ऋतू मानल्यास संवत्सर हा वसंतादि पांच ऋतूंनी युक्त असतो. अर्थात् पंचरात्र क्रतू करणारा यजमान त्या क्रतूच्या प्रभावाने पांच ऋतूंच्या आणि संवत्सराच्याच ठिकाणी प्रतिष्ठित होतो. शिवाय पांच अक्षरांच्या चरणांनी युक्त अशा पंक्ती छंदाशी पंचरात्र क्रतूचे स्वरूपसाम्य असल्यामुळे तो पंचरात्रक्रतुरूप यज्ञ पांक्त म्हणजे पूर्णत्वाला प्राप्त होतो. म्हणून पंचरात्र क्रतू करणाऱ्या यजमानाने पांक्त म्हणजे परिपूर्ण अशा यज्ञाचे संपादन केल्यासारखे होते.

पंचरात्र क्रतूतील पहिल्या दिवशी 'त्रिवृत्' स्तोमयुक्त अग्निष्टोमाचे अनुष्ठान करावे. तसे केल्याने यजमानाला तेजाची प्राप्ती होते. दुसऱ्या दिवशी 'पंचदश' स्तोमयुक्त अशा उक्थ्याचे अनुष्ठान करावे. त्या योगाने यजमानाला स्वकार्यक्षम अशा इंद्रियांची प्राप्ती होते. तिसऱ्या दिवशी 'सप्तदश' स्तोमयुक्त असा उक्थ्यच करावा. त्या योगाने यजमानाला सेवनीय असे अन्न प्राप्त होते. शिवाय त्या उक्थ्याच्या अनुष्ठानाने यजमानाला प्रजोत्पादनसामर्थ्याचाही लाभ होतो. चौथ्या दिवशी पंचविंशस्तोमयुक्त असा अग्निष्टोम करावा. तो यजमानाला प्रजापतीचे आनुकूल्य प्राप्त करून देतो. पांचव्या दिवशी विश्वजित् नांवाचा सर्वपृष्ठात्मक अतिरात्र करावा. तो यजमानाला सर्व प्रकारच्या फलांविषयी विजय प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. (अनुवाक १०).

'हे रशने, सवितादेवाची प्रेरणा मला झाल्यावर अश्विनीकुमारांच्या बाहूंनी व पूषादेवाच्या दोन्ही हातांनी मी तुला उचलून घेत आहे', या अर्थाचा 'देवस्य त्वा.......माददे' हा मंत्र म्हणून रशना म्हणजे अश्वाच्या गळ्याला बांधावयाची दोरी उचलून हाती घ्यावी. नंतर यजमानाला दीर्घायुष्य लाभावयासाठी चालविलेल्या यज्ञामध्ये प्राचीन काळच्या यज्ञकर्मकुशल अशा ऋत्विजांनी यज्ञाशी संबध्द असलेली ही रशना हाती घेतली. हे ऋत्विग्यजमान हो, आरंभिलेला यज्ञ सत्वर पूर्ण करण्यास प्रवृत्त व्हा, असेच जणू कथन करणाऱ्या 'त्या

रशनेच्या योगाने सर्व देव अश्वमेधसंबंधी 'त्रिरात्र' नामक सोमयागाचे ठिकाणी चोहोकडून येऊन पोचले,' या अर्थाचा 'इमामगृभ्णन्.....मारपन्ती' हा मंत्र म्हणावा.

'हे अश्वा, तू रशनेने बांधला जात आहेस, तू भुवनरूप आहेस, सर्वांचे नियंत्रण व धारण करणारा असा तू आपल्या अंगविस्तारासह सर्व मानवांचे कल्याण करणाऱ्या आहवनीयाग्नीमध्ये प्रवेश कर, नंतर आम्हाकडून स्वाहा असे म्हणून देवांना दिलेला तू हवी हो, हे अश्वा, पुढच्या जन्मामध्ये पृथ्वीच्या ठिकाणी तू राजा होऊन प्रजेचे नियंत्रण, नियमन, धारण व पोषण करण्यास सर्वथैव पात्र आहेस, हे अश्वा कृषिकर्माची योग्य निष्पत्ती, प्राप्त झालेल्या धनाचे रक्षण, प्राप्त करून घेण्यासारखे असेल त्या धनाची प्राप्ती, व त्या धनापासून मिळणाऱ्या भोगांचा परिपोष जन्मांतरी तुला प्राप्त व्हावा म्हणून या रशनेने मी तुला बांधीत आहे, हे अश्वा, पृथ्वी, अंतरिक्ष, द्यु हे तीन लोक, या तीन्ही लोकांत आज विद्यमान असलेले व पुढे संपादनयोग्य असलेले द्रव्य, भावी जन्मामध्ये तुला मिळावे म्हणून या रशनेने मी तुला बांधीत आहे, पृथ्वीवर असलेली सर्व उदके, सर्व प्रकारच्या ओषधी व सर्व प्राणी यांना तू याच जन्मामध्ये प्रिय व्हावास म्हणून मी तुला या रशनेने बांधीत आहे', अशा अर्थाचा 'अभिधा असि.......भूतेभ्यः' हा मंत्र म्हणून अश्वाच्या गळ्याला रशना बांधावी. (अनुवाक ११).

हे अश्वा, तू आपल्या भूरूप मातेच्या रूपाने व्यापनशील आहेस. द्युलोक रूप पित्याच्या रूपाने तू प्रभुत्वशक्तिमान आहेस. तू अस्सल जातीचा अश्व आहेस. तू उत्कृष्ट अशा चालीने चालणारा आहेस. तू सर्वदा गमनशील आहेस. आपल्यावर आरुढ होणाऱ्याला तू सुखाने वाहून नेणारा आहेस. तू उत्कृष्ट गतिमान् आहेस. तू युद्धादि सर्व कार्यांमध्ये संबद्ध आहेस. तू भरपूर घास खाणारा आहेस. तू वीर्यशाली आहेस. तू मनुष्यांच्या मनाला आकर्षक करणारा आहेस. स्वर्गलोकाला नेऊन पोचविणारा असा तू 'ययू' या नांवाने प्रसिध्द आहेस. हे अश्वा, तू बारा आदित्याच्या मागोमाग अंतरिक्षमार्गाने गमन कर.

१ अग्नीला ही आहुती समर्पण असो. २ इंद्राग्नींना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतीला ही आहुती समर्पण असो. ४ विश्वेदेवांना ही आहुती

समर्पण असो. ५ सर्वदेवतांना ही आहुती समर्पण असो.

१ हे अश्वा, तुझ्या पुढच्या बाजूच्या या उजव्या पायाचे ठिकाणी स्थैर्य उत्पन्न व्हावे म्हणून ही आहुती देतो. २ तुझ्या मागच्या बाजूच्या या उजव्या पायाचे ठिकाणी विशिष्ट स्थैर्य उत्पन्न होण्यासाठी ही आहुती देतो. ३ तुझ्या मागच्या बाजूच्या या डाव्या पायाच्या ठिकाणी रमणीय असे स्थैर्य उत्पन्न होण्यासाठी ही आहुती देतो. ४ तुझ्या पुढच्या बाजूच्या या डाव्या पायाचे ठिकाणी अत्यंत रमणीय असे स्थैर्य उत्पन्न होण्यासाठी ही आहुती देतो.

हे अश्वा, तू पूर्वी उत्पन्न झाला आहेस. पूर्वी उत्पन्न झालेल्या, सांप्रत उत्पन्न झालेल्या व भविष्यकालीही उत्पन्न होणाऱ्या तुज अश्वाला श्रेयाची सिद्धी व्हावी आणि विश्वातील सर्व प्राण्यांपासून तुला स्वाधीनत्व प्राप्त व्हावे म्हणून मी तुला सोडीत आहे. चारही दिशांच्या ठिकाणी या अश्वाच्या संरक्षणाचे कार्य करणाऱ्या हे देवतुल्य राजपुत्र हो, देवांच्या संतोषासाठी अश्वमेध यज्ञ करण्यासाठी प्रोक्षण करून सोडलेल्या या अश्वाचे तुम्ही संरक्षण करा. (अनुवाक १२).

१मंद गतीने समोर चालणाऱ्या अश्वाच्या प्रीतीसाठी ही आहुती देतो.२ त्वरित गतीने समोर चालत राहणाऱ्या त्या अश्वाच्या संतोषासाठी ही आहुती देतो.३ पुढचे दोनही पाय उंच करून मागच्या दोन पायांवर चालणाऱ्या अश्वाच्या प्रीतीसाठी ही आहुती देतो.४ मागचे दोनही पाय उंच करून पुढच्या दोन पायांवर चालणाऱ्या या अश्वाच्या प्रीतीसाठी ही आहुती देतो.५ अश्वाच्या मुखातून निघणाऱ्या 'शू' अशा शब्दाला उद्देशून ही आहुती देतो.६ 'शू' असा शब्द केलेल्या या अश्वाच्या प्रेमासाठी ही आहुती देतो.७ वेगाने पुढे धावणाऱ्या अश्वाला ही आहुती देतो.८ अगदी समोरच्या दिशेने दौड करणाऱ्या अश्वाला ही आहुती देतो.९ चारही पाय उचलून पुढे उडी घेणाऱ्या अश्वाला ही आहुती समर्पण असो.१० चारही पाय एकदम उचलून मागे सरणाऱ्या अश्वाला ही आहुती समर्पण असो.११ लांब लांब ढांगा टाकून चालणाऱ्या या अश्वाला ही आहुती समर्पण असो.१२ अतिशय लांब लांब ढांगा टाकून चालणाऱ्या या अश्वाला ही आहुती समर्पण असो.१३ सर्वगुणसंपन्न अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो.(अनुवाक १३).

१ अग्नीला ही आहुती समर्पण असो. २ सोमाला ही आहुती समर्पण असो. ३ वायूला ही आहुती समर्पण असो. ४ उदकांचा मुर्तिमंत आनंदच अशा पर्जन्याला ही आहुती समर्पण असो. ५ सविता देवाला ही आहुती समर्पण असो. ६ सरस्वती देवतेला ही आहुती समर्पण असो. ७ इंद्राला ही आहुती समर्पण असो. ८ बृहस्पतीला ही आहुती समर्पण असो. ९ मित्राला ही आहुती समर्पण असो. १० वरुणाला ही आहुती समर्पण असो. ११ सर्व देवांच्या समुदायाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १४).

१ पृथ्वीला ही आहुती समर्पण असो. २ अंतरिक्षाला ही आहुती समर्पण असो. ३ द्युलोकाला ही आहुती समर्पण असो. ४ सूर्याला ही आहुती समर्पण असो. ५ चंद्राला ही आहुती समर्पण असो. ६ नक्षत्रांना ही आहुती समर्पण असो. ७ पूर्व दिशेला ही आहुती समर्पण असो. ८ दक्षिण दिशेला ही आहुती समर्पण असो. ९ पश्चिम दिशेला ही आहुती समर्पण असो. १० उत्तर दिशेला ही आहुती समर्पण असो. ११ ऊर्ध्व दिशेला ही आहुती समर्पण असो. १२ पूर्वाइत्यादि चार दिशांना ही आहुती अर्पण असो. १३ आग्नेय इत्यादि चार उपदिशांना ही आहुती अर्पण असो. १४ सौर मानाने पूर्ण होणाऱ्या संवत्सरांना ही आहुती अर्पण असो. १५ चांद्र नक्षत्रमानाने पूर्ण होणाऱ्या संवत्सरांना ही आहुती अर्पण असो. १६ अहोरात्रांना ही आहुती अर्पण असो. १७ अर्धमासांना ही आहुती अर्पण असो. १८ मासांना ही आहुती अर्पण असो. १९ ऋतूंना ही आहुती अर्पण असो. २० संवत्सराला ही आहुती अर्पण असो. २१ अनुक्त अशा सर्व कालाला ही आहुती अर्पण असो.(अनुवाक १५).

१ अग्नीला ही आहुती अर्पण असो. २ सोमाला ही आहुती अर्पण असो. ३ सविता देवाला ही आहुती अर्पण असो. ४ सरस्वती देवतेला ही आहुती अर्पण असो. ५ पूषा देवाला ही आहुती अर्पण असो. ६ बृहस्पतीला ही आहुती अर्पण असो. ७ उदकाच्या आनंदरूपाने असलेल्या पर्जन्याला ही आहुती अर्पण असो. ८ वायूला ही आहुती अर्पण असो. ९ मित्राला ही आहुती अर्पण असो. १० वरुणाला ही आहुती अर्पण असो ११ सर्वदेवसमुदायाला ही आहुती अर्पण असो. (अनुवाक १६.)

१ पृथ्वीला ही आहुती समर्पण असो. २ अंतरिक्षाला ही आहुती

समर्पण असो. ३ द्युलोकाला ही आहुती अर्पण असो. ४ अग्नीला ही आहुती अर्पण असो. ५ सोमाला ही आहुती अर्पण असो. ६ सूर्याला ही आहुती अर्पण असो. ७ चंद्राला ही आहुती अर्पण असो. ८ दिवसाला ही आहुती अर्पण असो. ९ रात्रीला ही आहुती अर्पण असो. १० ऋजूसंज्ञक पृथ्वीला ही आहुती अर्पण असो. ११ साधुसंज्ञक अंतरिक्षलोकाला ही आहुती अर्पण असो. १२ सुक्षितिसंज्ञक द्युलोकाला ही आहुती अर्पण असो. १३ क्षुधेला ही आहुती अर्पण असो. १४ क्षुधेचे निवारण करणाऱ्या भक्ष्य पदार्थाला ही आहुती अर्पण असो. १५ रोगाला ही आहुती अर्पण असो. १६ हिवाळ्याला ही आहुती अर्पण असो. १७ उन्हाळ्याला ही आहुती अर्पण असो. १८ अरण्याला ही आहुती अर्पण असो. १९ पुण्य कर्माने प्राप्त होणाऱ्या स्वर्गलोकाला ही आहुती अर्पण असो. २० प्रत्येक लोकाला ही आहुती अर्पण असो. २१ सर्वलोकसमुदायाला ही आहुती अर्पण असो. (अनुवाक १७).

हे दीक्षे, तू देवांच्या तृप्तीसाठी आम्ही चालविलेल्या यज्ञानुष्ठानाशी संयुक्त हो. तू देवांचे व त्यांच्यासाठी चाललेल्या यज्ञाचे हित करणारी आहेस. वसूसंज्ञक देव, दीक्षाभिमानिनी देवता व गायत्र छंद यांच्याशी मी तुला संयुक्त करतो. वसंतऋतूसह असलेला मी हविर्द्रव्याच्या योगाने तुला सुसंस्कृत करतो. हे दीक्षे, रुद्रसंज्ञक देव, दीक्षाभिमानिनी देवता व त्रिष्टुप् छंद यांच्याशी मी तुला संयुक्त करतो. ग्रीष्म ऋतूसह असलेला मी हविर्द्रव्याच्या योगाने तुला संस्कारयुक्त करतो. हे दीक्षे, आदित्यसंज्ञक देव, दीक्षाभिमानिनी देवता व जगती छंद यांच्याशी मी तुला संयुक्त करतो. त्याचप्रमाणे वर्षाऋतूसह असणारा मी तुला हविर्द्रव्याने सुसंस्कृत करतो. हे दीक्षे, विश्वेदेवसंज्ञक देव, दीक्षाभिमानिनी देवता व अनुष्टुप् छंद यांच्याशी मी तुला संयुक्त करीत असून शरद्ऋतूसह असणारा मी तुला हविर्द्रव्याच्या योगाने सुसंस्कृत करतो. हे दीक्षे, अंगिरससंज्ञक देव, दीक्षाभिमानिनी देवता व पंक्ती छंद यांच्याशी मी तुला संयुक्त करीत असून हेमंत व शिशिर या दोन ऋतूंच्या सह असलेला मी तुला हविर्द्रव्याच्या योगाने संस्कारयुक्त करतो.

या अश्वमेधाचा यजमान असणारा मी गायत्री छंदाने युक्त असलेल्या आणि छंदरहित अशा दोनही प्रकारच्या मंत्रांनी आता अनुग्रहीत झालो असून यज्ञाचे पालन करणाऱ्या नियमविशेषरूप अशा दीक्षेच्या ठिकाणी आरूढ झालो

आहे. माझ्या ठिकाणचे मानसिक सत्य मी आता माझ्या वाचिक सत्याचे ठिकाणी स्थापन करीत आहे. आणि माझ्या ठिकाणी असलेले वाचिक सत्य मी आता माझ्या ठिकाणच्या मानसिक सत्याचे ठिकाणी स्थापीत आहे. सारांश, जे यज्ञविषयक विचार माझ्या मनात घोळत असतील ते मी आता उच्चारात आणणार असून माझ्याकडून उच्चारल्या जाणाऱ्या विचारांचेच मी आता मनन करणार आहे.

१ महनीय, सत्कर्म करणाऱ्या पुरुषाचे मातेप्रमाणे रक्षण करणारी, सत्याचे पालन करणारी, पुष्कळ राजांनी पालन केलेली, सर्वदा जरारहित, विस्तीर्ण गती असलेली, उत्कृष्ट सुखाने युक्त, स्वकर्तव्याचे ठिकाणी सुखाने प्रवृत्त होणारी अशी जी अदिती देवी, तिलाच आम्ही आमच्या संरक्षणासाठी उत्कृष्ट रीतीने बोलावीत आहोत. २ उत्कृष्ट प्रकारे तारणारी, विस्तीर्ण, प्रकाशमान, चिरकाल टिकणारी, उत्कृष्ट सुखांनी युक्त, उत्कृष्ट कर्मांचे ठिकाणी सुखाने प्रवृत्त होणारी, शत्रूंच्या पासून उत्तम प्रकारे रक्षण करणारी, पापरहित आणि कोठेही छिद्र नसलेली जणू देवनिर्मित नावच अशा या अखंडनीय भूमीवर आम्ही आरूढ झालो आहोत.

या अश्वाने या यज्ञामध्ये जी धैर्यवृत्ती स्वीकारिलेली आहे, तिला ही आहुती अर्पण असो. या प्रसंगी अश्वाने धारण केलेल्या विशेष धैर्याला ही आहुती अर्पण असो. या प्रसंगी अश्वाने जे स्थैर्य धारण केले आहे त्या स्थैर्याला ही आहुती अर्पण असो. या वेळी या अश्वाने आपल्या ठिकाणी हे विशेष स्थैर्य धारण केले आहे, त्याला ही आहुती अर्पण असो. (अनुवाक १८).

१ खाद्य पदार्थ पाहून त्याच्या जवळ जाण्याच्या उत्सुकतेने 'ईं' असा हळूच शब्द करणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. २ खाद्य पदार्थाकडे धाव घेताना 'ईं' असा शब्द केलेल्या या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३ घोडी दृष्टीस पडताच उत्साहित होऊन हलक्या स्वरात खिंकाळणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४ आपल्याशी विरोध करणाऱ्या अश्वाला पाहून क्रोधाने मोठमोठ्याने खिंकाळणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५ चालत असताना दोन्ही नाकपुड्यांनी फुर्फुर् अशा आवाजात श्वासोच्छ्वास करणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६ गवत खाते वेळी फुर्फुर्

अशा आवाजात श्वासोच्छ्वास करणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ८ स्वत:च्या शरीराचा वास घेत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ९ अश्वाच्या प्राणवायूला ही आहुती अर्पण असो. १० अश्वाच्या सर्व शरीरात संचार करणाऱ्या व्यानवायूला ही आहुती अर्पण असो. ११ अश्वाच्या अपान वायूला ही आहुती अर्पण असो. १२ बांधल्या जाणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. १३ बांधलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. १४ बंधनापासून मुक्त केल्या जाणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. १५ बंधनापासून मुक्त केलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. १६ पळून जाण्याच्या उद्योगात असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. १७ पळून जात असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. १८ पळावयाचे थांबण्याच्या बेतात असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. १९ पळावयाचे थांबलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. २० एखाद्या वस्तूकडे न्याहाळून पाहणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. २१ शाळेमध्ये प्रवेश करीत असलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. २२ शाळेमध्ये प्रविष्ट झालेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. २३ शाळेमध्ये बसण्याची इच्छा करणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. २४ शाळेमध्ये बसावयास येत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. २५ शाळेमध्ये येऊन बसलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. २६ शाळेत बसल्यानंतर चारही पाय आखडून जवळ घेणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. २७ चारही पाय आखडून जवळ घेण्याच्या उद्योगात असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. २८ चारही पाय आखडून जवळ घेतलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो.२९ आपल्या शरीराची एक बाजू भूमीला टेकवून आडव्या होणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३० आपल्या शरीराची एक बाजू भूमीला टेकवीत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३१ आपल्या शरीराची एक बाजू भूमीवर टेकवून आडव्या झालेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३२ चारही पाय लांब पसरून निजण्याचा स्वभाव असणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३३ चारही पाय लांब पसरून झोपण्याच्या बेतात असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३४ चारही पाय लांब ताणून झोप घेत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३५ झोप येत असल्यामुळे डोळे मिटण्याच्या बोतात आलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३६ दोनही डोळे मिटलेल्या

अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३७ निद्रा घेण्याची इच्छा करणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३८ निद्रा घेण्याच्या बेतात असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ३९ निद्रित झालेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४० निद्रेतून जागे होण्याच्या स्थितीत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४१ निद्रेतून जागा होत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४२ जागृत झाल्यावर डोळे उघडून चोहीकडे पाहण्याचा स्वभाव असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४३ डोळे उघडून चोहीकडे पाहण्याच्या स्थितीत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४४ डोळे उघडून चोहीकडे पाहत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४५ आपला पालक जागेवरून उठत असताना होणारा शब्द ऐकण्याचा स्वभाव असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४६ आपला पालक जागेवरून उठताना होत असलेला आवाज ऐकत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४७ आपला पालक जागेवरून उठल्याचा आवाज ऐकलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४८ आपल्याला देण्यात येणाऱ्या चंदीची वाट पाहत राहण्याचा स्वभाव असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ४९ आपल्याला देण्यात येणाऱ्या चंदीची मार्गप्रतीक्षा करीत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५० आपल्याला मिळणाऱ्या चंदीची मार्गप्रतीक्षा केलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५१ शाळेतून बाहेर पडण्याची इच्छा करणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५२ शाळेतून बाहेर पडत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५३ शाळेतून बाहेर पडलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५४ शाळेतून बाहेर पडल्यानंतर भूमीवर लोळण्याचा स्वभाव असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५५ शाळेतून बाहेर पडल्यावर भूमीवर लोळत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५६ शाळेतून बाहेर पडल्यावर भूमीवर लोळलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५७ लोळल्यानंतर उठून उभे राहण्याचा स्वभाव असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५८ लोळण्यानंतर उठून उभा राहत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ५९ उठून उभा राहिलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६० आपल्या शरीरावरील धूळ झाडण्यासाठी शरीर हलविण्याचा स्वभाव असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६१ धूळ झाडण्यासाठी शरीर हलवीत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६२ शरीर हलवून

त्यावरील धूळ झाडलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६३ एक एक पाऊल उचलून चालू लागण्याची इच्छा करणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६४ चालू लागण्याच्या निमित्ताने पावले उचलण्याच्या स्थितीत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६५ चारही पावले उचलून चालू लागलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६६ मंद गतीने चालण्याची इच्छा करणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६७ मंद गतीने चालण्याच्या बेतात असणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६८ मंद गतीने चालू लागलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६९ आपल्या दंतपंक्तींनी आपले शरीर खाजविण्याची इच्छा करणाऱ्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ७० दंतपंक्तींनी आपले शरीर खाजविण्याच्या स्थितीत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ७१ दंतपंक्तींनी आपले शरीर खाजविलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ७२ भिंतीला किंवा खांबाला आपले शरीर घासण्याची संवय असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ७३ आपले शरीर भिंतीला खाजवीत असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ७४ आपले शरीर भिंतीशी खाजविलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ७५ हा अश्व जे खाद्य खातो त्या खाद्याला ही आहुती अर्पण असो. ७६ हा अश्व जे उदक पितो त्या उदकाला ही आहुती अर्पण असो. ७७ हा अश्व जो मूत्रोत्सर्ग करतो त्या मूत्रोत्सर्गाला ही आहुती अर्पण असो. ७८ हा अश्व जो पुरीषोत्सर्ग करतो त्या पुरीषोत्सर्गाला ही आहुती अर्पण असो. ७९ या अश्वाच्या प्रजोत्पादनसमर्थ अशा रेताला ही आहुती अर्पण असो. ८० या अश्वापासून उत्पन्न होणाऱ्या प्रजांना ही आहुती अर्पण असो. ८१ या अश्वाच्या प्रजोत्पादनाला ही आहुती अर्पण असो. ८२ या अश्वाच्या अनुच्चारित अशा सर्व वर्तनाला ही आहुती अर्पण असो. (अनुवाक १९).

१ अग्नीला ही आहुती अर्पण असो. २ वायूला ही आहुती अर्पण असो. ३ सूर्याला ही आहुती अर्पण असो. ४ हे अश्वा, तू मानसिक सत्याची केवळ विभूती आहेस. यागरहित अशा पुरुषाच्या ठिकाणी असणाऱ्या मानसिक सत्याहूनही तू अत्यंत सत्यस्वरूप आहेस. ५ हे अश्वा तू मूर्तिमंत वाचिक सत्य आहेस. याग न करणाऱ्या पुरुषाच्या ठिकाणी असणाऱ्या वाचिक सत्यापेक्षा तुझे वाचिकसत्यरूप अत्यंत श्रेष्ठ आहे. ६ हे अश्वा, तू यज्ञाचा मार्ग आहेस. कारण तुझ्या द्वाराच यागानुष्ठान होत असते. हे अश्वा तू

जणू काय, देवांना सुखप्रद अशी छायाच आहेस. तुझे नांव म्हणजे अमृताचेच नांव आहे. देव तुझ्या रूपाने असणारे हविर्द्रव्य अमृत म्हणून स्वीकारीत असतात. तुझे जे अस्तित्व आहे, ते मूर्तिमंत सत्य आहे. प्रजापतीचा नेत्र तुझ्या आकारानेच निष्पन्न झालेला असल्यामुळे तूच जणू प्रजापती आहेस. ७ ज्या अर्थी या अश्वाच्या ठिकाणी असलेल्या शुभ अशा गुणांचा संघ देवांच्याहूनही अधिक असल्याचे दिसते, त्या अर्थी द्युलोकामध्ये असलेल्या मरुद्गणादि प्रजा सूर्यासमान असलेल्या अश्वाशी 'आम्हीच अधिक गुणसंपन्न आहोत, अश्व आमच्यापेक्षा कमी गुणवान आहे', अशा भावनेने स्पर्धा करीत असतात. देवांनीही ज्याच्या गुणांविषयी स्पर्धा करावी, असा हा अश्व यागाच्या मध्ये आपली स्तुती केली जावी या इच्छेने, देवसमुदाय जसा नियोजित यज्ञीय पशूला वेढून बसलेला असतो. त्याप्रमाणे, अश्वमेधरूप असे हे यज्ञकर्म सुरळितपणे पूर्णतेस जावे, अशी इच्छा करून त्या कर्माला वेढून राहत असतो. आणि यज्ञाच्या द्वारा अखिल विश्वाला पुनीत करतो. हा अश्व ऋत्विज व यजमान यांचा पालक, यज्ञकर्मद्वारा अन्नाचा निर्माता, आणि स्वर्गादि लोकांच्या ठिकाणी जाण्यास समर्थ आहे. (अनुवाक २०).

प्रपाठक २

'साध्य' नांव धारण करणाऱ्या देवांनी स्वर्गलोकप्राप्तीच्या इच्छेने हा 'षड्रात्र' संज्ञक क्रतू करण्याचे निश्चित केले. त्या क्रतूला लागणारी सामग्री त्यांनी संपादन केली. आणि त्या क्रतूचे यजन केले. त्या क्रतूच्या प्रभावाने ते साध्य देव स्वर्गलोकाला प्राप्त झाले. षड्रात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणून जे कोणी विद्वान् षड्रात्र क्रतूचे यजन करतात ते स्वर्गलोकी जातात. षड्रात्र क्रतू हा देवांना सत्रासारखाच प्रिय वाटत असल्यामुळे तो जणू देवसत्रच आहे. कारण सत्ररूप द्वादशाह क्रतूमध्ये जो 'पृष्ठ्य षडह' केला जातो, त्याच्या सहा दिवसांमध्ये अनुक्रमे जी 'पृष्ठ्य' संज्ञक स्तोत्रे गाइली जातात तीच या क्रतूतील सहा दिवसांत गाइली जात असल्याचे प्रत्यक्षच दिसत असल्याने या षडह क्रतूला देवसत्र हे नांव प्राप्त होणे युक्तच आहे. षडह क्रतूचे हे माहात्म्य जाणणारे जे विद्वान् षड्रात्र क्रतूचे अनुष्ठान करतात ते लौकरच देवांच्या निकट जाऊन पोचतात.

षडह क्रतू हा षड्रात्र म्हणजे सहा दिवसांनी पूर्ण होत असतो. ऋतू

सहा आहेत व षडह क्रतुमधील सहा दिवसांत अनुक्रमे एकेक दिवशी गाइली जाणारी 'पृष्ठ' संज्ञक स्तोत्रेही सहाच आहेत. या सहा पृष्ठांच्या योगानेच षडह क्रतूचे अनुष्ठान करणारे यजमान सहा ऋतूंच्या ठिकाणी आरूढ होतात. आणि ऋतूंच्या द्वारे ते संवत्सराच्या ठिकाणी प्राप्त होऊन तेथेच प्रतिष्ठित होऊन राहतात.

षडह क्रतूतील पहिल्या व दुसऱ्या या दोन दिवसांमध्ये अनुक्रमे 'रथंतर' व 'बृहत्' या दोन पृष्ठ स्तोत्रांचे गान करावे. मुळामध्ये शब्दशास्त्राच्या नियमानुसार बृहत् सामाचा उच्चार रथंतरापूर्वी असला तरी अनुष्ठानाच्या प्रसंगी पहिल्या दिवशी रथंतर पृष्ठस्तोत्राचा उपयोग करून दुसऱ्या दिवशी बृहत् पृष्ठे उपयोगात आणावे. कारण, रथंतर हे पृथ्वीवर असून बृहत् पृष्ठे हे द्युलोकरूप आहे. यास्तव, रथंतर व बृहत् या स्तोत्रांच्या गानप्रभावाने षडह क्रतू करणाऱ्या यजमानांनी पृथ्वी व द्युलोक या दोघांच्याही आनुकूल्याने षडह क्रतूचे अनुष्ठान केल्याप्रमाणे होते व ते या दोनही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. रथंतर व बृहत् ही दोन पृष्ठस्तोत्रे म्हणजे जणू काय थेट स्वर्गलोकी जाण्याचे दोन मार्गच होत. अर्थात् या दोन मार्गांच्या योगाने षडह क्रतू करणारे यजमान स्वर्गलोकी जातात.

षडह क्रतूतील पहिल्या दिवशी त्रिवृत्स्तोमयुक्त असा अग्निष्टोम करावा. त्या योगाने तेजाचे संपादन होते. दुसऱ्या दिवशी पंचदशस्तोमप्रधान असा 'उक्थ्य' करावा. त्या योगाने स्वकार्यक्षम अशा इंद्रियसमुदायाचे संपादन होते. तिसऱ्या दिवशी सप्तदशस्तोमयुक्त व वैरूपसामप्रधान असा उक्थ्य करावा. म्हणजे तो भक्षणयोग्य अशा अन्नाचे संपादन करून देण्याला कारणभूत होतो. क्रतू करणारे यजमान देखील सेवनीय अशा त्या अन्नाने समृध्दीला प्राप्त होतात. चौथ्या दिवशी एकविंशस्तोमयुक्त व वैराजसामप्रधान असा 'षोडशी' करावा. तो यजमानाला प्रतिष्ठितत्व प्राप्त करून देण्याला कारणभूत होऊन शिवाय यजमानांच्या शरीराचे ठिकाणी उज्वल कांती निर्माण करतो. पांचव्या दिवशी त्रिणवस्तोमयुक्त व शाक्वरसामप्रधान असा उक्थ्य करावा. तो यजमानांना विजय प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. शेवटच्या म्हणजे सहाव्या दिवशी त्रयस्त्रिंशस्तोमयुक्त व रैवतसामप्रधान असा उक्थ्य करावा. म्हणजे तो यजमानांना प्रतिष्ठितत्व प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो.

जे यजमान 'सारस्वत' सत्राच्या निमित्ताने या 'षडह' किंवा 'षड्रात्र' संज्ञक क्रतूच्या रूपाने यजन करणार असतील, त्यांनी 'हविर्धान' व 'आग्नीध्र' हे दोनही मंडप अश्वत्थाच्या म्हणजे पिंपळाच्या लाकडांचे तयार करावेत. कारण अश्वत्थ वृक्षाचे काष्ठ हे स्वर्गप्राप्तीचे साधन आहे. त्याचप्रमाणे हे दोन्ही मंडप भूमीवर न उभारता गाड्याप्रमाणे दोन बाजूस दोन चाके असलेल्या कण्याच्या आधारावर फळ्या बसवून त्यांवर उभारावेत. कारण अशा प्रकारे चक्रयुक्त अर्थात् हलते असणारे मंडप, रथाप्रमाणे उपयुक्त होऊन स्वर्गलोकी सुलभतेने जाण्याला कारणभूत होतात. शिवाय 'यूप' हा उखळाच्या आकारासारखे मोठे बूड असलेला तयार करावा. अर्थात् तो एकाच जागी खळग्यात पुरू नये. त्यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता येतो व आपल्याला पाहिजे त्या ठिकाणी तो उभा करावयाच्या उपयोगी पडतो.

षडह क्रतूतील एक दिवसाचे अनुष्ठान पूर्ण झाले म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी यज्ञमंडपाच्या अग्रभागी उभे राहून अध्वर्यूने पूर्व दिशेस खूप जोराने शम्या फेकावा व तो जेथे पडेल त्या ठिकाणी चाकांवर उभारलेले हविर्धान व आग्नीध्र मंडप, उखळासारखे बूड असलेला यूप इत्यादि साहित्यासह सर्वांनी जावे. नंतर त्या ठिकाणी मंडप उभारून त्या दिवसाचे अनुष्ठान करावे. याचप्रमाणे दररोज पूर्व दिशेस जाऊन अनुक्रमाने सहा दिवसांचे अनुष्ठान करावे. कारण, स्वर्गलोक पूर्व दिशेस असल्याचे प्रसिद्ध आहे.

प्रत्येक दिवशी सरस्वती नदीच्या तीरातीराने पूर्व दिशेस मजल करून जात असावे. कारण, सरस्वती नदीच्या तीराने जाणारा मार्ग देवांच्याकडे जाण्याला योग्य होय. या मार्गाने गेले असता यज्ञकर्ते यजमान स्वर्गलोकाला सुखाने जाऊन पोचतात. सरस्वती नदीच्या तीराने जाताना सर्वांनी अत्यंत उत्साहाने मोठमोठ्याने आनंदव्यंजक घोष करीत जावे. असे केल्याच्या योगाने शत्रूच्या ठिकाणी दारिद्र्य व स्वत:च्या ठिकाणी धनसंपत्तीची स्थापना करीत करीतच जणू पुढचा मार्ग आक्रमण केल्यासारखे होते. सारस्वत सत्र करणाऱ्या यजमानांनी सत्राचा आरंभ करताना एका वृषभासह दहा गाई बाळगाव्यात व त्या वृषभापासून त्या गाईंच्या ठिकाणी अपत्यपरंपरेने उत्पन्न होणाऱ्या गाईंची शंभरापर्यंत संख्या वाढली म्हणजे सारस्वतसत्राची समाप्ती करावी. तोपर्यंत आताच सांगितल्याप्रमाणे सरस्वती नदीच्या तीराने प्रवास करीत करीत

षडह क्रतूचे अनुष्ठान यथाक्रम चालू ठेवावे. पुरुष हा शतायू असून त्याच्या शरीरातील नाडीरूप इंद्रियेही शंभर असतात. यास्तव, आरंभी असलेल्या गाईंची संख्या शंभर भरेपर्यंत सारस्वत सत्रासंबंधी अनुष्ठान चालू ठेवल्याने सत्रकर्ते यजमान नाडीरूप असणाऱ्या शंभर इंद्रियांच्या व शंभर वर्षांच्या ः आयुर्मर्यादेच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

शंभर गाई प्रारंभी पाळाव्यात व त्या गाई अपत्यपरंपरेने हजार संख्येचे संपादन करीपर्यंत सारस्वत सत्र चालवावे. गाईंची संख्या हजार झाली म्हणजे सत्र संपवावे. कारण, स्वर्गलोक हा हजार सुखभोगांनी समृद्ध असा आहे. यास्तव, शंभर गाईंची संख्या हजार होईपर्यंत सारस्वत सत्र चालविणारे यजमान हजार सुखभोगांनी युक्त असा स्वर्गलोक जिंकतात म्हणजे तो त्यांना प्राप्त होतो.

सारस्वत सत्र अनुष्ठित करणाऱ्या यजमानांपैकी कोणी यजमान जर मृत होईल तर त्याच वेळी सत्राची समाप्ती करावी. अथवा सरस्वती नदीच्या तीराने प्रवास करीत करीत सारस्वत सत्र करणारे यजमान राष्ट्रक्षोभामुळे शत्रूंच्याकडून जिंकले गेले किंवा त्यांच्या सर्वस्वाची लूट करण्यात आली तर त्याच वेळी सत्र पूर्ण करावे. अशा प्रकारच्या निमित्ताने केलेले सत्राचे समापन पापापासून तारणारे होते. (अनुवाक १).

उद्दालकाच्या कुसुरविन्द नामक पुत्राला 'आपण पुष्कळ पशूंनी युक्त व्हावे' अशी इच्छा झाली. ती पूर्ण करण्याचे साधन म्हणून त्याने या 'सप्तरात्र' नांवाच्या क्रतूचे साहित्य जमविले आणि तो सप्तरात्र क्रतू केला. त्या योगाने त्याला गाई, शेळ्या, घोडे, मेंढ्या, गाढवे, उंट व नोकर चाकर या सर्व जातींचे ग्राम्य पशू प्राप्त झाले. सप्तरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणून जो कोणी सप्तरात्र क्रतूचे अनुष्ठान करतो त्यालाही पूर्वोक्त सर्व जातींचे ग्राम्य पशू प्राप्त होतात. हा सप्तरात्र क्रतू सात दिवसांच्या सोमयजनाने पूर्ण होणारा आहे. ग्राम्य पशू जसे सात जातींचे आहेत तसेच आरण्य किंवा अरण्यसंचारी पशूही सात जातींचे आहेत. प्रसिद्ध असे गायत्री इत्यादि छंदही सातच आहेत. सारांश, ग्राम्य व आरण्य पशू आणि छंद यांच्याशी स्वरूपसाम्य असलेल्या सप्तरात्र क्रतूचे अनुष्ठान यज्ञकर्त्या यजमानाला ग्राम्य व आरण्य या दोनही जातींचे पशू आणि छंद यांची प्राप्ती करून देण्याला कारणभूत

होते. सप्तरात्र क्रतूतील पहिल्या दिवशी त्रिवृत्स्तोमयुक्त असा अग्निष्टोम करावा. त्या योगाने यजमानाला तेज प्राप्त होते. दुसऱ्या दिवशी पंचदशस्तोमयुक्त असा उक्थ्य करावा. त्या योगे यजमानाला स्वकार्यक्षम असा इंद्रियसमुदाय प्राप्त होतो. तिसऱ्या दिवशी सप्तदशस्तोमयुक्त असा उक्थ्य करावा. त्या योगाने सेवनीय असे भरपूर अन्न यजमानाला प्राप्त होते. शिवाय त्या यजमानाच्या ठिकाणी प्रजोत्पादनसामर्थ्यही निर्माण होते. चौथ्या दिवशी एकविंशस्तोमयुक्त असा षोडशी करावा. तो यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतो. व त्या प्रतिष्ठेचे तेज तो यजमान आपल्या ठिकाणी संपादन करतो. पांचव्या दिवशी त्रिणवस्तोमयुक्त असा उक्थ्य करावा. तो यजमानाला सर्व कार्यांमध्ये जय मिळवून देण्याला कारणभूत होतो. सहाव्या दिवशी पंचविंश स्तोमयुक्त असा अग्निष्टोम करावा. तो यजमानाला प्रजापतीची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतो. हा अग्निष्टोम 'महाव्रत' वान् व्हावा. म्हणजे 'महाव्रत' नांवाच्या क्रतूमध्ये जी स्तोत्रे म्हणजे सामे गावयाची असतात ती या अग्निष्टोमात गावीत. अशा प्रकारे केलेल्या महाव्रतधर्मवान् अग्निष्टोम यजमानाला सेवनीय अशा अन्नाच्या प्राप्तीला कारणभूत होतो. पृष्ठयसंज्ञक सहाही पृष्ठांचा ज्यामध्ये उपयोग केला जातो असा विश्वजित् नांवाचा अतिरात्र सातव्या दिवशी करावा. तो यजमानाला सर्वतोपरी विजय प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो.

सप्तरात्र क्रतूतील सातव्या दिवसापूर्वीच्या सहा दिवसांच्या ठिकाणी रथंतर, बृहत्, वैरूप, वैराज, शाक्वर व रैवत ही जी पृष्ठे अनुक्रमाने गाइली गेली तीच सर्वपृष्ठस्तोत्रे जर प्रत्यक्ष म्हणजे जशीच्या तशीच सातव्या दिवशी होणाऱ्या विश्वजित् मध्ये गाइली तर, एखाद्या गाईची धार काढल्यानंतर पुन्हा त्याच गाईची धार काढावयास जसा एखादा भ्रांतिष्ट माणूस बसतो, परंतु, त्या गाईपासून दुधाचा लाभ मात्र होत नाही, त्याचप्रमाणे सातव्या दिवशी होणारा तो विश्वजित् अतिरात्र निष्फळ होईल. त्यापासून एखाद्या एकरात्रक्रतूइतकेही फळ निष्पन्न होणार नाही. मग सप्तरात्र क्रतूमध्ये त्याचा अंतर्भाव होण्याची वार्ताच बोलावयास नको. यास्तव, सप्तरात्र क्रतूतील सातव्या दिवसापूर्वीच्या सहा दिवसांमध्ये एक दिवस रथंतर व एक दिवस बृहत् अशा क्रमाने ही दोनच पृष्ठ स्तोत्रे उपयोगात आणावीत. वैरूपादि चार पृष्ठांचा उपयोगच करू नये. रथंतर हे पृष्ठस्तोत्र पृथ्वीरूप असून बृहत् पृष्ठस्तोत्र द्युलोकरूप किंवा स्वर्गरूप आहे. सारांश, सप्तरात्र क्रतूतील प्रथमपासूनच्या सहा दिवसांमध्ये

अनुक्रमे रथंतर व बृहत् या दोन पृष्ठस्तोत्रांचा उपयोग केला असता त्या दोन पृष्ठस्तोत्रांच्या प्रभावाने सप्तरात्र क्रतू करणारे यजमान स्वर्गलोकातून केव्हाही परत येणार नाहीत. सदैव स्वर्गलोकीच प्रतिष्ठित होतील. शेवटच्या सातव्या दिवशी, विश्वजित् यागाच्या दिवशी मात्र बृहत्-रथंतर-वैरूपादि सहाही पृष्ठस्तोत्रांचे गान करावे. म्हणजे एखाद्या नवप्रसूत व भरपूर दूध देण्यास उत्सुक अशा गाईची धार काढावयास बसावे आणि तिच्यापासून भरपूर दूध काढावे त्याप्रमाणे होईल. अर्थात् तो विश्वजित् क्रतू यजमानाला सप्तरात्र क्रतूचे यथोक्त फल प्राप्त करून देईल. (अनुवाक २).

आपण ब्रह्मवर्चससंपन्न व्हावे, अशी बृहस्पतीला इच्छा झाली. तेव्हा त्याला विचार करता, आपली इच्छा पूर्ण होण्यास 'अष्टरात्र' क्रतू हा साधनभूत होईल असे आढळून आले. मग त्याने अवश्य ती सामग्री जुळविली व अष्टरात्र क्रतू केला. त्या क्रतूच्या प्रभावाने तो ब्रह्मवर्चससंपन्न झाला. अष्टरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणून जो तो क्रतू करतो, तो ब्रह्मवर्चसी म्हणजे ब्रह्मवर्चसाने संपन्न होतो. हा क्रतू आठ दिवस सोमयाग केल्याने पूर्ण होत असतो. चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने गायत्री छंद हा अष्टाक्षरी असून त्या छंदात असलेली गायत्री ऋचा ही ब्रह्मवर्चसरूप आहे. यास्तव, गायत्री छंदाशी स्वरूपसाम्य असलेला हा अष्टरात्र क्रतू केला असता, यज्ञकर्त्या यजमानाला गायत्रीच्या अनुग्रहाने ब्रह्मवर्चस् प्राप्त होते. पूर्व इत्यादि चार दिशा व आग्नेय इत्यादि चार उपदिशा मिळून आठ दिशा होतात. अर्थात् अष्टरात्र क्रतूच्या ठिकाणी अष्ट दिशांचे स्वरूपसाम्य निष्पन्न होते. यास्तव, दिशांच्याशी स्वरूपसाम्य असलेला हा क्रतू केला असता अष्ट दिशांच्या द्वारे यजमानाला ब्रह्मवर्चस् प्राप्त होते.

अष्टरात्र क्रतूतील पहिल्या दिवशी त्रिवृत्सोमयुक्त अग्निष्टोम करावा. त्या योगाने यजमानाला तेज प्राप्त होते. दुसऱ्या दिवशी पंचदशस्तोमयुक्त उक्थ्य करावा. त्या योगाने यजमानाला कार्यक्षम असा इंद्रियगण प्राप्त होतो. तिसऱ्या दिवशी सप्तदशस्तोमयुक्त उक्थ्य करावा. तो यजमानाला सेवनीय असे अन्न प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. आणि त्याशिवाय त्या यजमानाच्या ठिकाणी प्रजोत्पादनसामर्थ्यही निर्माण होते. चौथ्या दिवशी एकविंशस्तोमयुक्त असा उक्थ्य करावा. तो यजमानाला प्रतिष्ठा प्राप्त करून दण्याला कारणभूत

होतो. शिवाय त्या क्रतूच्या प्रभावाने यजमान आपल्या शरीराच्या ठिकाणी उज्वल अशी कांती संपादन करतो. पांचव्या दिवशी त्रिणवस्तोमयुक्त असा उक्थ्य करावा. तो यजमानाला विजय प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. सहाव्या दिवशी त्रयस्त्रिंशस्तोमयुक्त उक्थ्य करावा. तो यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतो. सातव्या दिवशी पंचविंशस्तोमयुक्त अग्निष्टोम करावा. तो यजमानाला प्रजापतीची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतो. हा अग्निष्टोम 'महाव्रतवान्' म्हणजे महाव्रत क्रतूत गाइल्या जाणाऱ्या सामांचे गान करून अनुष्ठित करावा. तो यजमानाला शंसनीय अशा अन्नाची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतो. शेवटच्या आठव्या दिवशी सर्वच पृष्ठस्तोत्रांचा ज्यामध्ये उपयोग केला जाईल असा विश्वजित्संज्ञक अतिरात्र करावा. तो यजमानाला सर्व प्रकारे विजय मिळवून देण्याला कारणभूत होतो.

प्रजापतीने प्रजा निर्माण केल्या. परंतु, त्या सर्व क्षुधेने अत्यंत पीडित झाल्या. तेव्हा प्रजापतीने त्या प्रजांची क्षुधा कशी निवारण होईल याविषयी विचार केल्यानंतर 'नवरात्र' क्रतू हा या प्रजांची क्षुधा निवारण करण्यास समर्थ आहे, असे त्यास आढळून आले. लागलीच त्याने त्या क्रतूस लागणाऱ्या साहित्याची जमवाजमव करून नवरात्र क्रतूचे अनुष्ठान केले. त्या योगाने प्रजापती सर्व प्रजांची क्षुधा निवारण करण्यास समर्थ झाला. यास्तव, ज्या वेळी अन्नाच्या अभावामुळे प्रजांना क्षुधेची अत्यंत पीडा उत्पन्न होईल, त्यावेळी नवरात्र क्रतूचे यजन करावे. भूम्यादि तीनही लोक धान्यनिष्पत्तीच्या अभावी जेव्हा त्यांच्या ठिकाणी राहणाऱ्या प्रजांची क्षुधा निवारण करण्यास असमर्थ होतात, तेव्हाच त्या तीनही लोकांतील सर्व प्रजा क्षुधेने अत्यंत पीडित होतात. जेव्हा एखादा यजमान 'नवरात्र' क्रतूच्या अनुष्ठानाने भूम्यादि लोकांना व त्यांच्या ठिकाणी राहणाऱ्या प्रजांना क्षुन्निवारणसमर्थ करतो, अर्थात् तीन्ही लोकांमध्ये धान्य पुष्कळ निष्पन्न होते तेव्हाच त्यांच्या ठिकाणी राहणाऱ्या प्रजाही क्षुन्निवारणसमर्थ होतात. प्रजांच्या क्षुधेचे निवारण करण्यास तीन्ही लोक समर्थ झाले म्हणजे नवरात्र क्रतू करणारा यजमान साहजिकच आपल्या प्रजांचे क्षुधेपासून रक्षण करण्यास समर्थ होतो. सारांश, नवरात्र क्रतूच्या प्रभावाने भूम्यादि तीनही लोक भरपूर धान्य पिकविण्यास समर्थ होतात आणि त्यामुळे यजमानही आपल्या सर्व प्रजांच्या ठिकाणी त्यांच्या निर्वाहास पुरेसे धान्य स्थापन करू शकतो.

'नवरात्र' क्रतूतील नऊ दिवसांमध्ये तोन तीन दिवसांचे तीन विभाग पडतात. पहिल्या त्रिरात्राच्या म्हणजे तीन दिवसांच्या पहिल्या विभागाने यजमान भूलोकाला क्षुन्निवारणसमर्थ करतो. तीन दिवसांच्या दुसऱ्या विभागाचे अनुष्ठान करून यजमान अंतरिक्षलोकाला क्षुन्निवारणसमर्थ करतो. आणि तीन दिवसांच्या तिसऱ्या विभागाच्या अनुष्ठानप्रभावाने यजमान द्युलोकाला म्हणजे स्वर्गलोकाला क्षुन्निवारणसमर्थ करतो. तिपेडी दोरी वळू इच्छिणारा माणूस ज्याप्रमाणे एका पेडात दुसरा पेड गाठवितो व एकत्र गाठविलेल्या दोन्ही पेडांमध्ये तिसराही पेड गाठवून दोरी तयार करतो, त्याप्रमाणे नवरात्र क्रतू करणारा यजमान पहिल्या त्रिदिवसात्मक विभागाने भूलोक क्षुन्निवारण समर्थ केल्यानंतर दुसऱ्या विभागाने अंतरिक्षलोक व तिसऱ्या विभागाने स्वर्गलोकही क्षुन्निवारणसमर्थ करतो. नवरात्र क्रतूचे अशा प्रकाराने तीन विभागांनी केलेले अनुष्ठान सर्व प्रजांच्या धारणाला व स्थैर्याला कारणभूत होते.

सामगान करणाऱ्या उद्गात्यांना अत्यंत परिचित असलेले व 'स्तोम' शब्दयुक्त नांवांनी प्रसिद्धीस आलेले ज्योति गौ व आयु हे तीन सोमयाग पूर्वोक्त तीन दिवसांच्या प्रत्येक विभागात अनुक्रमे एक एक दिवस करावेत. पहिल्या दिवशी ज्योतिष्टोम, दुसऱ्या दिवशी गोष्टोम व तिसऱ्या दिवशी आयुष्टोम करावा. याप्रमाणे प्रत्येक तीन तीन दिवसांच्या तीन्ही विभागात या तीन यागांच्या आवृत्ती कराव्यात. ज्योतिष्टोम हा भूलोकरूप असून गोष्टोम हा अंतरिक्षलोकरूप आहे. आयुष्टोम हा स्वर्गलोकरूप आहे. यास्तव, नवरात्र क्रतूतील तीन तीन दिवसांच्या तीन विभागांत त्या तीन सोमयागांचे अनुष्ठान केले असता, नवरात्र क्रतू करणारा यजमान पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्ग या तीन्ही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. इतकेच नव्हे तर सर्व प्रजांच्या ठिकाणी 'क्षुधेचे निवारण करणारा यज्ञकर्ता' म्हणून तो यजमान प्रख्यात होतो. 'ज्योति' इत्यादि तीन यागांच्या अनुष्ठानाने पूर्ण होणारा जो त्रिरात्र म्हणजे तीन दिवसांचा विभाग, त्याच्या तीन आवृत्ती केल्या असता नवरात्र क्रतू पूर्ण होतो. इतकेच नव्हे तर त्या क्रतूतील प्रत्येक त्रिरात्राचे अनुष्ठान त्या यजमानाच्या ठिकाणी उत्तरोत्तर अधिक तेज संपादन करते.

फार दिवस शरीरात मुरलेल्या एखाद्या रोगाने जो ग्रस्त झाला असेल त्याने नवरात्र क्रतूचे यजन करावे. कारण शरीरगत असलेल्या जीवनाधारभूत

अशा अष्ट धातूंमध्ये जेव्हा वैषम्य उत्पन्न होते, तेव्हाच त्या शरीराकडून प्राणांचे धारण करणे, अशक्य होऊ लागते. आणि मग त्या पुरुषाला दीर्घकालीन असा एखादा रोग जडतो. यास्तव, अशा रोगग्रस्त पुरुषाने नवरात्र क्रतू केला असता तो त्या पुरुषाच्या ठिकाणी प्राणांचे धारण करतो. त्या पुरुषाचे शरीर निरोगी व प्राणधारणा करण्यास समर्थ होणे, इतकेच नव्हे तर, रोगाधिक्यामुळे एखादा पुरुष मूर्च्छित होऊन गतप्राण झाला असला तरी देखील तो नवरात्र क्रतूच्या प्रभावाने पुन्हा जिवंत होतो. (अनुवाक ४).

प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा असलेल्या प्रजापतीने आपली इच्छा पूर्ण होण्याचे साधन म्हणून उपयोगी पडणारा 'दशरात्र' क्रतू संपन्न करण्याला 'दशहोतृ' संज्ञक मंत्र हा साधनभूत होईल असे प्रजापतीला विचाराअंती आढळून आले. नंतर त्याने 'चित्तिः स्रुक् चित्तमाज्यम्' इत्यादि दशहोतृसंज्ञक मंत्राने होम केला आणि त्या होमाच्या प्रभावाने दशरात्र क्रतूची निर्मिती केली. मग त्या दशरात्र क्रतूच्या प्रभावाने प्रजापतीने प्रजा उत्पन्न केल्या. दशरात्र क्रतूची दीक्षा करणाऱ्या यजमानाने प्रथम 'दशहोतृ' नांवाच्या मंत्राचा होम करावा. त्या होमाच्या प्रभावाने तो यजमान दशरात्र क्रतूचे अनुष्ठान करतो व त्या क्रतूच्या सामर्थ्याने प्रजा उत्पन्न करतो.

दशरात्र क्रतूचे दशाक्षरीचरणाच्या विराट् छंदाशी स्वरूपसाम्य असल्यामुळे दशरात्र क्रतू हा 'वैराज' म्हणजे विराट्छंदस्वरूपच आहे. विराट् छंद हा अन्नाची प्राप्ती करून देणारा आहे, हे जाणून जो कोणी दशरात्र क्रतू करतो त्याला विराट् छंदाच्या द्वारे भरपूर अन्न प्राप्त होते.

प्रजोत्पादनसामर्थ्यरूप फळ देणारा हा दशरात्रसंज्ञक यज्ञ जणू 'प्राजापत्य' म्हणजे प्रजापतिरूपच आहे, हे जाणून जो कोणी दशरात्र क्रतूचे यजन करतो तो आपल्या ठिकाणी प्रजा उत्पन्न करतो.

पूर्वी इंद्र हा इतर देवतांच्याशी समानरूपच होता म्हणजे इतर देवतांच्याहून तो मोठा आहे, असे गणले जात नव्हते. सर्व देव त्याला 'अरे तुरे' अशा एकेरी नांवाने हाक मारीत. 'अहो महाराज' असे बहुमानाने त्याला कोणीही संबोधीत नसे. तेव्हा तो प्रजापतीकडे गेला आणि 'इतर देवांच्याहून मी मोठा कसा गणलो जाईन' याविषयी त्याने प्रजापतीला उपाय विचारला. तेव्हा प्रजापतीने हा दशरात्र क्रतू इंद्राला दिला. म्हणजे देवांच्याकडून श्रेष्ठता

प्राप्त होण्यासाठी तू 'दशरात्र' कर, असे प्रजापतीने इंद्राला सुचवून त्या क्रतूविषयी सर्व प्रकारे त्याला ज्ञान करून दिले. नंतर इंद्राने दशरात्र क्रतूचे साहित्य जमवून त्या क्रतूचे यजन केले. तेव्हापासून इतर देवांच्याहून त्याची गणना वेगळी होऊ लागली व सर्व देव त्याला राजाप्रमाणे मान देऊ लागले. दशरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणणारा जो कोणी 'दशरात्र' क्रतू करतो तो पापापासून व आपल्या शत्रूपासून वेगळा होऊन श्रेष्ठ गणला जातो.

बैलाच्या पाठीवर ज्याप्रमाणे एक उंच असे वशिंड असते, त्याप्रमाणे हा दशरात्र यज्ञ तीन वशिंडांनी युक्त असा असतो. दशरात्रामध्ये होणारा पंचदशस्तोमयुक्त उक्थ्य हे त्याचे पहिले व एकविंशस्तोमयुक्त उक्थ्य, हे त्याचे दुसरे वशिंड असून त्रयस्त्रिंशस्तोमात्मक उक्थ्य हे त्या दशरात्र क्रतूचे तिसरे वशिंड होय. दशरात्र क्रतूचे हे स्वरूप जाणून जो कोणी यजमान दशरात्र क्रतूचे यजन करतो, तो एकेकाळी आपल्या बरोबरीच्या असलेल्या लोकांमध्ये तीन वशिंडांच्या सारखा म्हणजे तीन प्रकारांनी उच्च गणला जातो. दशरात्र क्रतूमध्ये अंतर्गत असलेल्या पंचदशस्तोमयुक्त उक्थ्य क्रतूने तो यजमान प्रजा व पशू यांच्या समृध्दीने इतरांच्याहून श्रेष्ठ गणला जातो. एकविंशस्तोमयुक्त अशा उक्थ्याच्या अनुष्ठानप्रभावाने तो धनसंपन्नतेच्या दृष्टीने इतरांहून श्रेष्ठ ठरतो व त्रयस्त्रिंशस्तोमयुक्त अशा उक्थ्याच्या अनुष्ठानप्रभावाने त्या यजमानापुढे इतर सर्व लोक नम्र होतात, अर्थात् इतर लोकांचा तो यजमान सत्ताधीश असा राजा होतो.

कोणा शत्रूने ज्याच्यावर अभिचार म्हणजे मारण प्रयोग केला असतो, त्याने त्या अभिचाराच्या निवारणासाठी या दशरात्र क्रतूचे यजन करावे. त्या योगाने त्या दशरात्र क्रतू करणाऱ्या यजमानाने शत्रूने केलेल्या अभिचारापासून आपले संरक्षण करण्यासाठी आपल्या भोवती शूर अशा सैनिकांनी युक्त अशी देवांची अनेक नगरेच जणू स्थापन केल्यासारखे होते. अर्थात् ज्या शत्रूने त्या यजमानावर अभिचार केलेला असतो तो त्याचा नाश करण्यास असमर्थ होतो. इतकेच नव्हे तर कोठल्याही बाजूने कसल्याही प्रकारची बाधा त्याला होत नाही. तसेच त्या यजमानावर कोणाकडूनही अभिचार होण्याचा संभवच उत्पन्न होत नाही.

देव आणि असुर हे जेव्हा परस्परांशी युद्ध करण्यास प्रवृत्त झाले,

तेव्हा देवांनी आपल्याला विजयप्राप्ती कशी होईल याचा विचार केल्यावर, 'दशरात्र क्रतूच्या अनुष्ठानाने आपल्या भोवती देवनगरे स्थापित करण्याने आपण विजयी होऊ', असे त्यांना आढळून आले. तदनुसार त्यांनी 'दशरात्र' क्रतूचे यजन करून त्या क्रतूच्या प्रभावाने आपल्या भोवती शूर अशा सैनिकांची ज्यामध्ये पुरेशी भरती झालेली आहे, अशा प्रकारची अनेक देवनगरे उभारली. त्या योगाने असुरांच्याकडून त्यांच्यावर कोणत्याही बाजूने हल्ला होऊ शकला नाही. अर्थात् देव विजयी झाले आणि असुर पराभूत झाले. यास्तव, शत्रूंच्याकडून होणाऱ्या उपद्रवाने जो ग्रासलेला असतो त्याने दशरात्र क्रतू करावा. त्या क्रतूच्या प्रभावाने तो क्रतुकर्ता यजमान आपल्या भोवती स्वसंरक्षणासाठी देवनगरांची स्थापना करतो व त्यामुळे त्याला कोणत्याही शत्रूपासून उपद्रवाची बाधा न होता, तो सुरक्षित होतो आणि त्याचा शत्रू पराभव पावतो. शिवाय, वशिंडासारखा असलेला दशरात्रांतर्गत पंचदशस्तोमयुक्त उक्थ्याच्या समीपवर्ती असणारा त्रिवृत्स्तोम क्षीण होतो व त्यायोगे यजमान आपल्या शत्रूलाही क्षीण करतो.

जे कोणी दशरात्र क्रतू करणारे यजमान दशरात्रातील दुसऱ्या दिवशी पंचदशस्तोमात्मक उक्थ्याचे अनुष्ठान करून तिसऱ्या दिवशी त्याहून ठेंगण्या असलेल्या त्रिवृत् स्तोमाचा उपयोग करून याग करतात ते जणू काय, मोठ्या संपत्तीचा उपयोग एकदा केल्यानंतर पुन्हा दारिद्याच्या विपत्तीत पडून क्लेश अनुभवतात. यास्तव, तसे न करता, पंचदशस्तोमयुक्त उक्थ्य करण्याच्या आधीच्या दिवशी व तो उक्थ्य केल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी अग्निष्टोमसंस्थ प्रयोजित अशा 'यज्ञायज्ञिय' सामांचा उपयोग जे दशरात्र क्रतू करणारे यजमान करतील त्यांचे ते अनुष्ठान त्यांना प्राप्त होणाऱ्या दारिद्यादि हीनतेचा परिहार करण्याला कारणभूत होते.

दशरात्र क्रतूतील पहिल्या दिवशी त्रिवृत्स्तोमयुक्त अग्निष्टोम करावा. अग्निष्टोमसंस्थ यागाचाच 'अग्निष्टुत्' नांवाचा एक अवांतर भेद आहे. त्यामध्ये सर्वच स्तोत्रांच्या ठिकाणी अग्नीचीच स्तुती केली जात असून सर्वच स्तोत्रांमध्ये फक्त एका त्रिवृत् स्तोमाचाच उपयोग केला जात असतो. अर्थात् सर्वच स्तोत्रांच्या आधारभूत असलेल्या ऋचा आग्नेयी म्हणजे अग्निदेवतेची स्तुती करणाऱ्या असल्यामुळे अग्निष्टोमाच्याच या अवांतरभेदास 'अग्निष्टुत्' ही विशेष संज्ञा प्राप्त झाली आहे. एवं च, पहिल्या दिवशी अग्निष्टुत्संज्ञक याग करावा.

त्या योगाने यजमानाला तेज प्राप्त होते.

दुसऱ्या दिवशी पंचदशस्तोमात्मक उक्थ्य करावा. या उक्थ्यामध्ये गाइल्या जाणाऱ्या ऋचा 'ऐंद्री' म्हणजे इंद्राची स्तुती करणाऱ्या असतात. या उक्थ्य यागाच्या योगाने यजमानाला कार्यक्षम असा इंद्रियसमुदाय प्राप्त होतो. तिसऱ्या दिवशी त्रिवृत्स्तोमयुक्त असा अग्निष्टोम करावा. त्यातील सर्व स्तोत्रांच्या आधारभूत ऋचा वैश्वदेवी म्हणजे विश्वेदेवांची स्तुती करणाऱ्या असाव्यात. त्या योगाने यजमानाला सर्व प्रकारची पुष्टी प्राप्त होते. चौथ्या दिवशी तीव्र स्तोम अशी विशिष्ट संज्ञा असलेला सप्तदशस्तोमात्मक उक्थ्य करावा. या उक्थ्यामध्ये 'आशिर' तयार करण्यासाठी शंभर गाईंची धार काढावी लागत असल्यामुळे त्यास 'तीव्रसोम' अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. शिवाय या उक्थ्याचे अनुष्ठान करताना त्याला अग्निष्टोमाचे स्वरूप द्यावे. या यागामध्ये गाइल्या जाणाऱ्या पंधरा स्तोत्रांपैकी शेवटची तीन स्तोत्रे कमी केली म्हणजे बाराच स्तोत्रे उरतात. अर्थात् या उक्थ्यामध्ये तेवढ्या बारा स्तोत्रांचे गान केले म्हणजे त्याला अग्निष्टोमाचे स्वरूप प्राप्त होते. सर्व स्तोत्रे प्राजापत्य म्हणजे प्रजापतिदेवतेची स्तुती करणाऱ्या ऋचांच्या आधारे गावीत. अशा प्रकारे 'तीव्रसोम' नांवाच्या उक्थ्यविशेषाचे अनुष्ठान केल्याने यजमानाला सेवनीय असे अन्न प्राप्त होते आणि प्रजापतिदेवतात्मक ऋचांच्या आधारे सामगान केल्यामुळे त्या यजमानाच्या ठिकाणी प्रजाही उत्पन्न होते. ज्या यागांमधील स्तोत्रांच्या ठिकाणी सौरी म्हणजे सूर्याची स्तुती असलेल्या ऋचा गाइल्या जातात, असा एकविंशस्तोमयुक्त उक्थ्य पांचव्या दिवशी करावा. त्या योगाने यजमानाला उत्कृष्ट शरीरकांती प्राप्त होते.

'उपहव्य' असे नांव असलेला अग्निष्टोमसंस्थ असा एक याग आहे. 'प्राजापत्य' अर्थात् प्रजापतिदेवतेच्या स्तावक असलेल्या ऋचा या यागातील स्तोत्रांच्या ठिकाणी उपयोगात आणाव्या. हा उपहव्यसंज्ञक विशिष्ट अग्निष्टोम सातव्या दिवशी करावा म्हणजे यजमान सर्वत्र पूज्यतेला प्राप्त होतो.

दशरात्रातील सातव्या व नवव्या दिवशी अनुक्रमे त्रिणवस्तोमात्मक दोन अग्निष्टोम करावेत. या दोनही अग्निष्टोमांतील स्तोत्रे ऐंद्री म्हणजे इंद्रदेवतेची स्तुती करणाऱ्या ऋचांच्या आधारे गावीत. हे दोन याग यजमानाला सर्व कार्यांत विजयी होण्याला कारणभूत होतात. पूर्वोक्त दोन दिवसांच्या मधल्या

म्हणजे आठव्या दिवशी त्रयस्त्रिंशस्तोमयुक्त असा उक्थ्य करावा. तो यजमानाला सर्वत्र प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. शेवटच्या दहाव्या दिवशी सर्वत्र पृष्ठस्तोत्रांचा उपयोग ज्यामध्ये केला जातो, असा 'विश्वजित्' संज्ञक 'अतिरात्र' करावा. तो यजमानाला सर्व बाजूंनी जय प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. (अनुवाक ५).

वसंतादि ऋतू प्रजाप्राप्तीची इच्छा करीत असूनही त्यांची इच्छा सफल झाली नाही. त्यांना प्रजेची प्राप्ती झाली नाही. तेव्हा आपण प्रजा उत्पन्न करण्याला समर्थ व्हावे, उत्पन्न होईल त्या प्रजेचे नियंत्रण करण्यास आपण समर्थ व्हावे, उत्पन्न प्रजेपासून परंपरेने उत्पन्न होणारी प्रजा आपणास लाभावी आणि अशा प्रकारे पुष्कळ व प्रशस्त अशा प्रजांच्या योगाने आपण समृद्ध होऊन राहावे, अशी चार प्रकारची कामना त्या ऋतूंनी धारण केली. आपली चारही प्रकारची कामना पूर्ण होण्याला 'एकादश सत्र' हा क्रतू साधनभूत होईल, असे त्यांना दिसून आले. त्यांनी सर्व साहित्याची तयारी केली आणि 'एकादश रात्र' क्रतूचे यजन केले. त्या क्रतूच्या प्रभावाने, प्रजा उत्पन्न करण्याचे सामर्थ्य, उत्पन्न झालेल्या प्रजेचे नियंत्रण करण्याची पात्रता व त्या प्रजेपासून परंपरेने उत्पन्न होणाऱ्या प्रजेचा लाभ त्यांना प्राप्त झाला व शेवटच्या कामनेप्रमाणे ते वसंतादि ऋतू पुष्कळ व प्रशस्त अशा प्रजांच्या योगाने समृध्द होऊन राहिले. एकादश क्रतूच्या यजनानेने ऋतूंनी आपल्या चारही प्रकारच्या कामनेची पूर्ती करून घेतली, हेच त्या ऋतूंचे ऋतुत्व म्हणजे कर्तबगारी होय. विद्यमान असलेले सर्व प्राणी ऋतूंचेच पुत्र असल्यामुळे त्यांना 'ऋतू' असे म्हटले जाते. ऋतूंनी अनुष्ठित केलेल्या 'एकादश रात्र' नामक क्रतूचे हे महत्त्व जाणणारे जे कोणी विद्वान् या 'एकादशरात्र' क्रतूचे सत्ररूपाने यजन करतील, ते प्रजा उत्पन्न करण्यास समर्थ होतील, उत्पन्न झालेल्या प्रजेचे ते नियंत्रण करू शकतील, उत्पन्न झालेल्या प्रजेपासून परंपरेने उत्पन्न झालेल्या प्रजेचा त्यांना लाभ होईल आणि अशा प्रकारच्या पुष्कळ व प्रशस्त प्रजांच्या योगाने ते निरंतर समृद्ध स्थितीत राहतील.

एकदिनसाध्य अशा कोणत्याही सोमयागास 'एकाह' अशी संज्ञा आहे. 'एकादशरात्र' नामक सत्रातील पहिल्या दिवशी 'ज्योती' संज्ञक 'एकाह' अतिरात्र संस्थारूप करावा. तो अतिरात्रसंस्थारूप 'ज्योति' नांवाचा एकाह, सत्रकर्त्या

यजमानांना स्वर्गलोक स्पष्ट दिसावा म्हणून त्यांच्यापुढे मशालीप्रमाणे उज्वल असा प्रकाश निर्माण करतो. दुसऱ्या दिवसापासून क्रमाने सहा दिवस 'पृष्ठ्य षडह' नांवाच्या सहा एकाहांच्या संघाचे यजन करावे. कारण ऋतू सहा असून पृष्ठ्य षडहातील सहा दिवसांत उपयुक्त केली जाणारी रथंतरादि पृष्ठ स्तोत्रेही सहाच आहेत. यास्तव, या पृष्ठसंज्ञक सहा स्तोत्रांच्या योगाने सत्रकर्ते यजमान सहा ऋतूंच्या ठिकाणी आरूढ होतात आणि त्या सहा ऋतूंच्या द्वारे ते संवत्सराच्या ठिकाणी प्राप्त होऊन तेथे ते चिरकाल प्रतिष्ठित होऊन राहतात. आठव्या दिवशी रथंतरपृष्ठप्रधान व चतुर्विंशस्तोमयुक्त असा उक्थ्य करावा. गायत्री ही चोवीसअक्षरी असते व ब्रह्मवर्चस् म्हणजे वेदाध्ययनजन्य तेज गायत्रीच्या उपासनेने प्राप्त होत असल्यामुळे गायत्रीरूपच आहे. यास्तव, चतुर्विंशस्तोमयुक्त अशा उक्थ्याच्या योगाने सत्रकर्त्या यजमानांना गायत्रीची प्राप्ती होते व त्या गायत्रीच्या अनुग्रहाने त्यांना ब्रह्मवर्चस् प्राप्त होऊन ते त्या ब्रह्मवर्चसरूप तेजाने प्रतिष्ठेला प्राप्त होतात. नवव्या दिवशी बृहद्रथंतरपृष्ठप्रधान व 'चतुश्चत्वारिंशत्' संज्ञक स्तोमाने युक्त असा उक्थ्य करावा. त्रिष्टुप् छंद हा चव्वेचाळीस अक्षरांचा असून इंद्रियांचा समुदाय हा त्रिष्टुप्छंदस्वरूप आहे. यास्तव, चतुश्चत्वारिंशत्स्तोमयुक्त अशा उक्थ्याच्या प्रभावाने सत्रकर्ते यजमान त्रिष्टुप् छंदाचे संपादन करतात आणि त्या त्रिष्टुप् छंदाच्या अनुग्रहाने त्रिष्टुप्छंदरूप अशा इंद्रियसमुदायाच्या ठिकाणी ते निरंतर प्रतिष्ठित होऊन राहतात. दहाव्या दिवशी 'बृहत्' संज्ञक पृष्ठसामप्रधान व 'अष्टाचत्वारिंशत्' स्तोमयुक्त असा उक्थ्य करावा. जगती छंद हा अठ्ठेचाळीस अक्षरांचा असतो. पशूंची उत्पत्ती जगती छंदाच्या साहचर्याने होत असल्याने ते जगतीरूपच होत. अर्थात् अष्टाचत्वारिंशत्स्तोमयुक्त अशा उक्थ्याच्या प्रभावाने यजमान जगती छंदाचे संपादन करतात. आणि त्या जगती छंदाच्या अनुग्रहाने त्या यजमानांना पशूंची प्राप्ती होते. सारांश, अशा प्रकारे संपादन केलेल्या पशूंच्या भव्य समुदायामध्ये ते सतत प्रतिष्ठित होऊन राहतात.

अकराव्या दिवशीएकोनत्रिंशस्तोमयुक्त अशा अतिरात्रसंज्ञक एकाहाचे अनुष्ठान करावे. अशा प्रकारे अकरा दिवस एकेका एकाहामध्ये यजन केल्याने 'एकादशरात्र' संज्ञक सत्ररूप क्रतू पूर्ण होत असतो. हेमंत व शिशिर हे दोन ऋतू मिळून एकच ऋतू मानल्यास ऋतू पांच होतात व त्या ऋतूंच्या पासून होणारे पुष्पोद्गमादि स्वभाव पांच प्रकारचे असतात. ऋतू व त्यांचे स्वभाव मिळून

दहा व एक संवत्सर मिळून अकरा ही संख्या पूर्ण होते. सारांश, एकादशरात्रसंज्ञक सत्राच्या यजनाने सत्रकर्ते यजमान पांच ऋतू, त्यांचे पांच स्वभाव व संवत्सर यांच्या ठिकाणी प्रतिष्ठेला प्राप्त होतात व प्रजेच्या समृध्दीलाही संपादित करतात. पहिल्या दिवशी ज्योतिसंज्ञक अतिरात्र व शेवटच्या अकराव्या दिवशी एकोनत्रिंशत्स्तोमयुक्त अतिरात्र, अशा प्रकारे आरंभ व शेवट या दोनही बाजूंनी 'अतिरात्र' क्रतूंनी युक्त असलेले एकादशरात्ररूप सत्र सत्रकर्त्या यजमानाच्या प्रजांचे दोन्ही बाजूंनी संरक्षण करण्याला कारणभूत होते. (अनुवाक ६).

आपल्या पुत्रपौत्रादि प्रजा, पितृपितामहादि पूर्वज ज्या चालीरीतींनी वागत आले, त्या चालीरीतींनी वागणाऱ्या व्हाव्यात, असे ज्याला वाटत असेल त्या यजमानाने आपल्या यज्ञात सोमग्रह घेताना 'ऐंद्रवायव' ग्रहाचे प्रथम ग्रहण करून नंतर इतर ग्रहांचे ग्रहण करावे. ऐंद्रवायव ग्रहाला ज्यात प्राथम्य अर्थात् प्रामुख्य देण्यात येते असा ग्रह घेण्याचा क्रम स्वीकारून केलेल्या त्या यज्ञाच्या योगाने त्या यजमानाच्या पुत्रपौत्रादि प्रजा आपल्या पूर्वजांनी अंगीकारलेल्या चालीरीतींनीच वागणाऱ्या निपजतात. उलट, ऐंद्रवायवग्रहप्रमुख अशा ग्रह घेण्याच्या या अनुक्रमात विपर्यास करून केलेल्या यज्ञाच्या योगाने त्या यजमानाच्या पुत्रपौत्रादि प्रजा पूर्वजांनी घालून दिलेल्या चालीरीतींचा विपर्यास करून वागू लागतात. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे ऐंद्रवायव ग्रहाचे प्रथम ग्रहण करून नंतर इतर ग्रहांचे जो ग्रहण करतो तो यजमान आपल्या पुत्रपौत्रादि प्रजेला प्राचीन चालीरीतींनी वागण्यास प्रवृत्त करतो. अर्थात् अल्पवयी प्रजांच्या कडून वयोवृद्ध अशा त्या यजमानाने घालून दिलेल्या मर्यादेचे अतिक्रमण होत नाही.

ज्या पुरुषाला एखादा रोग जडतो, त्याचा प्राण लौकरच त्याला सोडून जातो. अर्थात् प्राणाशी त्याचा वियोग होतो. यास्तव जो कोणी रोगग्रस्त असेल त्याने ऐंद्रवायव ग्रह आपल्या यज्ञात प्रथम ग्रहण करून नंतर इतरांचे ग्रहण करावे. कारण, ऐंद्रवायव हा ग्रह प्राणरूप आहे. म्हणून या ग्रहाचे ग्रहण प्रथम केल्याच्या योगाने तो यजमान रोगविमुक्त होऊन प्राणाच्या योगाने समृद्ध होतो.

सत्ररूप द्वादशाहाचे अनुष्ठान करणाऱ्या दीक्षितांपैकी जर एखादा दीक्षित मृत होईल तर इतर दीक्षितांच्या प्राण व अपान वायूंना धोका उत्पन्न

होतो. त्यांचे प्राण व अपान वायू शिथिल होऊन जातात. यास्तव, त्या दीक्षितांनी मैत्रावरुण ग्रहाचे प्रथम ग्रहण करून नंतर इतर ग्रहांचे ग्रहण करावे. कारण, एक दीक्षित मृत झाल्यानंतर इतर सर्व दीक्षितांच्या प्राण व अपान वायूंचे मित्रावरुण हे अभिमानी असल्याने मैत्रावरुण ग्रहाचे प्रथम ग्रहण करून त्या मित्रावरूणांचा संतोष केला असता, त्या दीक्षितांच्या प्राण व अपान वायूंना ते मित्रावरुण देव प्रारंभापासून समाधान स्थितीत ठेवतात. अर्थात् त्यांच्या शैथिल्याचा परिहार करतात.

स्वत: सर्वांहून प्रथम जन्मल्यामुळे अग्रमानतेने पूज्य मानण्याला पात्र असता दुर्दैवाने जो इतर बंधूंच्याकडून निकृष्टासारखा गणला जातो त्याला 'आनुजावर' असे म्हणतात. आनुजावर असलेल्या यजमानाचे उभयता अश्विनीकुमार हे अभिमानी देव असतात. देवांच्या समुदायामध्ये उभयता अश्विनीकुमार हे आनुजावर असल्याने प्रथम जरी निकृष्ट म्हणून गणले जात होते तरी कालांतराने ते श्रेष्ठतेला प्राप्त झाले. यास्तव, आनुजावर अशा यजमानाने आपल्या यज्ञात 'अश्विनौ' देवांच्यासाठी प्रथम ग्रह घेऊन नंतर इतर ग्रह घ्यावेत. असे केले असता संतुष्ट झालेले ते अश्विनीकुमार म्हणजे अश्विनौदेव त्या यजमानाला इतर बंधूंमध्ये श्रेष्ठतेला प्राप्त करतात.

संपत्ती नष्ट झालेल्या ज्या कोणा यजमानास आपल्याला पुन्हा संपत्ती प्राप्त होऊन समाजामध्ये प्रतिष्ठा प्राप्त व्हावी अशी इच्छा असेल त्याने आपल्या यज्ञात 'शुक्र' ग्रहाचे प्रथम ग्रहण करून नंतर इतर ग्रहांचे ग्रहण करावे. कारण, आकाशात तळपत असलेला हा आदित्य म्हणजेच शुक्र किंवा प्रकाशाची मूर्तीच होय. आदित्य हा जणू प्रकाशाची परमावधीच आहे. यास्तव, आदित्यप्रकाशरूप अशा शुक्रग्रहाचे प्रथमत: ग्रहण केल्याच्या योगाने यज्ञकर्ता यजमान दारिद्र्यातून मुक्त होऊन संपत्तीच्या पराकाष्ठेला जाऊन पोचतो. सारांश, प्रकाशाची परमावधीच असलेल्या शुक्रग्रहाचे प्रथम ग्रहण केल्याने यजमान संपत्तीच्या परमावधीला प्राप्त होतो व पुन्हा कधीही दरिद्री होत नाही.

आपल्या वैऱ्यावर अभिचार प्रयोग करावा, म्हणजे मारणप्रयोग करून आपल्या शत्रूस मारावे असे ज्यास वाटत असेल त्याने 'मंथी' ग्रह प्रथम घेऊन नंतर इतर ग्रह घ्यावेत. मंथीसंज्ञक ग्रहपात्र हे शत्रूला मृत्यूकडून ग्रस्त करविणारे असल्यामुळे त्याला 'आर्तपात्र' अशी संज्ञा आहे. सारांश,

मंथीसंज्ञक ग्रहपात्राचे प्रथम ग्रहण केले असता त्या यजमानाने आपल्या शत्रूला मृत्यूकडून ग्रासविल्यासारखे होते व तो शत्रू तात्काल मरतो.

ज्याचे पिता व पितामह हे धन, विद्या इत्यादि गुणांनी उत्कृष्ट असून देखील तो स्वत: जर तशा उत्कृष्ट स्थितीला प्राप्त झालेला नसेल तर तो एखाद्या सभेत गेला असता तेजस्वीपणाने भाषणादि व्यवहार करण्याचे कामी असमर्थ असतो. त्याच्या इंद्रियसमुदायाच्या ठिकाणी उजळ माध्याने संभाषणादि व्यवहार करण्याची शक्तीच नसते. तात्पर्य, ज्या यजमानाचे पिता व पितामह हे धन, विद्या इत्यादि गुणांनी उत्कर्षाला प्राप्त झाले असताही जो स्वत: उत्कर्षहीन असा असतो, व ज्याला आपल्या पित्याचे व पितामहाचे उत्कर्षस्थान प्राप्त होत नाही, त्याने आपल्या यज्ञात 'आग्रयण' ग्रहाचे प्रथम ग्रहण करून नंतर इतर ग्रह घ्यावेत. कारण 'आग्रयण' ग्रह हा यज्ञाच्या उर:प्रदेशाप्रमाणे सामर्थ्याचा आधार असलेले जणू वागिंद्रियच असून तो उत्कर्षाला कारणभूत होणारा आहे. यास्तव, आग्रयण ग्रहाचे प्रथम ग्रहण केले असता तो त्या यजमानाला सभापांडित्य करण्याला योग्य अशा वाणीने व धैर्ययुक्त अशा इंद्रियसमुदायाने समृद्ध करतो. आणि त्यामुळे तो कधीही सभेमध्ये पांडित्य करण्यात कमी ठरत नाही. एवं च, तोही आपल्या पित्याप्रमाणे व पितामहाप्रमाणे धनविद्यादि गुणांनी समृध्दतेला प्राप्त होतो.

आतापावेतों सोमग्रहपात्रांचे वर्णन केले, तेवढ्या सर्व सोमग्रहपात्रांमध्ये 'उक्थ्य' नांवाचे ग्रहपात्र इंद्रियसामर्थ्याने अधिक समर्थ असते. यास्तव, शत्रूकडून ज्याचा अभिचार म्हणजे मारणप्रयोग केला गेला आहे, अशा यजमानाने आपल्या यज्ञात 'उक्थ्य' ग्रहाचे प्रथम ग्रहण करावे. म्हणजे त्या उक्थ्य ग्रहाच्या प्रभावाने तो यजमान आपल्यावर अभिचार करणाऱ्या शत्रूचे मारणप्रयोगविषयक सर्व सामर्थ्य कुंठित करून स्वत: सुरक्षित राहतो.

ग्रहपात्रामध्ये सोमरस भरून घेण्यापूर्वी जी ऋचा पठण करावयाची असते तिला 'पुरोरुक्' अशी संज्ञा आहे. उक्थ्य ग्रह भरून घेण्यापूर्वी अध्वर्यूने 'सरस्वत्यभि नो नेषि वस्य:' असा प्रारंभ असलेली पुरोरुक्संज्ञक ऋचा पठण करावी. सरस्वती ही वाग्देवता होय. यास्तव, त्या ऋचेचे पठण केले असता अध्वर्यूने जणू काय आपल्या यजमानाला वाग्देवतेच्या अनुग्रहाने अभिचारकर्त्या शत्रूच्या सामर्थ्याचे अतिक्रमण करून स्वत: सुरक्षित राहण्यास

समर्थ केल्यासारखे होते. 'हे सरस्वति, तुझ्या प्रसादाने रमणीय नसलेल्या अशा मृत्युस्थानांना आम्ही केव्हाही प्राप्त होणार नाही', असा अर्थ असलेला 'मा त्वत्क्षेत्राण्यरणानि गन्म' असा चौथा चरण पूर्वोक्त ऋचेत पठण करावा. मृत्यूची स्थाने ही रमणीयताशून्य अर्थात् उद्वेगजनक अशी असतात. यास्तव, या चरणाचे पठण केल्याच्या योगाने यज्ञकर्ता यजमान मृत्यूच्या क्षेत्रांच्या ठिकाणी प्राप्त होत नाही.

जो नेहमी रोगग्रस्त झालेला असतो त्याच्या प्राणांना एकसारखी पीडा होत असते. यास्तव, रोगग्रस्त अशा यजमानाने 'ऐंद्रवायव' इत्यादि सर्व ग्रह घेते वेळी सोमरसाने ग्रहपात्रे पूर्णपणे भरून घ्यावीत. पूर्णपणे भरून घेतलेले ग्रह हे प्राणरूप असतात. यास्तव, ऐंद्रवायवादि सर्व ग्रह अध्वर्यूने पूर्णपणे भरून घेतले असता, त्याने आपल्या यजमानाच्या प्राणांना होणाऱ्या पीडेचा परिहार केल्यासारखे होते. अर्थात् तो यजमान रोगमुक्त होतो. इतकेच नव्हे तर तो रोगाच्या तीव्रतेने दोन गतप्राण होऊन दोन घटका झाल्या असल्या तरी देखील तो सजीव होतो.

योग्य वेळी पर्जन्य पडला नाही तर धान्य पिकत नाही. व त्यामुळे प्रजांना पोटभर अन्न न मिळाल्यामुळे त्यांचे प्राण क्षुधेने कासावीस होतात. यासाठी योग्य वेळी पर्जन्य न पडल्यास यजमानाने आपल्या यज्ञात ऐंद्रवायवादि सर्व ग्रह सोमरसाने पूर्ण भरून घ्यावेत. म्हणजे त्या प्राणरूप अशा ऐंद्रवायवादि ग्रहांच्या प्रभावाने तात्काळ पर्जन्यवृष्टी होईल व धान्य भरपूर पिकेल. अर्थात् अन्नाच्या अभावी प्रजेच्या प्राणांना होणारी पीडा तो यजमान निवारण करील. (अनुवाक ७).

ऐंद्रवायव ग्रह हा गायत्रीछंदस्वरूप असून द्वादशाह क्रतूपैकी पहिला व शेवटचा बारावा दिवस सोडून मध्यंतरी असलेल्या दहा दिवसांपैकी पहिला 'प्रायणीय' संज्ञक दिवसही गायत्रीछंदस्वरूप आहे. म्हणून त्या दिवशी ऐंद्रवायव ग्रह प्रथम ग्रहण करावा. असे केले असता प्रथमदिनस्वरूप अशा स्वकीय स्थानी ऐंद्रवायव ग्रहाचे ग्रहण केल्यासारखे होते.

शुक्रग्रह हा त्रिष्टुपछंदस्वरूप असून दुसरा दिवसही त्रिष्टुपछंदस्वरूपच आहे. यास्तव, दुसऱ्या दिवशी प्रथमत: शुक्रग्रह भरून घ्यावा. म्हणजे स्वकीय अशा स्थानी त्या ग्रहाचे ग्रहण केल्यासारखे होते.

आग्रयण ग्रह हा जगतीछंदस्वरूप असून तिसरा दिवसही जगतीछंदरूप असतो. यास्तव, तिसऱ्या दिवशी प्रथमतः आग्रयण ग्रह घ्यावा आणि नंतर इतर ग्रह घ्यावेत. त्या योगाने तृतीयदिनरूप अशा स्वकीय स्थानामध्ये आग्रयण ग्रहाचे ग्रहण केल्यासारखे होते.

अशा प्रकारे तिसऱ्या दिवशी करण्यात येणारे आग्रयणप्रमुख ग्रहग्रहण गायत्र्यादि छंदस्वरूप अशा तीनही दिवसांना व्यापून राहते. कारण तीन दिवसांचा हा विभाग आग्रयण ग्रहाचे प्रथम ग्रहण करून समाप्त होत असल्याने त्रिदिनविभागात्मक यज्ञाला ते आग्रयण ग्रहाचे प्रथम ग्रहण व्यापून राहावे, हे युक्तच आहे. शिवाय दुसऱ्या दिवशी म्हणजे त्रिदिनात्मक अशा दुसऱ्या विभागाच्या प्रारंभी आग्रयण ग्रहाचेच प्रथम ग्रहण केले जाते. सारांश, आग्रयण ग्रहाच्या प्रथम ग्रहणाच्या ठिकाणी त्रिदिनात्मक पहिल्या विभागाची समाप्ती झाल्याचे ज्या अर्थी यज्ञकर्ते पाहतात त्या अर्थी त्रिदिनात्मक अशा द्वितीयभागरूप यज्ञाचा प्रारंभ आग्रयण ग्रहाचे प्रथम ग्रहण करून होणे प्रशस्त होय. दुसरा त्रिरात्रात्मक अर्थात् त्रिदिनात्मक विभाग 'जागत' म्हणजे जगतीछंदप्रमुख असून आग्रयण ग्रह हा जगतीछंदस्वरूपच आहे. यास्तव, चौथ्या दिवशी आग्रयण ग्रहाचेच प्रथम ग्रहण केले असता स्वकीय अशा स्थानाच्या ठिकाणी त्या ग्रहाचे ग्रहण केल्यासारखे होते. शिवाय, अशा प्रकारचे आग्रयण ग्रहाचे प्रथम ग्रहण स्वकीय अशा जगती छंदाला अनुसरूनच पुनरावृत्त केल्याप्रमाणे होते.

ऐंद्रवायव ग्रह हा 'रथंतर' सामसंबध्द असून पांचवा दिवसही रथंतर सामप्रधान असा आहे. यास्तव, पांचव्या दिवशी जर ऐंद्रवायंव ग्रहाचे प्रथम ग्रहण केले तर स्वकीय अशा स्थानीच त्या ग्रहाचे ग्रहण केल्यासारखे होते.

शुक्रग्रह हा बृहत्सामसंबध्द असून सहावा दिवसही बृहत्सामप्रधान असा आहे. यास्तव, सहाव्या दिवशी शुक्र ग्रहाचे प्रथम ग्रहण केले असता स्वकीय अशा स्थानी त्या ग्रहाचे ग्रहण केल्यासारखे होते. हे शुक्रग्रहाचे प्रथम ग्रहण त्रिदिनात्मक अशा द्वितीयविभागरूपी यज्ञाला व गायत्र्यादि तीनही छंदांना व्याप्त करते. शिवाय दुसऱ्या दिवशी म्हणजे त्रिदिनात्मक अशा तिसऱ्या विभागाच्या प्रारंभी शुक्रग्रहाचेच ग्रहण केले जात असते. एवं च, शुक्रग्रहाच्या प्रथम ग्रहणामध्ये त्रिदिनात्मक अशा दुसऱ्या विभागरूप यज्ञाची समाप्ती झाल्याचे ज्याअर्थी यज्ञकर्ते पाहतात, त्या अर्थी त्रिदिनात्मक अशा तिसऱ्या विभागरूप यज्ञाचा प्रारंभही

शुक्रग्रहाच्या प्राथम्याने होणे प्रशस्त होय.

त्रिरात्रात्मक म्हणजे त्रिदिनात्मक तिसरा विभाग त्रिष्टुप्छंदप्रमुख अ शुक्रग्रह हा त्रिष्टुप्छंदरूपच आहे. यास्तव, सातव्या दिवशी जर शुक्रग्रह प्रथम ग्रहण केले तर स्वकीय अशा स्थानी त्या ग्रहाचे ग्रहण केल्यासार होऊन शिवाय ते स्वकीय अशा त्रिष्टुप् छंदाला अनुसरूनच पुनरावृत्त केल्यासार होते.

आग्रयण ग्रह हा वाग्रूप असून आठवा दिवसही वाग्रूपच आहे. यास्त आठव्या दिवशी जर आग्रयण ग्रहाचे प्रारंभी ग्रहण केले तर अध्वर्यूने ज काय स्वकीय अशा स्थानाचे ठिकाणीच त्या ग्रहाचे ग्रहण केल्यासारखे होते.

ऐंद्रवायव ग्रह हा प्राणरूप असून नववा दिवसही प्राणरूपच आ यास्तव, नवव्या दिवशी जर प्रथम ऐंद्रवायव ग्रह घेतला तर स्वकीय अश स्थानीच तो ग्रह घेतल्यासारखे होते. ऐंद्रवायव ग्रहाचे हे प्रथम ग्रहण त्रिदिनात्म अशा तिसऱ्या विभागरूपी यज्ञाला व गायत्र्यादि छंदांना व्याप्त करते. नंत दुसऱ्या दिवशी म्हणजे दहाव्या दिवशी ऐंद्रवायव ग्रहाचेच जर प्रथम ग्रहण केले तर यज्ञकर्त्यांनी ज्या ऐंद्रवायव ग्रहाच्या प्रथम ग्रहणामध्ये त्रिदिनात्म अशा तृतीयविभागरूप यज्ञाची समाप्ती पाहिली, त्याच ग्रहाच्या प्रथम ग्रहणाने स्वकीय अशा छंदाला अनुसरून पुढच्या यज्ञविभागाची आवृत्ती सुरू केल्यासारखे होते.

जे कोणी यजमान ऐंद्रवायव ग्रह सोडून शुक्र इत्यादि एखाद्या अन्य ग्रहाचे ग्रहण दहाव्या दिवशी करतात, ते जणू काय सरळ असा मार्ग टाकून भलत्याच मार्गाने जातात. कारण दहावा दिवस हा खरोखर द्वादशाहान्तर्गत दशरात्रसंज्ञक यज्ञाच्या समाप्तीचा दिवस होय. यास्तव, दहाव्या दिवशी, ऐंद्रवायव ग्रहाचे जर प्रथम ग्रहण केले तर यज्ञकर्त्या यजमानांनी भलत्याच मार्गाने अवलंबन न करता, सरळ मार्गाने दशरात्रसंज्ञक यज्ञाच्या समाप्तीपर्यंत गमन केल्यासारखे होईल. व्यापार करणारे वाणी लोक ज्याप्रमाणे मालाच्या मोठमोठ्या गोण्या वाहणाऱ्या बैलांचा तांडा बरोबर घेऊन आजूबाजूच्या काळ्या वाकड्या मार्गाने न जाता सरळ राजरस्त्याने आपल्या इच्छित स्थळी आपला माल घेऊन जातात, त्याचप्रमाणे दहाव्या दिवशी ऐंद्रवायव ग्रहाचे प्रथम ग्रहण करणारे यजमान आडमार्गाने न जाता सरळ मार्गाने दशरात्ररूप यज्ञाच्या

समाप्तीचा यज्ञा गाठतात.

ज्याप्रमाणे एका गोत्रातील लोक विवाहासाठी दुसऱ्या गोत्रातील कन्येचा परिग्रह करतात त्याप्रमाणे छंदांच्या अभिमानिनी देवतांनी एकमेकांच्या स्थानांशी संबंध करण्याचे ध्येय ठरविले व त्याला अनुसरून त्या छंदोभिमानिनी देवतांनी परस्परांमध्ये विवाहसंबंध केला.

चौथा दिवस हे ऐंद्रवायव ग्रहाचे स्थान होय. परंतु, त्या दिवशी ज्या अर्थी आग्रयण ग्रहाचे ग्रहण केले जाते त्या अर्थी, आग्रयण ग्रहाचे स्थान असलेल्या नवव्या दिवशी ऐंद्रवायव ग्रहाचे ग्रहण करावे. हाच ऐंद्रवायव व आग्रयण या दोन ग्रहांचा परस्परांच्याशी झालेला विवाह होय.

पांचवा दिवस हे शुक्रग्रहाचे स्वकीय स्थान होय. परंतु, त्या दिवशी ज्या अर्थी ऐंद्रवायव ग्रहाचे ग्रहण केले जाते त्या अर्थी ऐंद्रवायव ग्रहाचे स्वकीय स्थान असलेल्या सातव्या दिवशी शुक्र ग्रहाचे प्रथम ग्रहण करावे. हाच शुक्र व ऐंद्रवायव या दोन ग्रहांचा परस्परांशी होणारा विवाह होय.

सहावा दिवस आग्रयण ग्रहाचे स्वकीय स्थान होय. परंतु, त्या दिवशी ज्या अर्थी शुक्रग्रह घेतला जातो त्या अर्थी शुक्रग्रहाचे स्वकीय स्थान असलेल्या आठव्या दिवशी आग्रयण ग्रहाचे ग्रहण करावे. हाच शुक्र व आग्रयण या दोन ग्रहांचा परस्परांच्याशी झालेला विवाह होय.

जो कोणी ऐंद्रवायवादि ग्रहांच्या परस्परांच्याशी होणाऱ्या विवाहाचे स्वरूप जाणून वर कथन केल्याप्रमाणे ग्रहांचे ग्रहण करतो तो जणू काय छंदोभिमानिनी देवतांचेच विवाह करतो. त्या योगाने तो स्वतःचा धनिक अशा अन्य कुलाशी विवाह संबंधही घडवून आणतो. शिवाय तो यज्ञाच्या अनुष्ठानकाली दैवताविषयक ज्ञान स्वतःच्या ठिकाणी उत्तम रीतीने धारण करतो. सारांश, छंदोभिमानिनी देवता ज्याप्रमाणे परस्परांच्या ठिकाणी विवाहसंबंध करतात त्याचप्रमाणे लोकव्यवहारामध्ये स्वकीय गोत्राखेरीजच्या एखाद्या गोत्रातील वराला आपली कन्या देऊन परस्परांचा विवाहसंबंध घडवून आणतात. (अनुवाक ८).

प्रजापतीला प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा झाली. आपली इच्छा पूर्ण होण्याला द्वादशरात्र क्रतू साधनभूत होईल असे त्यास आढळून आले. नंतर त्याने द्वादशरात्र क्रतूची सामग्री जमा करून तो क्रतू केला. त्या क्रतूच्या

प्रभावाने त्याने प्रजा उत्पन्न केल्या. यास्तव, आपल्यापासून प्रजा उत्पन्न व्हावी अशी ज्याला इच्छा होईल त्याने द्वादशाह क्रतू करावा. त्या क्रतूच्या प्रभावाने तो द्वादशाहक्रतू करणारा यजमान आपणापासून प्रजा उत्पन्न करतो.

ब्रह्मवादी असा प्रश्न उपस्थित करतात की, प्रायः सोमयाग हे अग्निष्टोमप्रायण असतात. म्हणजे त्या यज्ञाचा प्रारंभ अग्निष्टोमापासून असतो. असे असता, द्वादशाह क्रतूमध्ये प्रथम दिवशी अग्निष्टोम न करता अतिरात्रनामक सोमयाग काय म्हणून करण्यात येतो? यावर दुसरे ब्रह्मवादी असे समाधान करतात की, द्वादशरात्र किंवा द्वादशाह क्रतुरूपी पुरुषाचे दोन अतिरात्र म्हणजे जणू दोन नेत्र असून दोन अग्निष्टोम या त्या दोन नेत्रांतील बाहुल्या होत. यासाठी द्वादशरात्र क्रतू करणारे यजमान हे जर अग्निष्टोमाचे अनुष्ठान प्रथम दिवशी करतील तर त्यांनी द्वादशरात्र क्रतुरूपी पुरुषाच्या नेत्रातील बाहुल्या नेत्र नेत्रगोलकाच्या बाहेर अर्थात् भलत्याच ठिकाणी स्थापन केल्यासारख्या होतील. यास्तव, तसे होऊ नये म्हणून द्वादशरात्र क्रतूच्या पहिल्या दिवशी अतिरात्रसंज्ञक सोमयाग करण्यात येतो. आणि तसे केल्याने क्रतू करणाऱ्या यजमानांनी द्वादशरात्र क्रतुरूपी यज्ञपुरुषाच्या ठिकाणी अतिरात्ररूप दोन नेत्रगोलकांची प्रथम स्थापना करून त्या दोन नेत्रगोलकांच्या ठिकाणी अग्निष्टोमरूप दोन बाहुल्यांचे स्थापन केल्यासारखे होते.

ज्योतिरूप म्हणजे प्रकाशरूप अशा दोन पक्षांनी म्हणजे पंखांनी जी युक्त असते ती 'ज्योतिःपक्षा' होय. जो कोणी विद्वान् यजमान 'ज्योतिःपक्षा' अशा गायत्रीरूपी पक्षिणीला जाणतो, तो त्या पक्षिणीच्या ज्योतिरूप अशा दोन्ही पंखांच्या प्रकाशाच्या साहाय्याने स्वर्गलोकाला जाऊन पोचतो. सारांश, द्वादशरात्र किंवा द्वादशाह क्रतूपैकी प्रायणीय नामक पहिला व उदयनीयनामक शेवटचा दिवस सोडून मध्यंतरी जे दहा दिवस असतात त्यांपैकी पहिल्या व शेवटच्या दिवशी जे अग्निष्टोम केले जातात ते गायत्रीरूपी पक्षिणीचे दोन पंख असून मध्यवर्ती असलेल्या आठ दिवसांमध्ये जे आठ 'उक्थ्य' केले जातात, तो त्या गायत्रीरूपी पक्षिणीचा आत्मा म्हणजे शरीर होय. सारांश, अग्निष्टोमरूपी दोन पंख व आठउक्थ्यरूपी शरीर धारण करणारी ही ज्योतिःपक्षानामक गायत्रीरूपी पक्षिणी आहे. हिला जाणून जो द्वादशरात्र क्रतूचे अनुष्ठान करतो तो तिच्या ज्योतिरूप अशा दोन पंखांच्या उजेडाच्या साहाय्याने स्वर्गलोकाला

जाऊन पोचतो.

द्वादशरात्र किंवा द्वादशाह क्रतू हा 'अहीन' व 'सत्र' अशा दोन स्वरूपांचा आहे. द्वादशरात्र क्रतू हा बारा प्रकारांनी म्हणजे बारा दिवस चालणाऱ्या अनुष्ठानप्रकारांनी आविर्भूत होणारा पक्षिस्वरूपी प्रजापतीच होय. पहिल्या दिवशी व शेवटच्या दिवशी होणारे दोन अतिरात्र व त्यांचेच पूर्वभावी दोन दिवस होणारे दोन अग्निष्टोम हे जणू त्या प्रजापतिरूप पक्ष्याचे दोन पंख असून मध्यंतरीच्या आठ दिवसांत होणारे आठ उक्थ्य हे त्या प्रजापतिरूपी पक्ष्याचे शरीर होय. सारांश, अशा प्रकारे प्रजापतिरूपी पक्षी हा बारा प्रकारांनी म्हणजे अवयवांनी युक्त असा आविर्भूत होऊन तो सत्ररूपी प्रयोगाने यजमानांच्या प्राणांना स्पर्श करतो. अर्थात् सत्रकर्त्या यजमानांच्या प्राणांना सुख देतो. 'सत्' शब्दाचा अर्थ प्राण असा आहे. एवं च, सत्ररूपाने अनुष्ठित केलेला हा पक्षिरूपधारी प्रजापती यजमानाच्या प्राणांना संतुष्ट करतो.

जे यजमान द्वादशाहरूप सत्राचे अनुष्ठान करतात, ते केवळ स्वतःच्या प्राणांना सुखविण्यासाठीच ते करीत नसून सर्वच प्रजांच्या प्राणांना सुख देण्याच्या निमित्ताने करीत असतात. अर्थात् यजमानांच्याकडून केल्या जाणाऱ्या त्या द्वादशाहरूप सत्रानुष्ठानाच्या योगाने अखिल जगातील प्रजांचे प्राण संतुष्ट होत असतात. आणि म्हणूनच सर्व लोकांच्या प्राणांना सुख होण्यासाठी सत्र करणाऱ्या त्या यजमानांना पाहून सर्वलोक, 'जगाच्या कल्याणासाठी सत्रानुष्ठान करणारे हे यजमान किती थोर आहेत', असे आदरपूर्ण उद्गार काढीत असतात. सारांश, अशा प्रकारचे सत्रानुष्ठान अत्यंत प्रशस्त होय. द्वादशाहरूपी सत्राचे हे माहात्म्य जो जाणतो तो सर्व लोकांना अत्यंत प्रिय होतो, इतकेच नव्हे तर तो 'अत्यंत श्रेष्ठ' असा पुरुष म्हणून सर्व जगात प्रसिद्ध होऊन राहतो. (अनुवाक ९).

वैश्वानर अग्नीने दृष्ट केला असल्याने 'अतिरात्र' नामक यागालाच 'वैश्वानर' हे नांव आहे. ज्या द्वादशाह क्रतूच्या एकाच भागी म्हणजे प्रथम दिवशीच तेवढा वैश्वानरशब्दोपलक्षित असा अतिरात्र केला जातो, त्या द्वादशाह क्रतूस 'अन्यतो वैश्वानर' असे म्हणतात. अशा प्रकारचा 'अन्यतो वैश्वानर' रूप द्वादशाह त्याचे यजन करणाऱ्या यजमानांना स्वर्गलोक संपादन करून देण्यास समर्थ होत नाही. कारण अशा प्रकारचा द्वादशाह ऊर्ध्वाभिमुख असतो. त्याचे

मुख अतिशय विस्तृत असते. म्हणजे त्या द्वादशाहाह क्रतूचा शेवट कोठे होतो हेच समजत नाही. सारांश, अपर्यवसित अर्थात् असमाप्त अशा अवस्थेला प्राप्त झालेला हा द्वादशाह स्वर्गलोकाचे संपादन करू शकत नाही. यास्तव, देवांनी द्वादशाह क्रतूच्या दुसऱ्याही भागी म्हणजे शेवटच्याही दिवशी समाप्ति निदर्शक असा हा वैश्वानरशब्दाने उपलक्षित होणारा अतिरात्र क्रतू स्थापन केला. त्या अतिरात्र क्रतूमुळे द्वादशाह क्रतूच्या समाप्तीचे स्वरूप स्पष्ट होऊन त्याचे द्वादशदिनात्म परिमाण निश्चित झाले. ज्याच्या आरंभी आणि अंती अशा दोनही बाजूंना वैश्वानरसंज्ञक अतिरात्र क्रतू केला जातो तो द्वादशाह क्रतू 'उभयतो वैश्वानर' या संज्ञेला पात्र व यजमानांना स्वर्गलोक संपादन करून देण्याला समर्थ होतो.

द्वादशाह क्रतूच्या प्रभावाने समृध्द झालेल्या प्रजापतीच्या ठिकाणी वसंतादि ऋतूंनी 'तुझ्या समृध्दीपैकी आम्हालाही काही भाग असावा' अशी इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा प्रजापतीने वसंत ऋतूला योग्य वस्तूंच्या ठिकाणी असणारा सर्व सारभूत रस दिला. ग्रीष्माला 'यव' नांवाचे धान्य, वर्षा ऋतूला निरनिराळी धान्ये, शरद् ऋतूला साळीचे भात आणि हेमंत व शिशिर या दोन ऋतूंना उडीद व तीळ देऊन टाकले.

अग्रमान देण्याला पात्र असूनही इंद्राला इतर देव तुच्छ मानीत व त्या अपमानाने इंद्र कष्टी होई. देवांकडून होणाऱ्या आपल्या तुच्छतेचा परिहार होऊन त्यांच्याकडून आपणास श्रेष्ठत्वाचा मान कसा मिळेल, याविषयीचा उपाय इंद्राने प्रजापतीला विचारला. तेव्हा प्रजापतीने इंद्राकडून या द्वादशाह क्रतूचे यजन करविले. त्या यजनाच्या प्रभावाने इंद्र प्रभुत्वदर्शक अशा 'इंद्र' या थोर पदवीला प्राप्त झाला. देव त्याला राजा मानू लागले. सारांश, द्वादशाह क्रतूचे प्रथमत: यजन करून एकदा आनुजावर किंवा हीन लेखला जाणारा इंद्र श्रेष्ठत्वाला पोचला. तेव्हापासून द्वादशाह क्रतूला आनुजावरांचा यज्ञ, असे सर्व लोक म्हणू लागले.

सत्रामध्ये जे यजमान असतात तेच ऋत्विजही असतात. यास्तव, द्वादशाह क्रतूच्या सत्ररूपाने केल्या जाणाऱ्या यजनामध्ये जर कोणी यजमान 'मी ऋत्विज आहे, या सत्रात मी आर्त्विज्य केले आहे', या समजुतीने दक्षिणेचा प्रतिग्रह करील तर त्याला मनुष्याच्या किंवा घोड्याच्या प्रेताचा

परिग्रह केल्याचा दोष लागेल. इतकेच नव्हे तर तो दक्षिणेचा प्रतिग्रह करणारा जे अन्न भक्षण करील ते गाईप्रमाणे होईल. अर्थात् अन्नाच्या रूपाने गोमांसभक्षण केल्याचा दोष त्या दक्षिणाप्रतिग्रह करणाराला लागेल. सत्ररूप द्वादशाह क्रतूत दक्षिणा घेणाऱ्या त्या यजमानासाठी ज्या पात्रांमध्ये इतर यजमान अन्न शिजवितील ते पात्र अशुद्ध होईल. शास्त्रीय मार्गाने ते पात्र जर शुद्ध केले गेले नाही तर ते दोषरूपी मलाने अधिकच अशुद्ध होईल. सारांश, सत्रामध्ये दक्षिणाप्रतिग्रह करणारासाठी ज्या पात्रात अन्न शिजविले जाईल ते पात्र देखील इतके अपवित्र होत असते की त्या पात्रांचा उपयोग करून जर कोणी कोणतेही कार्य केले तर तो त्या पात्राचा उपयोग करणाराही अत्यंत दोषी होईल.

द्वादशाहाचे 'अहीन' रूपाने यजन एकच यजमान करू शकतो. कारण, अहीनरूप द्वादशाह क्रतूचे यजन करून प्रजापती हा एकटाच समृद्ध झाला. अहीनरूप द्वादशाह क्रतूचे अनुष्ठान करणाऱ्या यजमानाने बारा रात्री पूर्ण होईपर्यंत दीक्षा धारण करावी. कारण, संवत्सराचे महिने बारा असून संवत्सर हा प्रजापतिरूपच आहे. यास्तव, बारा दिवस दीक्षा धारण करून द्वादशाह क्रतूचे अनुष्ठान करणारा यजमान प्रजापतिरूपच होतो. इतकेच नव्हे तर मातापितरांपासून प्राप्त होणाऱ्या जन्मापेक्षाही त्या यजमानाला दीक्षारूप तपाच्या आचरणाने अधिक महत्त्वाचा असा नवाच जन्म प्राप्त होत असतो.

अहीन अशा द्वादशाह क्रतूमध्ये बारा रात्री म्हणजे बारा दिवस उपसदिष्टी कराव्यात. या बारा रात्रींमध्ये तीन तीन रात्रींचे चार विभाग पडतात. पहिल्या त्रिरात्रात्मक विभागात ज्या उपसदिष्टी केल्या जातात त्यांच्या योगाने यजमान द्वादशाह यज्ञाचे साहित्य संपादन करतो. दुसऱ्या त्रिरात्रात्मक विभागात ज्या उपसदिष्टी केल्या जातात, त्यांच्या योगाने यजमान द्वादशाह यज्ञाचा उपक्रम करतो. तिसऱ्या त्रिरात्रात्मक विभागात ज्या उपसदिष्टी केल्या जातात त्यांच्या योगाने यजमान यज्ञपात्रे विसळून ती स्वच्छ करतो व चौथ्या त्रिरात्रात्मक विभागात ज्या उपसदिष्टी केल्या जातात त्यांच्या योगाने यजमान स्वत:च्या अंत:करणाची शुध्दी करतो.

एखाद्या यजमानाच्या अहीन द्वादशाह क्रतूमध्ये आर्त्विज्य करणारा जो ऋत्विज दक्षिणेचा प्रतिग्रह करतो, त्या यजमानाच्या क्रतूतील पशूचे हुतशेष मांस भक्षण केल्याने यजमानाचेच मांस भक्षण केल्याचा त्याला दोष लागतो.

द्वादशाह क्रतूमध्ये दक्षिणाप्रतिग्रह करणारा जो ऋत्विज पुरोडाश भक्षण करतो, त्याला यजमानाचा मेंदू भक्षण केल्याचा दोष लागतो. हुतशेष अशा लाह्यांचे जो भक्षण करतो, त्यास यजमानाची विष्ठा भक्षण केल्याचा दोष लागतो. जो आज्याचे सेवन करतो, त्याने यजमानाची चरबी भक्षण केल्यासारखे होते. जो सोमपान करतो, त्याला यजमानाच्या शरीराचा घाम चाटल्याचा दोष लागतो. इतकेच नव्हे तर अहीन द्वादशाह क्रतूमध्ये जो ऋत्विज दक्षिणा ग्रहण करतो तो जणू काय त्या क्रतू करणाऱ्या यजमानाच्या मस्तकावरील रोमरोमात निष्पन्न होणाऱ्या मलाचाच प्रतिग्रह करतो.

एवंच, अहीनरूप अशा द्वादशाह क्रतूमध्ये ऋत्विज होऊन दक्षिणेचा प्रतिग्रह करणे, हे पातक आहे. यास्तव, अशा पातकापासून दूर राहावयासाठी कोणाही यजमानाच्या अहीनरूप द्वादशाहाचे यजन करूच नये. म्हणजे त्या द्वादशाह क्रतूमध्ये ऋत्विज होऊ नये. (अनुवाक १०).

१ प्रजापतिरूप अशा पदार्थाला ही आहुती समर्पण असो. २ प्रजापतिरूप अशा दोन पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा तीन पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा चार पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा पांच पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा सहा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ७ प्रजापतिरूप अशा सात पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ८ प्रजापतिरूप अशा आठ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ९ प्रजापतिरूप अशा नऊ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १० प्रजापतिरूप अशा दहा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ११ प्रजापतिरूप अशा अकरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १२ प्रजापतिरूप अशा बारा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १३ प्रजापतिरूप अशा तेरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १४ प्रजापतिरूप अशा चौदा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १५ प्रजापतिरूप अशा पंधरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १६ प्रजापतिरूप अशा सोळा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १७ प्रजापतिरूप अशा सतरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १८ प्रजापतिरूप अशा अठरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १९ प्रजापतिरूप अशा एकोणीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २० प्रजापतिरूप अशा एकोणतीस

पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २१ प्रजापतिरूप अशा एकुणचाळीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २२ प्रजापतिरूप अशा एकुणपन्नास पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २३ प्रजापतिरूप अशा एकुणसाठ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २४ प्रजापतिरूप अशा एकुणसत्तर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २५ प्रजापतिरूप अशा एकुणऐंशी पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २६ प्रजापतिरूप अशा एकुणनव्वद पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २७ प्रजापतिरूप अशा नव्याण्णव पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २८ प्रजापतिरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २९ प्रजापतिरूप अशा दोनशे पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३० प्रजापतिरूप अशा सर्वपदार्थसमूहाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक ११).

१ प्रजापतिरूप अशा एका पदार्थाला ही आहुती समर्पण असो. २ प्रजापतिरूप अशा तीन पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा पांच पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा सात पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा नऊ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा अकरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ७ प्रजापतिरूप अशा तेरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ८ प्रजापतिरूप अशा पंधरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ९ प्रजापतिरूप अशा सतरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १० प्रजापतिरूप अशा एकोणीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ११ प्रजापतिरूप अशा एकोणतीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १२ प्रजापतिरूप अशा एकुणचाळीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १३ प्रजापतिरूप अशा एकुणपन्नास पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १४ प्रजापतिरूप अशा एकुणसाठ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १५ प्रजापतिरूप अशा एकुणसत्तर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १६ प्रजापतिरूप अशा एकुणऐंशी पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १७ प्रजापतिरूप अशा एकुणनव्वद पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १८ प्रजापतिरूप अशा नव्याण्णव पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १९ प्रजापतिरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २० प्रजापतिरूप अशा सर्व पदार्थसमूहाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १२).

१ प्रजापतिरूप अशा दोन पदार्थांना ही आहुती समर्पण असो.

२ प्रजापतिरूप अशा चार पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा सहा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा आठ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा दहा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा बारा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ७ प्रजापतिरूप अशा चौदा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ८ प्रजापतिरूप अशा सोळा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ९ प्रजापतिरूप अशा अठरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १० प्रजापतिरूप अशा वीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ११ प्रजापतिरूप अशा अठ्याण्णव पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १२ प्रजापतीरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १३ प्रजापतिरूप अशा सर्वपदार्थसमूहाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १३).

१ प्रजापतिरूप अशा तीन पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २ प्रजापतिरूप अशा पांच पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा सात पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा नऊ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा अकरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा तेरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ७ प्रजापतिरूप अशा पंधरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ८ प्रजापतिरूप अशा सतरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ९ प्रजापतिरूप अशा एकोणीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १० प्रजापतिरूप अशा एकुणतीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ११ प्रजापतिरूप अशा एकुणचाळीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १२ प्रजापतिरूप अशा एकुणपन्नास पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १३ प्रजापतिरूप अशा एकुणसाठ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १४ प्रजापतिरूप अशा एकुणसत्तर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १५ प्रजापतिरूप अशा एकुणऐंशी पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १६ प्रजापतिरूप अशा एकुणनव्वद पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १७ प्रजापतिरूप अशा नव्याण्णव पदार्थांना ही आहुती अर्पण असो. १८ प्रजापतिरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती अर्पण असो. १९ प्रजापतिरूप अशा सर्वपदार्थसमूहाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १४.)

१ प्रजापतिरूप अशा चार पदार्थांना ही आहुती समर्पण असो.

२ प्रजापतिरूप अशा आठ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा बारा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा सोळा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा वीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा शहाण्णव पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ७ प्रजापतिरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ८ प्रजापतिरूप अशा सर्वपदार्थसमूहाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १५).

१ प्रजापतिरूप अशा पांच पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २ प्रजापतिरूप अशा दहा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा पंधरा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा वीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा पंचाण्णव पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ७ प्रजापतिरूप अशा सर्वपदार्थसमूहाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १६).

१ प्रजापतिरूप अशा दहा पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २ प्रजापतिरूप अशा वीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा तीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा चाळीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा पन्नास पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा साठ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ७ प्रजापतिरूप अशा सत्तर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ८ प्रजापतिरूप अशा ऐंशी पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ९ प्रजापतिरूप अशा नव्वद पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १० प्रजापतिरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती समर्पण असो ११ प्रजापतिरूप अशा सर्वपदार्थसमूहाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १७).

१ प्रजापतिरूप अशा वीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २ प्रजापतिरूप अशा चाळीस पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा साठ पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा ऐंशी पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा सर्वपदार्थसमूहाला ही आहुती

समर्पण असो (अनुवाक १८).

१ प्रजापतिरूप अशा पन्नास पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २ प्रजापतिरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा दोनशे पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा तीनशे पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा चारशे पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा पांचशे पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ७ प्रजापतिरूप अशा सहाशे पदार्थांनाही आहुती समर्पण असो. ८ प्रजापतिरूप अशा सातशे पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ९ प्रजापतिरूप अशा आठशे पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १० प्रजापतिरूप अशा नऊशे पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ११ प्रजापतिरूप अशा सहस्र पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १२ प्रजापतिरूप अशा सर्वपदार्थसमूहाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १९).

१ प्रजापतिरूप अशा शंभर पदार्थांना ही आहुती समर्पण असो. २ प्रजापतिरूप अशा हजार पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ३ प्रजापतिरूप अशा दहा हजार पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतिरूप अशा 'नियुत' संख्येइतक्या पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ५ प्रजापतिरूप अशा 'प्रयुत' संख्येइतक्या पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ६ प्रजापतिरूप अशा 'अर्बुद' संख्येइतक्या पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ७ प्रजापतिरूप अशा 'न्यर्बुद' संख्येइतक्या पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ८ प्रजापतिरूप अशा 'समुद्र' संख्येइतक्या पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ९ प्रजापतिरूप अशा 'मध्य' संख्येइतक्या पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १० प्रजापतिरूप अशा 'अंत' संख्येइतक्या पदार्थांना ही आहुती समर्पण असो. ११ प्रजापतिरूप अशा 'परार्ध' संख्येइतक्या पदार्थांना ही आहुती समर्पण असो. १२ प्रजापतिरूप अशा पहाट होण्याचा सुमार असलेल्या काळाला ही आहुती समर्पण असो. १३ प्रजापतिरूप अशा स्वच्छ पहाटेच्या काळास ही आहुती समर्पण असो. १४ प्रजापतिरूप अशा सूर्योदयापूर्वीच्या काळास ही आहुती समर्पण असो. १५ प्रजापतिरूप अशा सूर्योदयकाळाला ही आहुती समर्पण असो. १६ प्रजापतिरूप अशा सूर्योदयानंतरच्या काळाला ही आहुती समर्पण असो. १७ प्रजापतिरूप अशा स्वर्गलोकाला ही आहुती समर्पण असो. १८ प्रजापतिरूप अशा प्रकाशमान

झालेल्या सर्व भूतांना ही आहुती समर्पण असो. १९ प्रजापतिरूप अशा सर्व जगताला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक २०).

प्रपाठक ३

सत्रांतर्गत द्वादशाह क्रतूमधील दहाव्या दिवशी होणाऱ्या अनुष्ठानात अंगभूत अशी कर्मे पुष्कळच करावयाची असल्यामुळे त्या दिवशीचे अनुष्ठान वक्तशीर संपावे म्हणून सर्व ऋत्विज आपापले कर्म अत्यंत जलदीने करीत असतात. कारण त्या दिवसाच्या सांग अनुष्ठानाने अनुष्ठानकर्ते ऋत्विज पापमुक्त होत असतात. त्यांच्या सर्व पातकांचा त्या अनुष्ठानप्रभावाने क्षय व्हावयाचा असतो. यास्तव, शक्य तितकी जलदी करून त्या दिवसाचे अनुष्ठान वक्तशीर संपवावे, हे योग्य होय. मात्र अशा प्रकारे अत्यंत त्वरेने अनुष्ठान करताना अनवधानामुळे कोणा कोणा ऋत्विजाच्या अनुष्ठानक्रमात कोठे खळ पडतो आणि काही कर्मे करावयाची विसरून जातात. याला दृष्टांत असा की, चोर व वाघ वगैरे हिंसक जनावरे यांचा उपद्रव असलेल्या अरण्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांपैकी एखादा अविचारी माणूस इतरांच्या पुढे जलदीने चाल करून जातो व सरळ जाणारा मळलेला मार्ग सोडून भलत्याच मार्गाला लागतो. दुसरा एखादा माणूस काहीतरी नादात झरझर चालत असताना वाटेत असलेल्या वृक्षाकडे नजर न गेल्यामुळे त्याच्या बुडाशी ठेच लागून पडतो. तिसरा एखादा प्रवासी पायात काटा मोडल्यामुळे किंवा प्रकृतीत एकाएकी बिघाड झाल्यामुळे मार्गक्रमणास असमर्थ होऊन जातो. सारांश, आता सांगितलेल्या तीन प्रकारांपैकी कोणत्याही प्रकारची चूक करणारा प्रवासी आपल्या सहकारी प्रवाश्यांमधून फुटला जाऊन स्वसंरक्षणाविषयी असहाय स्थितीला प्राप्त होतो. याच न्यायाने तंत्रान्तर्गत द्वादशाह क्रतूतील दहाव्या दिवसाचे अनुष्ठान करणाऱ्या ऋत्विजांपैकी जो कोणी विस्मरणाने आपल्या अनुष्ठानक्रमापैकी काही कर्म करावयाचे अंतरील, तो बिनचूक अनुष्ठान करणाऱ्या आपल्या सहकारी ऋत्विजांमध्ये हीन ठरेल. दहाव्या दिवसाखेरीजच्या इतर दिवशी होणाऱ्या अनुष्ठानांमध्ये एखादा ऋत्विज एखादे कर्म करावयाचे विसरत असला तर दुसरा ऋत्विज त्याला सावध करून त्या कर्मांची स्मृती करून देतो. परंतु, दहाव्या दिवशी होणाऱ्या अनुष्ठानात कोणाच्या हातून काही कर्म करावयाचे विसरत असल्यास ते दुसऱ्याने सांगावयाचे नसते. एखाद्याच्या हातून विस्मरणाने कर्मवैकल्य होत

असल्यास ते त्याला सुचविण्यासाठी दुसरा जे वाक्य उच्चारतो त्यास 'विवाक्य' असे म्हणतात. दहाव्या दिवशी कोणाकडूनही अशाप्रकारचे 'विवाक्य' उच्चारले जात नसल्यामुळे त्या दिवसाला 'अविवाक्य' अशी संज्ञा आहे. यास्तव, दहाव्या दिवशी कोणा ऋत्विजाच्या हातून काही कर्म विसरले गेले किंवा जात असले तरी दुसऱ्याने त्या कर्माचे त्याला स्मरण करून देऊ नये. एवं च, त्या दिवशी कोणाचीही चूक कोणीही कोणास सांगू नये. असे असताना जर कोणा ऋत्विजाने दुसऱ्या ऋत्विजाच्या हातून होणारी चूक त्याला सांगितली, 'अरे तुझे अमुक कर्म करावयाचे राहिले आहे', असे जर त्याला सुचविले, तर तो ऋत्विज आपली चूक सुचविणाऱ्याच्या सांगण्याप्रमाणे आपले कर्मानुष्ठान व्यवस्थित व उत्तम रीतीने पार पाडील. परंतु, त्याची चुक सांगणारा मात्र 'विवाक्य' म्हणजे बोलू नये ते वाक्य बोलल्याचा अपराध होऊन बिनचूक अनुष्ठान करणाऱ्या इतर ऋत्विजांच्यापेक्षा हीन ठरेल. यास्तव, दहाव्या दिवशी कोणाच्याही हातून होणारे स्खलन म्हणजे कर्मवैकल्य इतर कोणीही बोलून दाखवू नये.

कोणी अभिज्ञ असे म्हणतात की, यज्ञाच्या निष्प्रमाद अशा संपूर्ण अनुष्ठानाच्या योगाने देव स्वर्गलोकाला प्राप्त झाले आणि वैकल्ययुक्त, अर्थात् प्रमादयुक्त अशा यज्ञानुष्ठानाने असुर पराभव पावले. प्रमादरहित असे यथासांग कर्म ज्या यज्ञात केले जाते त्या यज्ञाचे फळ यजमानाला प्राप्त होत असून कर्मवैकल्ययुक्त असंपूर्ण अशा यज्ञाचे फळ शत्रूला मिळत असते. असे असल्यामुळे दहाव्या दिवशीच्या अनुष्ठानात कोणा ऋत्विजाकडून स्खलन झाल्यामुळे ज्याच्या यज्ञाचे अनुष्ठान स्खलित झाले आहे असा तो यजमान शास्त्रीय अनुष्ठानाचे उल्लंघन केल्याचा अपराधी ठरेल व त्या वैकल्ययुक्त यज्ञानुष्ठानाचे फळ त्याच्या शत्रूला प्राप्त होईल. यास्तव, असे होऊ नये म्हणून दहाव्या दिवशी कोणा ऋत्विजाकडून कर्मवैकल्य होत असल्यास त्यास त्या कर्माची दुसऱ्याने सूचना देणे अवश्य आहे. आणि अशाप्रकारे सूचना देणारा ऋत्विज पूर्वी दर्शविल्याप्रमाणे दोषी होईल, हे खरे आहे. यासाठी कोणा ऋत्विजाकडून कर्मवैकल्य होत असल्याचे दिसल्यास दुसऱ्या ऋत्विजाने त्याविषयी त्याला काही न बोलता यज्ञानुष्ठान पहावयास आलेल्या एखाद्या जाणत्या प्रेक्षकाने त्या ऋत्विजास त्याजकडून होत असलेले कर्मवैकल्य सुचवावे. असे केले असता कोणीही ऋत्विज दोषी होणार नाही व यज्ञात होणाऱ्या कर्मवैकल्याचा परिहार होऊन

यजमानाचा यज्ञ यथासांग होईल.

यज्ञानुष्ठान पाहण्यास आलेल्या प्रेक्षकांमध्ये ऋत्विजाकडून होणाऱ्या वा झालेल्या चुकीची सूचना त्याला देण्याइतका जाणता कोणी नसल्यास सदोमंडपात बसलेल्या कोणी ऋत्विजांनी त्या चुकीची सूचना देऊन त्याचे कर्म नीट होईल असे करावे. सदोमंडपात बसलेल्या ऋत्विजांच्या ध्यानात ती चूक न येईल तर गृहपती झालेल्या यजमानाने स्वतःच ती चूक सांगावी. सारांश इतकाच की, ऋत्विजाच्या हातून अनुष्ठानात होणारी चूक त्याला अवश्य सांगावी व अनुष्ठान नीट होईल असे करावे, हे सर्वथैव उचित आहे.

त्यानंतर म्हणजे या दहाव्या दिवशी मानस ग्रह घेण्याची वेळ येईल तेव्हा 'सर्पराज्ञिय' म्हणजे सर्पांची राज्ञी असलेल्या भूदेवीची स्तुती करणाऱ्या ऋचांनी भूदेवीचे स्तवन करावे. कारण, भूमीवर संसर्पण म्हणजे संचार करणाऱ्या सर्व प्राण्यांची भूमी ही राणी आहे. या भूमीवर निवास करून जे कोणी परस्परांविषयी उपकारबुद्धीने इतरांचे अर्चन करीत असतील अथवा अर्चन करण्यास योग्य असे जे कोणी असतील त्या सर्वांना या भूदेवीचाच आधार असतो. आणि यासाठीच तिला सर्पराज्ञी म्हणजे भूसंचारी अशा सर्वांची राज्ञी म्हटले जाते. 'भूमिर्भूम्ना' 'द्यौर्वरिणा' इत्यादि सर्पराज्ञिसंज्ञक ऋचांनी भूदेवीचे जे स्तवन करतात ते. जणू या भूमीवर राहणाऱ्यांपैकी जे कोणी पूजनीय असतील अथवा आपल्या स्तुतिरूपी वाणीने त्या पूजनीयांचे जे कोणी पूजन करणारे असतील त्या सर्वांच्या जवळ जाऊन 'आम्ही आपल्या स्नेहार्द्र वाणीने त्यांना आपलेसे करून घेऊ तेव्हाच आम्ही येथून उठू म्हणजे ''आम्ही आपल्या सत्राची समाप्ती करू'', असे म्हणत असतात.

इतर ग्रहांच्या संबंधाने जी स्तोत्रे गाइली जातात त्यांच्या योगाने देवतांची वाचिक स्तुती केली जात असते. परंतु, मानसग्रहासंबंधाने सर्पराज्ञीसंज्ञक ऋचांच्या आश्रयाने गाइल्या जाणाऱ्या स्तोत्रांनी उद्गात्यांनी भूदेवीची मानसिक स्तुती करावी म्हणजे स्तोत्रगान मनातल्या मनात करावे. कारण अत्यंत बलवान असे घोडे जोडलेला किंवा अत्यंत वेगवान अशा खेचरी जोडलेला रथ एका दिवसात सर्व पृथ्वीचे आक्रमण करू शकत नाही. पण मनोरूपी रथ मात्र एका क्षणात सर्व पृथ्वीची फेरी करण्यास व सर्व अनिष्टांचा परिहार करण्यास समर्थ असतो. यास्तव, मानसग्रहासंबंधी सर्पराज्ञी ऋचांच्या आधाराने

स्तोत्रगान करावयाचे ते उद्गात्यांनी मोठ्याने न करता मनातल्या मनात करावे.

सर्पराज्ञी संज्ञक ऋचांनी होता शस्त्राचे 'शंसन' म्हणजे पठण करीत असताना अध्वर्यू ज्या ज्या ठिकाणी विशिष्ट असे 'प्रतिगर' देईल त्या त्या ठिकाणी होत्याने तैत्तिरीय आरण्यकात पठित असलेले 'ब्रह्म' संज्ञक 'पृथिवी होता' इत्यादि होतृमंत्र म्हणावेत. कारण ऋग्रूप असणाऱ्या मंत्रांचा उपयोग 'परिमित' म्हणजे क्वचित् क्वचित् केला जात असतो. त्याचप्रमाणे सामांचाही उपयोग परिमितच केला जात असतो. यजुर्मंत्रांचा उपयोग मात्र अपरिमित म्हणजे अगणित ठिकाणी केला जातो. सारांश, 'ब्रह्म' शब्दाने उपलक्षित अशा होतृसंज्ञक यजुर्मंत्रांचा उपयोग किती ठिकाणी केला जातो याला अंतच नसल्यामुळे प्रतिगर देण्यास उद्युक्त झालेल्या अध्वर्यूला अनुलक्षून होत्याने त्या होतृमंत्रसंघाचे पठण करावे. विशिष्ट अशा प्रतिगररूप वाणीचा उच्चार करण्यास अध्वर्यूला प्रवृत्त करणारे हे होतृसंज्ञक मंत्र असल्यामुळे त्या मंत्रांच्या संघाला 'प्रतिगर' असे म्हटले जाते. (अनुवाक १).

ब्रह्मवादी असा प्रश्न उपस्थित करतात की, अहीनसंज्ञक द्वादशाह क्रतू करणारा यजमान त्या क्रतूच्या पहिल्या दिवसाच्या अनुष्ठानाने ऋत्विजांच्या ठिकाणचे कोणते तेज हिरावून घेतो? या प्रश्नाचे दुसरा अभिज्ञ असे उत्तर देतो की, अहीन द्वादशाहातील पहिल्या दिवसाच्या अनुष्ठानाने त्या क्रतूचा यजमान ऋत्विजांचे तेज आणि इंद्रियशक्ती ग्रहण करतो. दुसऱ्या दिवसाच्या अनुष्ठानाने ऋत्विजांचे कोणते श्रेय यजमान संपादन करतो? या प्रश्नाचे उत्तर असे की, तो ऋत्विजांचे प्राण व त्यांचे सेवनीय अन्न यांचे संपादन करतो. तिसऱ्या दिवसाच्या अनुष्ठानाने तो यजमान काय मिळवतो.? तर, पृथिवी, अंतरिक्ष व द्यु या तीनही लोकांचे तो संपादन करतो, हे त्या प्रश्नाचे उत्तर होय. चौथ्या दिवसाच्या अनुष्ठानाने यजमान ऋत्विजांच्या ठिकाणचे कोणते फल संपादन करतो? चतुष्पाद अशा सर्व पशूंचे तो संपादन करतो. पांचव्या दिवसाच्या अनुष्ठानाने तो काय मिळवितो? पंचाक्षरी चरण असलेला पंक्ती छंद तो मिळवितो. सहाव्या दिवसाच्या अनुष्ठानाने तो ऋत्विजांच्या ठिकाणचे कोणते फल ग्रहण करतो? सहा ऋतूंचे तो ग्रहण करतो. सातव्या दिवसाच्या अनुष्ठानाने तो काय मिळवितो? सप्ताक्षरीचरणात्मक शक्वरी नांवाचा छंद तो मिळवितो. आठव्या दिवसाच्या अनुष्ठानाने तो काय मिळवतो? आठ

अक्षरांच्या चरणांनी युक्त असलेला गायत्री छंद तो संपादन करतो. नवव्या दिवसाच्या अनुष्ठानाने तो काय प्राप्त करून घेतो? निरनिराळ्या प्रकारचा 'स्तोम' तो आपल्याला प्राप्त करून घेतो. दहाव्या दिवसाच्या अनुष्ठानाने तो यजमान काय मिळवितो? दहाअक्षरी चरणांनी युक्त असा विराट्छंद तो मिळवितो. अकराव्या दिवसाच्या अनुष्ठानाने तो काय मिळवितो? अकराअक्षरी चरणांनी युक्त असा त्रिष्टुप् छंद तो मिळवितो. अहीनसंज्ञक द्वादशाहातील बाराव्या दिवसाच्या अनुष्ठानाने तो क्रतू करणारा यजमान ऋत्विजांच्या ठिकाणी विद्यमान असणारे कोणते श्रेय संपादन करतो? बारा अक्षरी चरणांनी युक्त अशा जगती छंदाचे तो संपादन करतो. सारांश, अहीन द्वादशाहामधील बारा दिवसांच्या अनुष्ठानाने ऋत्विज ज्या ज्या प्रकारचे श्रेय स्वतःच्या ठिकाणी निष्पन्न करतात, त्या त्या प्रकारचे सर्व श्रेय तो क्रतू करणारा यजमान त्यांच्यापासून हिरावून घेतो. (अनुवाक २).

'त्रयोदशरात्र' नांवाचा जो क्रतू आता सांगण्यात येणार आहे, यालाच 'आप्त द्वादशाह' अशी संज्ञा रुढ झाली आहे. यावर अशी शंका येते की, द्वादशाहापेक्षा एक दिवस या क्रतूत अधिक आहे, अर्थात् द्वादशाह क्रतूपेक्षा या क्रतूचे फलही अधिक असणार. असे असताना विवरण करण्यात येणाऱ्या 'त्रयोदशरात्र' क्रतूला 'द्वादशाह' ही संज्ञा कशी रुढ झाली? परंतु या शंकेचे समाधान असे की, द्वादशाह क्रतूमध्ये आरंभी 'प्रायणीय' व शेवटी 'उदयनीय' संज्ञक जसे दोन दिवस असतात तसेच या क्रतूमध्येही असतात. यास्तव, एवढ्याच समानतेच्या दृष्टीने त्रयोदशरात्र क्रतूला 'आप्तद्वादश' अशी विशिष्ट संज्ञा रुढ झाली आहे. अहीन किंवा सत्ररूप द्वादशाहापेक्षा या त्रयोदशरात्रात्मक आप्त द्वादशाहामध्ये वैशिष्ट्य असे आहे की, इतर द्वादशाहामध्ये 'प्रायणीय' व 'उदयनीय' असे दोनच अतिरात्र होत असून या आप्त द्वादशाहामध्ये आणखी एक तिसरा अतिरात्र केला जात असतो. कारण भू, अंतरिक्ष व द्यु असे तीन लोक ब्रह्मांडामध्ये आहेत. यास्तव, तीन अतिरात्रांनी युक्त असलेला हा आप्त द्वादशाह तीनही लोकांची प्राप्ती करून देण्याला कारणीभूत होतो.

पहिला अतिरात्र प्राणरूप, दुसरा अतिरात्र व्यानरूप आणि तिसरा अतिरात्र अपानरूप आहे. यास्तव, जे यजमान या आप्त द्वादशाहसंज्ञक अशा त्रयोदशरात्र

क्रतुरूप सत्राचे अनुष्ठान करतात, ते प्राण, अपान व व्यानसंज्ञेने उपलक्षित असा उदान हे तीन प्राणवायू आणि भक्षणीय असे अन्न यांच्या ठिकाणी प्रतिष्ठितपणाला प्राप्त होतात आणि मानवी आयुर्मर्यादेच्या अंतिम सीमेपर्यंत जीवनमार्ग क्रमतात.

कोणी ब्रह्मवादी असे म्हणतात की, द्वादशाह क्रतू हा असा आहे की, याच्या ठिकाणी शस्त्रस्तोत्ररूप वाणी अतिशय विस्तृत झालेली असते. यास्तव 'षडह' व 'छंदोम' यांच्यामध्ये जर अन्य एखादा सर्वस्तोमात्मक अतिरात्र केला तर द्वादशाहामध्ये विस्तार पावणारी शस्त्रस्तोत्रात्मक अशी अखंड वाणी त्या अतिरात्रकर्त्यांनी खंडित केल्यासारखे होईल. व त्या योगाने गृहपती झालेल्या यजमानाची वाणी क्षीणतेला प्राप्त होईल. अर्थात् तसे होऊ नये म्हणून छंदोमांच्यानंतर होणारा जो अविवाक्यसंज्ञक दिवस असतो त्या दिवशी सर्वस्तोमात्मक अतिरात्र करावा. या अतिरात्रामध्ये 'महाव्रत' धर्मांचा अतिदेश केला जात असतो. व त्या अभिप्रायामुळेच या अतिरात्राचा उल्लेख 'महाव्रत' शब्दाने श्रुतीने दर्शविला आहे. एवं च, अशा प्रकारे अविवाक्यसंज्ञक दिवशी महाव्रत धर्मांचा अतिदेश करून सर्वस्तोमात्मक अतिरात्राचे अनुष्ठान केले असता अखंड अशा वाणीचे संपादन केल्यासारखे होते व गृहपती झालेल्या यजमानाची वाणीही क्षीण होत नाही. छंदोमांच्यानंतर या महाव्रत धर्मवान् अतिरात्राचे अनुष्ठान करण्याचे आणखी एक असे कारण आहे की, 'छंदोम' क्रतू हे पशुरूप असून महाव्रतहा अन्नरूप आहे. यास्तव, जे कोणी यजमान सत्ररूप अशा त्रयोदशरात्रात्मक आप्त द्वादशाहाचे अनुष्ठान करतात ते पशूंच्या व घृतक्षीरादिरूप अन्नाच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. म्हणजे त्यांना पशूंची व अन्नाची भरपूर प्राप्ती होते. (अनुवाक ३).

आदित्यांना इहलोक व द्युलोक म्हणजे स्वर्गलोक या दोनही लोकांच्या पासून निष्पन्न होणाऱ्या समृध्दीचा उपभोग घेण्याची इच्छा झाली. आपली इच्छा पूर्ण होण्यास 'चतुर्दशरात्र' नांवाचा क्रतू साधनभूत होईल असे त्यांना आढळले. आणि त्या क्रतूची सामग्री जुळवून त्यांनी चतुर्दशरात्र क्रतू केला. त्या क्रतूच्या प्रभावाने हा भूलोक व उर्ध्व दिशेस असणारा स्वर्गलोक या दोनही लोकांच्या पासून निर्माण होणाऱ्या समृध्दीचा उपभोग त्यांना प्राप्त झाला. चतुर्दशरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणून जे कोणी यजमान त्या क्रतूचे

अनुष्ठान करतात ते भूलोक व स्वर्गलोक या दोनही लोकांच्या पासून निर्माण होणाऱ्या समृध्दीच्या उपभोगाला प्राप्त होतात.

हा चतुर्दशरात्र क्रतू सात ग्राम्य व सात आरण्य या दोन प्रकारच्या मिळून चौदा धान्यांची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतो.

प्रारंभीचा 'प्रायणीय' व शेवटचा 'उदयनीय' या दोन दिवसांच्या मध्यंतरी या क्रतूत बारा दिवस असून त्यांचे अनुष्ठान अनुक्रमे रथंतर, बृहत्, वैरूप, वैराज, शाक्वर व दैवत संज्ञक एका एका पृष्ठस्तोत्राच्या प्रामुख्याने होत असल्याने या दिवसांना 'पृष्ठ' हीच संज्ञा प्राप्त झालेली आहे. आताच सांगितलेला जो पृष्ठस्तोत्रांचा अनुक्रम त्याला 'पराचीन' असे नांव असून याच्या उलट असलेल्या अनुक्रमाला 'प्रतीचीत' अशी संज्ञा आहे. बारा दिवसांपैकी पहिल्या सहा दिवसांत पृष्ठस्तोत्रांचे गान 'पराचीन' क्रमाने होत असून पुढच्या सहा दिवसांत ते 'प्रतीचीन' क्रमाने होत असते. पराचीन क्रमाने जी पृष्ठस्तोत्रे पहिल्या सहा दिवसांत गाइली गातात त्यांच्या योगाने चतुर्दशरात्रात्मक सत्रकर्ते यजमान स्वर्गलोकी जय संपादन करतात आणि पुढच्या सहा दिवसांत प्रतीचीनसंज्ञक क्रमाने जी पृष्ठस्तोत्रे गाइली जातात, त्यांच्या योगाने ते इहलोकी विजय मिळवितात. त्रिवृत्, पंचदश, सप्तदश, एकविंश, त्रिणव व त्रयस्त्रिंश अशा प्रकारच्या स्तोमांच्या अनुक्रमास 'आरोह' क्रम असे नांव असून याच्या उलट त्रयस्त्रिंश, त्रिणव इत्यादि प्रकारच्या अनुक्रमास 'अवरोह' क्रम असे म्हणतात. पहिल्या सहा दिवसांत जी पृष्ठस्तोत्रे गाइली गातात ती आरोह क्रमाने असणाऱ्या स्तोमांच्या आधारे गाइली जात असून दुसऱ्या सहा दिवसांत जी पृष्ठस्तोत्रे गाइली जातात ती अवरोह क्रमाने असणाऱ्या स्तोमांच्या आधारे गाइली जातात. अर्थात् या बारा दिवसांपैकी मध्यवर्ती असणारे सहावा व सातवा हे दोन दिवस 'त्रयस्त्रिंश' स्तोमयुक्त असतात. म्हणजे या दोनही दिवशी गाइली जाणारी स्तोत्रे त्रयस्त्रिंशसंज्ञक स्तोमाच्या आधाराने गाइली जातात. आता सांगितलेल्या सर्व स्तोमांमध्ये त्रयस्त्रिंश स्तोम हा अधिराज म्हणजे श्रेष्ठ आहे. अर्थात् अधिराज असलेल्या त्रयस्त्रिंश स्तोमाच्या आधाराने ज्या दोन दिवसांत पृष्ठस्तोत्रे गाइली जातात ते दोन दिवसही इतर सहा दिवसांच्या अपेक्षेने 'अधिराज' या संज्ञेला पात्र होत असतात. अर्थात् अधिराजसंज्ञक दोन दिवसांचे अनुष्ठान करणारे यजमान इतर जनांमध्ये 'अधिराज' या पदवीला प्राप्त होतात. इतकेच नव्हे तर साम्राज्याचेही अधिकारी होतात. चतुर्दशरात्र

तूच्या पहिल्या प्रायणीय दिवशी व शेवटच्या उदयनीय दिवशी मिळून दोन तिरात्र करावेत. म्हणजे ते चतुर्दशरात्र क्रतूचे संपूर्णत्वाने संपादन करण्यास रणभूत होतात. (अनुवाक ४).

प्रजापती जेव्हा स्वर्गलोकाला गेला तेव्हा त्याच्या मागोमाग देवही स्वर्गाला ले. देवांच्या मागोमाग आदित्य व त्यांच्या पाठोपाठ पशूही स्वर्गलोकी गेले. हा देव परस्परांमध्ये बोलू लागले की, ज्या पशूंचे संपादन करून मनुष्यांच्या ह आम्ही सर्वांनी आपली उपजीविका चालविली, ते सर्वच पशू अगदी मच्या पाठोपाठ स्वर्गात येऊन पोचले हे ठीक नाही. आमच्या मागोमाग लेले आदित्य स्वर्गावर आरूढ होवोत. परंतु, हे पशू स्वर्गात न राहता त भूलोकी गेले पाहिजेत. मग सर्व देवांनी एकविचार करून त्या पशूंना लोकी परत घालविण्याकरता चतुर्दशरात्र क्रतूचे अनुष्ठान केले. त्या अनुष्ठानप्रभावाने र्गलोकी आलेले सर्व पशू पुन्हा भूलोकी परत गेले. चतुर्दशरात्र क्रतूतील ठ' संज्ञक सहा दिवसांच्या अनुष्ठानाने आदित्य स्वर्गलोकावर वसती करून हिले. आणि दोन त्र्यहांच्या अनुष्ठानाने पशू भूलोकी परत फिरले. 'पृष्ठ' ज्ञक दिवसांच्या प्रभावाने आदित्य स्वर्गलोकी समृध्द होऊन राहिले. आणि न त्र्यहांच्या प्रभावाने पशू भूलोकी समृद्ध झाले. चतुर्दशरात्र क्रतूचे हे हात्म्य जाणून जे कोणी चतुर्दशरात्ररूप सत्राचे अनुष्ठान करतात, ते सत्रकर्ते जमान भूलोक व स्वर्गलोक या दोनही लोकांच्या ठिकाणी समृध्द होतात. ठसंज्ञक दिवसांच्या योगाने स्वर्गलोकी ते समृध्द होत असून दोन त्र्यहांच्या गाने ते या भूलोकी समृध्दीला प्राप्त होतात.

अह म्हणजे दिवस आणि तीन दिवसांचा जो समूह त्यास 'त्र्यह' णतात. ज्योती, गौ व आयु हे तीन दिवस मिळून एक त्र्यह होतो. योतिनामक अह किंवा दिवस पृथ्वीरूप, गौ नांवाचा दिवस अंतरिक्ष आणि यु नांवाचा दिवस हा स्वर्गरूप होय. अर्थात् या तीनही दिवसांचे अनुष्ठान रणारे यजमान तीन्ही लोकांच्या ठिकाणी आरोहण करतात.

'पृष्ठ' संज्ञक सहा दिवसांच्या संघाला 'पृष्ठ्य षडह' असे नांव आहे. ष्ठ्य षडह हा गवळ्याच्या खांद्यावर असणाऱ्या कावडीच्या दांडीसारखा आहे. स्तव चतुर्दशरात्राच्या प्रारंभी किंवा शेवटी अर्थात् एका कडेला जर पृष्ठसंज्ञक हा दिवसांचे अनुष्ठान केले, तर दोनही बाजूला सारखे ओझे नसल्यामुळे

डळमळणाऱ्या कावडीच्या दांडीप्रमाणे त्या कर्माची स्थिती होईल. यास्तव, पृष्ठसंज्ञक सहा दिवसांचे अनुष्ठान मध्ये करावे. त्या योगे दोनही बाजूला सारखे ओझे असलेल्या व म्हणूनच स्थिर अशा कावडीच्या दांडीसारखे ते कर्म होईल. शिवाय, पृष्ठसंज्ञक दिवस हे शरीरबल व इंद्रियसामर्थ्य प्राप्त करून देणारे असल्यामुळे त्यांचे अनुष्ठान चौदा दिवसांच्या मध्यंतरी केल्याने ते यजमानांच्या ठिकाणी शरीरबल व इंद्रियसामर्थ्य धारण करतात.

पृष्ठ्य षडहांपैकी पहिल्या, तिसऱ्या व पांचव्या दिवशी रथंतर सामाच्या पृष्ठस्तोत्राचे निष्पादन करावे. आणि दुसऱ्या चौथ्या व सहाव्या दिवशी बृहत् सामाच्या आधारे पृष्ठस्तोत्राचे निष्पादन करावे. रथंतर हे भूलोकरूप असून बृहत् हे स्वर्गलोकरूप आहे. यास्तव, सत्रकर्ते यजमान पूर्वोक्त पृष्ठ्य षडहातील सहा दिवसांमध्ये आता सांगितलेल्या क्रमाने जर रथंतर व बृहत् या दोन स्तोत्रांचा उपयोग करतील तर ते भूलोकी व स्वर्गलोकी प्रतिष्ठित होतील. रथंतर व बृहत् ही दोन पृष्ठ स्तोत्रे म्हणजे जणू काय थेट स्वर्गलोकाला जाणारे दोन सरळ मार्गच होत. यास्तव, या दोन पृष्ठस्तोत्रांचा उक्त क्रमाने उपयोग करणारे यजमान सरळ अशा मार्गांनी स्वर्गलोकाला जाऊन पोचतात.

ज्योती, गौ व आयु या आरोहक्रमानेच जे यजमान दोनही त्र्यहांचे अनुष्ठान करतात ते कायमचेच स्वर्गलोकी आरूढ होतात. भूलोकी परत येत नाहीत. यास्तव, पहिला त्र्यह आरोह क्रमाने व दुसरा त्र्यह आयु, गौ व ज्योती या अवरोह क्रमाने अनुष्ठित करावा. असे केल्याच्या योगाने ते यजमान स्वर्गलोकातून परत भूलोकावर येतील. सारांश, आरोह व अवरोह अशा दोन क्रमांनी जे दोन त्र्यहांचे अनुष्ठान करतील ते भूलोक व स्वर्गलोक या दोनही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतील आणि सर्व प्रकारे समृध्द होऊन राहतील.

चतुर्दशरात्र क्रतूतील दहा रात्री या जणू काय दशाक्षरी चरण असणाऱ्या विराट् छंदासारख्या होत. विराट् छंद हा अन्न प्राप्त करून देणारा आहे. यास्तव, विराट् छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या दहा रात्रींच्या अनुष्ठानप्रभावाने सत्रकर्ते यजमान सेवनीय असे भरपूर अन्न संपादन करतात. उरलेल्या चार रात्री म्हणजे जणू चार दिशाच होत. एवं च, या चार रात्रींच्या अनुष्ठानाच्या योगाने यजमान चारही दिशांच्या ठिकाणी प्रतिष्ठेला प्राप्त होतात.

चतुर्दशरात्र क्रतूच्या आरंभ व शेवट या दोनही बाजूंच्या दोन दिवसांत जे दोन 'अतिरात्र' याग केले जातात, ते चतुर्दशरात्र क्रतूच्या संपूर्ण फलप्राप्तीला कारणभूत होतात. (अनुवाक ५).

इंद्र हा इतर देवतांच्याहून श्रेष्ठ गणला जाण्यास योग्य असूनही देवतांचे स्वामित्व त्याला प्राप्त झाले नसल्यामुळे तो इतर देवांच्याच सारखा समजला जात असे. तेव्हा इंद्राने प्रजापतीकडे धाव घेतली आणि इतर देवांच्याहून श्रेष्ठ गणले जाण्यासाठी मी कोणता उपाय करू? असे त्याने प्रजापतीला विचारले. तेव्हा प्रजापतीने 'पंचदशरात्र' क्रतू करण्याचा सल्ला इंद्राला दिला. इंद्राने तत्संबधी सामग्री जुळविली आणि प्रजापतीच्या सल्याप्रमाणे पंचदशरात्र क्रतूचे यजन केले. तेव्हा त्याला देवांचे स्वामित्व प्राप्त होऊन तो इतर देवतांच्याहून वेगळा म्हणजे श्रेष्ठ असा गणला जाऊ लागला. पंचदशरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणून जे यजमान पंचदशरात्ररूप सत्राचे अनुष्ठान करतात, ते पाप व शत्रू यांच्यापासून दूर होतात व इतर लोकांच्याहून श्रेष्ठ गणले जातात.

ज्योती, गौ व आयु या नांवाच्या तीन दिवसांनी पूर्ण होणारा त्र्यह पंचदशरात्र क्रतूमध्ये अनुष्ठित करावा. ज्योतिसंज्ञक दिवस भूलोकरूप, गौसंज्ञक दिवस अंतरिक्षरूप आणि आयुसंज्ञक दिवस स्वर्गलोकरूप असल्यामुळे आता सांगितलेल्या त्र्यहाचे अनुष्ठान करणारे यजमान भू, अंतरिक्ष व स्वर्ग या तीनही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

ज्या सत्रामध्ये 'छंदोम' संज्ञक क्रतू केले जात नाहीत ते सत्र असत्र अर्थात् अप्रशस्त ठरत असते. आणि ज्या सत्रामध्ये छंदोम क्रतू केले जातात ते सत्र प्रशस्त असे होत असते. पृष्ठसंज्ञक सहा दिवसांच्या अनुष्ठान प्रभावाने यजमान त्या त्या देवतांची प्राप्ती करून घेतात. पृष्ठसंज्ञक सहा दिवस हे शरीरबलस्वरूप व इंद्रियसामर्थ्यरूप असून छंदोम हे पशुरूप आहेत. यास्तव, पंचदशरात्रक्रतुरूप सत्राचे ठिकाणी पृष्त्य षडह व चार छंदोम क्रतूंचे अनुष्ठान जे यजमान करतात ते शरीरबल, इंद्रियसामर्थ्य व पशू यांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

'पंचदश' या नांवाचा स्तोम हा हिंसेला कारणभूत होत असल्याने तो वज्ररूप आहे. पंचदशरात्र क्रतूचे पंचदशस्तोमाशी स्वरूपसाम्य असल्याने

तो वज्ररूप असतो. अर्थात् पंचदशरात्र क्रतूचे अनुष्ठान करणारे यजमान हे जणू काय पंचदशरात्रक्रतुरूपी वज्राने आपल्या शत्रूंच्यावर प्रहारच करतात. पंचदशक्रतूच्या प्रारंभी व शेवटी होणारे अतिरात्र हे यजमानांच्या ठिकाणी कार्यक्षम अशा इंद्रियसमुदायाचा परिग्रह म्हणजे संपादन करण्याला कारणभूत होतात.(अनुवाक ६).

एकदा काही कारणाने इंद्राच्या ठिकाणी असलेले युद्धसामर्थ्य क्षीण झाल्यासारखे होऊन तो अगदी ढिला पडला. सेनारहित आणि एखाद्या दरिद्रासारख्या एकाकी झालेल्या त्या इंद्राला असुरांच्या भयापासून सुरक्षित असे ठिकाणही वस्तीला मिळणे दुर्लभ होऊन बसले. तेव्हा असुरांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या भीतीचा परिहार होऊन आपणास निर्भयता कशी प्राप्त होईल, या विषयीचा उपाय त्याने प्रजापतीला विचारला. प्रजापतीने त्याला 'पंचदशरात्र' नांवाचा सत्ररूप क्रतू करण्याचा सल्ला दिला. मग इंद्राने सर्व सामग्री जमा केली आणि पंचदशरात्र क्रतूचे अनुष्ठान केले. त्या अनुष्ठानाच्या प्रभावाने इंद्राने असुरांचा पराभव करून विजय संपादन केला. आणि तो अत्यंत वैभवाला प्राप्त झाला. त्याने पंचदशरात्र क्रतूतील दुसऱ्या दिवशी होणाऱ्या 'अग्निष्टुत्' नांवाच्या स्तोमाने स्वतःच्या ठिकाणी शैथिल्य उत्पन्न होण्यास कारणभूत होणाऱ्या पातकाचे दहन केले आणि अवशिष्ट राहिलेल्या पंचदशरात्र क्रतुविषयक दिवसांच्या अनुष्ठानाच्या प्रभावाने ओज, शरीरबल, कार्यक्षम असा इंद्रियसमुदाय आणि युद्धा विषयीचा धैर्ययुक्त उत्साह स्वतःच्या ठिकाणी निर्माण केला.

पंचदशरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणणारे जे कोणी यजमान पंचदशरात्र क्रतूचे अनुष्ठान करतील ते आपल्या शत्रूंचा पराभव करून विजयी होतील आणि परम ऐश्वर्याला प्राप्त होतील. 'अग्निष्टुत्' नामक सोमयागाने ते स्वतःच्या ठिकाणच्या पातकांचे दहन करतील आणि पंचदशरात्रापैकी उरलेल्या दिवसांच्या अनुष्ठानाच्या योगाने ते स्वतःच्या ठिकाणी ओज, शरीरबल, कार्यक्षम असा इंद्रियसमुदाय, धैर्ययुक्त असा उत्साह प्राप्त करून घेतील.

पंचदश क्रतूमध्ये ज्या पंधरा रात्री अंतर्भूत झालेल्या असतात त्या सर्व 'पशव्य' म्हणजे पशूंची प्राप्ती करून देणाऱ्या असतात. कारण अर्ध्या महिन्याच्या पंधराच रात्री असतात आणि अर्ध्या महिन्याच्या म्हणजेच पंधरवड्याच्या अनेक आवृत्तींनीच संवत्सर पूर्ण होत असतो. पशू हे एक संवत्सरपर्यंत

गर्भावस्थेत राहून नंतर जन्मास येत असतात. आणि म्हणूनच एका संवत्सरामध्ये अनेकवार येणाऱ्या अर्ध्या महिन्याशी स्वरूपसाम्य असणाऱ्या पंचदशरात्र क्रतूतील पंधरा रात्री पशुप्राप्तीला कारणभूत होत असतात.

पंचदशरात्र क्रतूतील पंधरा रात्री स्वर्गलोक प्राप्त करून देणाऱ्या आहेत. अर्धमासाच्या रात्री पंधरा असतात, हे प्रसिद्धच असून पंधरा रात्रींनी युक्त अशा अर्धमासाच्या अनेक आवृत्तींनीच संवत्सर पूर्ण होत असतो. संवत्सर हा स्वर्गलोकस्वरूप म्हणजे स्वर्गलोक प्राप्त करून देणारा आहे. आणि म्हणूनच संवत्सराशी परंपरेने संबद्ध होणाऱ्या पंचदशरात्र क्रतूतील पंधरा रात्री स्वर्गलोकप्राप्तीला कारणभूत होतात, हे योग्यच आहे.

पंचदशरात्र क्रतूमध्ये ज्योति, गौ आणि आयु या नांवाचे तीन याग अनुक्रमे केल्या जाणाऱ्या तीन दिवसांच्या समूहाने पूर्ण होणारा एक 'त्र्यह' अनुष्ठित केला जातो. ज्योतिनामक यागाने अनुष्ठित होणाऱ्या 'अहास' म्हणजे दिवसास ज्योती हीच संज्ञा असते. अर्थात् ज्योतिसंज्ञक दिवस भूलोकरूप, गौनामक दिवस अंतरिक्षरूप आणि आयुनामक दिवस हा स्वर्गलोकरूप आहे. यास्तव, या तीनही दिवसांचे अनुष्ठान करणारे यजमान तीनही लोकांच्या ठिकाणी आरूढ होतात. 'पृष्ठ' संज्ञक सहा दिवस जर पंचदशरात्र क्रतूच्या आरंभी किंवा शेवटी अनुष्ठित करण्यात आले तर त्या पंचदशरात्र क्रतूचे सर्व अनुष्ठान एकाच बाजूला अधिक ओझे झालेल्या कावडीच्या दांडीप्रमाणे अस्थिर होईल. यास्तव, पृष्ठ्य षडहाचे म्हणजे पृष्ठसंज्ञक सहा दिवसांचे अनुष्ठान मध्यंतरी करावे. म्हणजे त्या योगाने त्या पंचदशरात्र क्रतूचे सर्व अनुष्ठान दोन्हीकडे समान ओझे असलेल्या कावडीच्या दांडीप्रमाणे स्थिर असे होईल. शिवाय, पृष्ठसंज्ञक सहा दिवस हे शरीरबल व इंद्रियसामर्थ्य प्राप्त करून देणारे असल्यामुळे त्यांचे अनुष्ठान पंचदशरात्रक्रतूच्या मध्यंतरी केल्याने ते यजमानाच्या ठिकाणी शरीरबल व इंद्रियसामर्थ्य निर्माण करण्याला कारणभूत होतात. पृष्ठसंज्ञक सहा दिवसांपैकी विषम असलेले दिवस रथंतर सामाच्या आधाराने पृष्ठ स्तोत्रांचे गान करून अनुष्ठित केले जात असून सम असलेले तीन दिवस बृहत्सामाच्या आधारे पृष्ठस्तोत्रगान करून अनुष्ठित केले जातात. 'रथंतर' हे भूलोकरूप व 'बृहत्' हे स्वर्गलोकरूप आहे. यास्तव, पृष्ठसंज्ञक सहा दिवसांचे अनुष्ठान जो यजमान रथंतर व बृहत् या दोन

स्तोत्रांच्या आधारे पृष्ठस्तोत्रगान करून करतील ते रथंतर व बृहत् या दोन सामांच्या प्रभावाने भू व स्वर्ग या दोन्ही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतील. रथंतर व बृहत् ही दोन पृष्ठस्तोत्रे म्हणजे जणू काय स्वर्गलोकाला जाऊन पोचणारे दोन सरळ राजमार्गच होत. यास्तव, या दोन पृष्ठस्तोत्रांचा उक्त क्रमाने उपयोग करणारे यजमान सरळ अशा मार्गांनी थेट स्वर्गलोकाला जाऊन पोचतात.

ज्योती, गौ व आयु या आरोह क्रमाने जे यजमान दोनही त्र्यहांचे अनुष्ठान करतात ते कायमचेच स्वर्गलोकी आरूढ होतात. भूलोकी पुन्हा परत येत नाहीत. यास्तव, पहिल्या त्र्यहामध्ये आरोहक्रमाने पूर्वोक्त यागांचे अनुष्ठान करावे व दुसऱ्या त्र्यहांचे अनुष्ठान त्याच्या उलट म्हणजे आयु, गौ व ज्योती अशा अवरोहक्रमाने करावे. असे केले असता सत्रकर्ते यजमान स्वर्गलोकातून पुन: भूलोकावर परत येतील. सारांश, आरोह व अवरोह अशा दोन क्रमांनी दोन त्र्यहांचे अनुष्ठान जे यजमान करतात ते भू व स्वर्ग या दोनही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठेला प्राप्त होऊन शिवाय सर्वप्रकारे समृध्द होऊन राहतील.

पंचदशरात्र क्रतूतील पंधरा रात्रींपैकी ज्या दहा रात्री असतात त्या जणू काय दशाक्षरीचरण असलेल्या 'विराट्' छंदासारख्या होत. विराट्छंद हा अन्न प्राप्त करून देणारा आहे. यास्तव, विराट्छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या दहा रात्रींच्या अनुष्ठानाच्या प्रभावाने यजमान सेवनीय असे भरपूर अन्न संपादन करतात. उरलेल्या पांच रात्री म्हणजे जणू काय ऊर्ध्व दिशेसह असणाऱ्या पांच दिशाच होत. एवं च, उर्वरित अशा पांच रात्रींच्या अनुष्ठानाने यजमान पांचही दिशांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

पंचदशरात्र क्रतूच्या दोनही बाजूंना म्हणजे आरंभी एक व शेवटी एक असे जे दोन 'अतिरात्र' केले जातात ते कार्यक्षम असा इंद्रियसमुदाय, वीर्य, प्रजा व पशू यांची यजमानांना प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतात. (अनुवाक ७).

आपण भरपूर अन्न भक्षण करणारा व्हावे, अशी प्रजापतीला इच्छा झाली. आपली इच्छा पूर्ण होण्यास सप्तदशरात्र क्रतू उपयोगी पडेल असे त्याला आढळून आले. मग त्याने त्या क्रतूचे सर्व साहित्य जमा केले

आणि सप्तदशरात्र क्रतू केला. त्या क्रतूच्या प्रभावाने प्रजापती हा भरपूर अन्न भक्षण करणारा झाला. सप्तदशरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणून जे त्या क्रतूचे यजन करतात ते भरपूर अन्न भक्षण करणारे होतात.

या क्रतूमध्ये एक पंचाह म्हणजे पांच दिवसांचा समूह अंतर्भूत झालेला असतो. म्हणजे त्र्यहाच्या दुसऱ्या आवृत्तीतून ज्योतिसंज्ञक एक दिवस वर्ज्य केला असता 'पंचाह' निष्पन्न होतो. हेमंत व शिशिर हे दोन मिळून एकच ऋतू मानला असता ऋतू पांचच भरतात. पांच ऋतूंच्या योगानेच संवत्सर पूर्ण होत असतो. अर्थात् सप्तदशरात्र क्रतूतील पांच ऋतूंच्याशी स्वरूपसाम्य असलेल्या पंचाहाचे अनुष्ठान केल्याच्या योगाने यजमान पांच ऋतूंच्या ठिकाणी व त्या ऋतूंच्या द्वारा संवत्सराच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. शिवाय, पंक्तिछंद हा पांच अक्षरांच्या चरणांनी निष्पन्न होत असतो. पांच या संख्येलाच पंक्ती असे नांव आहे. व त्यामुळेच पांच पांच अक्षरांच्या पांच चरणांनी निष्पन्न होणाऱ्या छंदाला पंक्ती हे नांव प्राप्त झाले आहे. पांच हविर्द्रव्यांच्या पंक्तीनेच यज्ञ पूर्ण होत असतो. यास्तव, पंक्ती छंदाशी व पांच हविर्द्रव्यांच्या पंक्तीने परिपूर्ण होणाऱ्या यज्ञाशी समानरूप असलेल्या पंचाहाचे अनुष्ठान सप्तदशरात्र क्रतूमध्ये करावे. म्हणजे त्या योगाने यजमान संपूर्ण अशा यज्ञाचे संपादन करतात.

'छंदोम' नांवाच्या सोमयागांचे अनुष्ठान ज्या सत्रात होत नाही ते 'असत्र' होय. म्हणजे खऱ्या अर्थाने ते सत्रच ठरत नाही. यास्तव सत्ररूप सप्तदशरात्र क्रतूमध्ये 'छंदोम' नांवाचे चार सोमयाग करावेत म्हणजे ते सत्र यथार्थ असे होते. त्याच या क्रतूमध्ये एक पृष्ठ्य षडह अनुष्ठित करावा. म्हणजे पृष्ठसंज्ञक सहा दिवसांचे अनुष्ठान करावे. त्या योगाने यजमान देवतांचे आनुकूल्य संपादन करतात. छंदोमनामक सोमयागांच्या योगाने यजमान पशूंचे व पृष्ठसंज्ञक सहा दिवसांच्या अनुष्ठानाने शरीरबल व इंद्रियसामर्थ्य संपादन करतात. कारण, पृष्ठसंज्ञक सहा दिवस हे शरीरबल व इंद्रियसामर्थ्य प्राप्त करून देणारे असून छंदोम हे पशूंची प्राप्ती करून देणारे आहेत. सारांश, पृष्ठ्य षडहाचे व चार छंदोमांचे अनुष्ठान करणारे यजमान शरीरबल, इंद्रियसामर्थ्य आणि पशू यांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

प्रायणीय, एक पंचाह, चार छंदोम, पृष्ठसंज्ञक सहा दिवस व उदयनीय

अशा सतरा दिवसांच्या अनुष्ठानाने सप्तदशरात्र क्रतू पूर्ण होत असतो. प्रजापती हा सप्तदशाक्षरात्मक म्हणजे आश्रावय इत्यादि सतरा अक्षरांच्या समुदायस्वरूप असल्याचे पूर्वी वर्णिलेच आहे. एवं च, संख्यासाम्यत्वामुळे, प्रजापतीशी स्वरूपसाम्य असणारा सप्तदशरात्र क्रतू यजमानाला प्रजापतीची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतो. या क्रतूच्या प्रारंभी व शेवटी अशा दोनही बाजूंनी केले जाणारे दोन अतिरात्र संज्ञक सोमयाग यजमानांना भक्षण करण्यास योग्य अशा अन्नाची भरपूर प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतात. (अनुवाक ८).

दशरात्र क्रतूची अभिमानिनी असणारी कोणी विराट् नांवाची देवता दोन रूपे धारण करून राहिली. ब्रह्मवर्चसाचे रूप घेऊन ती देवांच्यामध्ये राहिली आणि अन्नाच्या रूपाने असुरांमध्ये राहिली. तेव्हा असुरांच्यापासून अन्न बळकावून घ्यावे आणि ब्रह्मवर्चस् व अन्न या दोहोंचाही उपयोग आपण घ्यावा अशी देवांनी इच्छा केली. आपली इच्छा पूर्ण होण्यास पुढे प्रदर्शित केल्या जाणाऱ्या वीस रात्री उपयोगी पडतील असे देवांनी पाहिले व त्याप्रमाणे देवांनी वीस रात्रींच्या योगाने पूर्ण होणाऱ्या विंशत्रिरात्रसंज्ञक क्रतूचे अनुष्ठान केले. त्या अनुष्ठानाच्या प्रभावाने असुरांच्या पासून देवांनी अन्न बळकावून घेतले. त्या योगाने ते ब्रह्मवर्चस् व अन्न या दोहोंचेही संपादन करणारे झाले. एवं च, विंशत्रिरात्र क्रतूच्या अनुष्ठानाने देव पूर्वीपेक्षाही अधिकतेने ब्रह्मवर्चस्संपन्न व भक्षणीय अशा भरपूर अन्नाचे सेवन करणारे झाले. विंशतिरात्र क्रतूचे हे माहात्म्य जाणारे जे कोणी यजमान या क्रतूचे अनुष्ठान करतील ते देवांच्याच प्रमाणे बह्मवर्चस् व अन्न या दोहोंचीही प्राप्ती करून घेतील आणि ब्रह्मवर्चस् व अन्न या दोहोंच्याही समृद्धीने संपन्न होऊन राहतील.

विंशतिरात्र क्रतूच्या वीस रात्रींची दहांनी विभागणी केली असता दोन 'विराट्' निष्पन्न होत असून त्या दोहोंची फलेही भिन्न भिन्न आहेत. एका विराट्चे 'ब्रह्मवर्चस्' हे फळ असून दुसऱ्या विराट्चे फळ 'अन्न' आहे. या दोन फळांच्या योगाने मिळणारी प्रतिष्ठाही वेगळी आहे. ब्रह्मवर्चसाने म्हणजे वेदाध्ययनजन्य तेजाने विद्वत्सभेमध्ये प्रतिष्ठा प्राप्त होते व अन्नसमृध्दीच्या योगाने धनिक लोकांमध्ये प्रतिष्ठा प्राप्त होते. दोनही हातांच्या दहा अंगुली व दोनही पायांच्या दहा अंगुली मिळून अंगुलिरूप वीस अवयवांनी युक्त असाच कोणताही पुरुष असतो. एवं च, अंगुलिरूप जितक्या अवयवांनी

पुरुष युक्त आहे तितक्याच रात्रिरूप अवयवांनी युक्त असा विंशत्रिरात्र हा क्रतू असल्यामुळे या रात्ररूप क्रतूतील सर्व यजमान पुरुषाच्या ठिकाणी असणाऱ्या सर्व गुणांच्या योगाने संपन्न होऊनच उठतात. म्हणजे आपल्या सत्राची समाप्ती करतात.

विंशतिरात्र क्रतूमध्ये ज्योति, गौ व आयु या तीन यागांनी पूर्ण होणारे तीन त्र्यह अनुष्ठित केले जातात. ज्योतिनामक याग हा भूलोकरूप, गौ हा अन्तरिक्षरूप आणि आयुसंज्ञक याग हा स्वर्गलोकरूप आहे. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे तीन त्र्यहांचे अनुष्ठान केल्याच्या योगाने सत्रकर्ते यजमान भू, अन्तरिक्ष व स्वर्ग या तीन लोकांच्या ठिकाणी आरूढ होतात.

विंशतिरात्र क्रतूच्या प्रारंभी किंवा शेवटी जर पृष्ठसंज्ञक सहा दिवसांचे अनुष्ठान केले तर एकाच बाजूला ओझे अधिक झालेल्या कावडीच्या दांडीप्रमाणेच त्या क्रतूच्या अनुष्ठानाचे स्वरूप अविवध म्हणजे अस्थिर किंवा डळमळल्यासारखे होईल. यास्तव विंशतिरात्र क्रतूच्या अनुष्ठानाचे स्वरूप सविवध म्हणजे दोनही बाजूंना समतोल ओझे असणाऱ्या कावडीच्या दांडीप्रमाणे स्थिर अर्थात् अचल होण्यासाठी पूर्वोक्त त्र्यहांच्या तीन आवृत्ती झाल्यानंतर पुढे व्हावयाच्या चौथ्या त्र्यहाच्या मध्यन्तरी पृष्ठसंज्ञक सहा दिवसांचे म्हणजे पृष्ठ्य षडहाचे अनुष्ठान करावे. पृष्ठ्य षडहातील पृष्ठसंज्ञक सहा दिवस हे शरीरबलरूप व इंद्रियसामर्थ्यप्रद असे आहे. यास्तव, मध्यन्तरी त्यांचे अनुष्ठान केले असता त्यांच्या प्रभावाने यजमान आपल्या शरीरामध्ये बल व इंद्रियांच्या ठिकाणी सामर्थ्य धारण करतात. विंशतिरात्र क्रतूमध्ये केल्या जाणाऱ्या त्र्यहांच्या ठिकाणी बृहत् व रथंतर या दोन स्तोत्रांच्या सामांच्या आधारे पृष्ठ स्तोत्रांचे गान केले जात असते. रथंतर हे भूलोकरूप आणि बृहत् हे स्वर्गलोकरूप आहे. या दोन स्तोत्रांच्या आधारे पृष्ठस्तोत्रगान करून जे त्र्यहांचे अनुष्ठान करतात ते त्या दोन स्तोत्रांच्या प्रभावाने भू व स्वर्ग या दोनही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. बृहत् व रथंतर हे जणू यज्ञाच्या ठिकाणचे सरळ असे दोन मार्गच आहेत. अर्थात् या दोन मार्गांच्या योगाने विंशतिरात्रसंज्ञक सत्र करणारे यजमान स्वर्गलोकाला जाऊन पोचतात. आरोह क्रमाने त्र्यहांचे अनुष्ठान करतात ते एकदा स्वर्गलोकावर आरूढ झाले म्हणजे पुन्हा परत भूलोकावर येत नाहीत. यास्तव, पृष्ठ्य षडहानंतर जो चौथा त्र्यह करावयाचा त्याचे अनुष्ठान अवरोहक्रमाने

म्हणजे आयु, गौ व ज्योती अशा प्रकारे करावे. म्हणजे स्वर्गलोकी गेलेले यजमान पुन्हा भूलोकी येऊन प्रतिष्ठित होतात. सारांश, भू व स्वर्ग या दोनही लोकांच्या पासून प्राप्त होणाऱ्या संपत्तीने समृध्द होऊनच सत्राचे अनुष्ठान संपवितात.

विंशतिरात्र क्रतूचा प्रारंभ व शेवट या दोनही बाजूंना जे 'अतिरात्र' केले जातात ते यजमानांना ब्रह्मवर्चस् व अन्नाद्य यांचे संपादन करून देण्यास कारणभूत होतात. (अनुवाक ९).

स्वर्गलोकामध्ये प्रकाशित होत असलेला हा आदित्य पूर्वी या भूलोकीच राहत होता. देवांनी त्याला हाती धरला आणि पृष्ठसंज्ञक सहा दिवसांच्या अनुष्ठानप्रभावाने त्यांनी त्याला स्वर्गलोकी नेऊन पोचविले. 'पर' या नांवाचे साम गाऊन ज्या दिवसांचे अनुष्ठान संपादिले जाते, त्यांना 'पर' हीच संज्ञा आहे. 'पर' संज्ञक तीन दिवसांच्या अनुष्ठानाच्या योगाने देवांनी त्या आदित्याला खालच्या बाजूने टेका देऊन थोपविला आणि तो स्वर्गलोकातून खाली येणार नाही अशी व्यवस्था केली. ज्या सामाचे गान फक्त दिवसाच केले जाते अशा 'दिवाकीर्त्य' संज्ञक सामाच्या गानाने ज्या दिवसाचे अनुष्ठान संपादिले जाते, त्या 'दिवाकीर्त्य' नामक दिवस होय. या दिवसाच्या अनुष्ठानाने देवांनी आदित्याला स्वर्गलोकात स्थापित केले. त्यानंतर 'पर' संज्ञक तीन दिवसांच्या अनुष्ठानाच्या योगाने त्यांनी आदित्याला वरच्या बाजूने थोपवून धरून तो स्वर्गलोकाच्याही वर जाणार नाही अशी व्यवस्था केली. नंतर पृष्ठसंज्ञक सहा दिवसांचे पुन्हा अनुष्ठान करून त्या अनुष्ठानाच्या प्रभावाने देवांनी त्या आदित्याला स्वर्गलोकापासून किंचित् खाली म्हणजे अंतरिक्षात आणून त्या ठिकाणी कायमचे आरूढ केले. सारांश, 'पर' संज्ञक तीन दिवसांच्या अनुष्ठानाने खालून आणि वरून देवांनी थोपवून धरल्यामुळेच आज आपणास दिसत असलेला हा आदित्य स्वर्गलोकाच्या जवळच्या अंतरिक्षामध्ये निरंतर प्रकाशित होत असतो.

अशा प्रकारे देवांनी 'एकविंशतिरात्र' सत्राचे अनुष्ठान करून आदित्याला स्वर्गलोकी स्थापित केले, हे जाणून जे यजमान 'एकविंशतिरात्र' सत्राचे अनुष्ठान करतात, ते स्वर्गलोकाच्या ठिकाणी आरूढ होतात.

प्रायणीयसंज्ञक पहिल्या दिवसाच्या अनुष्ठानानंतर जे यजमान पृष्ठसंज्ञक

सहा दिवसांचे अनुष्ठान करतात, त्या सहा दिवसांच्या योगाने ते स्वर्गलोकाला जाऊन पोहोचतात. नंतर 'पर' नांवाच्या सामगानाने तीन दिवसांचे जे अनुष्ठान करतात, त्या दिवसांच्या प्रभावाने ते खालच्या बाजूने थोपवून धरले जातात. 'दिवाकीर्त्य' नामक एका दिवसाच्या अनुष्ठानाने ते स्वर्गलोकामध्ये प्रतिष्ठित होतात. त्यानंतर 'पर' संज्ञक तीन दिवसांच्या अनुष्ठानाने ते वरच्या बाजूने थोपवून धरले जातात आणि त्यानंतरच्या पृष्ठसंज्ञक सहा दिवसांच्या अनुष्ठानप्रभावाने ते स्वर्गलोकाच्या खाली जवळच असलेल्या अंतरिक्षात येऊन राहतात.

एकविंशतिरात्र सत्रापैकी मध्यवर्ती असलेल्या दिवाकीर्त्यसंज्ञक दिवसानंतर यजमानांनी जर 'पर:साम' म्हणजे 'पर' संज्ञक सामाच्या गानाने तीन दिवस अनुष्ठित केले नाहीत, तर स्वर्गलोकी प्रतिष्ठित झालेले ते यजमान वरच्या बाजूने काहीच प्रतिबंध नसल्यामुळे स्वर्गलोकाच्याही वर निघून जातील आणि 'दिवाकीर्त्य' दिवसाच्या पूर्वी जर 'पर:साम' संज्ञक तीन दिवस अनुष्ठित केले नाहीत तर खालच्या बाजूला काहीच प्रतिबंध नसल्यामुळे आदित्याप्रमाणे प्रखर तेजस्वी झालेले ते स्वर्गलोकाखालच्या अंतरिक्षात स्थित झालेले यजमान एका निमिषात आपल्या प्रखर तेजाने भूलोकावरील सर्व प्राण्यांना जाळून भस्म करतील. सारांश, 'दिवाकीर्त्य' संज्ञक मध्य दिवसाच्यापूर्वी व मागाहून अनुष्ठित केल्या जाणाऱ्या 'पर:साम' संज्ञक तीन तीन दिवसांच्या प्रभावाने स्वर्गलोकासमीपच असलेल्या अंतरिक्षात प्रतिष्ठित झालेले यजमान खालून व वरून अशा दोनही बाजूंनी थोपवून धरले जातात आणि तेथेच निरंतर स्थिर होतात.

'दिवाकीर्त्य' संज्ञक दिवस हा सत्रकर्त्या यजमानासारखा असून त्याच्या दोन्ही बाजूंस असणारे 'पर:साम' संज्ञक दिवस हे संवत्सररूप होत. 'दिवाकीर्त्य' संज्ञक दिवसापूर्वी व नंतर अशा दोनही बाजूंनी 'पर:साम' संज्ञक दिवस अनुष्ठित केले असता, ते यजमान खालून व वरून संवत्सरदेवतांच्याच ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

'दिवाकीर्त्य' संज्ञक दिवस पाठीसारखा असून 'पर:साम' संज्ञक तीन तीन दिवस हे जणू पाठीच्या दोन बाजूंस असलेल्या दोन बरगड्याच होत. यास्तव, पाठीसारख्या असलेल्या 'दिवाकीर्त्य' संज्ञक दिवशी व त्याच्या पूर्वोत्तर होणाऱ्या 'पर:साम' संज्ञक दिवसांच्या ठिकाणी पुष्कळ सोमग्रह घेतले जातात

आणि शस्त्रेही पुष्कळच पठण केली जातात. अशा प्रकारच्या अनुष्ठानाधिक्याने युक्त असलेले ते दिवस हे एकविंशतिरात्ररूप यज्ञाच्या मध्यभागी, तो यज्ञ विस्कळित होऊ नये म्हणून जणू घट्ट अशी गाठच देतात.

'दिवाकीर्त्य' दिवसापूर्वीच्या तीन दिवसांमध्ये आरोहक्रमाने दररोज 'अतिग्राह्य' संज्ञक एक एक ग्रह घेतला जात असून दिवाकीर्त्यानंतरच्या तीन दिवसांमध्ये अवरोह क्रमाने दररोज एक एक अतिग्राह्य अधिक घेतला जातो. आणि 'दिवाकीर्त्य' संज्ञक दिवशी पूर्वोक्त सहा अतिग्राह्य घेऊन शिवाय 'सौम' नामक एक अतिग्राह्य मिळून सात 'अतिग्राह्य' ग्रह घेतले जातात. मनुष्याच्या शिरोभागी सातच प्राण निविष्ट झालेले असतात. यास्तव, 'दिवाकीर्त्य' नामक दिवशी पूर्वोक्त सात ग्रह घेतले असता ते यजमानांच्या शिरोभागी सातही प्राणांचे धारण करण्याला कारणभूत होतात.

'दिवाकीर्त्य' दिवसाच्या पूर्वी करण्यात येणाऱ्या 'पर:साम' संज्ञक तीन दिवसांच्या अगोदर अवरोहरूप असे जे पृष्ठसंज्ञक सहा दिवस केले जातात, त्यांच्या योगाने यजमान स्वर्गलोकी आरूढ होतातच. परंतु, त्या लोकातून ते खाली भूलोकी येण्यासाठी दिवाकीर्त्यानंतरच्या पर:सामसंज्ञक तीन दिवसांनंतर अवरोह क्रमाने जर पृष्ठसंज्ञक सहा दिवस अनुष्ठित केले नाहीत, तर ते यजमान इहलोकाचे सर्व व्यवहार विसरून जाऊन वेड्यासारखे उन्मत्त होतील किंवा मृतवत् होऊन राहतील. यासाठी दिवाकीर्त्यानंतर व पर:साम या नांवाच्या तीन दिवसांच्या नंतर जर अवरोह क्रमाने पृष्ठसंज्ञक सहा दिवसांचे अनुष्ठान केले तर ते यजमान पुन्हा खाली भूलोकी येतील आणि वेड्यासारखे उन्मत्त न होता उत्तम प्रकारे प्रतिष्ठित होतील.

पूर्वी एके काळी इंद्र अप्रतिष्ठित असा गणला जात असे. तेव्हा तो प्रजापतीकडे गेला व देवसमाजामध्ये आपल्याला प्रतिष्ठा कशी प्राप्त होईल याविषयी त्याने त्याला उपाय विचारला. तेव्हा प्रजापतीने 'एकविंशतिरात्र' संज्ञक सत्राचे अनुष्ठान करावयाचा इंद्राला सल्ला दिला. इंद्राने त्या सत्राला लागणारी सर्व सामग्री जुळविली आणि 'एकविंशतिरात्र' सत्राचे यजन केले. त्यानंतर तो देवसमाजात प्रतिष्ठेला प्राप्त झाला. यास्तव, पुष्कळ सोमयाग करूनही जे समाजात अप्रतिष्ठित गणले जात असतील, त्यांनी 'एकविंशतिरात्र' सत्राचे अनुष्ठान करावे. बारा महिने, पांच ऋतू, तीन लोक आणि एकविसावा

हा आदित्य इतकेच देवांचा निवास असणारे लोक आहेत. अर्थात् या एकवीस देवलोकांच्याशी संख्यासाम्य असणाऱ्या 'एकविंशतिरात्र' सत्राचे जे अनुष्ठान करतात, ते यजमान त्या एकवीस लोकांमध्ये राहणारे प्राणी जसे प्रतिष्ठित झालेले आहेत, त्याचप्रमाणे प्रतिष्ठित होऊन राहतात. पूर्वी एकदा स्वर्भानूच्या कृष्णवर्ण छायेने व्यापल्यामुळे किंवा मेघांच्या आवरणाने आच्छादित झाल्यामुळे आदित्य विशेषसा प्रकाशित होत नसे. तेव्हा तो प्रजापतीकडे गेला आणि पूर्वीप्रमाणे उत्कृष्ट प्रकाशित होण्याचा उपाय त्याने विचारला. प्रजापतीने 'एकविंशतिरात्र' संज्ञक सत्राचे अनुष्ठान करण्याचा आदित्याला सल्ला दिला. मग आदित्याने सर्व साम्रगी जुळविली आणि एकविंशतिरात्र सत्राचे अनुष्ठान केले. तेव्हा तो पूर्वीप्रमाणे पूर्ण उज्वलतेने प्रकाशित होऊ लागला. एकविंशतिरात्र सत्राचे हे माहात्म्य जाणून जे यजमान त्याचे अनुष्ठान करतील ते विद्या, धन इत्यादिकांनी समृद्ध होऊन समाजात प्रकाशित होतील. 'एकविंश' नांवाचा स्तोम, त्रिवृत् इत्यादि इतर स्तोमांच्याहून अधिक प्रकाशमान आहे. अर्थात् 'एकविंश' स्तोमाशी संख्यासाम्यतेमुळे एकरूप असणाऱ्या 'एकविंशतिरात्र' सत्राचे अनुष्ठान करणारे यजमान धनविद्यादिकांच्या योगाने समृध्द होऊन सर्व समाजात उज्वलतेने प्रकाशमान होतात. शिवाय, त्रिवृत् इत्यादि स्तोमांच्या प्रतिष्ठेला एकविंश स्तोमच आधारभूत असल्याने तो जणू मूर्तिमंत प्रतिष्ठाच आहे. यास्तव, प्रतिष्ठारूप असलेल्या एकविंश स्तोमाशी दिनसंख्येच्या दृष्टीने समानरूप अशा एकविंशतिरात्र सत्राचे जे अनुष्ठान करतात ते सर्व ठिकाणी सर्वतोपरी प्रतिष्ठित होऊन राहतात.

या सत्राचा प्रारंभ व शेवट या दोनही बाजूंना अनुष्ठित केले जाणारे दोन अतिरात्र हे सत्रकर्त्या यजमानांना ब्रह्मवर्चसाचे संपादन करून देण्याला कारणभूत होतात. (अनुवाक १०).

१ पूर्वसिद्ध व ज्ञानवंत अशा ऋषींच्या नजरेसमोर सर्वार्थसंपादनाचे एकमेव साधनच असा जो 'अश्वमेध' नांवाचा यज्ञ नेहमी उभा असतो, तो माझ्याखेरीज कोणाकडेही न जाता माझ्याकडेच येण्याचा उद्देश धरून आदराने माझ्या संमुख येवो. २ जो पुरुष आमचा द्वेष करीत असेल त्याच्या शरीराच्या ठिकाणी निविष्ट झालेले यज्ञांगभूत देव त्याला सोडून जावोत आणि त्याचे शरीर निर्देव म्हणजे देवताभक्तिरहित करोत. आमच्याशी द्वेष करणाऱ्या

पुरुषाचे पुत्र व नोकरचाकर त्याच्यापासून दूर जावोत आणि त्याचे शरीर निर्वीर म्हणजे पुत्रभृत्यरहित करोत. त्या पुरुषाच्या शरीराच्या ठिकाणी असलेले खांदे, हात, पाय इत्यादि अवयव त्याच्या शरीराचा त्याग करून जावोत व त्याचे शरीर विद्रूप करून ठेवोत. आमचा द्वेष करणाऱ्या त्या पुरुषाचे शरीर यज्ञानुष्ठानाने कधीही मलीन न होवो. त्याचे शरीर यज्ञानुष्ठानरहित होवो. धनादिकांच्या अर्जनाने त्या पुरुषाचा सुखाने चाललेला जीवनक्रम नष्ट होवो व तो पुरुष यज्ञानुष्ठानविमुख असा होऊन केवळ वणिक्वृत्तीने कोठे तरी राहो. ३ हे अश्वमेधयज्ञा, उत्तमप्रकारे अनुष्ठित केल्या जाणाऱ्या तुज यज्ञाचे जे फलरूपी तेज आहे, ते घेऊन तू माझ्या संमुख ये आणि माझ्या ठिकाणी प्रविष्ट हो. अभिषेकयुक्त असणाऱ्या हे 'सव' संज्ञक यज्ञा, उत्कृष्ट प्रकारे अनुष्ठित केल्या जाणाऱ्या तुज यज्ञाच्या अनुग्रहरूपी तप:सामर्थ्याने अनुग्रहीत झालेला मी 'सद' नामक मंडपात बसणारे ब्राह्मण, अध्वर्युप्रभृति ऋत्विज आणि यजनीय असे देव यांना या यज्ञकर्मासाठी बोलावीत आहे. ४ हे सवनामक यज्ञा, तुझ्या यजनाच्या योगाने शिजून परिपक्व झालेल्या अन्नाला मी आपल्याजवळ बोलावीत आहे. तुझ्या अनुग्रहाने प्राप्त होणाऱ्या पुण्याचे आणि पशूंचे मी संपादन करीत आहे. ५ प्रैष, सामिधेनी, आज्यभाग, आश्रावण व प्रत्याश्रवण इत्यादि यज्ञांगांचे मी शास्त्रमुखाने सर्वतोपरी श्रवण करीत असून त्या प्रयाजादि यज्ञांगांच्या अनुष्ठानाने प्राप्त होणारे स्वर्गरूप फलही मी सर्वतोपरी संपादन करीत आहे. ६ हे 'सव' यज्ञा, अग्नी, इंद्र, सोम, सरस्वती इत्यादि सर्व देवता व त्या देवतांच्या 'याज्यानुवाक्या' या सर्वांच्या सह मी तुझ्या अनुष्ठानाच्या सिद्धीसाठी अध्वर्युप्रभृति सर्व अनुष्ठानकर्त्यांना आपल्याजवळ बोलावीत आहे. त्याप्रमाणे तुझ्या सिद्धीकरता वषट्कारसहित अशा संपूर्ण यज्ञकर्मविषयक प्रयोगाचाही मी स्वीकार करीत आहे. ७ हे 'सव' संज्ञक यज्ञा, सामगानाने केले जाणारे स्तवन, शस्त्रपठणाने केले जाणारे शंसन, अध्वर्यूने शस्त्रपठणाच्या वेळी दिलेले प्रतिगर, सोमग्रह, इडा व सूक्तवाकादि आशीर्वचन इत्यादि यज्ञांगांच्या अनुष्ठानाने प्राप्त होणारे फल व स्वर्ग यांचे मी सर्वतोपरी संपादन करीत आहे. हे 'सव' यज्ञा, तुझ्या सिद्धीसाठी पत्नीसंयाजांचे अनुष्ठान करण्याच्या उद्देशाने ऋत्विजांना मी आपल्या सन्निध बोलावीत आहे. त्याचप्रमाणे तुझ्या सिद्धीसाठी समिष्टयजूंचाही मी स्वीकार करीत आहे. ८ अग्निषोमीय इत्यादि पशू, अभिषुत म्हणजे कुटलेला सोम, सवनीय पुरोडाश,

प्रात:सवनीय तीनही सवने व त्यांच्या अनुष्ठानाने निष्पन्न होणारा सर्वयज्ञ, या सर्वांना, हे 'सव' यज्ञा, मी तुझ्या सिद्धीसाठी आपल्याजवळ बोलावीत आहे. आणि त्याचप्रमाणे तुझ्या सिद्धीसाठी, इंद्रासहित असणारे, अग्निप्रमुख असलेले, सोमासह असणारे जे देव असतील त्या देवांना व त्याखेरीज असलेल्याही सर्व देवांना मी आपल्याजवळ बोलावीत आहे. (अनुवाक ११).

१ गत, वर्तमान आणि भविष्य या तीनही काळांच्या ठिकाणी विद्यमान असणाऱ्या वषट्, स्वाहा आणि नम:, ही नांवे धारण करणाऱ्या सत्याच्या स्वरूपांना ही आहुती अर्पण असो. २ ऋक्, यजु व साम या तीनही वेदमंत्रांच्या ठिकाणी विद्यमान असणाऱ्या वषट्, स्वाहा व नम:, ही नांवे धारण करणाऱ्या सत्याच्या स्वरूपांना ही आहुती समर्पण असो. ३ गायत्री, त्रिष्टुप् व जगती या तीनही छंदांच्या ठिकाणी विद्यमान असणाऱ्या वषट्, स्वाहा आणि नम:, ही अनुक्रमे तीन नांवे धारण करणाऱ्या सत्याच्या रूपांना ही आहुती समर्पण असो. ४ पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु या तीनही लोकांच्या ठिकाणी विद्यमान असणाऱ्या वषट्, स्वाहा आणि नम: ही अनुक्रमे तीन नांवे धारण करणाऱ्या सत्याच्या स्वरूपांना ही आहुती समर्पण असो. ५ अग्नी, वायू व सूर्य यांच्या ठिकाणी विद्यमान असलेल्या वषट्, स्वाहा व नम:, ही अनुक्रमे तीन नांवे धारण करणाऱ्या सत्याच्या स्वरूपांना ही आहुती समर्पण असो. ६ प्राण, व्यान व अपान या तीन वायूंच्या ठिकाणी विद्यमान असणाऱ्या वषट्, स्वाहा आणि नम:, ही अनुक्रमे तीन नांवे धारण करणाऱ्या सत्याच्या स्वरूपांना ही आहुती समर्पण असो. ७ अन्न, ते पिकविणारी शेतजमीन आणि तिच्या ठिकाणी होणारी पर्जन्यवृष्टी या तीनही ठिकाणी विद्यमान असलेल्या वषट्, स्वाहा आणि नम:, ही अनुक्रमे तीन नांवे धारण करणाऱ्या सत्याच्या तीन स्वरूपांना ही आहुती समर्पण असो. ८ पिता, पुत्र, पौत्र या तिघांच्या ठिकाणी विद्यमान असणाऱ्या, वषट्, स्वाहा व नम:, ही अनुक्रमे तीन नांवे धारण करणाऱ्या सत्याच्या स्वरूपांना ही आहुती समर्पण असो. ९ भू:, भुव: व सुव: या तीन व्याहृतिमंत्रांच्या ठिकाणी विद्यमान असणाऱ्या वषट्, स्वाहा व नम:, ही अनुक्रमे तीन नांवे धारण करणाऱ्या सत्याच्या स्वरूपांना ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १२).

१ सर्व सोमग्रह मला उत्तम प्रकारे अनुकूल होऊन माझ्यासाठी सर्व

बाजूंनी समृध्दीचे संपादन करोत. माझ्या पुत्रपौत्रादि सर्व प्रजा मला सर्वतोपरी अनुकूल होवोत. फलसंपन्न असा यज्ञ माझ्या ठिकाणी समाविष्ट होवो. त्याचप्रमाणे यज्ञोपयुक्त अशा जलदेवताही माझ्या सन्निध येवोत. सहस्रसंख्येने मोजता येणारे धनबाहुल्य मजपासून कधीही दूर न जावो. २ ऐंद्रवायव इत्यादि प्रत्येक सोमग्रह मला अपेक्षित अशा सर्व वस्तूंचे संपादन करो. सोमग्रह भरून घेण्यापूर्वी पठण करण्यात येणारी पुरोरुक् नांवाची प्रत्येक ऋचा, प्रत्येक स्तोत्र व प्रत्येक शस्त्र मला सर्वतोपरीने अनुकूल होवो. वसू, रुद्र व आदित्यादि देव व सदोमंडपात बसणारे सर्व ब्राह्मण सदैव माझ्या सन्निध राहोत. सहस्रसंख्येने गणता येणारा धनाचा भरपूर साठा मजपासून केव्हाही दूर न होवो. ३ सोमयागांमध्ये प्रथम असलेला अग्निष्टोम माझ्या सान्निध्यात सदैव राहो. द्वितीयसंस्थारूप असलेला उक्थ्य क्रतूही मला अनुकूल होऊन माझ्या सन्निध राहो. ज्या क्रतूमध्ये रात्रीच्या वेळी स्तोत्रे गाइली जातात व दिवसाचा त्याग करून म्हणजे दिवसा यजन न करता रात्रीच्या वेळी सोमग्रहांचे यजन केले जाते, तो अतिरात्रसंज्ञक क्रतूही मला अनुकूल होऊन माझ्या सन्निध राहो. अनेक सहस्रकांनी मोजता येणारे धन मजपासून केव्हाही दूर न होवो. (अनुवाक १३).

१ ज्याच्या अनुग्रहाने यजमान तपस्वी होतो. त्या अग्निदेवाला ही आहुती समर्पण असो. २ जिच्याकडून मंत्रवाङ्मय व्यापलेले असते त्या वाग्देवतेला ही आहुती समर्पण असो. ३ ज्याच्या योगाने सर्व रूपे अलंकृत होत असतात त्या रत्नमण्याला ही आहुती समर्पण असो. ४ ज्याच्याकडून सर्व देवांच्यावर आधिपत्य केले जाते त्या इंद्राला ही आहुती समर्पण असो. ५ ज्याच्याकडून पंचप्राण व्यापले जात असतात त्या वायुदेवाला ही आहुती समर्पण असो. ६ ज्याच्या प्रकाशाने द्युलोक प्रकाशित होतो त्या सूर्यदेवाला ही आहुती समर्पण असो. ७ ज्याच्या प्रभुत्वाने आकाशात नक्षत्रे चमकत असतात त्या चंद्रदेवाला ही आहुती समर्पण असो. ८ ज्याच्याकडून पितरांच्यावर आधिपत्य केले जाते त्या यमराजाला ही आहुती समर्पण असो. ९ ज्याच्याकडून मनुष्यांच्यावर आधिपत्य केले जाते त्या राजाला ही आहुती समर्पण असो. १० ज्याच्याकडून नदीप्रमाणे असलेले सर्व रस व्यापले जातात त्या वृक्षगत परिपक्व फळाला ही आहुती समर्पण असो. ११ ज्याच्याकडून सर्व जातीच्या सर्पांवर प्रामुख्य गाजविले जाते त्या अजगर जातीच्या सर्पराजाला ही आहुती

समर्पण असो . १२ ज्याच्याकडून अरण्यसंचारी अशा सर्व पशूंच्यावर प्रभुत्व गाजविले जाते त्या व्याघ्राला ही आहुती समर्पण असो. १३ ज्याच्या प्रमुखतेने अंतरिक्षसंचारी असे सर्व पक्षी वावरत असतात त्या श्येन पक्ष्याला ही आहुती समर्पण असो. १४ ज्याच्या प्रमुखतेने सर्व जातीचे अश्व वावरत असतात त्या अत्यंत प्रौढ अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. १५ ज्याच्या प्रमुखतेने गाई, बैल इत्यादि पशूंची गणना केली जाते त्या खिलारी बैलाला ही आहुती समर्पण असो. १६ ज्याच्या प्रामुख्याने सर्व बोकड वावरत असतात त्या बोकडाला ही आहुती समर्पण असो. १७ ज्याच्या प्रामुख्याने सर्व मेंढे वावरत असतात त्या शिंगाळू व प्रौढ मेंढ्याला ही आहुती समर्पण असो. १८ ज्याच्या प्रमुखतेने सर्व प्रकारची अन्ने परिचित होतात त्या साळीच्या भाताला ही आहुती समर्पण असो. १९ ज्याच्या प्रामुख्याने सर्व धान्ये ओळखली जातात त्या सातूनामक धान्याला ही आहुती समर्पण असो. २० ज्याच्या प्रामुख्याने सर्व वृक्ष गणले जातात त्या वटवृक्षाला ही आहुती समर्पण असो. २१ ज्याच्या प्रामुख्याने चिकाळू असणारे वृक्ष परिचित होतात त्या औदुंबर वृक्षाला ही आहुती समर्पण असो. २२ ज्या छंदाच्या प्रामुख्याने सर्व छंद निर्माण झाले आहेत त्या गायत्री छंदाला ही आहुती समर्पण असो. २३ ज्या स्तोमाच्या प्रामुख्याने इतर सर्व स्तोम निष्पन्न होत असतात त्या त्रिवृत् स्तोमाला ही आहुती समर्पण असो. २४ ज्याच्या मुखाने वेदवाणी उच्चारली जाते त्या ब्राह्मण वर्णाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १४).

१ मंत्र व अनुष्ठान यांच्या कार्यकारणभावाचा निर्णय करणाऱ्या बुद्धीला व तिच्या ठिकाणी स्थिर होणाऱ्या मनाला ही आहुती अर्पण असो. २ बुद्धीच्या ठिकाणी स्थिर होणाऱ्या मनाला व त्या मनाच्या धारणेस समर्थ असणाऱ्या अंतःकरणाला ही आहुती अर्पण असो. ३ बुद्धीच्या ठिकाणी स्थैर्य पावलेल्या मनाला व त्या मनाचा प्रेरक असणाऱ्या प्रजापतीला ही आहुती समर्पण असो. ४ 'क' ही संज्ञा असलेल्या प्रजापतिदेवाला ही आहुती समर्पण असो. ५ ज्याच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान होणे अशक्य आहे अशा प्रजापतिदेवाला ही आहुती अर्पण असो. ६ शास्त्रविवरणानेच ज्याच्या स्वरूपाचा निर्णय करता येतो अशा प्रजापतिदेवाला ही आहुती समर्पण असो. ७ भूदेवीला ही आहुती समर्पण असो. ८ विस्तीर्ण अशा भूमातेला ही आहुती अर्पण

असो. ९ सुखप्रद अशा भूमातेला ही आहुती समर्पण असो. १० वाग्देवता सरस्वतीला ही आहुती समर्पण असो. ११ अत्यंत थोर अशा सरस्वती देवतेला ही आहुती समर्पण असो. १२ उच्चार करणाराला पवित्रकारक अशा सरस्वती देवतेला ही आहुती समर्पण असो. १३ सर्व प्रकाराने यजमानाचे पोषण करणाऱ्या पूषा देवाला ही आहुती समर्पण असो. १४ श्रौतस्मार्तरूप कर्माचा मार्ग आक्रमण करणाऱ्या यजमानाला हितप्रद अशा पूषादेवाला ही आहुती समर्पण असो. १५ मानवांचे धारण करणाऱ्या पूषा देवाला ही आहुती अर्पण असो. १६ 'त्वष्ट्र' देवाला ही आहुती समर्पण असो. १७ उपासकाला त्वरित पावणाऱ्या त्वष्ट्र देवाला ही आहुती समर्पण असो. १८ अनेक रूपे धारण करणाऱ्या त्वष्ट्रदेवाला ही आहुती समर्पण असो.१९ सर्वव्यापक अशा विष्णुदेवाला ही आहुती समर्पण असो.२० पाप व रोग यांच्या बाधेपासून मुक्त करून उपासकांचे संरक्षण करणाऱ्या विष्णूला ही आहुती समर्पण असो.२१ विद्या व ऐश्वर्य यांनी रहित अशा निकृष्ट स्थितीच्या लोकांचे रक्षण करणाऱ्या विष्णुदेवाला ही आहुती समर्पण असो.२१ सर्वांचे पालन करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो.(अनुवाक १५).

१ अश्वाच्या दातांना ही आहुती अर्पण असो. २ अश्वाच्या खालच्या व वरच्या हनुवटीला ही आहुती समर्पण असो. ३ अश्वाच्या दोन्ही ओठांना ही आहुती अर्पण असो. ४ अश्वाच्या मुखाला ही आहुती अर्पण असो. ५ अश्वांच्या दोन्ही नाकपुड्यांना ही आहुती अर्पण असो. ६ अश्वाच्या दोन्ही नेत्रांना ही आहुती समर्पण असो. ७ अश्वाच्या दोन्ही कानांना ही आहुती अर्पण असो. ८ अश्वाच्या दोनही नेत्रांच्या ऊर्ध्वभागाच्या पापण्यांच्या केसांना (जे अधोभागस्थित पक्ष्मकेसांच्या ऊर्ध्वभागी आहेत) ही आहुती समर्पण असो. ९ अश्वाच्या दोनही नेत्रांच्या अधोभागाच्या पापण्यांच्या केसांना (जे ऊर्ध्वभागस्थित पक्ष्मकेसांच्या अधोभागी आहेत) ही आहुती समर्पण असो. १० अश्वाच्या कपाळाच्या खाली असणाऱ्या शिरोभागास ही आहुती अर्पण असो. ११ अश्वाच्या दोनही भिवयांना ही आहुती अर्पण असो. १२ अश्वाच्या कपाळाला ही आहुती अर्पण असो. १३ अश्वाच्या कपाळावरील शिरोभागास ही आहुती अर्पण असो. १४ अश्वाच्या मेंदूला ही आहुती अर्पण असो. १५ अश्वाच्या केसांना ही आहुती अर्पण असो. १६ रथाचे जू ज्या भागावर ठेवले जाते, त्या अश्वशरीरभागास ही आहुती अर्पण असो. १७ अश्वाच्या

कंठाच्या ठिकाणी असणाऱ्या शिरांना ही आहुती समर्पण असो. १८ अश्वाच्या कंठाच्या वरच्या भागी असणाऱ्या अवयवांना ही आहुती अर्पण असो. १९ अश्वाच्या पाठीच्या मणक्यांना ही आहुती अर्पण असो. २० अश्वाच्या पाठीवरील दोन्ही बाजूंच्या अस्थींना ही आहुती समर्पण असो. २१ अश्वाच्या बलोत्पत्तीचे स्थानच असलेल्या हृदयाला ही आहुती समर्पण असो. २२ अश्वाच्या दोन्ही बरगड्यांना ही आहुती समर्पण असो. २३ अश्वाच्या दोन्ही खांद्यांना ही आहुती अर्पण असो. २४ अश्वाच्या पुढच्या दोन पायांच्या ऊर्ध्व भागांना ही आहुती समर्पण असो. २५ अश्वाच्या पुढच्या, दोन पायांच्या अधोभागांना ही आहुती समर्पण असो. २६ अश्वाच्या पुढच्या दोन पायांच्या मध्यभागांना ही आहुती अर्पण असो. २७ अश्वाच्या पुढच्या दोन पायांपैकी उजव्या पायाच्या ऊर्ध्व भागाला ही आहुती समर्पण असो. २८ अश्वाच्या पुढच्या दोन पायांपैकी डाव्या पायाच्या ऊर्ध्वभागाला ही आहुती अर्पण असो. २९ अश्वाच्या मागच्या दोन पायांपैकी उजव्या पायाच्या अधोभागाला ही आहुती समर्पण असो. ३० अश्वाच्या मागच्या दोन पायांपैकी डाव्या पायाच्या अधोभागाला ही आहुती समर्पण असो. ३१ अश्वाच्या ढुंगणाला ही आहुती समर्पण असो. ३२ अश्वाच्या मस्कावरील केशांना ही आहुती अर्पण असो. ३३ अश्वाच्या शेपटीच्या दांड्याला ही आहुती अर्पण असो. ३४ अश्वाच्या दोन्ही अंडाना ही आहुती अर्पण असो. ३५ अश्वाच्या शिस्नाला ही आहुती समर्पण असो. ३६ अश्वाच्या रेताला ही आहुती अर्पण असो. ३७ अश्वाच्या प्रजांना ही आहुती अर्पण असो. ३८ अश्वाच्या प्रजोत्पादनशक्तीला ही आहुती समर्पण असो. ३९ अश्वाच्या चारही पायांना ही आहुती समर्पण असो. ४० अश्वाच्या पायाच्या खुरांना ही आहुती समर्पण असो. ४१ अश्वाच्या अंगावरील केसांना ही आहुती समर्पण असो. ४२ अश्वाच्या शरीरावरील त्वचेला ही आहुती अर्पण असो. ४३ अश्वाच्या शरीरातील रक्ताला ही आहुती अर्पण असो. ४४ अश्वाच्या शरीरातील मांसाला ही आहुती समर्पण असो. ४५ अश्वाच्या शरीरातील स्नायूंना ही आहुती अर्पण असो. ४६ अश्वाच्या शरीरातील अस्थींना ही आहुती अर्पण असो. ४७ अश्वाच्या शरीरातील चरबीला ही आहुती समर्पण असो. ४८ अश्वाच्या ठिकाणी असणाऱ्या उपयुक्त अशा सर्व अंगांना ही आहुती अर्पण असो. ४९ अश्वाच्या जीवात्म्याला ही आहुती समर्पण असो. ५० अश्वाच्या सर्व शरीराला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १६).

१ अश्वाच्या शरीराच्या ठिकाणी असणाऱ्या मिश्र वर्णाला ही आहुती अर्पण असो. २ अश्वाच्या शरीराच्या ठिकाणी असणाऱ्या पांढऱ्या व तांबुस वर्णाला ही आहुती समर्पण असो. ३ पायांच्या ठिकाणी पांढरा रंग असलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. ४ ज्याच्या मानेवरील उंचवटा श्वेतवर्ण आहे, अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. ५ ज्याच्या कानांच्या भोकांच्या ठिकाणी पांढरा रंग आहे अशा अश्वाला ही आहुती अर्पण असो. ६ ज्याच्या पाठीचा रंग पांढरा आहे अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. ७ ज्याचे खांदे पांढऱ्या रंगाचे आहेत अशा अश्वाला ही आहुती अर्पण असो. ८ फुलांच्या आकाराचे ज्याचे कान आहेत अशा अश्वाला ही आहुती अर्पण असो. ९ ज्याच्या ओठांचा रंग पांढरा आहे अशा अश्वाला ही आहुती अर्पण असो. १० पांढऱ्या रंगाच्या भुवया असलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ११ ज्याच्या ढुंगणाचा रंग पांढरा आहे अशा अश्वाला ही आहुती अर्पण असो. १२ ज्याच्या डोळ्याजवळील भाग श्वेतवर्ण आहे अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. १३ ज्याचे सर्व शरीर पांढऱ्या रंगाचे आहे अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. १४ ज्याच्या कपाळावर पांढरा रंग आहे, अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. १५ ज्याच्या गुडघ्यांवर काळा रंग आहे अशा अश्वाला ही आहुती अर्पण असो. १६ ज्याच्या शरीरावर कोठे तरी तांबुस व काळ्या रंगाचे मिश्रण आहे अशा अश्वाला ही आहुती अर्पण असो. १७ ज्याच्या शरीरावर कोठे तरी जास्वंदीच्या फुलाप्रमाणे लालभडक रंग आहे अशा अश्वाला ही आहुती अर्पण असो. १८ ज्याच्या शरीरावर कोठे तरी अरुणासारख्या तांबूस रंगाची झाक आहे अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. १९ ज्याच्या शरीराचा आकार स्पष्ट दिसतो अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. २० ज्याच्या शरीराचा आकार कसा आहे याविषयी दृष्टीचा निश्चय होत नाही अशा अश्वाला ही आहुती अर्पण असो. २१ दुरून पाहिल्यास ज्याच्या शरीराचा आकार अमक्यासारखा असेल काय? असा भास होतो, अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. २२ जवळ उभे राहून पाहिल्यास ज्याच्या शरीराचा आकार अमक्यासारखा आहे, असे ठरविता येते, अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. २३ ज्याच्या शरीराच्या आकाराला कसलीच उपमा देता येत नाही अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. २४ ज्याचा शरीराचा आकार उपमा देण्यास

सुलभ असतो अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. २५ ज्याच्या शरीराचा आकार सर्वसामान्य आहे, अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. २६ सर्वलक्षणयुक्त अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १७).

१ अश्वशरीराच्या ठिकाणी असलेल्या कृष्ण वर्णाला ही आहुती समर्पण असो. २ अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या श्वेत वर्णाला ही आहुती समर्पण असो. ३ अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या गोरोचनासारख्या वर्णाला ही आहुती समर्पण असो. ४ अश्वशरीराच्या ठिकाणी चाषपक्ष्याच्या रंगासारख्या असलेल्या रंगाला ही आहुती समर्पण असो. ५ अश्वशरीराच्या ठिकाणच्या अरुणाप्रमाणे किंचित् तांबुस असलेल्या रंगाला ही आहुती समर्पण असो. ६ अश्वशरीराच्या ठिकाणी असलेल्या अत्यंत गौरवर्णाला ही आहुती समर्पण असो. ७ अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या पिंगट वर्णाला ही आहुती समर्पण असो. ८ अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या मुंगुसासारख्या धुरकट रंगाला ही आहुती समर्पण असो. ९ अश्वशरीराच्या ठिकाणी असलेल्या लाल भडक रंगाला ही आहुती समर्पण असो. १० अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या पिवळट तांबूस वर्णाला ही आहुती समर्पण असो. ११ अश्वशरीराच्या ठिकाणी पिवळ्या व काळ्या रंगाची झाक असलेल्या रंगाला ही आहुती समर्पण असो. १२ अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या नीलवर्णाला ही आहुती समर्पण असो. १३ अश्वशरीराच्या ठिकाणी असलेल्या काजळी रंगाला ही आहुती समर्पण असो. १४ अश्वशरीराच्या ठिकाणी असलेल्या सुस्वरूपाला ही आहुती समर्पण असो. १५ अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या मनोरम रूपाला ही आहुती समर्पण असो. १६ अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या विविधस्वरूपाला ही आहुती समर्पण असो. १७ अश्वशरीराच्या ठिकाणी इतर शरीराच्या रंगांशी सादृश्य असलेल्या रंगाला ही आहुती समर्पण असो. १८ अश्वशरीराच्या ठिकाणी इतर शरीरांच्या रंगांशी सादृश्य नसलेल्या रंगाला ही आहुती समर्पण असो. १९ अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या मिश्रवर्णाला ही आहुती समर्पण असो. २० अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या कमळासारख्या वर्णाला ही आहुती समर्पण असो. २१ अश्वशरीराच्या ठिकाणी असणाऱ्या चित्रविचित्र वर्णाला ही आहुती समर्पण असो. २२ अश्वशरीराच्या जांघाडांच्या ठिकाणी असलेल्या चित्रविचित्र वर्णाला ही आहुती समर्पण असो. २३ अश्वाच्या सर्वांगाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १८).

१ ओषधींना ही आहुती समर्पण असो. २ ओषधींच्या मुळांना ही

आहुती समर्पण असो. ३ ओषधींच्या शाखांच्या ठिकाणी असलेल्या अग्रभागाकडील कांडांना ही आहुती समर्पण असो. ४ ओषधींच्या ठिकाणी असणाऱ्या कांडाकांडांना ही आहुती समर्पण असो. ५ ओषधींच्या ठिकाणी असलेल्या दुबेळक्यांच्या संधींना ही आहुती समर्पण असो. ६ ओषधींच्या ठिकाणी बहरलेल्या पुष्पांना ही आहुती समर्पण असो.७ ओषधींना लागलेल्या फळांना ही आहुती समर्पण असो.८ लोकांनी उपयोगात आणलेल्या ओषधींना ही आहुती समर्पण असो.९ लोकांनी उपयोगात न आणलेल्या ओषधींना ही आहुती समर्पण असो.१० खोडापासून मोडून खाली पडलेल्या ओषधींना ही आहुती समर्पण असो.११ खोडासह उमळून भूमीवर पडलेल्या ओषधींना ही आहुती समर्पण असो.१२ सर्व प्रकारच्या ओषधींना ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १९).

१ सर्व प्रकारच्या वनस्पतींना ही आहुती समर्पण असो. २ वनस्पतींच्या मुळांना ही आहुती अर्पण असो. ३ वनस्पतींच्या अग्रभागाच्या कांडांना ही आहुती समर्पण असो. ४ वृक्षांच्या ठिकाणी असणाऱ्या दुबेळक्यांच्या संधिस्थानांना ही आहुती समर्पण असो. ५ वृक्षांच्या सर्व शाखांना ही आहुती समर्पण असो. ६ वृक्षांच्या ठिकाणी असणाऱ्या पानांना ही आहुती समर्पण असो. ७ वृक्षांना लटकलेल्या फुलांना ही आहुती समर्पण असो. ८ वृक्षांना लागलेल्या फळांना ही आहुती समर्पण असो. ९ एकाच कार्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या वृक्षांना ही आहुती समर्पण असो. १० कोणत्याही कामासाठी उपयुक्त न केलेल्या वृक्षांना ही आहुती समर्पण असो. ११ खोडापासून तुटून खाली पडलेल्या वृक्षांना ही आहुती समर्पण असो. १२ खोडासह भूमीवर आडव्या पडलेल्या वृक्षांना ही आहुती समर्पण असो. १३ कालांतराने उपयोग करण्यासाठी राखून ठेवलेल्या वृक्षांना ही आहुती समर्पण असो. १४ कालांतराने उपयोग करण्यासाठी राखून ठेवलेल्या वृक्षाखेरीजच्या वृक्षाला ही आहुती समर्पण असो. १५ निरनिराळ्या कामात उपयुक्त केलेल्या वृक्षाखेरीजच्या वृक्षाला ही आहुती समर्पण असो. १६ लोकोपयोगी कार्यासाठी उपयोगात आणलेल्या वृक्षाखेरीजच्या वृक्षाला ही आहुती समर्पण असो. १७ जरूरीपुरता उपयोग केल्यावर टाकून दिलेल्या वृक्षाला ही आहुती समर्पण असो. १८ पूर्वीप्रमाणे फुले व फळे येत नाहीशी झालेल्या वृक्षाला ही आहुती समर्पण असो. १९ फुलांनी बहरलेल्या व फळभाराने गजबजलेल्या वृक्षाला ही आहुती समर्पण असो. २० फुले आणि फळे येईनाशी झालेल्या वृक्षाला ही आहुती समर्पण असो. २१ पाने

सुद्धा ज्यावर उरलेली नाहीत अशा वृक्षाला ही आहुती समर्पण असो. २२ पाने, फुले व फळे यांच्या योगाने बाराही महिने समृद्ध असणाऱ्या वृक्षाला ही आहुती समर्पण असो. २३ सर्वजातीच्या वृक्षसमूहाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक २०).

प्रपाठक ४

देवांच्या ठिकाणी आपणाविषयी आत्मीयपणाची श्रध्दा उत्पन्न व्हावी व आपण त्यांच्या पुरोहितत्वाला प्राप्त व्हावे, अशी बृहस्पतीला इच्छा झाली. शास्त्रदृष्ट्या विचार केल्यानंतर आपली इच्छा पूर्ण होण्यास 'चतुर्विंशतिरात्र' नामक सत्र हे उपयुक्त होईल, असे त्यास आढळून आले. त्याने सर्व सामग्री जुळविली आणि 'चतुर्विंशतिरात्र' सत्राचे अनुष्ठान केले. त्या योगाने देव आत्मीयपणाच्या श्रद्धेने बृहस्पतीला मानू लागले व बृहस्पती देवांच्या पुरोहितत्वाला प्राप्त झाला. हे कथानक जाणणारे जे यजमान 'चतुर्विंशतिरात्र' सत्राचे अनुष्ठान करतात त्यांना इतर मनुष्यांच्या कडून आत्मीयतेच्या श्रध्देने वागविले जाते आणि ते मनुष्यांच्या पुढारीपणाला प्राप्त होतात.

या सत्रामध्ये ज्योती, गौ व आयु हे तीन अह म्हणजे दिवस अनुष्ठित होत असतात. 'ज्योती' हा भूलोकरूप, 'गौ' हा अंतरिक्षलोकरूप व 'आयु' हा द्युलोकरूप आहे. यास्तव, या तीन दिवसांच्या अनुष्ठानाने सत्रकर्ते यजमान भूलोकादि तीनही लोकांच्या ठिकाणी आरूढ होतात. आता सांगितलेले तीन दिवस ज्या क्रमाने अनुष्ठित केले जातात त्याच क्रमाने यजमान स्वर्गलोकावर आरूढ होतात.

या तीन दिवसांच्या अनुष्ठानाच्या चार आवृत्ती या सत्रात करावयाच्या असतात. ज्या सत्रात 'छंदोम' नांवाचे चार दिवस अनुष्ठित केले जात नाहीत ते खरोखर सत्रच नव्हे. छंदोमसंज्ञक चार दिवस अनुष्ठित केले गेले तरच ते सत्र होय. 'पृष्ठ' संज्ञक सहा दिवसांच्या अनुष्ठानाने यजमानांना त्या त्या दिवसांच्या देवतांची प्राप्ती होत असून छंदोमसंज्ञक दिवसांच्या अनुष्ठानाने त्यांना पशूंची प्राप्ती होत असते. 'पृष्ठ' संज्ञक दिवस ओज-वीर्यरूप असून छंदोमसंज्ञक दिवस हे पशुरूप आहेत. यास्तव, 'पृष्ठ' संज्ञक दिवसांच्या योगाने यजमान ओज व वीर्य यांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होत असून छंदोमनामक

दिवसांच्या योगाने ते पशूच्या ठिकाणी प्रतिष्ठित होत असतात. 'बृहत्' व 'रथंतर' या पृष्ठ स्तोत्रांच्या योगाने पृष्ठसंज्ञक दिवस अनुष्ठित केले जातात. रथंतर हे भूलोकरूप व बृहत् हे द्युलोकरूप किंवा स्वर्गलोकरूप आहे. यास्तव, बृहत् व रथंतर या दोन पृष्ठस्तोत्रांच्या योगाने अनुष्ठित केलेल्या पृष्ठसंज्ञक दिवसांच्या अनुष्ठानप्रभावाने यजमान भू व स्वर्ग या दोनही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. बृहत् व रथंतर ही दोन पृष्ठस्तोत्रे म्हणजे जणू काय 'चतुर्विंशतिरात्र' या सत्ररूप यज्ञाला सुरक्षितपणाने पूर्णतेस नेणारे दोन मार्गच होत. अर्थात् या दोन मार्गांनी चतुर्विंशतिरात्रनामक सत्ररूप यज्ञाचे अनुष्ठान करणारे यजमान स्वर्गलोकाला जाऊन पोचतात.

चतुर्विंशतिरात्र नांवाचा हा सत्ररूप क्रतू चोवीस रात्रींनी अर्थात् चोवीस दिवसांच्या अनुष्ठानाने पूर्ण होत असतो. अर्धमास म्हणजे पंधरवडा किंवा पंधरा दिवसांचा समूह होय. चोवीस अर्धमासांच्या किंवा पंधरवड्यांच्या योगाने संवत्सर पूर्ण होत असतो. संवत्सर हा स्वर्गलोकरूप आहे. अर्थात् अर्धमासांच्या ठिकाणी संख्यासाम्य असलेल्या चोवीस दिवसांच्या अनुष्ठानाच्या योगाने यजमान अर्धमासांच्या द्वारा संवत्सराच्या ठिकाणी प्राप्त होऊन तद्द्वारा स्वर्गलोकाच्या ठिकाणी जाऊन पोचतात. गायत्री छंद हा चोवीस अक्षरी असून तो ब्रह्मवर्चसरूप म्हणजे ब्रह्मवर्चसाची प्राप्ती करून देणारा आहे. अर्थात् गायत्री छंदाच्या अक्षरांच्याशी चतुर्विंशतिरात्र सत्रात अनुष्ठित केल्या जाणाऱ्या दिवसांचे स्वरूपसाम्य असल्यामुळे सत्रकर्ते यजमान गायत्रीच्या अनुग्रहाने ब्रह्मवर्चसाला प्राप्त होतात. या सत्राच्या प्रारंभी व शेवटी होणारे दोन 'अतिरात्र' देखील यजमानांना ब्रह्मवर्चस् संपादन करण्याला कारणभूत होतात. (अनुवाक १).

धनसंपत्ती हे सुखाने जीवनक्रम चालण्याचे साधन होय. अशा प्रकारच्या धनसंपत्तीच्या अभावास 'अवर्ति' हे नांव आहे. अर्थात् अवर्ती म्हणजे दारिद्य होय. जन्मांतरी केलेल्या पापामुळे दारिद्य प्राप्त होत असते. दारिद्य अत्यंत क्लेश देणारे असल्यामुळे ते जणू मरणच आहे. जन्मांतरीच्या पापामुळे आज जशी काही मनुष्ये जन्मदरिद्री असतात, तसे देवही पूर्वी एके काळी दरिद्री होते. जन्मांतरीच्या पापामुळे आपणास प्राप्त झालेला दारिद्यरूप मृत्यू दूर होऊन आपण दैवी संपत्तीला प्राप्त व्हावे, अशी देवांना इच्छा झाली. आपली इच्छा कोणत्या उपायाने सफल होईल याविषयी त्यांनी विचार केला. तेव्हा,

'चतुर्विंशतिरात्र' संज्ञक सत्र आपले दारिद्र दूर करण्यास योग्य असल्याचे त्यांना आढळून आले. त्याप्रमाणे त्यांनी सर्व साहित्य जुळविले आणि चतुर्विंशतिरात्र सत्राचे अनुष्ठान केले. त्या अनुष्ठानाच्या प्रभावाने ते जन्मांतरीच्या पापामुळे प्राप्त झालेल्या दारिद्ररूपी मृत्यूपासून मुक्त होऊन दैवी संपत्तीला प्राप्त झाले. चतुर्विंशतिरात्र सत्राचे हे माहात्म्य जाणून जे यजमान त्या सत्राचे अनुष्ठान करतात ते पापमूलक अशा दारिद्रापासून मुक्त होऊन धनसंपत्तीला प्राप्त होतात. धनसंपत्तीची समृध्दता हीच मनुष्याची दैवी संपत्ती होय.

या सत्रात 'ज्योति अतिरात्र' नांवाचा जो पहिला दिवस अनुष्ठित केला जातो, तो यजमानांना स्वर्गलोक प्रकाशित करण्यास कारणभूत होतो. दुसऱ्या दिवशी 'आरंभणीय' संज्ञक व 'त्रिवृत्' स्तोमाने युक्त असा उक्थ्यसंस्थ सोमयाग करावयाचा असतो. तिसऱ्या दिवसापासून आठव्या दिवसापर्यंतच्या सहा दिवसांत पृष्ठ्य षडह अनुष्ठित करावा लागतो. निरनिराळ्या सहा पृष्ठ स्तोत्रांच्या योगाने पृष्ठ्य षडहाचे अनुष्ठान करणे युक्त होय. सहा ऋतू मिळून संवत्सर पूर्ण होत असतो. त्या संवत्सराच्या ठिकाणी बारा महिने, चोवीस पंधरवडे व सहा ऋतू हे अवयवरूपाने अंतर्भूत होऊन अत्यंत धनसमृध्द अशा दैवी सभेला प्राप्त होत असतात. हे जाणून जे कोणी विद्वान् यजमान चतुर्विंशतिरात्र सत्राचे अनुष्ठान करतात ते पृष्ठ्यषडहयुक्त अशा त्या सत्राच्या अनुष्ठानप्रभावाने धनसमृद्ध अशा दैवी सभेला प्राप्त होतात.

पृष्ठ्य षडहापैकी शेवटचा आठवा व त्यानंतरचे नववा आणि दहावा हे दोन मिळून अनुष्ठित केले जाणारे तीन दिवस त्रयस्त्रिंशत् स्तोमाने युक्त व्हावयाचे असतात. त्यानंतरचे अकरावा, बारावा, तेरावा आणि चौदावा हे चार दिवस अनुक्रमे त्रिणव, एकविंश, एकविंश व त्रिणव या स्तोमांनी युक्त असे अनुष्ठित करावे लागतात. त्यापुढच्या पंधरा, सोळा व सतरा या तीन दिवसांत केले जाणारे सोमयाग हे त्रयस्त्रिंशत् स्तोमाने युक्त असे होतात. एवं च, मध्यवर्ती असणाऱ्या चार दिवसांच्या पूर्वीचे आणि नंतरचे तीन तीन दिवस त्रयस्त्रिंशत्स्तोमयुक्त असतात. अर्थात् चतुर्विंशतिरात्र सत्राच्या मध्य भागाच्या पूर्वी आणि नंतर अशा दोनही बाजूंनी होणाऱ्या त्रयस्त्रिंशत्स्तोमयुक्त सोमयागांच्या अनुष्ठानाच्या प्रभावाने सत्रकर्ते यजमान दारिद्रहेतुभूत अशा पातकाच्या परिहार करून मध्यवर्ती अशा अत्यंत धनसमृध्दिरूपी दैवी सभेला प्राप्त

होतात. मध्यवर्ती असलेले अकरा ते चौदा पर्यंतचे पृष्ठसंज्ञक चार दिवस हेच 'दैवी सभा' म्हणून गणले जातात.

ज्या देवतेच्या उद्देशाने स्तोत्र गावयाचे त्या देवतेचे निदर्शक असे स्पष्ट लिंग असलेल्या मंत्रांनी जे गान केले जाते त्यास 'निरुक्त' अशी संज्ञा असून देवतेचे निदर्शक असे स्पष्ट लिंग नसलेल्या मंत्रांनी जे गान केले जाते, त्यास 'अनिरुक्त' असे नांव आहे. मध्यवर्ती अशा पूर्वोक्त चार दिवसांपूर्वीचे तीन व नंतरचे तीन हे सर्वच दिवस एकाच प्रकारच्या त्रयस्त्रिंशत् स्तोमाच्या विनियोगाने जे यजमान अनुष्ठित करतात म्हणजे त्रयस्त्रिंशत् स्तोमाच्या आधारे निरुक्तसंज्ञक मंत्रांचेच जे गान करतात, त्यांनी आपल्या अनुष्ठानात आळस केल्यासारखे होते. यास्तव, मध्यवर्ती चार दिवसांच्या पूर्वीच्या व नंतरच्या तीन तीन दिवसांपैकी मधल्या एका दिवशी अनिरुक्त अशा मंत्रांनी त्रयस्त्रिंशत् स्तोमाच्या आधारे सामगान करावे. म्हणजे त्या यजमानांचे अनुष्ठान आलस्यरहित होते.

मध्यवर्ती असलेल्या चार दिवसांच्या ठिकाणी रथंतर, बृहत् अशा अनुक्रमाने पृष्ठ स्तोत्रे गावीत. त्याचप्रमाणे या चार दिवसांत 'पवमान' इत्यादि काही स्तोत्रांच्या गानांमध्ये छंदोमक्रतुगत अशा चतुर्विंशति इत्यादि उत्तरोत्तर चढत्या संख्येने युक्त अशा स्तोमांचा उपयोग करावा. असे केल्याच्या योगाने या मध्यंतरवर्ती अशा चार दिवसांना 'पृष्ठ्य' व 'छंदोम' अशी दोन स्वरूपे प्राप्त होतात. आणि सत्रकर्ते यजमान दोन स्वरूपांनी युक्त अशा चार दिवसांच्या अनुष्ठानप्रभावाने स्वर्गलोकाला प्राप्त होतात.

ज्या सत्रामध्ये छंदोम क्रतू केले जात नाहीत ते असत्र होत असून त्यामध्ये छंदोम क्रतू जर केले गेले तर त्यांच्या योगाने ते सत्यार्थाने सत्र ठरत असते. पृष्ठ स्तोत्रांच्या योगाने त्यांच्या अधिष्ठात्री देवतांचे संपादन केले जात असून छंदोमांच्या अनुष्ठानाने यजमानांना पशू प्राप्त होत असतात. ओज म्हणजे कार्यक्षम असे वीर्य किंवा सामर्थ्य. छंदोम क्रतू हे पशुप्राप्तिकारक असल्याने पशुरूपच आहेत. सारांश, छंदोम क्रतू अनुष्ठित केल्यास ते यजमानांना पशूंची प्राप्ती करून देऊन त्या पशूंच्या ठिकाणी ओज अर्थात् कार्यक्षम असे वीर्य किंवा सामर्थ्य निर्माण करतात.

मध्यवर्ती दिवसांच्या पूर्वीचे व नंतरचे त्रयस्त्रिंशत्स्तोमयुक्त असे तीन

तीन दिवस म्हणजे पुरुषशरीराचा उरोभाग असून मध्यवर्ती असलेले पृष्ठसंज्ञक चार दिवस हे जणू पुरुषाचा जीवात्मा होय. सारांश, उरोभाग व जीवात्मा अशा उभयविधरूप दिवसांच्या अनुष्ठानाच्या योगाने सत्रकर्ते यजमान जणू स्वत:साठी सुखाचे गाठोडेच बांधतात. म्हणजे स्वत:च्या ठिकाणी उत्कृष्ट असे सुख संपादन करतात.

पृष्ठ स्तोत्रांच्या ठिकाणी बृहत् व रथंतर या दोन स्तोत्रांचा उपयोग करावा. रथंतर हे इहलोकरूप असून बृहत् हे स्वर्गलोकरूप आहे. या दोन स्तोत्रांचा उपयोग करून जे यजमान अनुष्ठान करतात ते या दोनही स्तोत्रांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. बृहत् व रथंतर ही दोन स्तोत्रे म्हणजे जणू काय सत्ररूप यज्ञापासून फुटून म्हणजे निर्माण होऊन स्वर्गलोकाकडे जाणारे दोन राजमार्गच होत. अर्थात् या दोन स्तोत्रांचा अवलंब करून चतुर्विंशतिरात्र सत्राचे अनुष्ठान करणारे यजमान त्या स्तोत्रद्वयरूपी दोन राजमार्गांनी सरळपणे थेट स्वर्गलोकाला जाऊन पोचतात.

अनुलोम क्रमाने पूर्वोक्त तीन दिवसांचे अनुष्ठान करणारे यजमान अनुलोम क्रमाने म्हणजे चढत्या क्रमाने स्वर्गलोकाच्या ठिकाणी आरोहण करतात. आणि त्यानंतर तीन दिवसांचे प्रतिलोम क्रमाने अनुष्ठान करणारे यजमान प्रतिलोम क्रमाने म्हणजे उतरत्या क्रमानेच स्वर्गलोकापासून खाली भूलोकावर येऊन प्रतिष्ठित होतात. सारांश, आता सांगितलेल्या पध्दतीने चतुर्विंशतिरात्र सत्राचे अनुष्ठान करणारे यजमान भूलोक व स्वर्गलोक या दोनही लोकांच्या समृध्दीला संपादन करून उठतात. म्हणजे आपल्या सत्राची समाप्ती करतात.

अनुष्ठित केलेल्या पृष्ठ्य षडहामध्ये अनुक्रमे त्र्ययस्त्रिंश स्तोमापासून त्रिवृत् स्तोमापर्यंतच्या सहा स्तोमांतील एक एक स्तोम अनुक्रमाने उपयुक्त केला जात असतो. यामुळे बाविसाव्या दिवशी त्रिवृत्स्तोमच उपयोगात आणला जातो, हे उघड आहे. यानंतरच्या पुढच्या तेवीसाव्या म्हणजे सत्राच्या उपांत्य दिवशी देखील यजमानांनी त्रिवृत् स्तोमाचाच उपयोग करून अनुष्ठान करावे. असे केल्याच्या योगाने त्रिवृत् स्तोमाचे सांतत्य निष्पन्न होते. आणि त्या सातत्यापासून स्तोमांची संपत्ती उत्पन्न होते. ही संपत्ती सत्रकर्त्या प्रत्येक यजमानाच्या ठिकाणी पुत्रपौत्रादि प्रजा उत्पन्न करण्यास कारणभूत होते. त्रिवृत्स्तोमयुक्त असा जो तेविसावा दिवस अनुष्ठित करावयाचा तो 'ज्योति:

अग्निष्टोम' नांवाचा सोमयाग करून करावा. हा मनुष्यलोक अग्निष्टोमरूपच असून तो अखिल प्राणिमात्रांना निवास करण्यास योग्य असे जणू गृहच आहे. सारांश, सप्तसंस्थारूप अग्निष्टोमांपैकी यजमानांनी उपांत्य दिवशी प्रथमसंस्थारूप 'ज्योतिः अग्निष्टोम' करावा. म्हणजे त्याच्या अनुष्ठानप्रभावाने भूलोकी राहणारे जे असतील ते स्वतःच्या गृहापासून दूर जाणार नाहीत.

चतुर्विंशतिरात्र सत्रामध्ये चोवीस दिवसांचा अंतर्भाव झालेला असतो. संवत्सरामध्येही चोवीसच अर्धमास अंतर्भूत झालेले असतात. तात्पर्य, चतुर्विंशतिरात्र सत्र हे संवत्सररूप आहे. संवत्सर हा स्वर्गलोकरूप आहे. एवं च, चतुर्विंशतिरात्र सत्राचे अनुष्ठान जे यजमान करतात, ते स्वर्गलोकरूपी संवत्सराच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. शिवाय गायत्री ही चोवीसअक्षरी असते. गायत्री म्हणजे मूर्तिमंत ब्रह्मवर्चस् होय. तात्पर्य, संख्यासाम्यतेमुळे गायत्री छंदाशी समानरूप असणाऱ्या चतुर्विंशतिरात्र सत्राचे अनुष्ठान करणारे यजमान गायत्री छंदाच्या द्वारा ब्रह्मवर्चसाचे संपादन करतात.

शेवटच्या चोवीसाव्या दिवशी अतिरात्रसंस्थ सोमयाग करावा. अशा प्रकारे चतुर्विंशतिरात्र सत्राच्या प्रारंभी व शेवटी होणारे दोन अतिरात्र यजमानांना ब्रह्मवर्चसाचे संपादन करून देण्याला कारणभूत होतात. (अनुवाक २).

ही पृथ्वी प्रारंभी अतिशय कठिण होती. तिच्या ठिकाणी यत्किंचितही भुसभुशीतपणा नव्हता. त्या कारणाने तिच्यावर झाडझुडपच काय पण गवत देखील उत्पन्न झालेले नव्हते. पुढे तिला अशी इच्छा झाली की, आपण नाना प्रकारच्या धान्याच्या पिकांनी, लहानमोठ्या वृक्षांनी व लतावेलींनी संपन्न व्हावे. तेव्हा तिला आपली इच्छा तृप्त होण्यास पुढे सांगण्यात येणाऱ्या तीस रात्री साधनभूत होतील, असे आढळून आले. व त्याप्रमाणे तिने तीस रात्रींचे, अर्थात् तीस दिवसात पूर्ण होणाऱ्या 'त्रयस्त्रिंशद्रात्र' सत्राचे अनुष्ठान केले. त्या अनुष्ठानप्रभावाने ही पृथ्वी आज दिसत असल्याप्रमाणे आपल्या ठिकाणी नानाविध धान्याची पिके, लहान मोठे वृक्ष आणि लतावेली इत्यादिकांचे उत्पादन करण्यास समर्थ झाली. तात्पर्य, जे कोणी प्रजा व पशू यांच्या प्राप्तीची इच्छा करीत असतील त्यांनी ह्या तीस रात्रींचे म्हणजे त्रयस्त्रिंशद्रात्र सत्राचे अनुष्ठान करावे. म्हणजे ते प्रजा व पशू यांचे उत्पादन करण्यास समर्थ होतात.

ही पृथ्वी अन्नाच्या अभावी एकदा अत्यंत क्षुधित झाली. तेव्हा तिला तेहतीस रात्रींच्या संघरूपाने असलेला 'विराट्' छंद आपली क्षुधा निवारण होण्यास साधनभूत होईल असे आढळून आले. तीसअक्षरी विराट्छंदाशी संख्यासाम्य असल्यामुळे तीस रात्रींचा संघ हा विराट्छंदरूपच होय. सारांश, त्या विराट् छंदाचे स्वरूप पक्केपणी आपल्या अंत:करणात ठेवून तिने तेहतीस रात्रींच्या संघाने पूर्ण होणाऱ्या त्रयस्त्रिंशद्रात्र सत्राचे अनुष्ठान केले आणि त्याच्या प्रभावाने ही भूमी आपल्या क्षुधेचे पूर्णतया निवारण करणारे उदक, तृण व साळीचे भात इत्यादि अनेक रूपांनी युक्त असे अन्न संपादन करण्यास समर्थ झाली. तिच्या ठिकाणी नाना प्रकारची धान्ये पिकू लागली व त्यामुळेच ती अत्यंत उच्च अशा महिन्याला प्राप्त झाली.

हा वृत्तांत ध्यानी घेऊन जे यजमान विराट्छंदाचे स्वरूप आपल्या अंत:करणात ठेवून तत्स्वरूप असणाऱ्या या तीस रात्रींचे म्हणजे 'त्रयस्त्रिंशद्रात्र' सत्राचे अनुष्ठान करतील, ते सेवनीय असे अन्न संपादन करतील. प्रजा व पशू यांच्या योगाने वृध्दिंगत होतील. इतकेच नव्हे तर सर्व कार्यात विजयी होऊन अत्युच्च अशा महत्त्वाला प्राप्त होतील.

या सत्रात प्रथमत: 'ज्योति:अतिरात्र' अनुष्ठित करावा. म्हणजे तो स्वर्गलोकाचे प्रकाशन करण्याला कारणभूत होतो. त्यानंतर 'पृष्ठ्य' नावाचा 'षडह' करावा. कारण ऋतू सहा असून षडहामध्ये प्रामुख्याने गाइली जाणारी 'पृष्ठ' संज्ञक स्तोत्रेही सहाच असतात. वास्तव, त्या सहा पृष्ठस्तोत्रांच्या योगाने ते सत्रकर्ते यजमान सहा ऋतूंच्या ठिकाणी आरोहण करतात. आणि त्या ऋतूंच्या द्वारा ते संवत्सराला प्राप्त होऊन त्याच्या ठिकाणी प्रतिष्ठेला प्राप्त होतात.

आता सांगितलेल्या षडहातील शेवटचा दिवस त्रयस्त्रिंश स्तोमाचा उपयोग करून अनुष्ठित करण्यात येत असतो. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा त्रयस्त्रिंश स्तोमाने युक्त अशाच सोमयागाचे अनुष्ठान करावे. म्हणजे 'त्रयस्त्रिंशद्रात्र'रूपी यज्ञाच्या ठिकाणी सांतत्य उत्पन्न होते. शिवाय प्रजापती हा त्रयस्त्रिंशत्स्तोमरूप असल्यामुळे, प्रजापतीप्रीत्यर्थच जणू सत्राचा आरंभ केल्यासारखे होते. आणि तो आरंभ यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतो. त्यानंतर 'त्रिणव' स्तोमयुक्त अशा सोमयागाचे अनुष्ठान करावे. ते जयप्राप्तीला कारणभूत होते. त्याच्या दुसऱ्या दिवशी 'एकविंश' स्तोमयुक्त असा सोमयाग करावा. म्हणजे तो यजमानांच्या

प्रतिष्ठेला कारणभूत होतो. त्यानंतर 'त्रिवण' स्तोमयुक्त अशा सोमयागाचे अनुष्ठान करावे. ते जयप्राप्तीला कारणभूत होते. त्याच्या दुसऱ्या दिवशी 'एकविंश' स्तोमयुक्त असा सोमयाग करावा. म्हणजे तो यजमानांच्या प्रतिष्ठेला कारणभूत होऊन त्यांच्या शरीराच्या ठिकाणी उज्वल अशी कांती निर्माण करतो, त्यापुढे 'त्रिवृत्' स्तोमयुक्त असा 'अग्निष्टुत्' नांवाचा एक सोमयाग करावा. त्याच्या प्रभावाने यजमान आपल्या ठिकाणचे पाप जाळून टाकतात. शिवाय, त्रिवृत् स्तोम हा तेजोरूप असल्याने त्या स्तोमाच्या सामर्थ्याने सत्रकर्ते यजमान आपल्या शरीराच्या ठिकाणी तेज धारण करतात. त्यानंतरच्या दुसऱ्या म्हणजे बाराव्या दिवशी, ज्यामध्ये इंद्राचीच स्तुती केली जाते अशा 'पंचदश' स्तोमाने युक्त असा सोमयाग करावा. त्या योगाने यजमानांना कार्यक्षम अशा इंद्रियांची प्राप्ती होते. तेराव्या दिवशी 'सप्तदश' स्तोमाचा विनियोग करावा. हा स्तोम अन्न व प्रजा प्राप्त करून देणारा असल्यामुळे त्याच्या विनियोगाने केलेले सोमयागाचे अनुष्ठान यजमानांना सेवनीय अशा अन्नाची प्राप्ती करून देते व त्यांना पुत्रपौत्रादि प्रजाही प्राप्त होतात. चौदाव्या दिवशी 'एकविंश स्तोमाच्या विनियोगाने सोमयाग करावा. म्हणजे तो यजमानांना प्रतिष्ठा प्राप्त करून देतो. आणि शिवाय त्यांच्या शरीराच्या ठिकाणी उज्वल असे तेज निर्माण करतो. पंधराव्या दिवशी 'चतुर्विंश' स्तोमयुक्त अशा सोमयागाचे अनुष्ठान करावे. चोवीस अर्धमास मिळून एक संवत्सर होत असतो. संवत्सर हा स्वर्गलोकरूप आहे. अर्थात् चतुर्विंशस्तोमयुक्त असा सोमयाग करणारे यजमान संवत्सररूप स्वर्गलोकाच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. शिवाय पंधरावा दिवस हा 'विषूवान्' म्हणजे नाना प्रकारची फलोत्पत्ती करणारा आहे. हे जाणणारे जे विद्वान् यजमान या विषूवान् दिवसाचे अनुष्ठान करतात ते नाना प्रकारच्या फळांनी सपन्न होतात.

'चतुर्विंश' स्तोमयुक्त अशा विषुवान् नामक पंधराव्या दिवसाच्या अनुष्ठानानंतर सोळापासून एकविसाव्या दिवसापर्यंतच्या सहा दिवसांत पृष्ठ्य षडहाचे अनुष्ठान करावे. त्या योगाने सत्रकर्ते यजमान प्रथमतः संवत्सराच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात व नंतर त्या षडहाच्या अधिष्ठात्री देवतांना प्राप्त होतात. म्हणजे त्या देवतांची प्रीती संपादन करतात. पृष्ठ्य षडहाचा शेवटचा म्हणजे एकविसावा दिवस त्रयस्त्रिंशत्स्तोमयुक्त अशा सोमयागाने अनुष्ठित केला जात असतो. त्यानंतर पुन्हा दुसऱ्या बाविसाव्या दिवशी जे यजमान त्रयस्त्रिंशत्स्तोमयुक्त अशा सोमयागाचे अनुष्ठान करतात ते, आठ वसू, अकरा रुद्र, बारा आदित्य

इत्यादि तेहतीस देवतांच्या सान्निध्यात प्रतिष्ठित होतात. तीन संख्येच्या तीन आवृत्तींनी म्हणजे नऊ या संख्येने पूर्ण होणाऱ्या स्तोमास 'त्रिणव' असे नांव आहे. तेवीसाव्या दिवशी च्या अनुष्ठानात 'त्रिणव' स्तोमाचा उपयोग करावा. पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक त्रिणवरूप आहेत. यास्तव, या स्तोमाच्या विनियोगाने जे त्या दिवशीच्या सोमयागाचे अनुष्ठान करतात ते यजमान तीन्ही लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

आता सांगितलेला तेविसावा व त्यापुढचा चोवीसावा हे दोनही दिवस 'त्रिणव' स्तोमाचाच विनियोग करून अनुष्ठित करावेत. म्हणजे ते यजमानांना प्रतिष्ठा प्राप्त करून देऊन शिवाय त्यांच्या शरीराच्या ठिकाणी उज्वल अशी कांती निर्माण करतात.

पंचवीसपासून एकुणतिसाव्या दिवसापर्यंतच्या पांच दिवसांत पांच 'एकाह' पुष्कळशी स्तोत्रे गाऊन अनुष्ठित करावेत. म्हणजे प्रत्येक दिवसाच्या अनुष्ठानात सोळा सोळा स्तोत्रांचे गान करावे. अनुक्रमाने अनुष्ठित केले जाणारे आणि पुष्कळ स्तोत्रांनी युक्त असे हे पांच एकाह प्रजोत्पत्तीला कारणभूत होणारे असल्यामुळेच बहुजनसमाजामध्ये पौरुषयुक्त असे पुष्कळ लोक आपणास आढळतात.

आतापर्यंत सांगितलेल्या एकुणतीस दिवसांत व त्यापुढच्या शेवटच्या तिसाव्या दिवशी जी स्तोत्रे गाइली जातात, त्यांना आधारभूत असलेले 'स्तोम' हे कमी अधिक प्रमाणात परस्परांच्याशी संकीर्ण झालेले असतात. म्हणूनच ही भूमी नाना प्रकारच्या ओषधींनी व वनस्पतींनी सर्वत्र संकीर्ण झालेली दिसते.

अशा प्रकारचे स्तोमांचे संकीर्णत्व जाणणारे जे यजमान 'त्रिंशद्रात्र' सत्राचे अनुष्ठान करून परस्परसंकीर्ण स्तोमांचा उपयोग करतात, ते प्रजा व पशू या दोहोंनी संकीर्ण होऊन राहतात. म्हणजे त्या यजमानांपैकी काहींना नुसती प्रजा व काहींना नुसते पशू अशा परस्परभिन्न फलाचा लाभ न होता सर्वच यजमानांना प्रजा व पशू या दोहोंच्याही संमिश्र फलाचा लाभ होतो.

सोळा सोळा स्तोत्रांचे गान करून ते पांच दिवस अनुष्ठित करावयास मागे सांगितले त्यांच्या पूर्वीच्या दिवसांत जे यजमान लहान मोठ्या व परस्परभिन्न अशा स्तोमांचा उपयोग करून स्तोत्रगान करतात ते, स्वर्गलोकात मिळणाऱ्या

अनेक उपभोगांपैकी, अमक्याने अमका उपभोग घ्यावा, अमक्याने अमुक भोग भोगावा, असा कोणताच संकल्प न करता, स्वर्गलोकाला जातात. आणि पूर्वीच्या चोवीस दिवसांनंतर सोळा सोळा स्तोत्रे गाऊन अनुष्ठित केल्या जाणाऱ्या पांच दिवसांच्या अनुष्ठानात दररोज एकाच ठराविक स्तोमाचा जे उपयोग करतात ते स्वर्गलोकीच्या भोगांचा सर्वांना समान उपभोग मिळावा अशा संकल्पाने युक्त होऊनच स्वर्गलोकाला जातात. सारांश, काही दिवस निरनिराळ्या स्तोमांचा व काही दिवस ठराविक एका स्तोमाचा आश्रय करून जे 'त्रिंशद्रात्र' सत्र करतात, त्या यजमानांच्यासाठी हा भूलोक व स्वर्गलोक या दोनही लोकांच्या ठिकाणी जे जे म्हणून उपभोग्य असते, ते ते सर्व निष्पन्न होत असते.

या त्रिंशद्रात्र सत्रात अंतर्भूत होणाऱ्या तीस रात्री तीसअक्षरी विराट्छंदस्वरूप असून विराट्छंद हा अन्नरूप आहे. यास्तव, विराट्छंदस्वरूप अशा त्रिंशद्रात्र सत्राचे अनुष्ठान करणाऱ्या यजमानांना सेवनीय अशा अन्नाची प्राप्ती होते.

या सत्राच्या प्रारंभी होणारा 'प्रायणीय' अतिरात्र व शेवटच्या दिवशी होणारा 'उदयनीय' अतिरात्र हे दोनीही सत्रकर्त्या यजमानांना सेवनीय अशा अन्नाचे संपादन करून देण्याला कारणभूत होतात. (अनुवाक ३).

प्रजापती जेव्हा स्वर्गलोकाला गेला तेव्हा त्याच्या मागोमाग आपणही स्वर्गलोकाला जावे, अशी देवांना इच्छा झाली. तेव्हा ज्या ज्या छंदांनी युक्त असे यज्ञ देवांनी केले, त्यांपैकी कोणत्याही छंदाने युक्त अशा एकाही यज्ञाने ते स्वर्गलोकाला जाऊ शकले नाहीत. तेव्हा स्वर्गलोकी जाण्याला काय साधन करावे याविषयी विचार करता करता बत्तीस रात्री आपणाला स्वर्गलोकी जाण्याला उपयोगी पडतील असे त्यांना आढळले. तदनुसार सर्व साहित्याची जमवाजमव करून 'द्वात्रिंशद्रात्र' म्हणजे बत्तीस रात्रींमध्ये पूर्ण होणाऱ्या सत्राचे त्यांनी अनुष्ठान केले. अनुष्टुप् छंदामध्ये असलेल्या अक्षरांची संख्या बत्तीसच असते. अनुष्टुप् छंद हा सर्व छंदांचा राजा आहे. इतकेच नव्हे तर अनुष्टुप् छंदाच्या प्रभावानेच प्रजापतीला सर्वसृष्टत्व प्राप्त झाले आहे. सारांश, प्रजापती हा आनुष्टुभ म्हणजे अनुष्टुप्छंदसंबध्द आहे. म्हणजे अनुष्टुप् छंद हा प्रजापतीचा स्वकीय असा छंद आहे. यास्तव, प्रजापतीचा स्वकीय असलेल्या अनुष्टुप् छंदाच्या अक्षरांशी संख्यासाम्य असलेल्या 'द्वात्रिंशद्रात्र'

सत्राच्या अनुष्ठानाने देवांनी प्रजापतीला आपलासा केला व त्याच्या कृपेने ते स्वर्गलोकावर आरूढ होऊन त्या ठिकाणच्या भोगांना प्राप्त झाले.

हा वृत्तांत जाणून जे यजमान या बत्तीस रात्रींचे म्हणजे बत्तीस रात्रींनी पूर्ण होणाऱ्या 'द्वात्रिंशद्रात्र' सत्राचे अनुष्ठान करतील ते बत्तीसअक्षरी अनुष्टुप् छंदाला व अनुष्टुप्छंदसंबद्ध अशा प्रजापतीला प्राप्त होतील. म्हणजे प्रजापतीला स्वकीय वाटणाऱ्या छंदाच्या द्वारा ते प्रजापतीला आपलासा करतील आणि त्या प्रजापतीच्या अनुग्रहाने ते परमोच्च अशा संपत्तीला प्राप्त होतील. संपत्ती हाच मनुष्याचा स्वर्गलोक आहे.

द्वात्रिंशद्रात्रसंज्ञक या सत्रात बत्तीस रात्री अन्तर्भूत झालेल्या असतात. बत्तीसअक्षरी अनुष्टुप् छंद हा वाग्रूप आहे. अर्थात् अनुष्टुप् छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या द्वात्रिंशद्रात्र सत्राचे अनुष्ठान करणारे यजमान वेदशास्त्ररूप संपूर्ण वाणीचे संपादन करतात. सर्वच यजमान आपल्या विद्वत्तापूर्ण वाणीने सभारंजन करण्यास समर्थ होतात आणि सर्वच यजमान पूज्यत्वरूपी संपत्तीला प्राप्त होतात.

या सत्रामध्ये ज्योती, गौ व आयु हे तीन एकाह केले जातात. ज्योती हा भूलोकरूप , गौ हा अंतरिक्षलोकरूप आणि आयु हा द्युलोकरूप म्हणजे स्वर्गलोकरूप आहे. 'ज्योती' इत्यादि तीन एकाहांचे अनुलोम क्रमाने नऊ वेळ म्हणजे सत्तावीस दिवस अनुष्ठान करावे. अनुलोम क्रमाने ज्योती इत्यादि तीन एकाहांचे अनुष्ठान करणारे यजमान अनुक्रमाने तीन्ही लोकांच्या ठिकाणी आरूढ होतात. अनुलोम क्रमानेच पूर्वोक्त तीन एकाहांचे सत्तावीस दिवस जे अनुष्ठान करतात ते यजमान यथानुक्रमेच स्वर्गलोकावर आरोहण करतात.

या सत्तावीस दिवसांच्या अनुष्ठानात बृहत् व रथंतर या दोन पृष्ठ स्तोत्रांचा विनियोग करावा. रथंतर 'पृष्ठ' हे इहलोकरूप व बृहत् पृष्ठ हे स्वर्गलोकरूप आहे. या दोन पृष्ठ स्तोत्रांचा विनियोग करून जे यजमान पूर्वोक्त त्र्यहांचे अनुष्ठान करतात ते त्या दोन्ही पृष्ठांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. बृहत् व रथंतर ही दोन पृष्ठे म्हणजे जणू काय द्वात्रिंशद्रात्रसंज्ञक सत्ररूप यज्ञापासून फुटणारे स्वर्गलोकी जाण्याचे दोन राजमार्गच होत. अर्थात् या दोन पृष्ठ स्तोत्रांचा अवलंब करून द्वात्रिंशद्रात्र सत्राचे अनुष्ठान करणारे

यजमान त्या पृष्ठस्तोत्ररूपी दोन राजमार्गांनी निष्प्रतिबंधपणे थेट स्वर्गलोकाला जाऊन पोचतात. अनुलोम क्रमाने पूर्वोक्त त्र्यहाचे अनुष्ठान करणारे यजमान अनुलोम क्रमानेच म्हणजे चढत्या क्रमाने स्वर्गलोकाच्या ठिकाणी आरोहण करतात आणि त्यानंतर पूर्वोक्त त्र्यहाचे म्हणजे तीन एकाहांचे प्रतिलोम क्रमाने एकवार जे अनुष्ठान करतात ते यजमान प्रतिलोम क्रमाने म्हणजे स्वर्गलोकापासून उतरत्या क्रमाने पुन्हा भूलोकावर येऊन प्रतिष्ठित होतात सारांश, आता सांगितलेल्या पद्धतीने द्वात्रिंशद्रात्राच्या अनुष्ठानाच्या प्रभावाने सत्रकर्ते यजमान भूलोक व स्वर्गलोक या दोनही लोकांच्या समृध्दीला संपादन करून उठतात. म्हणजे आपल्या सत्राची समाप्ती करतात.

या द्वात्रिंशद्रात्र सत्रात अंतर्भूत होणाऱ्या बत्तीस रात्रींपैकी ज्या तीस रात्री आहेत, त्या तीस अक्षरांनी पूर्ण होणाऱ्या विराट्छंदाशी समानरूप आहेत. विराट्छंद हा अन्न प्राप्त करून देणारा असल्यामुळे मूर्तिमंत अन्नच आहे. अर्थात् विराट् छंदाशी समानरूप असणाऱ्या तीस रात्री अनुष्ठित करणार यजमान भक्षण करण्यास योग्य अशा भरपूर अन्नाचे संपादन करतात. यानंतरची जी दोन अहोरात्रे अनुष्ठित केली जातात त्यांच्या दिवस आणि रात्र या दोन स्वरूपांच्या द्वारा सत्रकर्ते यजमान स्वर्गलोकाला जातात.

पहिल्या दिवशी होणारा प्रायणीय अतिरात्र व शेवटच्या दिवशी होणारा उदयनीय अतिरात्र हे दोनही अतिरात्र सत्रकर्त्या यजमानांना द्वात्रिंशद्रात्र सत्राचा संपूर्णत्वाने परिग्रह करून देण्यास कारणभूत होतात. (अनुवाक ४).

'द्वादशाह' व 'त्रयस्त्रिंशदह' या नांवाच्या दोन सत्ररूप क्रतूंच्या ठिकाणी देवांची अत्यंत प्रीती असल्यामुळे त्या दोन्ही सत्रांना 'देवसत्र' अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. हे जाणून जे कोणी यजमान त्रयस्त्रिंशदह म्हणजे तेहतीस दिवसांनी पूर्ण होणारे सत्र करतात ते देवतांच्या सान्निध्यास प्राप्त होतात. इतकेच नव्हे तर पापापासूनही निवृत्त होतात.

राजाच्या मंत्रिपदाचा अधिकारी असलेला एखादा श्रेष्ठ पुरुष स्वतःच्या पराक्रमाने राजपदावर आरूढ होतो व त्यानंतरही आपल्या राज्याची वाढ होण्यासाठी अवश्य त्या साम, दंड, भेट इत्यादि प्रयत्नांनी इतर राज्यातील प्रांत मिळवून पूर्वीपेक्षाही अधिक प्रसिद्धीला प्राप्त होतो. मात्र, सामदानादि प्रयत्नांचे तंत्र अवलंबण्यात जर काही चूक झाली तर अधिक श्रेष्ठतेला

प्राप्त होण्याऐवजी पूर्वी संपादन केलेल्या श्रेष्ठतेवरूनही खाली येण्याचा प्रसंग त्याला भोगावा लागतो. सुदैवाने तशी काही चूक त्याच्या हातून न घडली तर तो पूर्वसंपादित श्रेष्ठतेहून अधिक श्रेष्ठतेचाही उपभोक्ता होतो. निदान पूर्वसंपादित श्रेष्ठता निश्चित टिकवितो. स्वप्रयत्नाने श्रेष्ठतेला प्राप्त होण्याचे हे मर्म ध्यानात आणून जे यजमान 'त्रयस्त्रिंशदह' सत्राचे अनुष्ठान करतात, ते देवत्वप्राप्तीला प्रतिबंधक अशा पापरूपी शत्रूपासून मुक्त होऊन पूर्वसंपदित मानवी श्रेष्ठतेहून अधिक श्रेष्ठ अशा दैवी श्रेष्ठतेला प्राप्त होतात.

पूर्वी 'अहर्भाज' म्हणजे दिवसांचा एक एक भाग संपादन करू इच्छिणाऱ्या देवांनी तेहतीस दिवसांपैकी एकेका दिवसाचा भाग संपादन केला. एका देवाने एका दिवसाचा एक भाग घेतला, तर दुसऱ्या देवाने दुसऱ्या एका दिवसाचा भाग घेतला. अशा रीतीने तेहतीस दिवसांपैकी एकेक दिवस एकेका देवाने वाटून घेतला. नंतर सर्व देवांनी मिळून त्या दिवसांमध्ये सत्ररूप यज्ञानुष्ठान केले. तेव्हा त्या तेहतीस दिवसांच्या सत्रानुष्ठानाने ते सर्वच देव समसमान अशा समृध्दीला प्राप्त झाले. समृद्धिरहित असा कोणीही देव राहिला नाही. त्रयस्त्रिंशदह सत्राचे हे माहात्म्य जाणून जे यजमान त्या सत्राचे अनुष्ठान करतात, ते सर्व यजमान समसमान अशा समृध्दीला प्राप्त होतात. म्हणजे ते सर्व यजमान ग्रामाधिपती होतात.

ज्योती, गौ व आयु हे तीन आणि आयु व ज्योती हे दोन एकाह मिळून एक 'पंचाह' म्हणजे पांच एकाहांचा समूह पूर्ण होत असतो. त्रयस्त्रिंशदह या सत्रात चार 'पंचाह' अनुष्ठित करावेत. हेमंत व शिशिर हे दोन मिळून एकच ऋतू मानला म्हणजे ऋतू पांचच भरतात. पांच ऋतूंच्या योगाने संवत्सर पूर्ण होतो. सारांश, ऋतूंच्याशी संख्यासाम्य असलेल्या पंचाहांचे अनुष्ठान करणारे यजमान पांच ऋतूंच्या ठिकाणी व त्यांच्या द्वारा संवत्सराच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

प्रायणीय व उदयनीय आणि या दोहोंच्या मध्यवर्ती एक असे तीन 'अतिरात्र' क्रतू या सत्रात होत असतात. हे तीन्ही अतिरात्र 'आश्विन' करावेत. म्हणजे या तीनही अतिरात्रांत होत्याने 'आश्विन' शस्त्राचे शंसन करावे. पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक आहेत. यास्तव, तीन अतिरात्रांत शंसन केलेल्या तीन 'आश्विन' शस्त्रांच्या प्रभावाने सत्रकर्ते यजमान तीन्ही

लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. इतकेच नव्हे तर यज्ञाची सवनत्रयरूपी जी तीन इंद्रिये आहेत त्या इंद्रियांनाही प्राप्त होतात. म्हणजे सवनत्रयात्मक अशा यज्ञाचे साकल्याने संपादन करतात. ह्या सत्रात 'विश्वजित्' म्हणजे विश्वामध्ये सर्व कार्यांत विजय प्राप्त करून देणारा एक क्रतू करावा. म्हणजे तो सेवनीय अशा अन्नाचे भरपूर संपादन करण्याला कारणभूत होतो. हा विश्वजित् क्रतू सर्वपृष्ठ करावा. म्हणजे त्या क्रतूत रथंतर, बृहत् इत्यादि सहाही पृष्ठस्तोत्रांचे गान करावे. म्हणजे तो क्रतू यजमानांच्या सर्व प्रकारच्या फलप्राप्तीला कारणभूत होतो.

पुष्कळ स्तोत्रे व पुष्कळ शस्त्रे यांच्या योगाने अनुष्ठित केला जाणारा 'द्वादशाह' हा वाग्‌रूप आहे. असा हा वाग्‌रूप द्वादशाह जर पूर्वोक्त दिवसांच्या अगोदर अनुष्ठित केला तर सत्रकर्त्या यजमानांची वाणी अपूर्णतेला प्राप्त होईल. म्हणजे क्षीण दशेला प्राप्त होईल. यास्तव, पूर्वोक्त दिवसांच्या अनुष्ठानानंतर द्वादशाहाचे अनुष्ठान करावे. म्हणजे सत्रकर्ते यजमान संपूर्ण अशा वाणीला प्राप्त होतात. सत्राच्या ऊर्ध्व भागात वाग्‌रूप अशा द्वादशाहाचे अनुष्ठान केले जाते. यामुळे आपण वाणीच्या ऊर्ध्वभागी असलेल्या मुखाने वाणीचा उच्चार करीत असतो.

द्वादशाह क्रतूपैकी पहिला 'प्रायणीय' व शेवटचा 'उदयनीय' हे दिवस सोडून मध्यंतरी असलेल्या दशरात्राच्याच अनुष्ठानाने पूर्वी एकेकाळी प्रजापतीने प्रजा निर्माण केल्या. यास्तव, ह्या 'त्रयस्त्रिंशदह' सत्रात जर यजमानांच्याकडून दशरात्राचे अनुष्ठान होईल, तर ते यजमान त्या दशरात्राच्या प्रभावाने प्रजा उत्पन्न करतील.

शुल्ब नांवाच्या एका ऋषीचा पुत्र उदंक असे म्हणाला की, या त्रयस्त्रिंशदह सत्राच्या अंगभूत असलेल्या दशरात्राच्या अनुष्ठानानेच संपूर्ण सत्राची फलसमृध्दी प्राप्त होते. यास्तव, त्रयस्त्रिंशदह सत्र करणाऱ्या यजमानांनी जर दशरात्र अनुष्ठित केला तर ते सत्राच्या पूर्ण फलसमृद्धीला प्राप्त होतील.शिवाय दशरात्राच्या पूर्वी अनुष्ठित केलेल्या दिवसांच्या अनुष्ठानात जर काही वैकल्य झाले असेल, तर त्याचाही उपशम दशरात्राच्या अनुष्ठानाने होईल.

अनीक म्हणजे सेना. त्रयस्त्रिंशदह सत्रात अंतर्भूत होणाऱ्या तेहतीस रात्री या जणू 'द्व्यनीक' म्हणजे दोन ठिकाणी विभागलेल्या दोन सेनाच

होत. या दोहोंपैकी प्रायणीय अतिरात्र व त्यानंतरचे तीन पंचाह मिळून होणाऱ्या सोळा रात्रांच्या पहिला सेनाविभाग असून उदयनीय अतिरात्रासह एक पंचाह आणि दशरात्र मिळून होणाऱ्या सोळा रात्रींचा दुसरा सेनाविभाग होय. सेनारूप रात्रींच्या ह्या दोन विभागांच्या मध्यवर्ती अनुष्ठित केला जाणारा 'विश्वजित्' हा यजमानस्थानीय समजावा. सारांश, दोन सेना विभागांच्या मध्ये उभ्या असलेल्या राजाप्रमाणे असलेल्या विश्वजित् क्रतूचे अनुष्ठान सत्राचा मध्यवर्ती असलेल्या सतराव्या दिवशी करावे. अशा प्रकारे अनुष्ठानक्रम जाणून ते यजमान त्रयस्त्रिंशदह सत्र करतात, त्या यजमानांना पुत्ररूप आणि कन्यारूप अशी दोनही प्रकारची प्रजा प्राप्त होते.

पहिल्या दिवशी होणारा प्रायणीय अतिरात्र व शेवटी होणारा उदयनीय अतिरात्र हे दोन अतिरात्र सत्रकर्त्या यजमानांना त्रयस्त्रिंशदह सत्राचे साकल्याने संपादन करून देण्याला कारणभूत होतात. (अनुवाक ५).

पूर्वी एकदा आदित्यांना स्वर्गलोकाला जाण्याची इच्छा झाली. तथापि, स्वर्गलोकाला जाण्याचा मार्ग त्यांना माहीत नसल्यामुळे ते स्वर्गलोकी जाऊ शकले नाहीत. तेव्हा स्वर्गलोकाला जाण्याचा मार्ग आपणाला माहीत होण्यासाठी काय उपाय करावा यासाठी विचार करता करता 'षट्त्रिंशत्रात्र' म्हणजे छत्तीस दिवसांत पूर्ण होणारा सत्ररूप यज्ञ, आपली इच्छा पूर्ण करील असे त्यांना आढळले. तदनुसार त्यांनी सर्व साहित्याची जुळणी केली आणि त्या षट्त्रिंशत्रात्र यज्ञाचे यजन केले. तेव्हा त्यांना स्वर्गलोकी जाण्याचा मार्ग कळून आला. आणि त्या मार्गाने ते आदित्य स्वर्गलोकाला गेले. हा वृत्तांत जाणून जे यजमान षट्त्रिंशत्रात्रसंज्ञक सत्ररूप यज्ञाचे अनुष्ठान करतील, त्यांना स्वर्गलोकी जाण्याचा मार्ग कळून येईल आणि ते त्या मार्गाने स्वर्गलोकाला जाऊन पोचतील.

सुत्यांच्यापैकी पहिल्या प्रायणीयसंज्ञक दिवशी 'ज्योति:अतिरात्र' क्रतू करावा. म्हणजे स्वर्गलोकी जाण्याचा मार्ग दिसावा म्हणून तो जणू काय आपल्या प्रकाशाची मशालच यजमानांच्या पुढे धरतो. त्यानंतर पूर्वी सांगितलेल्या पद्धतीने म्हणजे ज्योती, गौ व आयु हे तीन एकाह एकदा अनुलोम क्रमाने व एकदा प्रतिलोम क्रमाने केल्याने पूर्ण होणारे 'अभिप्लव षडह' करावेत. सहा ऋतूंच्याशी स्वरूपसाम्य असलेल्या षडहांचे अनुष्ठान केल्याने यजमान सहा

ऋतूंच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. हे अभिप्लव षडह चार वेळ करावेत. कारण मुख्य दिशा चारच आहेत. यास्तव, चार षडहांच्या अनुष्ठान ... ने यजमान चारही दिशांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

ज्या सत्रामध्ये 'छंदोम' क्रतू केले जात नाहीत, ते 'असत्र' ... त असून चार छंदोम क्रतू जर केले गेले, तरच त्यांच्या अनुष्ठानाने ते सत्यत... 'सत्र' ठरते. छंदोम क्रतूंमध्ये गाइल्या जाणाऱ्या पृष्ठसंज्ञक स्तोत्रांनी छंदोम क्रतूंच्या अधिष्ठात्री देवतांचे संपादन केले जात असून छंदोम क्रतूंच्या अनुष्ठानाने यजमानांना पशूंची प्राप्ती होत असते. ओज म्हणजे वीर्य हे प्रसिद्धच आहे. छंदोम क्रतू हे पशुरूप म्हणजे पशुप्राप्तिकारक आहेत. एवं च, छंदोम क्रतूंचे अनुष्ठान केल्यास ते यजमानांना पशूंची प्राप्ती करून देऊन त्या पशूंच्या ठिकाणी ओजसंज्ञक वीर्य स्थापित करतात.

प्रस्तुत विवेचन करण्यात येत असलेला सत्ररूप क्रतू छत्तीस रात्रींनी परिपूर्ण होत असतो. म्हणजे या क्रतूचे अनुष्ठान छत्तीस दिवस चालत असते. 'बृहती' छंद छत्तीस अक्षरांचा आहे. बृहती छंदाने प्रजेमध्ये पशू जिंकले असल्यामुळे सर्व पशू हे 'बार्हत' म्हणजे बृहतीछंदाधीन आहेत. बृहतीछंदाच्या योगानेच पशू मिळविता येतात. सर्व छंदांच्या मध्ये बृहतीछंद हा स्वाराज्याला प्राप्त झालेला आहे. षट्‌त्रिंशद्रात्र क्रतूचे छत्तीसअक्षरी असलेल्या बृहती छंदाशी स्वरूपसाम्य आहे. म्हणजे षट्‌त्रिंशद्रात्र क्रतू हा बृहतीछंदरूपच आहे. हे जाणून जे कोणी यजमान बृहतीछंदरूप अशा षट्‌त्रिंशद्रात्र क्रतूचे अनुष्ठान करतात, ते इहलोकी स्वराज्य संपादन करून शेवटी स्वर्गलोकाला प्राप्त होतात. शेवटच्या उदयनीयसंज्ञक दिवशी अतिरात्र करावा. अशा प्रकारे या क्रतूच्या प्रारंभी व शेवटी होणारे ... न अतिरात्र क्रतू स्वर्गलोकाचा परिग्रह करण्यास कारणभूत होतात. (अनुवाक ६).

विश्वामित्राच्या शापाने शंभर पुत्र मृत झाल्यामुळे दुःखी झालेल्या वसिष्ठ ऋषीने आपणास पुन्हा पुत्रपौत्रादि प्रजा प्राप्त व्हावी आणि आपले शत्रू असलेल्या सौदासांचा म्हणजे सुदासराजाच्या पुत्रांचा क्षय व्हावा अशी इच्छा धारण केली. आपली इच्छा पूर्ण होण्यास 'एकस्मान्नपंचाश' म्हणजे एकुणपन्नास दिवसांनी पूर्ण होणारा सत्ररूप क्रतू साधनभूत होईल असे त्याच्या वैचारिक दृष्टीस आढळून आले. तदनुसार सर्व साहित्याची जुळवाजुळव करून वसिष्ठ

ऋषीने 'एकस्मान्नपंचाश' नांवाचा सत्ररूप क्रतू केला. त्या क्रतूच्या यजनाच्या प्रभावाने त्याला पुन्हा पुत्रपौत्रादि प्रजा प्राप्त झाली व त्याचे शत्रू असलेले सुदासपुत्रही नाश पावले. हे जाणून जे कोणी यजमान 'एकस्मान्नपंचाश' संज्ञक सत्ररूप क्रतूचे अनुष्ठान करतात त्यांना त्या क्रतूच्या अनुष्ठानप्रभावाने प्रजा प्राप्त होतात व त्यांचे शत्रूही पराभव पावतात.

या सत्ररूप क्रतूमध्ये त्रिवृत् स्तोमाने युक्त असे अग्निष्टोमरूप तीन अह म्हणजे दिवस अनुष्ठित करावेत. 'त्रिवृत्' स्तोम हा वज्ररूप आहे. यास्तव वज्ररूप अशा त्रिवृत्स्तोमाने युक्त अशा अग्निष्टोमरूप तीन दिवसांचे अनुष्ठान केले असता सत्रकर्त्या यजमानांनी आपल्या शत्रूंचा नाश करण्यासाठी जणू काय वज्राचेच टोक धार लावून तीक्ष्ण केल्यासारखे होते. पंचदशस्तोमयुक्त अशा सोमयागांच्या योगाने दहा दिवस अनुष्ठित करावेत. पंचदशस्तोम हा देखील शत्रूंचा संहार करण्याला उपयुक्त अशा व्रजासारखाच आहे. अर्थात् वज्ररूप अशा स्तोनाने युक्त अशा सोमयागांनी दहा दिवस अनुष्ठान केले असता यजमानांनी जणू काय आपल्या शत्रूंच्यावर वज्राचा प्रहारच केल्यासारखे होते.

या सत्रामध्ये जो 'दशरात्र' म्हणजे दहा दिवसांनी पूर्ण होणारा सोमयागांचा संघ अनुष्ठित करावा लागतो त्यापैकी शेवटचा अविवाक्यसंज्ञक दिवस षोडशीसंज्ञक स्तोत्राच्या गानाने युक्त असा करावा. म्हणजे त्या योगाने पूर्वोक्त वज्राच्या ठिकाणी सत्रकर्त्या यजमानांनी विशेष सामर्थ्य स्थापन केल्यासारखे होते.

सप्तदशस्तोमयुक्त अशा सोमयागांनी बारा दिवस अनुष्ठान करावे. सप्तदशस्तोम हा प्रजापतीच्या उदरापासून निर्माण झाला असल्यामुळे तो अन्नप्राप्तीला कारणभूत होणारा आहे. शिवाय सप्तदशाक्षरात्मक प्रजापतीशी संख्यासाम्य असल्यामुळे तो प्रजापतिरूपही आहे. अर्थात् बारा दिवसपर्यंत उपयोगात आणला गेलेला तो सप्तदशस्तोम सत्रकर्त्या यजमानांना सेवनीय अशा भरपूर अन्नाची प्राप्ती करून देण्याला व प्रजेची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतो.

पृष्ठ्य संज्ञक षडहाचे अनुष्ठान करावे. ऋतू सहा आहेत. त्याप्रमाणे षडहामध्ये अनुक्रमे गाइलेली 'पृष्ठ' संज्ञक स्तोत्रेही सहाच असतात. यामुळे सहा स्तोत्राच्या गानाने सत्रकर्ते यजमान सहा ऋतूंच्या ठिकाणी आरूढ होतात व त्या ऋतूंच्या द्वारा ते संवत्सरावर आरूढ होतात आणि त्याच्या ठिकाणी

प्रतिष्ठित होऊन राहतात.

एकविंशस्तोमयुक्त असे बारा दिवस अनुष्ठित करावेत. एकविंशस्तोम हा प्रतिष्ठाप्राप्तीला कारणभूत होणारा असल्यामुळे बारा दिवस सामगानामध्ये त्या स्तोमाचा आश्रय केल्याच्या योगाने यजमान प्रतिष्ठेला प्राप्त होऊन शिवाय आपल्या शरीराच्या ठिकाणी उज्वल अशी कांती संपादन करतात.

एकुणपन्नास दिवसांची पूर्णता होण्यासाठी जितके दिवस अपेक्षित असतील तितके दिवस षोडशी स्तोत्राच्या गानाने अनुष्ठित करावेत. म्हणजे ते सत्रकर्त्या यजमानांना विजय प्राप्त होण्याला कारणभूत होतात. षोडशी स्तोत्राचे गान करून जितके दिवस सोमयाग करावे लागतील त्यांपैकी सहा दिवस 'आश्विन' युक्त करावेत. म्हणजे या सहा दिवसांत 'आश्विन' शस्त्राचे शंसन म्हणजे पठण करावे. ऋतू सहा आहेत. यास्तव, त्यांच्याशी संख्यासाम्य असणाऱ्या आश्विनशस्त्रयुक्त अशा सहा दिवसांच्या अनुष्ठानाने सत्रकर्ते यजमान सहा ऋतूंच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

'एकस्मान्नपंचाश' म्हणजे एकुणपन्नास दिवसांनी पूर्ण होणाऱ्या या सत्ररूप क्रतूमध्ये अंतर्भूत होणाऱ्या एकुणपन्नास रात्री एका दृष्टीने कमी अधिक होत असतात. पन्नास या संख्येच्या अपेक्षेने एकुणपन्नास रात्रींची संख्या कमी पडते. आणि अठ्ठेचाळीस या संख्येच्या अपेक्षेने एकुणपन्नास रात्री या एका रात्रीने अधिक भरतात.

सृष्टिकर्त्या प्रजापतीने पूर्वी क्वचित्काळी कमी म्हणजे अल्प अशा वीर्यापासून अधिक अर्थात् प्रौढ अशा शरीरधारी प्रजा निर्माण केल्या, आणि क्वचित् काळी सर्वांहून अधिक विस्तीर्ण अशा आकाशापासून उत्तरोत्तर कमी विस्तार असलेली वायू इत्यादि भूते निर्माण केली. सारांश, प्रजापतीने देखील कमी अधिक प्रमाणाने सृष्टिनिर्मितीचं कार्य केले असल्याने यजमानांनी अनुष्ठित केलेला, कमी अधिक रात्रींचा अंतर्भाव होणारा एकस्मान्नपंचाशसंज्ञक सत्ररूप क्रतू हा प्रशस्तच होय.

जे कोणी यजमान प्रजाप्राप्तीची व पशुप्राप्तीची इच्छा करणारे असतील त्यांनी पूर्वोक्त सत्ररूप क्रतूतील एकुणपन्नास दिवसांचे अनुष्ठान करावे. म्हणजे त्या योगाने ते प्रजा व पशू यांच्या योगाने समृद्ध स्थितीला प्राप्त होतील.

'एकस्मान्नपंचाश' नांवाचा हा यज्ञ वैराजस्वरूप आहे. कारण या यज्ञात दहा दहा दिवसांचे चार विभाग व एकाच संख्येने कमी असा पांचवा विभाग अनुष्ठित केला जात असतो. विराट्‌छंद हा दहाअक्षरी चरणांचा असतो. अर्थात् चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने पूर्वोक्त दहा दहा दिवसांचे चार भाग विराट्‌छंदाशी एकरूप आहेत व पांचवा विभाग एक दिवसाने उणा आहे. तथापि, कोणत्याही छंदामध्ये एक दोन अक्षरे कमी असली तरी तो छंद पूर्णच मानला जातो. त्याचप्रमाणे, पूर्वोक्त पांचवा विभाग एक दिवसाने कमी असला तरी तो दहा दिवसांचाच समजावा. सारांश, 'एकस्मान्नपंचाश' हा यज्ञ वैराजरूप आहे हे जाणून जे कोणी यजमान त्या यज्ञाचे अनुष्ठान करतात ते वैराज पदाला प्राप्त होतात आणि सेवनीय अशा भरपूर अन्नानेही समृध्द होतात. (अनुवाक ७).

संवत्सरसत्र करण्यास प्रवृत्त होणाऱ्या यजमानांनी 'एकाष्टका' अशी संज्ञा असलेल्या माघ कृष्ण अष्टमीस दीक्षा ग्रहण करावी. कारण एकाष्टकानामक तिथीची जी अभिमानिनी देवता आहे, ती संवत्सराच्या अभिमानी देवाची पत्नी होय. संवत्सराचा अभिमानी देव या एकाष्टकासंज्ञक माघ कृष्ण अष्टमीच्या रात्रीची अभिमानिनी असणाऱ्या देवतेच्या ठिकाणी वसती करीत असतो. यास्तव, संवत्सर सत्र करू इच्छिणारे जे यजमान या एकाष्टकासंज्ञक तिथीस दीक्षा ग्रहण करतात त्यांनी संवत्सराच्या प्रारंभापासून दीक्षा ग्रहण केल्यासारखे होते.

एकाष्टका अशी संज्ञा असलेल्या माघ कृष्ण अष्टमीस जे यजमान दीक्षा ग्रहण करतात ते जणू काय संवत्सराच्या अंतकालाला अर्थात् विनाशकालाला अनुलक्षून दीक्षा ग्रहण करतात. कारण पौष व माघ या दोन महिन्यांच्या अवधीत असणारे हेमंत व शिशिर हे दोन ऋतू संवत्सराचा अंत करणारे म्हणून ओळखले जातात. हेमंत ऋतूचा उत्तर भाग व शिशिर ऋतूचा प्रथम भाग हे शिशिरऋतुरूप आहेत. या शिशिर ऋतूनेच पूर्वीचा संवत्सर समाप्त होत असतो. अर्थात् पौषी पूर्णिमेपासून फाल्गुनी पूर्णिमेच्या आधीच्या दिवसापर्यंतचा काल म्हणजे पूर्वसंवत्सराचा अंतकाल होय. सारांश, एकाष्टकासंज्ञक माघ कृष्ण अष्टमीस दीक्षा ग्रहण करणाऱ्या यजमानांनी संवत्सराच्या विपर्यासास अनुलक्षून दीक्षा ग्रहण केल्यासारखे होते. सत्राच्या प्रारंभीच दीक्षा ग्रहण करावी लागते. व हेमंत आणि शिशिर हे दोन ऋतू तर संवत्सराचा 'अंत करणारे'

या नांवाने प्रसिद्ध आहेत. यास्तव, माघ कृष्ण अष्टमीस दीक्षा ग्रहण न करता उत्तरा फाल्गुनीयुक्त पूर्णिमेस अर्थात् फाल्गुनी पूर्णिमेस संवत्सरारंभ करणाऱ्या यजमानांनी दीक्षा ग्रहण करावी. कारण फाल्गुनी पूर्णिमा हा नूतन संवत्सराचे मुख म्हणजे प्रारंभाचा दिवस आहे. यास्तव, फाल्गुनी पूर्णिमेस दीक्षा ग्रहण केल्याच्या योगाने संवत्सराच्या प्रारंभाच्या दिवशी दीक्षा ग्रहण केल्यासारखे होते.

फाल्गुनी पूर्णिमेस दीक्षा ग्रहण केल्याने संवत्सराच्या अंतकाली व विपर्यस्त स्थितीत दीक्षा ग्रहण केल्याचे दोष टळतात हे खरेच, पण या दिवशी दीक्षा ग्रहण करण्यातही एक दोष उत्पन्न होतो. तो असा की, संवत्सराच्या मध्यवर्ती असणारा विषुवान्संज्ञक एक विशिष्ट दिवस असतो. तो अगदी वर्षाऋतू म्हणजे भर पावसाळ्याचे दिवस संपतात तोच वीस दिवसांनी येतो. भर पावसाळ्याला 'सांमेध्य' म्हणजे अतिशय वृष्टी करणाऱ्या मेघांचा काळ असे म्हणतात. अर्थात् फाल्गुनी पूर्णिमेस दीक्षा ग्रहण केली असता विषुवान्संज्ञक मध्यवर्ती दिवस 'सांमेघ्य' संज्ञक काळाच्या नजीकच पडतो. म्हणजे यावेळी पावसाळा पूर्णपणे संपलेला नसतो. एवं च, वर्षाऋतूच्या समाप्तीकालाच्या नजीक असलेल्या काळात विषुवान् दिवस येण्याचा दोष घडू नये म्हणून संवत्सरसत्र करणाऱ्या यजमानांनी चित्रायुक्त पूर्णिमेस अर्थात् चैत्री पूर्णिमेस दीक्षा ग्रहण करावी. चैत्री पूर्णिमा ही वसंत ऋतूमध्येच असल्यामुळे ती संवत्सराचे जणू मुख म्हणजे प्रारंभकालच होय. अर्थात् संवत्सरसत्र करणाऱ्या यजमानांनी चैत्री पूर्णिमेस दीक्षा ग्रहण केल्यास संवत्सराच्या प्रारंभकाळी दीक्षा ग्रहण केल्यासारखे होऊन विषुवान्संज्ञक मध्यवर्ती दिवस वर्षाऋतूपासून दूर पडतो आणि साहजिकच पावसाळा पूर्ण थांबला नसतांना विषुवान् दिवस पडण्याचा दोषही उत्पन्न होत नाही.

माघी पूर्णिमेच्या पूर्वी चार दिवस म्हणजे शुद्ध एकादशीच्या दिवशी दीक्षा ग्रहण करावी. असे केले असता दीक्षाग्रहणासंबंधी व्रतस्थ राहावयाच्या बारा दिवसांची पूर्णता होते. आणि एकाष्टकेच्या म्हणजे माघ कृष्ण अष्टमीच्या दिवशी सोम विकत घेण्याचा विधी करणे क्रमप्राप्तच होते. अशा प्रकारे एकाष्टकेच्या दिवशी सोमक्रय - म्हणजे सोम विकत घेण्याचा विधी - केला असता त्या मुख्य तिथीला निरुपयोगी केल्याचा दोष न लागता उलट संवत्सराची

पत्नी या नात्याने सत्रकर्त्या यजमानांनी तिचा सत्कारच केल्यासारखे होते.

एकाष्टकासंज्ञक माघ कृष्ण अष्टमीच्या दिवशी सोमक्रय करण्यात आणखी एक गुण उत्पन्न होतो. तो असा की, त्या संवत्सरसत्र करणारांच्या सुत्यांचा प्रारंभ शुक्ल पक्षात होतो. संवत्सरसत्रान्तर्गत सर्व महिने शुक्ल पक्षामध्ये समाप्त होतात. आणि सत्रकर्ते यजमान शुक्ल पक्षातच सत्रातून उठतात, म्हणजे त्यांच्या संवत्सरसत्राची समाप्तीही शुक्ल पक्षात होऊन ते सत्रानुष्ठानातून मोकळे होतात. सत्र संपवून यजमान उठतात, त्याच वेळी त्यांच्या अनुष्ठानसामर्थ्याने ओषधी आणि वनस्पती भूमीपासून वर उठतात म्हणजे उगवून येतात. त्याबरोबरच 'हे सत्रकर्ते यजमान पुण्यकर्म करून समृद्धीला प्राप्त झाले', अशा प्रकारे त्या यजमानांच्या कल्याणरूप कीर्तीचा ध्वनी सर्वत्र उठू लागतो. यजमानांनी केलेल्या सत्ररूप पुण्यकर्माच्या प्रभावाने सर्व प्रकारची धान्ये भरपूर पिकतात व त्या योगाने राष्ट्रातील सर्व प्राणीही साहजिकच समृद्ध होतात. एवं च, माघ शुद्ध एकादशीस संवत्सरसत्र करणाऱ्या यजमानांनी दीक्षेचे ग्रहण करावे हे प्रशस्त होय. (अनुवाक ८).

सत्र करणारे यजमान हे शेवटी स्वर्गलोकाला जात असतात. स्वर्गलोक प्राप्तीला कारणभूत होणाऱ्या सत्राचे अनुष्ठान करण्याची योग्यता प्राप्त होण्यासाठी प्रथमत: बारा दिवस दीक्षा धारण करून तत्संबंधी व्रतनियमांच्या पालनाने ते जणू आपले शरीर सर्वतोपरी प्रज्वलित करीत असतात. आणि त्यानंतर बारा दिवस केलेल्या 'उपसत्' इष्टींच्या योगाने ते आपला देह जणू शिजवून काढतात.

दीक्षेतील दोन दिवस व उपसद् इष्टीतील दोन दिवस अशा दोन दोन दिवसांच्या अनुष्ठानरूपाने ते जणू आपल्या शरीरावरील केसांचेच अवदान देतात, त्यानंतरच्या दोन दोन दिवसांच्या अनुष्ठानरूपाने ते आपल्या शरीरावरील त्वचेचे, त्यानंतरच्या दोन दोन दिवसांच्या अनुष्ठानरूपाने आपल्या शरीरातील रक्ताचे, त्यानंतरच्या दोन दोन दिवसांच्या अनुष्ठानरूपाने आपल्या शरीरातील मांसाचे, त्यानंतरच्या दोन दोन दिवसांच्या अनुष्ठानरूपाने आपल्या शरीरातील अस्थींचे आणि त्यानंतरच्या दोन दोन दिवसांच्या अनुष्ठानरूपाने ते जणू आपल्या शरीरातील चरबीचेच अवदान देवतांना समर्पण करीत असतात. सत्र हे 'आत्मदक्षिण' आहे. म्हणजे सत्राच्या सांगतेसाठी यजमानांनी आपल्या

शरीराचीच दक्षिणा द्यावी लागते. यास्तव, सत्रकर्ते यजमान स्वतःचे शरीरच दक्षिणारूपाने देऊन स्वर्गलोकाला प्राप्त होतात.

सत्रकर्त्या यजमानांनी आपल्या मस्तकावरील शेंडीच्या केसांसह सर्व केसांचे वपन करावे. केस म्हणजे शरीरावरील त्वचेचा मृत झालेला अंशच होय. यास्तव केसांच्या रूपाने आपल्या त्वचेचा मृत झालेला भाग काढून टाकणे हे यजमानांच्या समृद्धीलाच कारणभूत होत असते. शिवाय केसांचा भार काढून टाकल्याने आम्ही अत्यंत हलके झालो म्हणजे अनायासे आपण स्वर्गलोकाला जाऊन पोहचू अशीही भावना ठेवून सत्रकर्त्या यजमानांनी शेंडीच्या केसांसह मस्तकावरील सर्व केसांचे वपन करावे. (अनुवाक ९).

ब्रह्मवादी असे म्हणतात की, सोमयागरूप जितके क्रतू आहेत, त्यांमध्ये 'अतिरात्र' हा शेवटचा क्रतू आहे. असे असताना, सोमयागरूप क्रतूंमध्ये प्रकृतिभूत, अर्थात् पहिला असलेल्या अग्निष्टोम क्रतूचा त्याग करून सत्राच्या प्रारंभी अर्थात् पहिल्या सुत्येच्या दिवशी सत्रकर्ते यजमान अतिरात्र क्रतूचे अनुष्ठान काय म्हणून करतात? त्यावर दुसरे अभिज्ञ असे उत्तर देतात की, अहो, प्रथमारंभी अतिरात्र केला तरी त्यामध्ये ते सत्रकर्ते प्रथम अग्निष्टोमाचे, नंतर 'उक्थ' क्रतूचे, नंतर षोडशीचे व त्यानंतर अतिरात्राचे अनुष्ठान करीत असतात. यामुळे अग्निष्टोमाचा त्याग केल्याचा दोष येत नाही. सारांश, आता सांगितलेल्या क्रमाप्रमाणे अग्निष्टोमापासून अतिरात्रापर्यंतच्या सर्व क्रतूंचे अनुष्ठान करण्याचा निश्चय करून त्याप्रमाणे अग्निष्टोमादि अतिरात्रात क्रतूंच्या अनुष्ठानाचा उपक्रम करतात आणि नंतर सर्व सत्र समाप्त होईपर्यंत ते सत्रकर्ते यजमान केवळ सोमपानच करून असतात. एवं च, आता सांगितलेल्या पद्धतीत अग्निष्टोमाचा त्याग होत नसल्यामुळे सत्रकर्त्या यजमानांनी सुत्याहांच्या प्रारंभाचे दिवशी अतिरात्रसंस्थ ज्योतिष्टोम क्रतूचे अनुष्ठान करावे. कारण ज्योतिष्टोम हा ज्योती, गौ व आयू या नांवाच्या स्तोमांचे म्हणजे क्रतूंचे जणू मुखच होय. यास्तव, ज्योतिष्टोम प्रथम केल्याने सत्रकर्त्या यजमानांनी मुखापासून सर्व स्तोमांचे अनुष्ठान केल्यासारखे होते.

अतिरात्रसंस्थ अशा ज्योतिष्टोम क्रतूमध्ये स्तोत्रगत अशा ज्या दहा ऋचा गाइल्या जातात त्या दशाक्षरी चरणांनी युक्त असलेल्या विराट्छंदाच्या स्वरूपाला प्राप्त होतात. गौ व आयू हे जे इतर दोन क्रतू आहेत त्यांच्या

स्तोत्रगत ऋचा कमी अधिक असतात. गौनामक स्तोमक्रतून एक ऋचा कमी असते व आयुनामक स्तोमक्रतूत एक ऋचा दहांच्याहून अधिक असते. मात्र दोन्ही क्रतूंच्या मिळून वीस ऋचा भरतात. आणि विराट्छंदाच्या दोन चरणांच्या स्वरूपसाम्याला प्राप्त होतात. स्वर्गलोक हा प्रकाशरूप असून विराट्छंद हा देखील प्रकाशरूप आहे. यास्तव, स्वर्गलोक व विराट्छंद यांच्याशी स्वरूपसाम्य असलेला अर्थात् स्वर्गलोकप्रकाशक अशा अतिरात्रसंस्थ ज्योतिष्टोम क्रतूचे प्रथम दिवशी अनुष्ठान केल्याच्या योगाने सत्रकर्ते यजमान स्वर्गलोकाला प्राप्त होतात.

अतिरात्रसंस्थ ज्योतिष्टोमामध्ये दिवसा आणि रात्रीच्या पर्यायसंज्ञक स्तोत्रांमध्ये रथंतर साम गाइले जात असते. अशा प्रकारे दोन वेळी तेच तेच साम गाइल्याने एक प्रकारे आळस उत्पन्न होत असतो. तेव्हा या आळसाचा परिहार कोणत्या उपायाने होईल? असा प्रश्न काही ब्रह्मवादी उपस्थित करतात. त्यावर दुसरे अभिज्ञ असे उत्तर देतात की, तृतीय सवनामध्ये 'सौभर' नांवाचे जे एक निराळे साम आहे, त्या सामाचे 'ब्रह्मसाम' म्हणून गान करावे. कारण, ते साम फार मोठे आहे. बृहत् व रथंतर या दोन सामांच्या मध्ये ते साम गावे. म्हणजे ते सत्ररूप यज्ञाच्या धारणाला कारणभूत होईल व रथंतराहून भिन्न अशा त्या सामाच्या गानाने आळसाचाही परिहार होईल. (अनुवाक १०).

ज्योतिष्टोम, गोष्टोम व आयुष्टोम या नांवाचे तीन एकाह आहेत. या तीन स्तोमसंज्ञक एकाहांचे एकदा अनुलोम क्रमाने व त्यानंतर एकदा प्रतिलोम म्हणजे उलट क्रमाने अनुष्ठान केले म्हणजे 'अभिप्लव' नांवाचा एक षडह पूर्ण होतो. यास्तव, या अभिप्लव षडहाच्या पूर्वभागात सत्रकर्ते यजमान प्रथम ज्योतिष्टोमसंज्ञक एकाह अनुष्ठित करतात. त्या योगाने ते या भूलोकाचे ठिकाणी प्रतिष्ठित होतात. त्यानंतर गोष्टोम या नांवाचा दुसरा एकाह अनुष्ठित करतात. त्याच्या प्रभावाने ते अंतरिक्ष लोकाच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. नंतर आयुष्टोम नांवाच्या तिसऱ्या एकाहाचे ते अनुष्ठान करतात. आणि त्या योगाने ते द्युलोकाच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. ज्योती या नांवाचा एकाह हा भूलोकरूप, गौ नांवाचा दुसरा एकाह अंतरिक्षलोकरूप आणि आयु नांवाचा तिसरा एकाह द्युलोकरूप आहे. यामुळे स्तोम या विशिष्ट संज्ञेने युक्त असलेले हे तीन एकाह अनुक्रमाने अनुष्ठित करून सत्रकर्ते यजमान तीन्ही लोकांच्या ठिकाणी

प्रतिष्ठित होतात.

ज्योती इत्यादि तीन एकाहांमध्ये ज्या स्तोत्रगत ऋचा गाईल्या जातात, त्या विराट्छंदाशी स्वरूपसाम्य संपादन करतात. गौ व आयु या दोन एकाहा मधील स्तोत्रगत ऋचा कमी अधिक आहेत. गौनामक एकाहात एक ऋचा जास्त, आणि आयु नांवाच्या एकाहात एक ऋचा कमी आहे. तथापि, दोन्ही एकाहांच्या मिळून होणाऱ्या ऋचांची संख्या विराट्छंदाशी स्वरूपसाम्यतेला प्राप्त होत असते. स्वर्गलोक हा प्रकाशक असल्याचे प्रसिद्धच असून छंदांमध्ये हा विराट्छंदही प्रकाशरूप किंवा स्वर्गलोकप्रकाशक आहे. एवं च, प्रकाशरूप अशा विराट् छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या स्तोत्रगत ऋचांचे गान करून ज्योती इत्यादि एकाहांचे अनुष्ठान करून त्यांच्या प्रभावाने सत्रकर्ते यजमान प्रकाशमय अशा स्वर्गलोकाला प्राप्त करून घेतात. सत्रकर्ते यजमान अनुष्ठानाच्या अत्यंत कष्टांच्या योगाने क्षुधेने पीडित होत असतात. परंतु, आता सांगितलेल्या एकाहांचे अनुष्ठान केल्याने त्यांना होणाऱ्या क्षुधेच्या पीडेचा परिहार होतो व ते क्षुधारहित होतात.

अभिप्लव षडह म्हणजे जणू काय पुन्हा पुन्हा फिरत राहणारे एक देवचक्र आहे. अनुलोम क्रमातील पहिला अग्निष्टोम आणि प्रतिलोम क्रमातील शेवटचा अग्निष्टोम हे दोन अग्निष्टोम म्हणजे जणू काय त्या देवचक्राच्या धावेच्या दोन फळ्याच असून मध्यंतरी होणारे उक्थ्यसंस्थ असे चार एकाह क्रतू हे जणू काय त्या देवचक्राचे 'नभ्य' म्हणजे तुंबा होय. एवं च, अभिप्लव षडहाच्या अनेक आवृत्ती जे सत्रकर्ते यजमान करतात ते जणू काय देवचक्रावरच आरोहण करतात. अशा प्रकारे देवचक्रावर होणारे त्यांचे आरोहण त्यांची कोणत्याही प्रकारे हिंसा होऊ न देण्याला कारणभूत होते. आणि ते यजमान उत्कृष्ट अशा क्षेमसुखाचा उपभोग घेतात.

पूर्वोक्त ज्योती इत्यादि तीन क्रतूंचे एकवार अनुलोम क्रमाने व एकवार प्रतिलोम क्रमाने मिळून होणाऱ्या अभिप्लवसंज्ञक षडहाचे पुनःपुन्हा अनुष्ठान करून यजमान सत्र पूर्ण करतात. ऋतू सहा आहेत. अर्थात् ऋतूंच्याशी संख्यासाम्यतेने एकरूप असलेल्या षडहांच्या अनुष्ठानाने सत्रकर्ते यजमान वसंतादि सहा ऋतूंच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. अभिप्लव षडहाच्या प्रारंभी व शेवटी ज्योतिष्टोम क्रतू होत असल्याने अभिप्लव षडह आरंभ व समाप्ती या दोन्ही

बाजूंनी प्रकाशाने युक्त असतो. यामुळे त्याच्या अनुष्ठानप्रभावाने प्रकाशरूप अशा स्वर्गलोकी प्रवेश करताना प्रतिष्ठितपणे म्हणजे कोणाकडूनही अवज्ञा न होता यजमान प्रवेश करतात आणि स्वर्गलोकातील सुखोपभोगाची कालमर्यादा पूर्ण झाल्यानंतरही प्रतिष्ठितपणानेच पुन्हा भूलोकावर येतात.

षडहाच्या दोन आवृत्ती झाल्या म्हणजे बारा दिवस पूर्ण होतात. पुरुष हा कमरेचे दोन बाजूचे दोन भाग, दोन खांदे, शरीराचा मध्यभाग, मस्तक, दोन हात, दोन पाय आणि दोन स्तन मिळून बारा अवयवांनी युक्त असतो. सारांश, बारा अवयवांनी युक्त असलेल्या पुरुषाला अनुसरूनच पूर्वोक्त अभिप्लव षडहाचे बारा दिवस पुनः पुन्हा आवृत्त होत असतात. म्हणजे त्या बारा दिवसांचेच पुनः पुन्हा अनुष्ठान होत असते. अभिप्लव षडहाच्या जेव्हा तीन आवृत्ती होतात तेव्हा अठरा दिवस पूर्ण होतात. या अठरा दिवसांचे दोन विभाग केले असता नऊ नऊ दिवसांचा एक एक भाग पडतो. पुरुषशरीराच्या ठिकाणी असलेल्या नऊ छिद्रांच्या ठिकाणी असलेल्या नऊ प्राणांना अनुसरूनच जणू काय पूर्वोक्त नऊ नऊ दिवसांचे दोन भाग पुनः पुन्हा आवृत्तिरूपाने अनुष्ठित केले जात असतात.

षडहांच्या चार आवृत्ती जेव्हा होतात तेव्हा चोवीस दिवस पूर्ण होतात. संवत्सर हा चोवीस अर्धमासांनी म्हणजे चोवीस पंधरवड्यांनी युक्त असतो. षडहांच्या चार आवृत्तींनी पूर्ण होणारे चोवीस दिवस संवत्सरान्तर्गत चोवीस अर्धमासांना अनुसरूनच पुन्हा पुन्हा आवृत्तिरूपाने अनुष्ठित केले जातात. मात्र चोवीस अर्धमासांची संख्या मासदृष्टीने पूर्ण होण्यासाठी पूर्वोक्त चार अभिप्लव षडहांमध्ये 'पृष्ठ' संज्ञक आणखी एका षडहाची भरती घालावी लागते.

'पूर्वोक्त न्यायाने एक मास प्रतिष्ठित होतो, संवत्सर होत नाही, प्रतिष्ठेच्या दृष्टीने मास हा अत्यंत अल्प असून संवत्सर हा अतिशय मोठा आहे', असे काही ब्रह्मवादी म्हणतात. त्यांना एवढेच उत्तर देणे योग्य आहे की, पूर्वोक्त रीतीने महिन्याचे प्रतिपादन करणारे जे ब्राह्मणवाक्य आहे, तेच संवत्सराचे प्रतिपादक वाक्य होय. त्यापेक्षा अधिक असे नवीन प्रतिपादन काहीच नाही. सारांश, पूर्वोक्त प्रकाराने प्रत्येक महिन्याचे अनुष्ठान करून व त्या त्या महिन्यांचे ठिकाणी प्रतिष्ठित होऊनच सत्रकर्ते यजमान अनुक्रमाने संवत्सरसत्राच्या पूर्ततेचा

पल्ला गाठतात. (अनुवाक ११).

१ हे अश्वा, मेंढ्यांमध्ये प्रमुख असलेला हा मेंढा हविर्द्रव्यरूपाने शिजविण्यास योग्य अशा इतर लहान सात मेंढ्यांच्या सह तुझे रक्षण करो. २ हे अश्वा, प्रमुख असलेला व ज्याच्या मानेवरील केस लाल आहेत असा हा बोकड इतर लहानसान कोकरांच्यासह तुझे रक्षण करो. ३ हे अश्वा, सावरीचा वृक्ष आपल्या ठिकाणच्या अत्यंत उंचीसह तुझे रक्षण करो. ४ हे अश्वा, पळसाचा वृक्ष स्वतःच्या अभिमानी अशा मंत्रासह तुझे रक्षण करो. ५ हे अश्वा पायरीचा किंवा नांदुर्कीचा वृक्ष यज्ञासहवर्तमान तुझे रक्षण करो. ६ हे अश्वा, ज्याच्या लाकडाचे चमस केले जातात तो वडाचा वृक्ष चमसांसह वर्तमान तुझे रक्षण करो. ७ हे अश्वा, उंबराचा वृक्ष आपल्या ठिकाणच्या रसभरित फलांच्या सह तुझे रक्षण करो. ८ हे अश्वा इतर छंदांच्यासह गायत्री छंद तुझे रक्षण करो. ९ हे अश्वा, इतर स्तोमांच्यासह त्रिवृत्स्तोम तुझे रक्षण करो. १० (त्या राजपत्न्या एकमेकींना म्हणतात की) हे राजपत्न्यांनो, तुम्ही या अश्वाच्या पालनकर्त्या आहात, त्याचे रक्षण करा. हे अश्वा, तुझ्या पालनकर्त्या या राजपत्न्या तुझे रक्षण करोत. राजपत्न्या म्हणतात की सर्व, प्रिय वस्तूंत अत्यंत प्रिय, आमच्या इच्छापूर्तीला कारणभूत अशा सर्व वस्तूंत श्रेष्ठ, तसेच शंखरवपद्मादि सर्व निधींत अत्यंत श्रेष्ठ असा निधिपती तसेच आमचे जणू तेजच अशा हे अश्वा तुला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १२).

१ विहिरीत असलेल्या उदकांना ही आहुती अर्पण असो. २ भरलेल्या नदीच्या दोन्ही थडीने वाहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ३ भुयारांमध्ये असलेल्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ४ डबक्यामध्ये असलेल्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ५ खणून तयार केलेल्या झऱ्यांत असलेल्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ६ तळाचा अंत न लागणाऱ्या डोहात असणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ७ तळाचा अंत लागणाऱ्या डोहात असणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ८ सरोवरात असणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ९ तलावात असणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. १० लहान हेळात असणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ११ पावसाळ्यातच उत्पन्न होणाऱ्या उदकांना ही

आहुती अर्पण असो. १२ एकाच ठिकाणी साठून राहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. १३ प्रवाहाच्या ध्वनीने युक्त अशा उदकांना ही आहुती अर्पण असो. १४ अत्यंत लहान अशा डबक्यात राहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. १५ प्रवाहरूपाने वाहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. १६ पावसाळ्यानंतरही भूमीवर राहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. १७ पाटामध्ये केव्हा केव्हा वाहत राहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. १८ नदीमधून वाहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. १९ समुद्रातील उदकांना ही आहुती अर्पण असो. २० न सांगण्यात आलेल्या सर्व उदकांना ही आहुती अर्पण असो. (अनुवाक १३).

१ सर्व जातींच्या उदकांना ही आहुती अर्पण असो. २ प्रवाहरूपाने वाहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ३ भोवऱ्यांनी युक्त अशा उदकांना ही आहुती अर्पण असो. ४ सपाट असलेल्या जमिनीवरून सर्व दिशांना वाहत राहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ५ उतरत्या जमिनीवरून वेगाने वाहत राहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ६ किंचित् उतरत्या असलेल्या जमिनीतून रमणीय गतीने झुळझुळ वाहत राहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ७ पर्वताच्या माथ्यावरून धो धो असा उग्र शब्द करीत भूतलाकडे जोराने वाहत राहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ८ मगरीसारख्या जलचरांना उदरात साठवून वाहत राहणाऱ्या उदकांना ही आहुती अर्पण असो. ९ इहलोकी वाहणाऱ्या उदकांना ही आहुती समर्पण असो. १० अंतरिक्षलोकात वाहत राहणाऱ्या उदकांना ही आहुती समर्पण असो. ११ स्वर्गलोकात वाहत राहणाऱ्या उदकांना ही आहुती समर्पण असो. १२ सर्व प्रकारच्या उदकाला ही आहुती अर्पण असो. (अनुवाक १४).

१ हा अश्व उदकामध्ये स्नान करीत असताना त्या ठिकाणी प्रवेश करून जो कुत्रा त्याला चावा घेऊन त्रास देण्याची इच्छा करतो, त्याला उदकाधिपती वरुणदेव सर्वतोपरी रोगग्रस्त करतो. २ प्रबल असा हा कुत्रा उदकाच्या पलीकडे जाऊन मृत होवो. ३ इंद्राप्रमाणेच आपल्या शत्रूचा नाश करणाऱ्या हे यजमाना, तू आणि तुझ्या यज्ञातील ब्रह्मा असलेला मी असे आपण दोघेही नाना प्रकारच्या द्रव्यलाभासाठी सर्वतोपरी एकत्र होऊ. पर्वतासारखे विशाल वज्र धारण करणाऱ्या इंद्राप्रमाणेच असलेल्या हे यजमाना, तू आणि

मी दोघेही हविर्दानरहित असलो तरी देखील देवाधिपती व शूर अशा इंद्राची कल्याणरूप अशी फलदाने आपणा उभयतांचा अंगीकार करोत. म्हणजे इंद्राने दिलेली फलदाने आपणांकडे येवोत. ४ परमऐश्वर्ययुक्त अशा इंद्राप्रमाणेच असलेल्या हे यजमाना, तू केलेल्या या यज्ञाच्या योगाने तू आपल्या शत्रूचा पराभव केला आहेस. तुझा महिमा आणि सर्व जगाला चकित करणारी तुझी चरित्रे यथार्थ रीतीने वर्णन करण्याला या भूतलावर कोणीही समर्थ होणार नाही. तू आपल्या बलाने शत्रूला ठार केले आहेस. तुझ्या त्या शत्रूला मात्र युद्धाच्या योगाने तुझा नाश करण्याची संधी लाभली नाही. (अनुवाक १५).

१ सोमराजाला नमस्कारपूर्वक ही आहुती समर्पण असो. २ वरुणराजाला नमस्कारपूर्वक ही आहुती समर्पण असो. ३ अश्वाला नमस्कारपूर्वक ही आहुती समर्पण असो. ४ प्रजापतीला नमस्कारपूर्वक ही आहुती समर्पण असो. ५ हे धर्मदेवा तुला नमस्कार असो. ६ तू अधिपती आहेस तसाच मला तू अधिपती कर. तुझ्या कृपेने प्रजांचा मी अधिपती होईन. प्रजांच्या आधिपत्याचे ठिकाणी तू मला स्थापित कर. पालनीयत्वाच्या नात्याने त्या प्रजा ा तू माझ्या ठिकाणी स्थापन कर. तुला ही आहुती अर्पण असो. ७ 'उपाकरण' केलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ८ 'आलभन' केलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. ९ अग्नीमध्ये हवन केलेल्या अश्वाला ही आहुती अर्पण असो. (अनुवाक १६).

१ सुखप्रद असा मंद वारा सर्व गाईच्या अंगावरून वाहो. या सर्व गाई रसयुक्त अशा तृणाचे भक्षण करोत. प्राणिमात्राला जीवरूपधन देण्यास योग्य व प्राशन केल्यानंतर शरीराला पुष्ट करणारी उदके या गाई पिओत. हे रुद्रदेवा, रक्षण करण्यास योग्य अशा पादसंचारी पशूला तू सुख दे. रुद्रदेवाला ही आहुती अर्पण असो. २ सारख्या उंचीच्या, निरनिराळ्या रंगाच्या व एकाच जातीच्या ज्या गाई आहेत, आहवनीय इत्यादि रूपाने असणारा अग्नी इष्टीच्या निमित्ताने ज्या गाईंची गंगा, यमुना, सरस्वती अशा प्रकारची नांवे जाणतो आणि अंगिरस महर्षींनी आपल्या तपश्चर्येच्या सामर्थ्याने ज्या गाई या भूमीवर स्थापन केल्या आहेत, त्या गाईना, हे पर्जन्यदेवा, तू जनदेवतांच्यापासून अत्यंत सुख दे. पर्जन्यदेवाला ही आहुती अर्पण असो. ३ ज्या गाई केवळ देवांच्यासाठीच शरीर धारण करून या भूमीवर आल्या

आहेत, ज्या गाईंची निरनिराळी रूपे आणि कमी जास्त दूध देण्याचे प्रमाण सोमदेव जाणतो, तसेच आपल्या ठिकाणच्या भरपूर दुधाने प्राणिमात्राला सुख देणाऱ्या व पुष्कळ वासरांनी युक्त अशा ज्या गाई आहेत, त्या सर्व गाईंना, हे इंद्रदेवा आमच्यासाठी आमच्या गोशाळेमध्ये आणून पोचव. इंद्रदेवाला ही आहुती अर्पण असो. ४ प्रजापतिदेवाने सर्व देव व सर्व पितर यांच्याशी एकमत झालेल्या व अनेकवार ज्यांचे गुणवर्णन मी केले आहे, अशा या गाई मज यजमानाला ज्या अर्थी दिल्या आहेत, त्या अर्थी तोच प्रजापतिदेव, या गाई जेणेकरून भरपूर दूध आम्हाला देऊन आम्हाला कल्याणकारक होतील असे करून आमच्या गोशाळेत आणून पोचवो. आम्ही त्या गाईंच्या वासरांमध्ये सदैव मिळून मिसळून राहू. प्रजापतिदेवाला ही आहुती समर्पण असो. ५ अश्वाच्या पुढच्या दोन पायांपैकी या उजव्या पायाच्या ठिकाणी असलेल्या स्थिरतेला ही आहुती अर्पण असो. ६ अश्वाच्या पाठीमागच्या दोन पायांपैकी या उजव्या पायाच्या ठिकाणी असणाऱ्या विशेष स्थिरतेला ही आहुती समर्पण असो. ७ मागच्या दोन पायांपैकी या डाव्या पायाच्या ठिकाणी स्थिरतेने प्राप्त झालेल्या रमणीयतेला ही आहुती अर्पण असो. ८ पुढच्या दोन पायांपैकी या डाव्या पायाच्या ठिकाणी अत्यंत स्थिरतेने प्राप्त झालेल्या रमणीयतेला ही आहुती अर्पण असो. ९ महनीय, सत्कर्म करणाऱ्या पुरुषांचे मातेप्रमाणे रक्षण करणारी, सत्याचे पालन करणारी, पुष्कळ राजांनी पालन केलेली, सर्वदा जरारहित, विस्तीर्ण गती असलेली, उत्कृष्ट सुखाने युक्त, स्वकर्तव्याचे ठिकाणी सुखाने प्रवृत्त होणारी अशी जी अदिती देवी, तिलाच आम्ही आमच्या संरक्षणासाठी उत्कृष्ट रीतीने बोलावीत आहोत. १० उत्कृष्ट प्रकारे तारणारी, विस्तीर्ण, प्रकाशमान, चिरकाल टिकणारी, उत्कृष्ट सुखांनी युक्त, उत्कृष्ट कर्मांचे ठिकाणी सुखाने प्रवृत्त होणारी, शत्रूंच्या पासून उत्तमप्रकारे रक्षण करणारी, पापरहित, आणि कोठेही छिद्र नसलेली जणू देवनिर्मित नावच, अशा या अखंडनीय भूमीवर आम्ही आरूढ झालो आहोत. (अनुवाक १७).

१ हे ब्रह्मा, जन्मानंतर होणारे ज्ञान जन्मापूर्वी कोठे असते.? अत्यंत अभिलाषा करण्यायोग्य अशी कोणती वस्तू आहे.? पांढरा व काळा या दोन रंगाचे मिश्रण असणारी कोणती वस्तू आहे? त्याचप्रमाणे अत्यंत शुभ्र अशा प्रकाशाने युक्त अशी कोणती वस्तू आहे?. २ हे होत्या, जन्मानंतर

होणारे ज्ञान जन्मापूर्वी द्युलोकात असते. अश्व हीच अत्यंत अभिलाषा करण्यायोग्य वस्तू आहे. आणि म्हणूनच राजे लोक हरप्रयत्नाने अश्वाचे संपादन करीत असतात. अंधकाराचा काळा व नक्षत्रांचा पांढरा या दोन रंगाचे मिश्रण रात्रीच्या ठिकाणी असते. सूर्यप्रभा ही अत्यंत शुभ्र अशा प्रकाशाने युक्त असते. ३ निरलसपणाने सर्वदा एकटाच कोण फिरत असतो? काही दिवस नाहीसा होऊन पुन्हा कोण उत्पन्न होतो? थंडीपासून होणारी पीडा निवारण करणारे औषध कोणते? नानाप्रकारची बीजे पेरण्याला योग्य असे विस्तृत स्थल कोणते? ४ निरलसपणाने सर्वदा सूर्य हा एकटा फिरत असतो. कृष्णपक्षात नाहीसा होऊन चंद्र हा शुक्लपक्षात पुन्हा उत्पन्न होतो. योग्य असे स्थल म्हणजे ही पृथ्वी होय. ५ पृथ्वीच्या विस्ताराची अंतिम मर्यादा कोणती, हे मी तुला विचारतो. अखिल जगाला आधारभूत असा कोण आहे? असे मी तुला विचारतो. पुरुषत्वाने अधिक असणाऱ्या अश्वाच्या ठिकाणी असणाऱ्या वीर्याप्रमाणे सारभूत अशी कोणती वस्तू आहे.? हे मी तुला विचारतो. त्याचप्रमाणे अक्षररूपाने व्यक्त होणाऱ्या वाणीचे विशेष संरक्षण करणारी वस्तू कोणती ? हे मी तुला विचारीत आहे. ६ वेदी हीच पृथ्वीच्या विस्ताराची अंतिम मर्यादा आहे, असे म्हणतात. यज्ञ हाच अखिल जगाला आधारभूत असा आहे. सर्व प्राण्यांचा इहपरलोकी संचार यज्ञाच्या आधीन असतो, असे विद्वान् म्हणतात. पुरुषत्वाने अधिक असलेल्या अश्वाच्या वीर्याप्रमाणेच सारभूत असा 'सोम' आहे, असे म्हणतात. पुरुषात्वाने अधिक असलेल्या अश्वाच्या वीर्याप्रमाणेच सारभूत असा 'सोत' आहे, असे म्हणतात. मंत्रसमुदायरूप वेद हाच अक्षररूपाने व्यक्त होणाऱ्या वाणीचा विशेषत्वाने संरक्षक आहे. (अनुवाक १८)

१ हे अंबे, हे अंबालि आणि हे अंबालिके (अशा नांवांनी प्रतिप्रस्थात्याने हाक मारून बोलाविलेल्या तिघी राजपत्न्यांपैकी मुख्य असलेली पट्टराणी म्हणते), कोणीही पुरुष माझा रतिसुखोपभोग घेण्याकरता मला एकांती घेऊन जात नाही. हा बिचारा अश्वही झोपला आहे. २ 'कांपील' नांवाचे अत्यंत मौल्यवान वस्त्र परिधान करणाऱ्या व उत्कृष्ट गुह्येन्द्रियुक्त अशा हे राजमहिषि, तू आणि हा अश्व अशी दोघेही स्वर्गसदृश अशा या ठिकाणी हे रेशमी वस्त्र पांघरून घ्या. आणि नंतर त्या अश्वाला असे म्हण की, हे अश्वा, गर्भधारण करविणाऱ्या तुझ्या अगदी संमुख राजाची मुख्य राणी असलेली मी आलेली आहे तरी

तूही आता गर्भधारण करणाऱ्या माझ्या अगदी संमुख ये. ३ हे अश्वा, तू आणि मी आपापले दोनही पाय आता पसरू. आणि माझे दोन्ही पाय व तुझ्या मागच्या बाजूचे दोन्ही पाय एकमेकांच्याशी चिकटतील असे करू. ४ आपणा दोघांमध्ये वीर्यसिंचन करणारा तू माझ्या गुह्येन्द्रियाचे ठिकाणी वीर्यसिंचन कर. आणि वीर्यधारण करणारी मी तू सिंचित केलेले वीर्य आपल्या गुह्ययेन्द्रियाचे ठिकाणी धारण करीन. ५ हे अश्वा, तुझ्या गुदद्वाराचा मागचा भाग या राजपत्नीच्या दोन्ही मांड्यांवर ठेव आणि उन्नत झालेले तुझे शिस्न या राजपत्नीच्या योनीत प्रविष्ट कर. ६ स्त्रियांना जीवनाचा व संभोगसुखाचा लाभ देणाऱ्या त्यांच्या जननेंद्रियात जोराने प्रवेश करणाऱ्या, प्रविष्ट झाल्यानंतर त्यांना सुखप्रद अशी हालचाल करणाऱ्या तुझ्या शिस्नाने या राजस्त्रीच्या काळसर अशा जननेंद्रियाच्या विशिष्ट स्थली वीर्य सिंचित होईल अशा प्रकारे तू आपल्या शिस्नाचा या राजपत्नीच्या जननेंद्रियावर आघात कर. ७ 'हे अंबे, हे अंबालि आणि हे अंबिके' अशा नांवांनी कोणीही पुरुष संभोगेच्छू अशा मला संभोगासाठी जवळ करीत नाही. आणि हा अश्वही झोपला आहे. ८ एखादा लाकूडतोड्या डोंगरावर तोडलेल्या लाकडांची मोळी बांधल्यावर ती घरी नेण्यासाठी मस्तकावर घेताना जशी भूमीपासून वर उचलतो, त्याप्रमाणे हे राजमहिषि, तू आपली योनी वर उचलून धर, म्हणजे खळ्यावरील धान्य सुपाने पाखडता पाखडता श्रमित झालेल्या शेतकऱ्याला थंड वाऱ्याची झुळुक लागताच जसा हर्ष होतो, तसाच तिला हर्ष होईल. ९ 'हे अम्बे हे अंबालि, आणि हे अंबिके' अशा नांवांनी कोणीही पुरुष भोगासाठी आर्त झालेल्या मला भोग देण्यासाठी जवळ बोलावीत नाही. हा अश्वसुद्धा मला भोग न देता निजूनच राहिला आहे. १० एखादी हरिणी रात्रीच्या वेळी शेतात शिरून तेथे असलेले सातूंचे पीक खाऊन तृप्त झाली म्हणजे अरण्यात गेलेल्या पुष्ट अशा पशूला जाणेनाशी होते, त्याचप्रमाणे हे राजमहिषि, देवतारूपाने तुझा उपयोग घेऊन दृष्टीआड झालेल्या अश्वाला तू जाणत नाहीत. हे राजमहिषि, उच्चवर्णी व जारकर्मी अशा एखाद्या पुरुषाने आपला त्याग केल्यामुळे दुःखी झालेली त्याची शूद्र स्त्री आपल्या धन्याने पुन्हा आपला स्वीकार केल्यानेच जशी अत्यंत संतुष्ट होते, आणि मग स्वतःच्या पोषणाचे किंवा धनसंपत्तीचेही महत्त्व मानीत नाही, त्याचप्रमाणे मनुष्यशरीरधारी अशी तू देवतारूपी अश्वाने तुझा स्वीकार केला आहे एवढ्यानेच संतुष्ट हो. तुच्छ अशा मानुष भोगाची

अपेक्षाच करू नकोस. ११ 'हे अम्बे, हे अंबालि, आणि हे अंबिके' अशा नांवांनी कोणीही पुरुष मला भोग देण्यासाठी जवळ बोलावीत नाही. हा अश्वसुद्धा झोपला आहे. १२ एखादी शकुंतिका म्हणजे शकुंतनामक पक्षिजातीची जी स्त्री असते, ती भोगाच्या इच्छेने 'आहल' असा शब्द करीत करीत पुरुषाच्या म्हणजे शकुंत पक्ष्याच्या एकसारखी मागे लागलेली असते. तिची भोगतृप्ती केव्हाही होत नाही. हे राजमहिषि, त्या शकुंतिकेसारखीच तू भोगेच्छेविषयी तृप्त होत नाहीस हे बरे नव्हे. एखादी गर्भिणी स्त्री पुरुषाने आपल्या योनीमध्ये सिंचित केलेले रेत गर्भरूपाने आपल्या गर्भाशयात धारण करून संतुष्ट होते. त्याचप्रमाणे देवतारूपी अश्वाने तुझा स्वीकार केला, तुला जवळ घेतली एवढ्यानेच तू संतुष्ट व्हावेस हेच तुला योग्य होय. १३ 'हे अंबे, हे अंबालि आणि हे अंबिके' अशा नांवांनी भोगाविषयी उत्सुक असलेल्या मला कोणीही जवळ बोलावीत नाही. हा अश्व देखील झोपून राहिला आहे. १४ हे राजमहिषि, तुझी आई आणि तुझा पिता ही दोघे जेव्हा वृक्षाच्या अग्रभागी असणाऱ्या शाखांचा पलंग करून त्यावर निजली, तेव्हा तुझा पिता तुझ्या आईला म्हणाला की, हे पहा मुठीसारखे जाड असे हे माझे शिस्न मी आता तुझ्या योनीत प्रविष्ट करतो. आणि त्याच प्रमाणे त्याने आपले शिस्न तुझ्या आईच्या योनीत प्रविष्ट केले. या अश्वानेही आपले शिस्न तुझ्या योनीत प्रविष्ट केले आहे. तेव्हा आता तू त्या अश्वाला सोडून ऊठ. १५ जयशील अश्वाला व्यापून राहिलेल्या आणि अन्नवान् अशा 'दधिक्रावा' नांवाच्या म्हणजे दह्याची अत्यंत आवड असलेल्या एका देवाच्या प्रीत्यर्थ मी कर्म करीत राहिलो आहे. तो दधिक्रावा देव सुवासिक असे अनेक पदार्थ आम्हास भक्षणासाठी देऊन आमचे मुख सुगंधयुक्त करो. आणि आमच्या आयुष्याची वृध्दी करो. १६ हे उदकांनो, तुम्ही सुखोत्पादक आहात त्या अर्थी तुमच्या रसाचा अनुभव आम्हाला सदैव मिळेल अशा ठिकाणी तुम्ही आम्हाला ठेवा. अत्यंत महनीय व अत्यंत रमणीय असे ब्रह्मस्वरूप आम्हाला दिसण्याकरिता आमच्या ठिकाणी योग्य ते सामर्थ्य उत्पन्न करा. १७ हे उदकांनो, प्रीतियुक्त अशा मातांप्रमाणे असणारे तुम्ही तुमच्या ठिकाणी जो मधुर रस आहे, त्या रसाचे, येथे विद्यमान असलेल्या आम्हाला विभागी करा. १८ हे उदकांनो, ज्या रसाच्या साठ्यापैकी एका अंशाने तुम्ही अखिल जगाची तृप्ती करता, त्या तुमच्या रसाविषयी आम्ही पूर्ण तृप्ततेला प्राप्त होऊ. आणि हे उदकांनो

आम्हाला तुम्ही प्रजोत्पादनसमर्थ करा. (अनुवाक १९).

१ अश्वाच्या पृष्ठभागापैकी पुढच्या बाजूस असणाऱ्या त्याच्या केसांच्या ठिकाणी ओवल्या जाणाऱ्या भूलोकरूपी सुवर्णमण्यांना ही आहुती समर्पण असो. २ अश्वाच्या पृष्ठभागापैकी मागच्या बाजूस असणाऱ्या त्याच्या केसांच्या ठिकाणी ओवल्या जाणाऱ्या अंतरिक्षलोकरूपी रजतमण्यांना ही आहुती अर्पण असो. ३ अश्वाच्या कमरेच्या मागे असणाऱ्या व शेपटीच्या ठिकाणच्या त्याच्या केशांमध्ये ओवल्या जाणाऱ्या स्वर्गलोकरूपी शंखमण्यांना ही आहुती समर्पण असो. ४ हे अश्वा, वसू नांवाचे आठ देव गायत्री छंदाने युक्त होऊन तुझ्या मुखाच्या ठिकाणी गुग्गुळाचे तेल चोळोत. ५ हे अश्वा, रुद्र नांवाचे अकरा देव त्रिष्टुप् छंदाने युक्त होऊन तुझ्या शरीराच्या मध्यभागाचे ठिकाणी कुसुंभाचे तेल चोळोत. ६ हे अश्वा, आदित्य नांवाचे बारा देव जगती छंदाने युक्त होऊन तुझ्या शरीराच्या पश्चात् भागाच्या ठिकाणी नागरमोथ्याचे तेल चोळोत. ७ हे स्तुतिपाठका, पूर्वी ज्या मार्गाने वायू, इंद्राचे जणू प्रिय शरीरच अशा पर्जन्योदकाजवळ जाऊन पोचला, त्याच मार्गाने हा अश्व जाईल व त्याच ठराविक मार्गाने पुन्हा परत येईल, अशा प्रकारे तू शब्दोच्चार कर. ८ हवनशेषभूत अशा सातूंच्या लाह्या खाणाऱ्या, गोदुग्धादि रसांसहित अशा हुतशेष अन्नांचे भक्षण करणाऱ्या आणि आमच्या यज्ञाची केवळ मूर्तीच अशा हे अश्वा, आमच्याजवळ ये. हे अश्वशरीरगत देव हो, यवांच्यापासून आणि दुग्धादि गोरसापासून निष्पन्न झालेले अन्न तुम्ही सेवन करा. हे प्रजापते, सर्व देवांचा स्वामी असलेला तू देखील या अन्नाचे सेवन कर. ९ आदित्य व अग्नी यांच्या रूपाने संचार करणाऱ्या या अश्वाला आणि या अश्वाच्या रूपाने आसपास अवस्थित असणाऱ्या तिन्ही लोकांना देव रथाला जोडतात. आणि द्युलोकाचे ठिकाणी आपल्या प्रकाशाने चमकत राहणारी नक्षत्रे देवांनी रथाला जोडलेल्या या अश्वाला प्रकाशित करतात. १० रथाला जोडलेल्या या अश्वाला साहाय्यभूत असे सुंदर, किंचित् तांबूस वर्णाचे, धैर्यशील व रथात बसणाऱ्या मनुष्याला वाहून नेणारे दोन अश्वही रथाच्या दोन बाजूला देव जोडतात. ११ ध्वजरहित अशा या रथाला रथाची सजावट करणारे लोक उत्कृष्ट अशा ध्वजाने अलंकृत करोत. त्याचप्रमाणे रथाच्या निरनिराळ्या भागांचे ठिकाणी सुवर्णाचे अलंकार घालून ते त्याला अलंकृत करोत. हे अश्वा, उषःकालाच्या सूर्यकिरणांच्या प्रमाणेच चमकणाऱ्या सुवर्णकिरणांच्या योगाने

तू आता सुशोभित झाला आहेस. (अनुवाक २०).

१ प्राणाला ही आहुती अर्पण असो. २ व्यानसंज्ञक सर्वशरीरगत वायूला ही आहुती समर्पण असो. ३ अधोगतीने शरीरात संचार करणाऱ्या अपान वायूला ही आहुती अर्पण असो. ४ शरीरातील स्नायूंना ही आहुती अर्पण असो. ५ स्नायूंच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या नाडींना ही आहुती अर्पण असो. ६ स्नायूंच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या नाडींच्या पासून उत्पन्न होणाऱ्या उपनाडींना ही आहुती अर्पण असो. ७ शरीराच्या ठिकाणी असणाऱ्या हातापायांच्या पेऱ्यांना ही आहुती अर्पण असो. ८ निरनिराळ्या पेऱ्यांना जोडणाऱ्या सांध्यांना ही आहुती अर्पण असो. ९ अनेकविध शरीरांना ही आहुती समर्पण असो. १० यज्ञाला ही आहुती समर्पण असो. ११ यज्ञात दिल्या जाणाऱ्या दक्षिणांना ही आहुती समर्पण असो. १२ स्वर्गाला ही आहुती समर्पण असो. १३ विवक्षित अशा लोकांना ही आहुती समर्पण असो. १४ सर्व प्रकारच्या संततीला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक २१).

१ आरोहण करण्यासाठी ज्याच्या पाठीवर खोगीर चढविले आहे, अशा अश्वाला ही आहुती समर्पण असो. २ खोगीर पाठीवर चढविण्याच्या पूर्वावस्थेत असलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. ३ तोंडामध्ये लगाम दिलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. ४ तोंडामध्ये लगाम न दिलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. ५ रथास जोडलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. ६ रथाला न जोडलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. ७ रथाला यथायुक्त रीतीने जोडलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. ८ रथाला जोडल्यानंतर रथ वाहून नेण्यास उद्युक्त झालेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. ९ रथापासून मुक्त होत असलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. १० रथापासून पूर्णपणे मोकळ्या झालेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. ११ पाठीवर आरूढ झालेल्या स्वाराने चालू लागण्यासाठी इषारा दिलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. १२ इषाऱ्याप्रमाणे चालू लागणाऱ्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. १३ उत्तम चालीने चाल करीत असलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. १४ पुढे चालत असलेल्या स्वाराच्या मागोमाग धावत असलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. १५ पुढे चाललेल्या स्वाराला मागे टाकून पुढे धावणाऱ्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. १६ स्वेच्छेने चालत राहणाऱ्या अश्वाला ही आहुती समर्पण असो.

१७ स्वत:च्या इच्छेनुसार धावत असलेल्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. १८ धावता धावता स्वत:च्या लहरीप्रमाणे एका जागी उभ्या राहणाऱ्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. १९ सर्व प्रकारच्या अवस्थेत असणाऱ्या अश्वाला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक २२).

प्रपाठक ५

पूर्वी शिंगे नसलेल्या भुंड्या गाईंनी आपल्याला शिंगे उत्पन्न व्हावीत या इच्छेने संवत्सराच्या अनुष्ठानास प्रारंभ केला. अनुष्ठानाचे दहा महिने जेव्हा पूर्ण झाले, तेव्हा त्या गाईंच्या पैकी काही गाईंना शिंगे फुटली. तेव्हा आपल्या सत्राचे फळ आपणास मिळाले असे वाटून त्या शिंगे फुटलेल्या गाई सत्रातून उठल्या म्हणजे त्यांनी आपल्या सत्रानुष्ठानाची समाप्ती केली. ज्या गाईंना शिंगे फुटली नव्हती, त्यांनी आपले सत्र पुढे चालू ठेवले. संवत्सर पूर्ण होईपर्यंत त्यांचे अनुष्ठान झाले तरी त्यांना शिंगे फुटली नाहीत. तरी पण आपल्या संकल्पाप्रमाणे एक संवत्सरपर्यंत सत्रानुष्ठान पूर्ण केल्याचे फळ आपणास मिळाले, यातच संतोष मानून त्या उठल्या. त्यांनी आपले सत्र संपविले. सारांश, शिंगे उत्पन्न झालेल्यांनी आपल्या सत्राचे साफल्य झाल्याचा व शिंगे उत्पन्न न झालेल्यांनी आपल्या संकल्पानुसार संवत्सर पूर्ण होईपर्यंत अनुष्ठान घडल्याचा संतोष मानून आपल्या सत्रातून उत्थान केले म्हणजे सत्राची समाप्ती केली. गाईंनी सत्ररूपाने अनुष्ठित केलेला संवत्सर 'गोसत्र' या नांवाने प्रसिद्धीस आला. हे जाणून जे यजमान संवत्सर सत्राचे अनुष्ठान करतात, ते समृद्धीला प्राप्त होतात.

शिंगे न फुटलेल्या गाईंनी आपल्या हातून संवत्सराची पूर्णता होईपर्यंत सत्रानुष्ठान घडण्यातच समृध्दी मानली. त्यामुळेच त्यांना वर्षाऋतूचे दोन महिने अत्यंत सुखाचे गेले. कसलेही क्लेश न होता पावसाळ्याच्या त्या दोन महिन्यांत त्यांना अरण्यात संचार करणे शक्य झाले. कारण ज्या गाईंना शिंगे असतात त्यांना वर्षाऋतूत होणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्याने युक्त अशा तीव्र पर्यन्यवृष्टीमुळे फार क्लेश भोगावे लागत असतात. त्यांच्या उंच शिंगावरून पाण्याचे ओघळ एकसारखे त्यांच्या मुखांवर वाहत येतात आणि त्यामुळे त्यांना वारंवार मुख वाकवून संचार करावा लागतो. आपल्या मस्तकावर असलेल्या शिंगांच्या ओझ्याची त्यांना पीडाच होत असते. शृंगरहित अर्थात् भुंड्या गाईंना अशा प्रकारचे

क्लेश भोगावे लागत नाहीत. शिंगांचे ओझे त्यांच्या मस्तकावर नसल्याने त्या भर पावसाळ्यात सुखाने संचार करतात. एवं च, वर्षाऋतूमध्ये प्राप्त होणारे सुख हेच त्या शृंगरहित अशा गाईंना संवत्सरपूर्तीपर्यंत केलेल्या अनुष्ठानाने लाभलेले फल होय.

यास्तव, संवत्सरसत्राचे अनुष्ठान करणाऱ्या यजमानांपैकी जो जो यजमान आपल्या घरी अग्निहोत्रादि जे जे कर्म करतो, त्यात काही वैगुण्य झाले, तरी देखील ते ते कर्म यथासांग केल्यासारखे होते, अकाली केलेले कर्म उक्त काली केल्यासारखे होते, इतकेच नव्हे तर फलाची अपेक्षा न करता केलेले कर्मही फलप्रद होते.

जे यजमान संवत्सरसत्राच्या अनुष्ठानास प्रारंभ करतात, ते जणू काय दोन्ही हातांनी पोहत पोहतच समुद्र तरून जाण्याचा प्रयत्न करतात. समुद्र तरून जाऊ इच्छिणारा जो कोणी समुद्राचे पैल तीर पाहत नाही, तो समुद्रातून बाहेर येण्यास असमर्थ होतो. संवत्सर सत्र हे समुद्रासारखे अपार आहे. संवत्सरसत्ररूपी समुद्राचे प्रायणीय अतिरात्र हे अलीकडील तीर असून उदयनीय अतिरात्र हे पैलतीर आहे. हे जाणून जे यजमान संवत्सर सत्राचा उपक्रम करतात ते उद्वेगरहित अशा चित्ताने समाप्तिसंबंधी ऋचेपर्यंतचा पल्ला गाठतात. म्हणजे कोणतेही आयास न होता संवत्सरसत्ररूप समुद्र तरून पार जातात.

संवत्सरसत्राच्या प्रारंभी होणारा प्रायणीय अतिरात्र हा भूलोकरूप असून शेवटी होणारा उदयनीय अतिरात्र हा द्युलोकरूप आहे. प्रायणीय अतिरात्र हा मनोरूप आहे. तर उदयनीय अतिरात्र हा वाग्रूप आहे. पहिला प्रायणीय अतिरात्र हा प्राणरूप असून पुढे शेवटी होणारा उदयनीय अतिरात्र हा अपानरूप आहे. प्रायणीय अतिरात्र हा प्रारंभरूप आहे व उदयनीय अतिरात्र हा समाप्तिरूप आहे.

संवत्सरसत्राच्या प्रारंभी होणारा प्रायणीय अतिरात्र हा ज्योतिष्टोमरूप असून तो वैश्वानरनामक देवाने दृष्ट केला आहे. यास्तव, या ज्योतिष्टोमरूप अतिरात्राचे अनुष्ठान केले असता तो स्वर्गलोकाचा मार्ग आक्रमण करणाऱ्या यजमानांना स्वर्गलोक दिसण्यासाठी प्रकाशरूपी मशाल धारण करण्याला कारणभूत होतो.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी चतुर्विंशतिस्तोमयुक्त असा 'उक्थ्य' संज्ञक क्रतू करावा. हा क्रतू पुढे सांगितल्या जाणाऱ्या अभिप्लव षडहांच्या आवृत्तींनी अनुष्ठित केल्या जाणाऱ्या मासांपैकी पहिला असल्यामुळे या क्रतूस प्रायणीय किंवा आरंभणीय अशी संज्ञा आहे. संवत्सरामध्ये चोवीस अर्धमास अंतर्भूत झालेले असतात. या अर्धमासांच्या ठिकाणी संख्यासाम्य असलेल्या चतुर्विंशतिस्तोमयुक्त उक्थ्य क्रतूचे अनुष्ठान केले असता सत्रकर्ते यजमान अर्धमासांच्या द्वारा संवत्सराच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. म्हणजे संवत्सर पूर्ण होईपर्यंत स्थैर्याने सत्रानुष्ठान करण्यास समर्थ होतात. या क्रतूमध्ये पंधरा स्तोत्रांचे म्हणजे सामांचे गान केले जात असून त्यांपैकी प्रत्येक स्तोत्रात चोवीस चोवीस याप्रमाणे एकंदर तीनशे साठ 'स्तोत्रिया' संज्ञक ऋचा गाइल्या जातात. संवत्सराच्या ठिकाणी तीनशे साठ रात्रीच अन्तर्भूत झालेल्या असतात. एवं च, चोवीस अर्धमासात्मक आणि तीनशे साठ रात्र्यात्मक अशा संवत्सराच्या दोन्ही स्वरूपांशी संख्यासाम्य असलेल्या उक्थ्य क्रतूचे अनुष्ठान करणारे यजमान संवत्सराच्या दोन्ही स्वरूपांना प्राप्त होतात.

आता सांगितलेले प्रायणीय अतिरात्र व आरंभणीय उक्थ्य हे दोन क्रतू केल्यानंतर सत्रकर्त्यांनी स्थिरतेने व निर्विघ्नपणे सत्र समाप्त होण्यासाठी ज्योती, गौ व आयू हे तीन व त्यापुढचे आयू, गौ व ज्योती हे तीन दिवस अनुक्रमाने अनुष्ठित करावेत. अनुलोम क्रमाने पहिले तीन व प्रतिलोम क्रमाने पुढचे तीन मिळून सहा दिवस होत असून संवत्सरामध्ये सहा क्रतू अंतर्भूत झालेले असतात. अर्थात् क्रतूंच्याशी संख्यासाम्यत्वाने एकरूप असलेल्या पूर्वोक्त सहा दिवसांच्या आवृत्तिरूप अनुष्ठानाने सत्रकर्ते यजमान संवत्सराच्या ठिकाणी प्रतिष्ठित होत असतात. पूर्वोक्त सहा दिवसांमध्ये गोष्टोम व आयुष्टोम हे दोन क्रतू मध्यवर्ती अनुष्ठित केले जात असल्यामुळे ते संवत्सरामध्ये मिथुन म्हणजे दांपत्यभाव निर्माण करतात. आणि तो दांपत्यभाव यजमानांना प्रजोत्पादनसमर्थ करण्यास कारणभूत होतो. षडहाच्या आरंभी व शेवटी असा दोन्ही बाजूंनी ज्योतिष्टोम केला जात असतो. षडहाच्या आद्यंती केले जाणारे ज्योतिष्टोम क्रतूचे अनुष्ठान म्हणजे प्रतिबद्ध अशा छंदांचे जणू विमोचन म्हणजे सुटकाच होय. आद्यंती केलेल्या या ज्योतिष्टोमाच्या अनुष्ठानाने गायत्र्यादि छंद निष्प्रतिबंधतेला अर्थात् मोकळेपणाला प्राप्त होतात. शिवाय दोन बाजूला तेवत राहणाऱ्या जणू दोन दीपांनी युक्त अशा षडहाच्या अनुष्ठानप्रभावाने

प्रकाशित होणाऱ्या स्वर्गलोकाच्या ठिकाणी यजमान सुखाने प्राप्त होतात.

जे यजमान सत्राचे अनुष्ठान करतात, ते कोणत्या मार्गाने स्वर्गलोकाला जातात? असा काही ब्रह्मवादी प्रश्न उपस्थित करतात. परंतु, अभिज्ञ पंडिताने, 'देवयान' मार्गाने सत्रकर्ते यजमान स्वर्गलोकाला जातात, असे त्यांना उत्तर द्यावे. गायत्री, त्रिष्टुप् व जगती हे छंद म्हणजेच देवयान, अर्थात् देवांच्या जाण्यायेण्याचा मार्ग होय. ज्योतिष्टोम हा गायत्रीछंदरूप, गौ किंवा गोष्टोम हा त्रिष्टुप्छंदरूप आणि आयुष्टोम हा जगतीछंदरूप होय. सारांश, हे जे स्तोमसंज्ञक तीन क्रतू वर्णित केले, त्यांचे अनुष्ठान केले असता सत्रकर्ते यजमान छंदोरूप देवयान मार्गाने स्वर्गलोकाला जातात. षडहापैकी प्रत्येक दिवशी बृहत् किंवा रथंतर या दोहोंपैकी कोणत्या तरी एकाच सामाचे पृष्ठस्तोत्र म्हणून गान करावे. कारण देवलोक हा पक्षपातरहित, अर्थात् सर्वसमान असल्यामुळे तो सामरूप आहे. यास्तव, एकाच सामाच्या गानाने पृष्ठ्य षडहातील सर्व दिवसांचे अनुष्ठान करणारे यजमान देवलोकापासून केव्हाही दूर जात नाहीत.

षडहातील प्रत्येक दिवशी पृष्ठस्तोम म्हणून एकाच सामाचे गान करावयाचे असले तरी त्याला आधारभूत असणाऱ्या ऋचा दररोज निरनिराळ्या योजाव्यात. ऋचा या मनुष्यलोकरूप आहेत. कार्यानुष्ठानद्वारा प्राप्त होणाऱ्या देवलोकाचा ज्याप्रमाणे मनुष्यलोक हा आधार आहे, त्याचप्रमाणे सामाचा ऋचा हा आधार आहे. यास्तव, पृष्ठस्तोत्राच्या ऋचा दररोज निरनिराळ्या योजून षडहाचे अनुष्ठान करणारे यजमान मनुष्यलोकाहून अन्य अशा देवलोकाच्या ठिकाणी सुखाने आरोहण करतात.

दररोज 'ब्रह्मसाम' म्हणून जे साम गावयाचे असते ते 'अभिवर्त' नांवाचे गावे. म्हणजे ते स्वर्गलोकाची सर्व बाजूंनी प्राप्ती करून देण्याला कारणभूत होते.

विषुवान् या नांवाचा जो दिवस असतो त्याच्या पूर्वी 'स्वरसाम' नांवाचे तीन दिवस अनुष्ठित करावयाचे असतात. त्या तीन दिवसांच्या अगोदर 'अभिजित्' या नांवाचा एक दिवस अनुष्ठित करावा. म्हणजे तो यजमानांना स्वर्गलोकप्राप्तिरूप विजय संपादन करून देण्याला कारणभूत होतो.

विषुवान्संज्ञक दिवसानंतर स्वरसाम नांवाचे जे तीन दिवस अनुष्ठित

करावयाचे असतात, त्यांनंतर 'विश्वजित्' नांवाचा एक दिवस अनुष्ठित करावा. म्हणजे तो अखिल विश्वावर जय मिळवून देण्यास कारणभूत होतो.

संवत्सरसत्रातील प्रत्येक महिन्यामध्ये अभिप्लव षडहांच्या आवृत्ती केल्यानंतर 'पृष्ठ्य षडह' विषयक सहा दिवस अनुष्ठित करावेत. त्याचप्रमाणे प्रत्येक महिन्यामध्ये 'अतिग्राह्य' संज्ञक सोमग्रहांचेही ग्रहण करावे. अशा प्रकारे केले जाणारे अनुष्ठान संवत्सरसत्रातील प्रत्येक महिन्याच्या ठिकाणी वीर्य संपादन करीत असून संवत्सरातील सर्व मासांच्या ठिकाणी यजमानांना प्रतिष्ठा प्राप्त होण्याला कारणभूत होते. प्रत्येक महिन्याच्या उत्तरभागात 'पृष्ठ्य षडह' विषयक सहा दिवस अनुष्ठित केले जातात आणि त्यामुळेच सर्व ओषधी आपल्या उत्तर भागांच्या ठिकाणी फल धारण करीत असतात. (अनुवाक १).

पूर्वी शृंगरहित अशा गाईंनी आपणास शिंगे फुटावीत या इच्छेने पुढे सांगितल्या जाणाऱ्या संवत्सरसत्राचे अनुष्ठान केले. दहा महिने अनुष्ठान झाल्यानंतर काही गाईंना शिंगे फुटली. तेव्हा त्या गाई परस्परांना म्हणू लागल्या की, शृंग प्राप्तीच्या ज्या एका इच्छेने आपण सत्रानुष्ठानासाठी एका जागी बसून राहिलो, ती इच्छा आपण सफल करून घेतली आहे. त्या अर्थी आपण आता सत्रानुष्ठानातून उठावे. याप्रमाणे परस्परांचा संवाद झाल्यानंतर शिंगे फुटलेल्या त्या अर्ध्या गाई कृतार्थ बुध्दीने सत्रातून उठल्या.

नंतर शिंगे न फुटलेल्या ज्या अर्ध्या गाई उरल्या, त्यांमध्ये दोन तट निर्माण झाले. काही गाईंना, आपणास शिंगे फुटली पाहिजेत हीच इच्छा होती. काही गाईंना वाटे की, शिंगे फुटण्यातच काय विशेष आहे?. उदरपूर्तीला पुरेसे अन्नच आपण संपादन करावे. शेवटी शृंगप्राप्तीची इच्छा असलेल्या व शिंगांची अपेक्षा न करता उदरपूर्तीला पुरेसे अन्न संपादन करण्याची इच्छा करणाऱ्या अशा दोन्ही तटांतील गाई एकत्र झाल्या आणि त्या सर्वांनी आपआपसात विचारविनिमय करून असे ठरविले की, संवत्सरपूर्तीमध्ये उणे असलेले अर्थात् उर्वरित असलेले दोन महिने आपण अनुष्ठित करावेत आणि संवत्सर पूर्ण झाल्यानंतरच सत्रानुष्ठानातून उठावे. त्याप्रमाणे त्या दोन्ही तटांतील गाईंनी उरलेल्या दोन्ही महिन्यांचे अनुष्ठान करून संवत्सरसत्राची पूर्णता केली. ज्यांना शृंगप्राप्तीविषयी श्रध्दा होती त्यांना त्यांच्या श्रद्धेनुसार बाराव्या महिन्यात शिंगे फुटली. ज्यांना शिंगांच्या संबंधी अपेक्षा नव्हती,

त्यांना शिंगे न फुटता त्या तशा भुंड्याच राहिल्या. मात्र त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना उदरपूर्तीला पुरेसे अन्न भरपूर मिळाले. एवं च, ज्या गाईंनी उरलेल्या दोन महिन्यांचे अनुष्ठान करून संवत्सरसत्र पूर्ण केले, त्यांना त्यांच्या त्यांच्या इच्छेप्रमाणे प्राप्त झालेल्या फलाच्या योगाने त्या सर्व गायी समृद्ध झाल्या.

दहाव्या महिन्यात शिंगे फुटलेल्या ज्या गाईंनी पुढच्या दोन महिन्यांचे अनुष्ठान न करता सत्रातून उत्थान केले, त्यांना कशी तरी शिंगे फुटली होती. पण ज्या गाईंनी शिंगे फुटण्याच्या तीव्र इच्छेने उरलेल्या दोन महिन्यांचे अनुष्ठान केले, त्यांना बाराव्या महिन्यात जी शिंगे फुटली ती रमणीय अशी होती.

आतापर्यंत वर्णित केलेल्या अर्थवादावरून संवत्सरसत्रामध्ये वैकल्पिक असे दोन पक्ष निर्माण झाल्याचे दिसून येईल. दहाच महिने अनुष्ठान करण्याचा एक पक्ष व बारा महिने अनुष्ठान करण्याचा दुसरा पक्ष. अर्थात् या दोन्ही पक्षांचे स्वरूप जाणणारा जो यजमान या दोहोंपैकी कोणत्या तरी एका पक्षाचा अवलंब करून अनुष्ठान करील तो आपल्या इच्छेनुरूप प्राप्त झालेल्या फलाच्या योगाने समृद्ध होईल.

संवत्सरसत्राचा आरंभ करून बारा महिने पूर्ण होईपर्यंत अनुष्ठान करणारांना इच्छित फळ प्राप्त होणे हे ठीक आहे. पण दहाच महिन्यांचे जे अनुष्ठान करतात त्यांना इच्छित फलांची प्राप्ती कशी व्हावी? अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे. परंतु, या शंकेचे समाधान असे की, दहा महिन्यांचे अनुष्ठान करणारे यजमान संवत्सरपूर्तीच्या दृष्टीने अल्पकालिक अनुष्ठान करतात हे खरे, पण शास्त्राने तो पक्ष विकल्परूपाने मान्य केला आहे. यामुळे त्या पक्षाचे अवलंबन करणारे यजमान शास्त्रीय अशा मार्गानेच अनुष्ठान करीत असल्यामुळे त्यांचे अनुष्ठान फलद्रूप होत असते. लोकव्यवहारामध्ये देखील राजमार्गाने जाणारे पथिक मार्ग चालताना अल्प स्वल्प स्खलन जरी झाले तरी अपेक्षित असलेल्या गावी जाऊन पोचतातच. तोच न्याय येथे लागू आहे.

सारांश, हे 'गवामयन' नांवाचे संवत्सरसत्र दहाव्या महिन्यात समाप्त केले जावो किंवा बारा महिन्यांनी समाप्त केले जावो, ते फलद्रूपच होत असते. या सत्राच्या अनुष्ठानाने गाईसारख्या तिर्यक् जातीच्या पशूंना सुद्धा

ते लाभदायक झाले, मग ब्राह्मणादिकांना ते फलसमृध्दीचा लाभ करून देणारे होईल, हे काय सांगावयास पाहिजे? (अनुवाक २).

संवत्सरसत्रातील सर्वच महिन्यांत पृष्ठ्य षडहाचे अनुष्ठान करू नये. पहिल्या, मधल्या व शेवटच्या अशा तीनच महिन्यांत 'पृष्ठ्य षडह' विषयक सह दिवस अनुष्ठित करीत जावेत.

कोणी असे म्हणतात की, धार काढणारे जे गवळी एका दिवसात ज्या एखाद्या गाईची तीन वेळ धार काढण्यास प्रवृत्त होत असतात, त्यांना ती गाय पहिल्या खेपेस पुष्कळ दूध देते. पण पुढच्या दोन्ही वेळी ती थोडे थोडेच दूध देते. असा अनुभव असताना, जे गवळी, ज्या गाईची धार एका दिवसात बारा वेळ काढण्यास प्रवृत्त होतात, त्यांना ती गाय तितक्या वेळ कोठून दूध देणार? दूध देण्याचा संभव नसताना धार काढण्याचा खटाटोप करणे व्यर्थ होय. पृष्ठ्य षडह हा गोरूपच आहे. यास्तव, एका संवत्सरात तीन महिने त्याचे अनुष्ठान करणे, हे एका गाईची एका दिवसात तीनदा धार काढण्यासारखेच अनुचित आहे. मग संवत्सरसत्रातील बाराही महिन्यांमध्ये पृष्ठ्य षडहाचे अनुष्ठान करणे, हे एका गाईची एका दिवसात बारा वेळा धार काढण्याच्या खटाटोपाप्रमाणेच अत्यंत अनुचित होईल, हे अगदी उघड आहे. यास्तव, अभिज्ञांचे असे म्हणणे आहे की, संवत्सरसत्राचे अनुष्ठान करताना शेवटच्या बाराव्या महिन्यात शेवटी एकदाच पृष्ठ्य षडहाच्या संबंधीचे सहा दिवसांचे अनुष्ठान करावे. इतर सर्व महिन्यांमध्ये अभिप्लव षडहाचे अनुक्रमे पांच वेळ अनुष्ठान करूनच त्या त्या महिन्याची पूर्तता करावी. असे केले असता शेवटी एकवार केल्या जाणाऱ्या प्रभूतसारसहित पृष्ठ्य षडहाच्या अनुष्ठानाच्या प्रभावाने सत्रकर्ते यजमान यथासांग संवत्सरसत्ररूप यज्ञाला प्राप्त होतात.

जे यजमान संवत्सरसत्राचे अनुष्ठान करतात, ते जणू काय ऐलतीराचा व पैलतीराचा थांगच लागत नसलेला समुद्र दोन्ही हातांनी पोहत पोहत तरून जाण्याची इच्छा करतात. पण त्यांची ती इच्छा पूर्ण होणे अशक्य आहे. तथापि, त्या यजमानांनी जर बृहत् व रथंतर या दोन सामांच्या आधाराने अनुक्रमाने पृष्ठ स्तोत्रांचे संपादन केले तर त्यांनी संवत्सरसत्ररूपी अपार समुद्र तरून जाण्याचे साधन अशी एक नावच संपादन केल्यासारखे

होईल. आणि अशा रीतीने बिनचूकपणे बृहत्-रथंतररूप दोन पृष्ठ स्तोत्रांचा नावेप्रमाणे अवलंब करून अनुष्ठान करणारे यजमान संवत्सरसत्ररूपी यज्ञाच्या समाप्तिरूपी प्रतिष्ठेला प्राप्त होतील.

दुसऱ्याच एखाद्या गाईचे वासरू कांसेजवळ नेले, तरीसुद्धा जिची धार काढणे शक्य होते, अशा गाईस 'संधी' अशी संज्ञा आहे. अशा प्रकारची संधी जातीची जी गाय असते, ती ज्या ज्या वेळेस दुधाची गरज भासेल त्या त्या वेळेस कोणत्याही गाईच्या वासराला जवळ येऊन दूध देऊ शकते. त्याचप्रमाणे संवत्सरसत्रामध्ये अन्य क्रतूमधील प्रकृतिभूत अशा बृहत् व रथंतर संज्ञक पृष्ठ स्तोत्रांचा त्या त्या दिवशी उपयोग करून जे यजमान संवत्सर सत्राचे अनुष्ठान करतात, ते त्या अनुष्ठान प्रभावाने इच्छित अशा सर्व कामनांच्या सिध्दीला प्राप्त होतात. (अनुवाका ३).

मनुष्यलोकी पुण्यकर्म करून नंतर जसे देवलोकी जावयाचे असते, त्याचप्रमाणे ऋचांचा अभ्यास म्हणजे पठण आधी करून नंतर त्यांच्या आधारे साम गाइले जाते. यास्तव, ऋचा या मनुष्यलोकरूप आहेत. संवत्सरसत्राच्या उत्तर भागात म्हणजे पुढच्या सहा महिन्यांत प्रत्येक दिवशी त्याच त्याच ऋचा पठण करीत जाव्यात. असे केले असता ऋग्रूप अशा मनुष्यलोकापासून यजमान कधीही दूर जात नाहीत म्हणजे त्यांच्या अपत्यपंरपरेचा केव्हाही विच्छेद होत नाही.

दररोज त्याच त्या ऋचा पठण करण्यात आल्या तरी त्यांच्या आधारे गाइले जाणारे साम दररोज वेगवेगळे गावे. कारण साम हे देवलोकरूप आहे. म्हणून देवलोकातून पुन्हा खाली येणारे यजमान मनुष्यलोकातील निरनिराळ्या प्रदेशात स्वेच्छेनुरूप जन्माला जातात किंवा कर्मफलानुरूप प्राप्त होणाऱ्या निरनिराळ्या देवलोकातून खाली येणारे यजमान मनुष्यालेकी येत असतात.

संवत्सरसत्रातील पहिल्या सहा महिन्यांत गायत्री छंदाचा विनियोग दररोज प्रथमत: केला जात असतो. परंतु, पुढच्या सहा महिन्यांत दररोज प्रथपत: जगती छंदाचा विनियोग करावा. असे केले असता, जगतीछंदाच्या ठिकाणी इतर सर्व छंद उतरत्या क्रमाने प्राप्त होतात. संवत्सरसत्राच्या पहिल्या सहा महिन्यांत दररोज आग्रयण ग्रह शेवटी घेतला जातो. तसे न करता पुढच्या सहा महिन्यांत आग्रयण ग्रह दररोज प्रथम घेतला जावा. पहिल्या सहा

महिन्यांत पृष्ठस्तोत्र म्हणून रथंतर साम गाइले जाते, परंतु, पुढच्या सहा महिन्यांत दररोज पृष्ठस्तोत्र म्हणून बृहत् सामाचे गान करावे. त्याचप्रमाणे पूर्वीच्या सहा महिन्यांत दररोज त्रयस्त्रिंश स्तोमाचा उपयोग शेवटी केला जातो. परंतु, पुढच्या सहा महिन्यांत त्या त्र्ययस्त्रिंश स्तोमाचा विनियोग दररोज प्रथमच करीत जावे. असे केले असता पहिल्या सहा महिन्यांत जे ग्रह, जी पृष्ठस्तोत्रे, जे स्तोम चढत्या क्रमाने विनियुक्त केलेले असतात ते ग्रह, ती पृष्ठस्तोत्रे व ते स्तोम पुढच्या सहा महिन्यात उतरत्या क्रमाने विनियुक्त केल्याप्रमाणे होत असतात. आपणापेक्षा वयोवृद्ध असलेल्या अश्वारूढ पित्याला किंवा प्रपितामहाला त्याचा अल्पवयी पुत्र किंवा नातू अश्वावरून खाली उतरवीत असतो, असा लोकव्यहार आपण पाहतोच.

'वाचस्पतिं विश्वकर्माणमूतये' या मंत्राने जो अतिग्राह्यसंज्ञक ग्रह घेतला जातो त्यास 'वैश्वकर्मण' असे नांव आहे. या अतिग्राह्य ग्रहाच्या योगाने यजमान विहित असलेल्या सर्व कर्मांना प्राप्त होतात. म्हणजे विहित असलेली सर्व कर्मे त्यांच्या हातून घडतात. 'महीमूषु मातरं' या मंत्राने जो अतिग्राह्य ग्रह घेतला जातो, त्यास आदित्य अशी संज्ञा आहे. ही भूमी म्हणजेच अदिती होय. यास्तव, आदित्यसंज्ञक अतिग्राह्य ग्रह घेतल्याच्या योगाने यजमान या भूमीचे ठिकाणी प्रतिष्ठित होऊन राहतात. या दोन अतिग्राह्यांपैकी दररोज एकेक अतिग्राह्य अनुक्रमाने घेत जावा. आज वैश्वकर्मणसंज्ञक अतिग्राह्य घेतला तर उद्या आदित्यसंज्ञक अतिग्राह्य घ्यावा. असा क्रम 'महाव्रत' संज्ञक दिवसापर्यंत अनुष्ठित करीत जावा. वैश्वकर्मण हा पुरुषरूप आहे व आदित्य हा स्त्रीरूप आहे. अर्थात् पुरुषरूप व स्त्रीरूप अशा या दोन ग्रहांचा विनियोग क्रमाने केल्याच्या योगाने सत्राच्या अनुष्ठानाचे ठिकाणी मिथुनत्व म्हणजे दांपत्यभाव निर्माण होतो. आणि तो यजमानांच्या ठिकाणी प्रजोत्पत्ती करण्याला कारणभूत होतो.

द्वादशाह क्रतूपैकी पहिला प्रायणीय व शेवटचा उदयनीय हे दोन दिवस सोडून मध्यंतरी असलेल्या दहा दिवसांत दशरात्राचे अनुष्ठान करावे. दशरात्र यज्ञाचेच अनुष्ठान करून प्रजापतीने प्रजा निर्माण केल्या. यास्तव, या संवत्सरसत्रात यजमानांनी जर दशरात्र यज्ञाचे अनुष्ठान केले तर ते यजमान त्या यज्ञाच्या प्रभावाने प्रजोत्पादन करण्यास समर्थ होतील. 'शुल्ब' नांवाच्या एका ऋषीचा

पुत्र 'उदंक' असे म्हणाला की, या सत्राच्या अंगभूत असलेल्या दशरात्राच्या अनुष्ठानानेच संपूर्ण सत्राची फलसमृद्धी प्राप्त होत असते. यास्तव, संवत्सरसत्रकर्त्या यजमानांनी जर दशरात्र अनुष्ठित केला तर ते सत्राच्या पूर्णफलसमृध्दीला प्राप्त होतील. शिवाय दशरात्राच्या पूर्वी अनुष्ठित केल्या जाणाऱ्या दिवसांच्या अनुष्ठानात जर काही वैकल्य आले असेल तर त्याचाही उपशम दशरात्राच्या अनुष्ठानाने होईल. (अनुवाक ४).

जर कदाचित् परस्परांच्या विषयी मत्सरग्रस्त झालेल्या यजमानांचे दोन संघ गवामयनसंज्ञक सत्रान्तर्गत सोमयागातील अभिषव म्हणजे सोम कुटून त्याच्या रसाचे यजन करण्याचा उपक्रम एकाच वेळी करण्यास प्रवृत्त झाले, तर 'महारात्र' झाल्याचे समजताच म्हणजे मध्यरात्र उलटून गेल्याचे लक्षात येताच प्रातरनुवाकांचे उपाकरण करावे. म्हणजे अध्वर्यने 'प्रातर् यावभ्यो देवेभ्यो होतर् अनुब्रूहि' असा प्रैष द्यावा. ज्या यजमानांचा संघ प्रातरनुवाकांचे उपाकरण करण्यास प्रथम प्रवृत्त होईल तो संघ दुसऱ्या यजमानसंघाची वाणी, देवता व संघ हिराऊन घेईल.

प्रातरनुवाकसंबंधी होत्याने ज्या ऋचा पठण करावयाच्या असतात, त्यांपैकी 'आपो रेवती: क्षयथा:' ही प्रतिपत्संज्ञक म्हणजे पहिली ऋचा होय. परंतु, अशा संघर्षाच्या प्रसंगी पठण करावयाच्या प्रातरनुवाकविषयक ऋचांचे पठण करताना होत्याने प्रथमत: 'वृषन्' शब्दाने युक्त असलेल्या ऋचेचे पठण करावे. म्हणजे होत्याने दुसऱ्या यजमानसंघाच्या प्रात:सवनाच्या अनुष्ठानापासून देवतारूप असलेल्या इंद्राला दूर केल्यासारखे होते.

गायत्र्यादि छंदाचा आमच्या यज्ञात उत्कृष्ट प्रकारे प्रवेश व्हावा, त्याचप्रमाणे त्रिष्टुप्, जगती, अनुष्टुप् व पंक्ती या छंदांचाही आमच्या यज्ञात उत्कृष्ट प्रवेश व्हावा, प्रविष्ट झालेले गायत्र्यादि छंद आमच्या यज्ञात स्थिरपणे राहावेत, त्याचप्रमाणे आमच्याशी मत्सर करणाऱ्या दुसऱ्या संघातील यजमानांच्या यज्ञातील गायत्र्यादि छंदांचा पराभव व्हावा म्हणून ही आहुती त्या छंदांना समर्पण करीत आहे.

गायत्र्यादि छंद हेच संवेश म्हणजे यज्ञात उत्कृष्टतेने प्रविष्ट होणारे असून तेच उपवेश म्हणजे यज्ञाच्या ठिकाणी स्थिरतेने राहणारे होत. आणि म्हणूनच आहुती देऊन संतुष्ट केलेल्या छंदांच्याकडूनच विरोधक अशा दुसऱ्या

संघातील यजमानांच्या यज्ञातील छंदांचा अध्वर्यू विनाश करीत असतो.

'निष्केवल्य' शस्त्रामध्ये 'इंद्रस्य नु वीर्याणि' असा प्रारंभ होणाऱ्या 'निष्केवल्य' सूक्ताच्या ठिकाणी 'यो जात एव प्रथमो' असा प्रारंभ होत असलेल्या 'सजनीय' संज्ञक सूक्ताने शंसन करावे. त्याचप्रमाणे महावैश्वदेवनामक शस्त्रातील 'आनोभद्रा' या सूक्ताच्या जागी 'ममाग्ने वर्चो' असा प्रारंभ होणाऱ्या 'विहव्य' सूक्ताचे शंसन करावे. 'मरुत्वतीय' शस्त्रामध्ये 'जनिष्ठा उग्रः' असा आरंभ असलेल्या सूक्ताच्या ठिकाणी अगस्तिमुनीने दृष्ट केलेल्या 'कया शुभा सवयसः' या 'कयाशुभीय' सूक्ताचे शंसन करावे. अथवा त्या त्या सूक्ताच्या पठणापूर्वी आता सांगितलेले ते ते सूक्त शंसन करावे. आता सांगितलेली तीन सूक्ते हेच एकंदर यज्ञातील सार आहे. यास्तव, या सूक्तत्रयाचे पठण केले असता ते परकीय संघातील यजमानांच्या यज्ञातील सर्व साराचा नाश करते.

प्रातःसवनाचे अनुष्ठान चालू असताना जर द्रोणकलश चीर पडून विदीर्ण झाला तर सामगायक ऋत्विजांनी 'शिपिविष्ट' शब्दयुक्त अशा विष्णुदेवतात्मक ऋचांच्या आधारे 'स्तवन' करावे. म्हणजे यज्ञातील जे अंग शास्त्रमर्यादा सोडून अनुष्ठित झालेले असते, ते 'शिपिविष्ट' गुणयुक्त अशा विष्णूला अनुलक्षूनच झालेले असते. म्हणजे ते अंग शिपिविष्टगुणयुक्त अशा विष्णुरूपालाच प्राप्त होत असते. तात्पर्य हे की, शिपिविष्टशब्दयुक्त अशा विष्णुदेवतात्मक ऋचांच्या आधारे स्तवन केले असता, त्या शिपिविष्ट गुणयुक्त विष्णूकडूनच शास्त्रमर्यादेचे उल्लंघन करून घडलेल्या अंगाच्या ठिकाणी शास्त्रीयरूप उत्पन्न करविल्यासारखे होते.

माध्यंदिन सवनाच्या अनुष्ठानात जर द्रोणकलश विदीर्ण झाला तर ज्या सामाचे निधन म्हणजे अंतिम भाग 'वषट्' शब्दाने गाइला जातो, त्या 'वषट्कार निधन' संज्ञक सामाचे उद्गात्यांनी गान करावे. 'वषट्कार' हा यज्ञाची प्रतिष्ठा आहे. यास्तव, 'वषट्कारनिधन' सामाचे जे गान करतात, ते सामगायक उद्गाते प्रारंभिलेल्या यज्ञाला प्रतिष्ठेला प्राप्त करतात. तृतीय सवनामध्ये जर द्रोणकलश विदीर्ण झाला, तर याच 'वषट्कारनिधन' सामाचे गान करावे. (अनुवाक ५).

अभिप्लव षडहातील सहा दिवसांच्या पांच आवृत्ती करून जे सत्रकर्ते यजमान एक महिना अनुष्ठित करतात त्यांनी दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या

दिवशी कर्तव्य असलेल्या 'ज्योति' नामक दिवसाचा म्हणजे सोमयागाचा उत्सर्ग करावा. किंवा 'अभिप्लव षडह' विषयक सहा दिवसांच्या चार आवृत्तींनी व पृष्ठ्य षडहविषयक सहा दिवसांच्या एका आवृत्तीने एक महिना अनुष्ठित केल्यावर दुसऱ्या महिन्याच्या प्रथम दिवशी कर्तव्य असलेल्या पूर्वोक्त यागाचा उत्सर्ग करावा. कारण, लोकव्यवहारामध्ये सहा दिवसांच्या संघाची पांच वेळ गणना करून तीस दिवस मोजतात आणि हा 'सावन मास' पूर्ण झाला असा निश्चय करतात.

संवत्सरसत्राच्या पूर्वार्धामध्ये प्रायणीय व आरंभणीय हे दोन दिवस सोडून तिसऱ्या दिवशी षडहाचा प्रारंभ होत असतो. त्या दिवसापासून तीस दिवसांचा 'सावन मास' पूर्ण झाला म्हणजे त्या पुढच्या महिन्यातील प्रथम दिवसाचा उत्सर्ग करावा. या प्रकारानुसार पाहिले असता, प्रायणीय दिवसापासून पंधरा पंधरा दिवसांच्या दोन अर्धमासांनी एक मास पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवसाचा उत्सर्ग करावा, हेच क्रमप्राप्त होय. कारण, दोन पंधरवड्यांनी म्हणजे दोन अर्धमासांनी एक मास पूर्ण झाल्याचे लोक निश्चित करीत असतात.

चांद्रमानानुसार कालगणना मानणारे काही लोक अमावास्येच्या दिवशी महिन्याची पूर्णता निश्चित करतात. यास्तव, या पक्षास अनुसरणाऱ्या यजमानांनी अमावास्येसच महिन्याची समाप्ती करून दुसऱ्या दिवशीच्या शुक्ल प्रतिपदेस ज्या 'अहा' चे अनुष्ठान करावयाचे असते त्याचा उत्सर्ग म्हणजे त्याग करावा.

चांद्रमानानुसार कालगणना करणाऱ्यांमध्येही काही लोक कृष्ण प्रतिपदेपासून गणना करून शुक्ल पक्षातील पूर्णिमेस महिन्याची पूर्णता निश्चित करतात. यास्तव, या पक्षास अनुसरणाऱ्या यजमानांनी कृष्णप्रतिपदेस कर्तव्य असलेल्या 'अहा' च्या अनुष्ठानाचा उत्सर्ग करावा.

जो कोणी पुरुष दुधातुपाने पूर्ण भरलेल्या पात्रात पुनः आणखी दूध तूप ओततो, तेव्हा त्या पात्रात ते दूध तूप न मावल्यामुळे बाहेर भूमीवर सांडून फुकट जाते. अर्थात् अशा प्रकारचा अविचारी पुरुष भरलेल्या पात्रात आणखी भर घालून त्या दुधाचा नाश मात्र करतो. परंतु, जो विचारी पुरुष दुधातुपाने तुडुंब भरलेले पात्र बाहेर न सांडावे म्हणून त्या पात्रातील

थोडे दूधतूप इतर पात्रात ओतून घेऊन कमी करतो, तो माणूस त्या दुधातुपाने भरलेल्या पात्रात प्राणरूपी वायूचे स्थापन करतो. अर्थात् त्या भरलेल्या पात्रात राहिलेल्या रिकाम्या भागात वायूचा संचार होणे शक्य होत असते. या न्यायानेच सत्रकर्ते यजमान जर त्या त्या पूर्णिमेस त्या त्या महिन्याची पूर्तता करून त्या त्या कृष्ण प्रतिपदेस कराव्या लागणाऱ्या अहाच्या म्हणजे सोमयागाच्या अनुष्ठानाचा उत्सर्ग अर्थात् त्याग करतील तर त्यांनी संवत्सरसत्ररूपी पुरुषाच्या ठिकाणी प्राणवायूचे स्थापन केल्यासारखे होईल. आणि त्या संवत्सरसत्ररूपी पुरुषाच्या ठिकाणी होणाऱ्या प्राणवायुस्थापनेला अनुसरून सत्रकर्ते यजमान देखील त्यांच्या प्राणांचा निरोध न होता जिवंत राहतील.

आता सांगितल्याप्रमाणे कृष्ण पक्षातील प्रतिपदेच्या दिवशी कर्तव्य असलेल्या यागानुष्ठानाचा त्याग जर सत्रकर्ते यजमान न करतील, तर तुडुंब भरलेल्या पखालीचे तोंड घट्ट बांधले गेले असताना तिच्यातील पाण्यावर अधिक दाब बसून ते जोराने पखाल फोडून बाहेर उसळून येते व बाहेर पडून फुकट जाते, त्याप्रमाणे त्या यजमानांचा संवत्सरसत्ररूपी यज्ञपुरुष श्वास कोंडल्याने नाश पावेल म्हणजे मरेल आणि त्यामुळे यजमानही मरणाला प्राप्त होतील. यास्तव, या अनर्थाचा प्रसंग टाळण्यासाठी सत्रकर्त्या यजमानांनी पूर्णिमेस महिन्याची समाप्ती करून दुसऱ्या दिवशी कृष्ण प्रतिपदेस अनुष्ठित करावयाच्या दिवसाचा त्याग करावा. असे केले असता, संवत्सरसत्राचा नाश न व्हावा म्हणून त्याच्या ठिकाणी यजमानांनी संचार करणाऱ्या उदान वायूचेच स्थापन केल्यासारखे होते. आणि त्यामुळे सत्रकर्ते यजमानही श्वासोच्छ्वास करण्यास समर्थ होतात. अर्थात् ते मरणाच्या आपत्तीस प्राप्त होत नाहीत.

प्रकृतिभूत सोमयागामध्ये पूर्णिमेच्या दिवशी देवांच्यासाठी सोम कुटला जाऊन त्याच्या रसाचे यजन केले जाते. यास्तव, पूर्णिमेसच महिन्याची समाप्ती करून नंतर दुसऱ्या दिवशी कृष्ण प्रतिपदेस करावयाच्या सोमयागाचा उत्सर्ग केला असता सत्रकर्त्या यजमानांनी आदल्या दिवशी झालेल्या यज्ञाशी संवत्सरसत्ररूपी यज्ञाचा संयोग केल्यासारखे होऊन त्या यज्ञाच्या ठिकाणी यजमान आरूढ होतात.

अभिप्लव व पृष्ठ्य या नांवाच्या षडहांचे सांतत्याने महिनाभर अनुष्ठान

करून चालू असणाऱ्या सत्ररूप यज्ञाला प्राप्त झालेले यजमान जर दुसऱ्या दिवशी कर्तव्य असलेल्या पूर्वोक्त सोमयागाचा उत्सर्ग करतील तर त्या योगाने यजमानांनी आपल्या सत्ररूपी यज्ञाचा विच्छेद केल्यासारखे होईल. यास्तव, पूर्वोक्त सोमयागाचा जरी उत्सर्ग केला तरी तो दिवस फुकट रिकामा न घालविता त्या दिवशी प्रजापती देवतेच्या उद्देशाने पशुयाग करावा. प्रजापती हा सृष्टिकर्ता असल्यामुळे तो सर्वदेवतात्मक आहे. यास्तव, प्राजापत्यसंज्ञक पशुयाग केल्याच्या योगाने सर्व देवतांच्याकडूनच सत्रकर्त्या यजमानांनी विच्छिन्न होणाऱ्या आपल्या सत्ररूपी यज्ञाला सांधल्यासारखे होईल.

जे यजमान पूर्वोक्त दिवशीच्या सोमयागाचा उत्सर्ग करतात ते प्रात:सवनादि तीनही सवनांपासून दूर होतात. 'सान्नाय्य' द्रव्याचे यजन हे तीन्ही सवनांच्याहून अधिक असे जणू चौथे सवनच होय. यासाठी, उत्सर्ग केलेल्या सोमयागाऐवजी त्या 'सान्नाय्य' द्रव्याचे यजन करावे. म्हणजे सत्रकर्ते यजमान सवनांच्यापासून दूर जाणार नाहीत. हुतशेष अशा सोमरसाचे जसे भक्षण केले जाते, त्याच पध्दतीने 'सान्नाय्य' द्रव्याचे यजन केल्यावर त्याच्या अवशेषाचे उपाह्वानपूर्वक म्हणजे परस्परांची अनुज्ञा घेऊन भक्षण करावे. म्हणजे यजमानांनी हुतशेष अशा सोमरसाचेच भक्षण केल्यासारखे होईल.

जे यजमान पूर्वोक्त सोमयागाच्या अनुष्ठानाचा उत्सर्ग करतात. त्यांच्या प्रात:सवनादि तीन्ही सवनांतील हविर्भाग सेवन करणाऱ्या देवता, सोमयागाच्या अभावी, निराश होऊन आपआपल्या स्थानी जातात. यास्तव, तसे होऊ नये म्हणून त्या त्या सवनांच्या ऐवजी पुरोडाशाचे निर्वपण करावे. अर्थात् पुरोडाश तयार करून त्यांचा याग करावा. असे केले असता त्या त्या सवनासंबंधी निराश होऊन स्वस्थानी गेलेल्या त्या त्या देवतांना यजमानांनी त्या त्या सवनांच्या ठिकाणी परत आणल्यासारखे होते. म्हणजे पुरोडाशांच्या आहुती देऊन यजमानांनी त्यांना तृप्त केल्यासारखे होते.

प्रात:सवनसंबंधी अष्टाकपालात्मक,माध्यंदिनसवन संबंधी एकादशकपालात्मक आणि तृतीयसवनासंबंधी द्वादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचे यजन करावे. असे केले असता, गायत्री, त्रिष्टुप् व जगती या छंदांचे यजमानांनी संपादान करून सवनत्रयात्मक अशा सोमयागाचेच श्रेय मिळविल्यासारखे होते. तृतीय सवनामध्ये 'वैश्वदेव' चरूचा निर्वाप करीत असतात. कारण तृतीय

सवन हे 'वैश्वदेव' म्हणजे सर्वदेवतात्मक आहे. यासाठी पूर्वोक्त पुरोडाशांचा याग झाल्यानंतर विश्वेदेव देवतांच्या उद्देशाने चरूचे निर्वपण करून त्याचा याग करावा. असे केल्याच्या योगाने यजमान तृतीय सवनापासून दूर जात नाहीत. (अनुवाक ६).

पूर्वी वाटाघाट केल्याप्रमाणे एक महिना पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या दिवशी कराव्या लागणाऱ्या सोमयागाचा उत्सर्ग करावा तर यज्ञाचा विच्छेद होतो. आणि न करावा तर सत्रकर्त्या यजमानांचा श्वास कोंडतो. यास्तव, उत्सर्ग करावा किंवा करू नये? अशा प्रकारचा काही ब्रह्मवाद्यांनी विचार केला. त्यावर दुसऱ्या अभिज्ञांनी 'उत्सर्ग करावा' असे उत्तर दिले. कारण उत्सर्गामुळे होणाऱ्या यज्ञविच्छेदाचा परिहार प्राजापत्य - पुरोडाश - यागादिकांनी होत असतो.

कोणी असे म्हणतात की, अमावास्येच्या व पूर्णिमेच्या दिवशी होणाऱ्या सोमयागाचा उत्सर्ग करावा. कारण, अमावास्या व पूर्णिमा या दोन तिथी दर्शपूर्णमासरूप यज्ञाचा भार वाहत असतात.

दुसरे कोणी असे म्हणतात की, अमावास्येच्या व पूर्णिमेच्या दिवशी होणाऱ्या सोमयागाचा त्याग मुळीच करू नये. कारण, अमावास्या व पूर्णिमा या दोन तिथी केवळ दर्शपूर्णमासात्मक कर्माच्याच निष्पादक नसून त्या अयनगतादि इतर कर्मांच्याही निष्पादक असतात. यास्तव, या दोन तिथींच्या दिवशी होणाऱ्या सोमयागाचा उत्सर्ग करणे अयोग्य आहे. मग कोणत्या दिवशी उत्सर्ग करावा? असा प्रश्न उपस्थित होतो. परंतु, या प्रश्नाचे समाधान असे की, पहिली जी व्यष्टका प्राप्त होईल त्या दिवशी उत्सर्ग करावा. कृष्ण प्रतिपदेला 'व्यष्टका' अशी संज्ञा आहे. अर्थात् पूर्णिमेस महिन्याची पूर्णता झाल्यावर दुसऱ्या दिवशीच्या कृष्णप्रतिपदेस उत्सर्ग करावा. म्हणजे त्या दिवशी कर्तव्य असलेला सोमयाग करू नये, असे पूर्वोक्त प्रश्नाचे अभिज्ञ उत्तर देतात. कारण, कृष्ण प्रतिप्रदेचा दिवस म्हणजे विशीर्ण झालेल्या मासाप्रमाणेच होय.

'विष्णुवान् महाव्रत' अशा प्रकारचा नामनिर्देश करून ज्या कर्माचा उपदेश केला जातो, त्यास 'आदिष्ट' अशी संज्ञा आहे. आदिष्ट अशा त्या कर्माचा उत्सर्ग करू नये. तर षडहादिकांच्या आवृत्तींनी मास पूर्ण झाल्यानंतर सामान्यत: प्राप्त होणाऱ्या दुसऱ्या दिवसाचा त्याग करावा. किंवा उत्सर्गपक्षाचा अवलंब

न करता त्या दिवसाचे अनुष्ठान करूनच महिन्याची पूर्णता करण्याची क्रम स्वीकारावा. कारण उत्सर्गपक्षाच्या स्वीकारातच विशीर्ण अशा मासाची संप्राप्ती होत असते. कारण त्या दिवशी अनुष्ठानच न केल्यामुळे त्या महिन्याची पूर्णता होत नाही. आणि अशा अपुऱ्या महिन्यालाच विशीर्णत्वाचे रूप प्राप्त होते. सारांश, मासवैकल्य अर्थात् मासाची अपूर्णता टाळण्याच्या दृष्टीनेही शास्त्राने उपदिष्ट असे जे कर्म असेल त्या कर्माच्या अनुष्ठानाचा त्याग करू नये हेच योग्य होय.

शास्त्रोपदिष्ट अशा कर्माचा त्याग करू नये. हे बरोबर आहे. पण, उत्सर्गपक्ष व अनुत्सर्गपक्ष हे दोन्हीही पक्ष विकल्पाने शास्त्रीयच आहेत. अर्थात् कोणताही पक्ष स्वीकारला तरी त्यामध्ये शास्त्रोपदिष्ट अशा कर्माचा त्याग अपरिहार्यच होत असतो. यास्तव, उत्सर्गपक्ष स्वीकारला तरी देखील ज्योती इत्यादि क्रतूंच्या आवृत्तींनी अनुष्ठित केल्या जाणाऱ्या षडहांमधील एखाद्या दिवसाचा उत्सर्ग करावा. परंतु, कर्तव्य असलेल्या विषुवान् महाव्रत नांवाच्या दिवसाचा मात्र त्याग करू नये. यास्तव, अभिप्लव षडहांच्या आवृत्तींनी महिन्याची पूर्णता करावी. आणि पृष्ठ्य षडहानंतर येणाऱ्या सातव्या दिवशी जो ज्योती नांवाचा याग करावा लागतो त्या यागाचा त्याग करावा.

ज्योतीसंज्ञक यागाचा उत्सर्ग ज्या दिवशी करावयाचा, तो दिवस कसलेच अनुष्ठान न करता रिकामा न घालविता त्या दिवशी 'वसुमान्' अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक म्हणजे आठ कपालांवर भाजलेला पुरोडाश, इंद्रदेवतेसाठी दही, मरुत्वान् इंद्रासाठी एकादशकपालात्मक पुरोडाश आणि विश्वेदेव देवांच्यासाठी द्वादशकपालात्मक पुरोडाश याप्रमाणे हविर्द्रव्ये तयार करून त्यांचे यजन करावे.

सोमयागातील प्रात:सवनावर वसुमान् अग्नीचे आधिपत्य असते. यास्तव, वसुमान् अग्नीच्या उद्देशाने अष्टाकपालात्मक पुरोडाशाचे निर्वपण करून त्याचा जे याग करतात त्यांनी प्रात:सवनाच्या अधिष्ठात्री असलेल्या देवतेला, तिला अपेक्षित असलेला हविर्भाग अर्पण केल्यासारखे होते. शिवाय, गायत्री छंदाच्या चरणाक्षरसंख्येशी साम्य असलेल्या आठ कपालांच्या उपयोगाने गायत्री छंदाच्या द्वारा त्या यजमानांनी प्रात:सवनाचे संपादन केल्यासारखे होते.

इंद्रदेवतेसाठी दही तयार करून त्याचा याग केल्याने इंद्राला त्याचा भाग देऊन संतुष्ट केल्यासारखे होते. अर्थात् सत्रकर्त्या यजमानांनी इंद्राला

त्याच्या भागापासून दूर केल्यासारखे होत नाही.

माध्यंदिन सवन हे मरुत्वान् इंद्राचे आहे. म्हणजे मरुत्वान् इंद्र ही त्या सवनाची अधिष्ठात्री देवता आहे. यास्तव, मरुत्वान् इंद्राकरता एकादशकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप जे यजमान करतात ते त्या सवनाच्या अधिष्ठात्री देवतेला हविर्भागयुक्त करतात म्हणजे त्या देवतेला अपेक्षित असलेला हविर्भाग देऊन संतुष्ट करतात आणि एकादश कपालांच्याशी चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने स्वरूपसाम्य असलेल्या त्रिष्टुप् छंदाच्या द्वारा सत्रकर्ते यजमान माध्यंदिन सवनाचे संपादन करतात.

'ऋभू' नामक देवांच्या सह असलेल्या 'विश्वेदेव' संज्ञक देवांचे तृतीय सवनावर अधिष्ठातृत्व असते. यास्तव, विश्वेदेव देवांच्या उद्देशाने यजमानांनी जर द्वादशकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप केला व त्याचे यजन केले तर यजमानांनी तृतीय सवनाच्या अधिष्ठात्री असलेल्या विश्वेदेव देवतांना त्या सवनाचे विभागी केल्यासारखे होते. शिवाय चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने जगती छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या द्वादशकपालांच्या उपयोगाने जगतीछंदद्वारा यजमानांनी तृतीय सवनाचे संपादन केल्यासारखे होते.

यानंतर प्रजापती देवतेसाठी पशूचे आलभन करून त्याच्या वपादि अंगांचा याग करावा. कारण, प्रजापती हा यज्ञरूप आहे. यास्तव, त्याच्यासाठी पशुयाग केल्याच्या योगाने यजमानांनी ज्योतीनामक सोमयज्ञाचा त्याग केल्यासारखे होत नाही.

आतापावेतो ज्या सत्राचे विवेचन करण्यात आले आहे, ते 'गवामयन' सत्राचीच एक विकृती असून त्यास 'उत्सर्गिणां अयनम्' अशी संज्ञा आहे. या सत्राचे दोन पक्ष म्हणजे विभाग असतात. पहिल्या सहा महिन्यांचा एक पक्ष किंवा विभाग आणि पुढच्या सहा महिन्यांचा दुसरा विभाग. पहिल्या विभागाच्या अनुष्ठानाने यजमानांना स्वर्गलोकाची प्राप्ती होते व दुसऱ्या विभागाच्या अनुष्ठानप्रभावाने ते पुन्हा भूलोकावर येऊन पोचतात. यास्तव, या भूलोकावरून स्वर्गलोकी जाऊ इच्छिणाऱ्या यजमानांनी पहिल्या सहा महिन्यांच्या विभागात प्रतिदिवशी 'अभिवर्त' या नांवाच्या ब्रह्मसामाचे गान करावे. अभिवर्त हे ब्रह्मरूप आहे. यास्तव ब्रह्मसामाचे गान करताना अभिवर्त सामाचे गान केले असता ब्रह्मरूप अशा त्या सामाच्या सामर्थ्याने स्वर्गलोकाकडे जाऊ इच्छिणारे यजमान

सुखाने स्वर्गलोकी जाऊन पोचतात. या भूलोकापेक्षा स्वर्गलोक हा विरुद्ध स्वरूपाचा आहे, हे प्रसिद्धच आहे.

'हे इंद्रा, पिता ज्याप्रमाणे आपल्या पुत्रांना हाक मारून त्यांचा भाग त्यांना देतो, त्याप्रमाणे या यज्ञाचा विभाग तू आम्हाला दे. देवांचा पुढारी असलेल्या हे इंद्रदेवा, आम्ही अनुष्ठित करीत असलेल्या ऋतुविशिष्ट अशा नियमांविषयी तू आम्हास योग्य तो हितोपदेश कर. आम्ही तुझ्या प्रसादाने जिवंत राहून प्रकाशरूप अशा मनुष्यलोकी पुन्हा प्राप्त होऊ'.

वरील अर्थाची जी 'इंद्र क्रतुं न आभर' असा प्रारंभ असलेली ऋचा आहे, त्या ऋचेच्या आधारावर निष्पन्न होणाऱ्या ब्रह्मसामाचे गान स्वर्गलोकातून मनुष्यलोकी परत येऊ इच्छिणाऱ्या यजमानांनी पुढच्या सहा महिन्यांतील प्रतिदिवशी करीत जावे. या भूमीवर असणारा मनुष्यलोक हा प्रकाशरूप आहे. अर्थात् येथे राहणाऱ्या प्रजा देखील प्रकाशरूप आहेत. अर्थात् प्रकाशमय अशा मनुष्यलोकावर दृष्टी ठेवून त्यावर पुन्हा परत येऊ इच्छिणाऱ्या यजमानांनी पूर्वोक्त सामाचे गान केले असता ते यजमान 'प्रकाशरूप अशा सामगानाच्या योगाने मनुष्यलोकाकडे अवलोकन करीतच आम्ही त्या लोकाच्या ठिकाणी परत येत आहो', असे जणू म्हणत म्हणतच, परत मनुष्यलोकी येतात. (अनुवाक ७).

पूर्वी देवांनी जेव्हा एकदा आपल्या सत्राची समाप्ती केली, तेव्हा सत्रानुष्ठानात झालेल्या अत्यंत कष्टामुळे त्यांच्या इंद्रियांच्या ठिकाणचे सामर्थ्य अगदी गळून गेले. तेव्हा त्या देवांनी, गलित झालेल्या इंद्रियसामर्थ्याला परत आपल्या ठिकाणी बोलावण्याचे साधन म्हणून 'क्रोश' या नांवाच्या सामाचे गान केले व त्या सामगानाच्या प्रभावाने त्यांनी आपल्या इंद्रियांच्या ठिकाणी पुन्हा सामर्थ्य संपादन केले. देवांचे गलित झालेले सामर्थ्य पुन्हा त्यांच्या ठिकाणी निर्माण करणे, हेच त्या क्रोशसंज्ञक सामाचे क्रोशत्व म्हणजे स्वभावगुण होय. यास्तव, जे सत्रकर्ते यजमान चात्वालांच्या पुढच्या जागेत क्रोश नांवाचे साम गाऊन स्तवन करतात, ते सत्ररूप यज्ञाच्या समाप्तीनंतर विगलित झालेले इंद्रियसामर्थ्य पुन्हा आपल्या ठिकाणी संपादन करतात. 'सत्रस्यर्धि' म्हणजे सत्राची समृध्दी या नांवाच्या सामाचे गान जे यजमान आहवनीयाच्या पुढच्या जागेत करतात, ते त्या आपल्या सामगानरूप स्तवनाला अग्नीला साक्ष ठेवून

सत्ररूप यज्ञाच्या समृध्दीला प्राप्त होतात.

'प्रजापतेर्हृदयम्' म्हणजे प्रजापतीचे हृदय नांवाच्या सामाचे गान जे यजमान हविर्धान मंडपाच्या पुढच्या बाजूस करतात ते प्रजापतीच्या प्रेमाला पात्र होतात.

सदोमंडपाच्या पुढच्या बाजूस जे यजमान 'श्लोक' या नांवाच्या सामाचे आणि संदोमंडपाच्या मागच्या बाजूस 'अनुश्लोक' या नांवाच्या सामाचे स्तवन करतात, ते सत्ररूप यज्ञाच्या समाप्तीला प्राप्त होऊन कीर्तिमान् होतात.

अनुश्लोकनामक सामाच्या आधारभूत असलेल्या 'स्तोत्रिया' संज्ञक ऋचा नऊ असतात. या नऊ ऋचांच्या आधारे अध्वर्यूने सामगान करावे. कारण पुरुषाच्या शरीराच्या ठिकाणी नऊ छिद्रे असून त्यांच्या ठिकाणी नऊ प्राण अवस्थित झालेले असतात. यास्तव नऊ ऋचांच्या आधारे अध्वर्यूने अनुश्लोक नांवाच्या सामाचे गान केले असता त्याने जणू काय आपल्या यजमानाच्या शरीराच्या ठिकाणी नऊ प्राणांची धारणा केल्यासारखे होते. त्या सर्व ऋचा 'ऐंद्री' म्हणजे इंद्रदेवतेची स्तुती करणाऱ्या असतात. अर्थात् त्यांच्या आधारे अध्वर्यूने साम गाइले असता त्या ऋचा यजमानांच्या प्राणांच्या ठिकाणी सामर्थ्य स्थापन करतात. गाइल्या जाणाऱ्या प्रत्येक सामात हिंकार, प्रस्ताव, उद्गीथ, प्रतिहार व निधन असे पांच विभाग असतात. परंतु, आता सांगितलेल्या नऊ ऋचांचे जे गान करावयाचे ते प्रतिहारसंज्ञक भागरहित करावे. अशा प्रकारे अनुश्लोक सामामध्ये 'प्रतिहार' वर्ज्य केला जातो. म्हणूनच कोणताही पुरुष मस्तकाखेरीज हस्तपादादि सर्व अंगे लांब, आखुड करू शकतो, पण मस्तक तेवढे त्यास लांब, आखुड करता येत नाही. यास्तव, अध्वर्यूकडून गाइल्या जाणाऱ्या शिरस्थानी अशा अनुश्लोक सामाच्या गानात प्रतिहार वर्ज्य करावा.

अनुश्लोकसंज्ञक सामागानाच्या मागेपुढे दोन्ही बाजूस दोन सामे गावीत. म्हणजे अनुश्लोक साम गाण्यापूर्वी पंचदशस्तोमात्मक रथंतर सामाचे गान करावे. म्हणजे यजमानांना कार्यक्षम अशा इंद्रियांची प्राप्ती होते. आणि अनुश्लोक साम गाइल्यानंतर सप्तदशस्तोमात्मक 'बृहत्' सामाचे गान करावे. म्हणजे सत्रकर्त्या यजमानांना सेवनीय अशा अन्नाची प्राप्ती होऊन ते प्रजा निर्माण करण्यास समर्थ होतात.

'एकविंश' या नांवाचा एक स्तोम असून 'भद्र' या नांवाचे एक साम आहे. दोनच चरण असलेल्या ज्या ऋचा असतात त्यांना 'द्विपदा' असे म्हणतात. एकविंशस्तोमाचा अंगीकार करून द्विपदासंज्ञक ऋचांच्या आधारे भद्र नांवाचे साम गाइले असता ते यजमानांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला कारणभूत होते.

भद्र सामाचे गान चालू असताना यजमानांच्या ज्या स्त्रिया असतील त्यांनीही त्या सामाचे उपगान करावे. म्हणजे त्या सामाची साथ करावी. असे केले असता भद्र सामाचे गान पुरुष व स्त्रिया यांनी गाइल्यामुळे त्याच्या ठिकाणी मिथुनत्व म्हणजे दांपत्यभाव उत्पन्न होतो व तो यजमानांच्या स्त्रियांच्या ठिकाणी प्रजोत्पादन करण्यास कारणभूत होतो.

प्रजापतीने प्रजा निर्माण केल्या. तेव्हा त्या प्रजांच्यावर आपण राज्य करावे अशी त्याला इच्छा झाली. 'राजन' या नांवाच्या सामाचे गान करूनच त्याने आपल्या प्रजांच्यावर राज्य संपादन केले. प्रजापतीला राज्य संपादन करून देणे हेच राजन सामाचे राजनत्व म्हणजे स्वभावगुण होय. यास्तव, ज्यांच्या सत्रात राजन सामाचे गान होते ते यजमान आपल्या प्रजांच्यावर राज्य संपादन करतात. हे राजन साम पंचविंश नांवाच्या स्तोमाच्या आश्रयाने करावे. म्हणजे तो स्तोम यजमानांना प्रजापतीची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होतो.

त्या पंचविंश स्तोमापैकी पहिल्या पांच स्तोत्रियांच्या योगाने जे गान करावयाचे, ते सामगायक ऋत्विजांनी उभे राहून करावे. नंतरच्या पांच 'स्तोत्रिया' बसून गाव्यात. उभे राहून गाइलेल्या पांच स्तोत्रियांच्या योगाने यजमान देवलोकावर जय मिळवितात. आणि बसून गाइलेल्या पांच स्तोत्रियांच्या योगाने ते मनुष्यलोकावर विजय मिळवितात. उभे राहून व बसून गाइलेल्या स्तोत्रियांची एकंदर संख्या दहा होते. विराट्छंद हा दहाअक्षरी चरणांचा असतो. विराट्छंद हा अन्नरूप आहे. यास्तव, चरणाक्षरसंख्येने विराट्छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या पूर्वोक्त दहा ऋचांच्या गानाने विराट्छंदाच्या द्वारा यजमानांनाच सेवनीय अशा अन्नाची प्राप्ती होते. पांच स्तोत्रियांचे बसून जे गान करावयाचे, ते एकाच ठिकाणी बसून न करता पांच ठिकाणी बसून करावे. म्हणजे यजमान ऊर्ध्व दिशेसह असलेल्या पांचही दिशांच्या ठिकाणी प्रतिष्ठेला प्राप्त होतात.

निरनिराळ्या पांच ठिकाणी बसताना, जेथे बसावयाचे असेल तेथे प्रथम उद्गात्याने एकट्यानेच जाऊन बसावे आणि स्तवन न केलेल्या एका स्तोत्रिया ऋचेने इतर सर्वांनी त्याच्या जवळ बसावे. याचप्रमाणे प्रत्येक ठिकाणी प्रथम उद्गाता जाऊन बसल्यानंतर इतरांनी स्तवन न केलेल्या स्तोत्रिया ऋचेने ~~इतरांनी~~ त्याच्याजवळ जाऊन बसावे. असे केले असता, यजमानांनी सर्व दिशांच्या पासून सेवनीय अशा अन्नाचे संपादन केल्यासारखे होते.

ज्या ऋचेचा पुरस्कार करून इतर ऋत्विज उद्गात्याजवळ आले असतील, त्या ऋचेने उद्गात्याने सामगानास प्रारंभ करावा व एकट्यानेच सर्व साम गावे. असे केले असता सर्व दिशांपासून संपादित केलेले तेजोरूपी अन्न सर्वांनी आपल्या ठिकाणीच स्थापन केल्यासारखे होते. इतर सर्व जवळ येऊन बसल्यानंतर एकटा उद्गाताच सामगान करतो. म्हणूनच एकच प्राण शरीरातील सर्व अंगांचे रक्षण करतो. किंवा कोणी एखादा पक्षी आकाशात भरारी मारताना आपले मस्तक उंच करतो, त्याचप्रमाणे एकट्या उद्गात्याच्याच सामगानाने सर्व प्रजाजनांमध्ये सत्रकर्ते यजमान श्रेष्ठतेला प्राप्त होतात.

उद्गात्याने चार पायांच्या खाटेच्या आकाराच्या घडवंचीवर बसून साम गावे. एकट्या उद्गात्याच्या त्या आसंदीवरील आरोहणाने सर्वच यजमान साम्राज्याला प्राप्त होतात. हिंदोळ्यावर बसून होत्याने शस्त्राचे शंसन करावे. त्या योगाने सर्व यजमान स्वर्गलोकाच्या पृष्ठभागी आरोहण करतात. दर्भांच्या दोन कूर्चांवर अध्वर्यूने बसावे. त्या योगाने सत्रकर्ते सर्व यजमान सूर्याच्या स्थानाला जाऊन पोचतात. साम्राज्य, स्वर्गलोक व सूर्याचे स्थान एवढेच 'देवलोक' आहेत. अर्थात् आता सांगितल्याप्रमाणे त्या त्या ऋत्विजाने त्या त्या स्थानी आरोहन केले असता सर्व यजमान यथानुक्रमे त्या देवलोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात. शिवाय अशा प्रकारे तिघांनी विशिष्ट स्थानी केलेल्या आरोहणरूपाने यजमानांनी जणू काय स्वर्गरूपी समुद्राचे आक्रमण करण्याकरिता सेतूच बांधल्यासारखे होते व तो सेतू यजमानांच्या स्वर्गप्राप्तीला कारणभूत होतो. (अनुवाक ८).

पूर्वी प्रजापतीने 'अर्क्य' नांवाच्या एका सामापासून निरनिराळ्या प्रकारच्या प्रजांचे हजारो समुदाय निर्माण केले. आणि 'इलांद' या नांवाच्या दुसऱ्या एका सामाने, आपण निर्माण केलेल्या प्रजांच्या निर्वाहासाठी प्रथम एकवार

उत्पन्न केलेल्या अन्नाने त्यांच्या निर्वाहामध्ये जी तूट पडू लागली, तिचा परिहार करून पुन्हा कधीही तूट न पडेल इतके अन्न प्रजापतीने संपादन केले. यास्तव, ज्या यजमानांच्या सत्रात अर्क्यसंज्ञक सामाचे गान केले जाते ते यजमान प्रजोत्पादन करू शकतात आणि त्यांच्या सत्रात इलांदनामक सामाचे गान केले जाते, ते यजमान आपणापासून उत्पन्न झालेल्या प्रजांचा निर्वाह होण्यास कधीच तूट पडणार नाही, इतके भरपूर अन्न संपादन करतात. आणि यामुळेच, ज्या वर्षी आता सांगितलेल्या दोन सामांचे गान ज्यात केले जाते असे सत्र यजमानांनी चालू ठेवलेले असते, त्या वर्षी क्षुधित असलेल्या प्रजा सर्व दिशांच्या बाजूंनी एकसारख्या सत्रकर्त्या यजमानांच्याकडे येत असतात आणि सत्रकर्ते यजमान त्या सर्व प्रजांना त्यांची क्षुधा निवारण होण्याइतके अनेक प्रकारचे अन्न व अनेक प्रकारचे दूध, दही इत्यादि आणून देतात. परंतु, ज्या वर्षी यजमान सत्र करीत नाहीत त्या वर्षी अनेक ठिकाणच्या प्रजा क्षुधित असूनही त्यांच्याकडे येत नाहीत. कारण, सत्राच्या अभावी यजमानांच्याच जवळ अन्नाचा व रसाचा भरपूर साठा नसतो, आणि त्यामुळे ते क्षुधित प्रजांना अन्न किंवा रस देण्यास समर्थच नसतात.

हर्ष झाल्याच्या निमित्ताने मुखातून जो उत्तम ध्वनी बाहेर पडतो त्यास 'उत्क्रोद' असे नांव आहे. सत्रकर्त्या सर्व यजमानांनी सत्र समाप्त झाल्यामुळे संतुष्ट होऊन म्हणजे उच्च स्वराने आपल्याला झालेला आनंद व्यक्त करावा. दीर्घकालपर्यंत पायांना घातलेल्या शृंखलेने जखडून गेलेले लोक त्या शृंखलेतून मुक्त होताच हर्षाने उच्च स्वरात घोष करतात, त्याचप्रमाणे दीर्घकाळपर्यंत देवांच्याकडून घातल्या गेलेल्या सत्रानुष्ठानरूप बंधनातून मुक्त झाल्यामुळे आणि अन्न व रस यांचे आपल्या ठिकाणी भरपूर संपादन झाल्यामुळे सत्रकर्ते यजमान उच्च स्वराने आपला आनंद व्यक्त करतात; हे युक्तच होय.

उंबराच्या लाकडाची ज्याची दांडी बनविली आहे, व ज्याच्या दांडीच्या बुडाशी जोडलेल्या भोपळ्याच्या तबलीवर मोळाच्या तंतूंच्या शंभर तारा बसविल्या आहेत अशा वाद्यास 'वाण' अशी संज्ञा आहे. सत्राची समाप्ती झाल्याबद्दल आनंदित झालेल्या यजमानांनी शंभर तारा लावलेले वाण नांवाचे वाद्य वाजवून आपला आनंद व्यक्त करावा. कारण, पुरुष हा सामान्यत: शंभर वर्षांच्या आयुष्याने व दहा इंद्रियांच्या ठिकाणी असलेल्या दहा दहा वृत्ती मिळून

शंभर इंद्रियवृत्तींनी युक्त असतो. यास्तव, सत्रकर्त्या यजमानांनी शंभर तारा लावलेले 'वाण' नांवाचे वाद्य वाजविले असता ते शंभर वर्षांच्या आयुष्याच्या व वृत्तिभेदामुळे उत्पन्न झालेल्या शंभर इंद्रियांच्या समुदायाच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतात.

काही एक मर्यादा ठरवावी व सत्रसमाप्तिनिमित्तक हर्ष झालेल्या सर्व यजमानांनी त्या मर्यादेपर्यंत धावत जावे. अशा प्रकारचे धावत जाणे, हे यजमानांना, आजपर्यंत जे जिंकता आले नाही ते जिंकता येण्यास कारणभूत होते. अर्थात् ते यजमान जे फल आजपावेतो त्यांना मिळविता आलेले नसते ते फळ मिळविण्यास समर्थ होतात. यज्ञभूमीच्या भोवती सर्व दिशांना ठेवलेल्या दुंदुभी मोठमोठ्याने वाजवाव्यात. कारण, दुंदुभीतून म्हणजे नगाऱ्यातून निघणारा ध्वनी हा सर्व ध्वनींच्याहून मोठा होत असल्याने तो ध्वनिरूप वाणीचा परमावधीच होय. यास्तव, सत्रसमाप्तिनिमित्त हर्षित झालेल्या यजमानांनी दुंदुभी वाजवून परमोच्च ध्वनी केल्याच्या योगाने ते सभारंजनक्षम अशा परमोच्च वाणीला संपादन करतात.

आग्नीध्र मंडपाच्या पश्चिमेस, वेदीच्या आत अर्धा व बाहेर अर्धा राहील असा, भूमीवर एक खळगा करावा व त्याच्या तोंडावर ओले चामडे पसरावे व ते ताणून घट्ट बसण्यासाठी त्याच्या भोवती खिळे ठोकावेत. म्हणजे भूमिदुंदुभी तयार होते. सत्रसमाप्तिनिमित्ताने हर्षित झालेल्या यजमानांनी मेलेल्या जनावराच्या शेपटीच्या बुडख्याकडील तुकड्याने ती भूमिदुंदुभी वाजवावी. म्हणजे त्या योगाने सर्व यजमान पार्थिव पदार्थ एकमेकांवर आदळल्याने उत्पन्न होणाऱ्या सर्व प्रकारच्या ध्वनिविशेषांना संपादन करतात आणि या भूलोकावर सर्वत्र जय मिळवितात.

'माहेंद्र' संज्ञक स्तोत्राचे उपाकरण झाले म्हणजे सर्व यजमानांनी हर्षजनक असा उच्च ध्वनी करावा. त्याचप्रमाणे त्यांच्या स्त्रियांनी अपघाटिला, तुंबरू, वीणा विच्छोला इत्यादि तंतुवाद्ये व शंख, नाळी इत्यादि सुषिर वाद्ये वाजवून आनंदघोष करावा. अशा प्रकारचा घोष सत्रकर्त्या यजमानांना सर्व प्रकारची वाद्ये, मनुष्ये, पशू इत्यादिकांकडून उच्चारला जाणाऱ्या सर्व प्रकारच्या शब्दध्वनींचा श्रवणलाभ करून देण्याला कारणभूत होतो.

आपल्या ठिकाणच्या इंद्रियसमुदायाच्या ठिकाणी सामर्थ्य उत्पन्न व्हावयासाठी

सत्रकर्त्या यजमानांनी एका ओल्या चामड्याच्या ओढाओढीच्या मिषाने ब्राह्मण व शूद्र या दोघांचा कलह करवावा. तो असा की, ओले व वर्तुळाकार असे एक चामडे वेदीच्या आत उभ्या राहिलेल्या एका ब्राह्मणाने आपल्याकडे खेचावे व वेदीबाहेर उभ्या राहिलेल्या एका शूद्राने ते चामडे आपल्याकडे खेचावे. सारांश, शूद्रापासून ते चामडे हिसकावून घेण्याचा प्रयत्न ब्राह्मणाने करावा. आणि त्या ब्राह्मणापासून ते चामडे हिसकाऊन घेण्याचा प्रयत्न शूद्राने करावा. शूद्राने आपल्याकडे चामडे खेचताना 'हे सत्रकर्ते यजमान द्रव्याचा विनाकारण अपव्यय करून हा सत्रानुष्ठानाचा व्यर्थ खटाटोप करीत आहेत, इतकेच नव्हे तर हा सत्रानुष्ठानाचा अव्यापरेषु व्यापार करून राष्ट्राला संपत्तिशून्य करीत आहेत', अशी सत्रकर्त्यांची निंदा करावी. उलटपक्षी, ब्राह्मणाने चामडे आपल्याकडे खेचताना, 'हे सत्रकर्ते यजमान अत्यंत सत्कृत्य करीत आहेत व या सत्कृत्याच्या योगाने ते समृध्दीला प्राप्त झालेले आहेत, इतकेच नव्हे तर ते सर्व राष्ट्राला धनसमृध्द करीत आहेत', अशी सत्रकर्त्यांची प्रशंसा करावी. जो शूद्र सत्रकर्त्यांच्या निंदेचा आक्रोश करतो, तो जणू त्या यजमानांच्या अंतःकरणांची शुद्धी करून त्यांना निष्पाप करतो. आणि जो ब्राह्मण सत्रकर्त्यांच्या प्रशंसेचा घोष करतो, तो जणू निष्पाप व पवित्र झालेल्या यजमानांच्या ठिकाणी सेवनीय अशा अन्नाचे संपादन करतो.

गवामयन सत्रामध्ये महाव्रतसंज्ञक उपांत्य दिवसापूर्वी अनुष्ठित केलेल्या महिन्यांच्या योगाने ऋषींनी व देवांनी केलेल्या उपकृतीच्या लाभाला सत्रकर्ते यजमान प्राप्त होत असतात. यास्तव, महाव्रताच्या दिवशीही ऋषींच्या व देवांच्या अशा दोन्हीही उपकृतींचा यजमानांना लाभ व्हावा म्हणून त्या दिवशी 'भूतेच्छत्' नामक ऋषींनी दृष्ट केलेल्या सामांचे गान करावे. हे सामगान यजमानांना ऋषींच्या व देवांच्या उपकृतीचा लाभ करून देण्याला कारणभूत होते.

जे यजमान संवत्सर सत्राचे अनुष्ठान करतात त्यांना दीर्घकाळ ब्रह्मचर्य धारण करावे लागल्यामुळे ते आपल्या ठिकाणच्या मैथुनशक्तीला मुकले जातात. यास्तव, ती शक्ती पुन्हा प्राप्त होण्यासाठी वेदीच्या अंतर्भागातील बदिस्त जागेत ब्रह्मचारी व व्यभिचारिणी स्त्री या उभयतांकडून मैथुन करवावे.म्हणजे त्या योगाने सत्रकर्ते यजमान मिथुनशक्तीपासून वियुक्त होत नाहीत.(अनुवाक९)

आग्नीध्रीय शाळेच्या उत्तरेस कळकांचे उंच वासे उभे करून त्यांच्यावर एक ओले चामडे ताणून बसविण्यात आलेले असते. त्यावर धनुर्धारी वीरांनी बाण मारून त्या चामड्याला भोक पाडावे. असे केल्याने ते जणू काय यजमानांच्या पापांनाच विद्ध करतात.

अंगावर चिलखत धारण केलेल्या धनुर्धारी वीरांना अध्वर्यूने 'हे कवचधारी वीरहो, चामड्याला भोक पाडण्यासाठी तुम्ही आपल्या धनुष्यापासून सोडण्याचा बाण मध्येच पडू देऊ नका, तसेच तो भोकाच्या पलीकडे निघून जाईल असेही करू नका, तो बाण चामड्याच्या भोकात तसाच अडकून राहील अशा कुशलतेने सोडा', अशा प्रकारे प्रैष दिल्यानंतर जेव्हा धनुर्धारी वीर त्या चामड्याचा वेध करतात तेव्हा ते जणू काय आपल्या यजमानांच्या पातकांचाच वेध करतात. त्यांच्या पातकांनाच ते भोक पाडतात.

मार्जालीय शाळेच्या पुढच्या मोकळ्या जागी आठ दासींनी म्हणजे दासांच्या अविवाहित कुमारिकांनी आपल्या मस्तकावर उदकाने भरलेले घडे घ्यावेत आणि मार्जालीय धिष्ण्येच्या भोवती नृत्य करावे. नृत्य करताना त्यांनी आपले उजवे पाऊल जमिनीवर आपटावे व तसे करताना 'इदं मधु' म्हणजे हे आमचे नृत्य सारभूत अशा मधासारखे गोड आहे, अशा अर्थाचे शब्दोच्चार करून गावे. कारण मध हे देवांच्या अत्यंत आवडीचे व सेवनीय असे अन्न आहे. यास्तव, अशा प्रकारे गान करीत करीत त्या दासींनी नृत्य केले असता, यजमानांनी सेवनीय असे उत्कृष्ट अन्न देवांना प्राप्त केल्यासारखे होते आणि दासींच्या कडून भूमीवर केल्या जाणाऱ्या पावलांच्या आधाराने संतुष्ट झालेले ते देव यजमानांच्या ठिकाणी परमोच्च अशा प्रकारचे पूज्यत्व संपादन करतात. (अनुवाक १०).

१ पृथ्वीला ही आहुती अर्पण असो. २ अंतरिक्षाला ही आहुती अर्पण असो. ३ द्युलोकाला ही आहुती अर्पण असो. ४ धूम, ज्योती, उदक व वायू यांच्या होऊ घातलेल्या संप्लोषाला म्हणजे संयोगाला ही आहुती अर्पण असो. ५ धूमादिकांच्या होऊन राहिलेल्या संयोगाला ही आहुती अर्पण असो. ६ होऊन गेलेल्या पूर्वोक्त धूमादिच्या संयोगाला ही आहुती अर्पण असो. ७ मेघोत्पत्ती होऊ घातलेल्या अवस्थेला ही आहुती अर्पण असो. ८ मेघोत्पत्ती झालेल्या अवस्थेला ही आहुती अर्पण असो. ९ होऊन गेलेल्या

मेघोत्पत्तीला ही आहुती अर्पण असो. १० मेघाला ही आहुती अर्पण असो. ११ मेघोत्पत्तीनंतर उत्पन्न झालेल्या पावसाच्या बुरबुरीला ही आहुती अर्पण असो. १२ पावसाच्या दाट बुरबुरीने निर्माण झालेल्या अंधकाराला ही आहुती अर्पण असो. १३ पावसाळ्याच्या दाट बुरबुरीने झालेल्या अंधकारमय स्थितीने वाजू लागलेल्या थंडीमुळे प्रवासी मनुष्याच्या अवयवांना प्राप्त होणाऱ्या संकोचावस्थेस ही आहुती अर्पण असो. १४ सर्व अवयव थंडीने आखडून गेल्यामुळे प्रवाश्याला प्राप्त होणाऱ्या आडोश्याच्या जागी धावत जाण्याच्या अवस्थेला ही आहुती अर्पण असो. १५ वीज चमकू लागण्याच्या पूर्वावस्थेस ही आहुती अर्पण असो. १६ वीज चमकू लागलेल्या अवस्थेस ही आहुती अर्पण असो. १७ वीज चमकून गेलेल्या अवस्थेस ही आहुती अर्पण असो. १८ होऊ घातलेल्या मेघगर्जनेला ही आहुती अर्पण असो. १९ चालू असलेल्या मेघगर्जनेला ही आहुती अर्पण असो. २० जोराने होत असलेल्या मेघगर्जनेला ही आहुती अर्पण असो. २१ पावसाच्या धारा पडू लागण्याच्या पूर्वावस्थेस ही आहुती अर्पण असो. २२ पावसाच्या धारा जोराने पडू लागल्याच्या स्थितीस ही आहुती अर्पण असो. २३ वाऱ्याच्या झोताच्या अनुरोधाने समोरून तोंडावर येणाऱ्या पर्जन्यधारांना ही आहुती अर्पण असो. २४ वाऱ्याच्या अनुरोधाने मंडलाकार पडत असलेल्या पर्जन्यधारांना ही आहुती अर्पण असो. २५ सरळपणे पडत राहणाऱ्या पर्जन्यधारांना ही आहुती अर्पण असो. २६ प्रवासी मनुष्याच्या पाठीकडून जोराने मारा करणाऱ्या पर्जन्यधारांना ही आहुती अर्पण असो. २७ पावसाने भिजून चिंब झालेल्या प्रवाश्याला थंडी वाजू लागण्याच्या पूर्वावस्थेस ही आहुती अर्पण असो. २८ थंडी वाजू लागल्याच्या स्थितीस ही आहुती अर्पण असो. २९ थंडीने काकडणाऱ्या प्रवाश्याच्या प्रवाशाच्या अवस्थेत ही आहुती अर्पण असो. ३० उन्हाळ्यामुळे तापून गेलेल्या जमिनीच्या ठिकाणी प्रथम पाऊस पडल्यामुळे उत्पन्न व्हावयाच्या उष्णतेस ही आहुती अर्पण असो. ३१ पृथ्वीच्या ठिकाणी प्रथमच झालेल्या पर्जन्यवृष्टीमुळे उत्पन्न होत असलेल्या उष्णतेस ही आहुती अर्पण असो. ३२ पृथ्वीच्या ठिकाणी पूर्वोक्त कारणाने चांगल्याच प्रकारे उत्पन्न झालेल्या उष्णतेस ही आहुती अर्पण असो. ३३ पर्जन्यवृष्टी थांबण्याच्या पूर्वावस्थेस ही आहुती अर्पण असो. ३४ पर्जन्यवृष्टी थांबू लागल्याच्या अवस्थेस ही आहुती अर्पण असो. ३५ पर्जन्यवृष्टी पूर्णपणे थांबल्यानंतरच्या अवस्थेस ही आहुती अर्पण असो.

३६ मेघांच्या ठिकाणचा उदकांचा साठा कमी होऊ लागण्याच्या पूर्वावस्थेस ही आहुती अर्पण असो. ३७ मेघांच्या ठिकाणी असलेल्या उदकांचा साठा कमी होत असल्याच्या अवस्थेस ही आहुती अर्पण असो. ३८ मेघांच्या ठिकाणच्या उदकांचा साठा पूर्णपणे कमी झाल्याच्या अवस्थेस ही आहुती अर्पण असो. ३९ आकाशात ढग दिसेनासे झाल्यानंतर सूर्यप्रकाशाचा संचार होऊ लागल्याच्या अवस्थेस ही आहुती अर्पण असो. ४० सूर्यप्रकाश सर्वत्र निर्माण झालेल्या स्थितीस ही आहुती अर्पण असो. ४१ सूर्याचा प्रकाश प्रखरतेने झाल्याच्या अवस्थेस ही आहुती अर्पण असो. ४२ पादबद्ध अशा ऋङ्.मंत्रांना ही आहुती अर्पण असो. ४३ पादबद्ध नसलेल्या यजुर्मंत्रांना ही आहुती अर्पण असो. ४४ गीतीरूप असलेल्या सामांना ही आहुती अर्पण असो. ४५ अंगिरसमुनींनी दृष्ट केलेल्या चौथ्या वेदातील मंत्रांना ही आहुती अर्पण असो. ४६ विधिभागांच्या सहित असणाऱ्या सर्व वेदांना ही आहुती अर्पण असो. ४७ देवतांची आख्याने ज्यांमध्ये वर्णिलेली आहेत अशा गाथांना ही आहुती अर्पण असो. ४८ मानवांच्या चरित्रविषयक आख्यानांनी युक्त असलेल्या नाराशंसींना ही आहुती अर्पण असो. ४९ शब्द करणाऱ्या अग्निदेवाविषयी वर्णन असलेल्या 'रेभी' संज्ञक ऋचांना ही आहुती अर्पण असो. ५० अनुक्त अशा सर्व प्रकारच्या वैदिक वाङ्.मयाला ही आहुती अर्पण असो. (अनुवाक ११).

१ दांत असलेल्या बालकाला ही आहुती अर्पण असो. २ दांत नसलेल्या वृध्दाला ही आहुती अर्पण असो. ३ प्राण असलेल्या जंगम जीवाला ही आहुती अर्पण असो. ४ प्राणरहित अशा स्थावर पदार्थाला ही आहुती अर्पण असो. ५ मुख असणाऱ्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ६ मुखरहित अशा प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ७ नाक असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ८ नाक नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ९ नेत्र असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. १० नेत्ररहित अशा प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ११ कान असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. १२ कान नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. १३ मस्तक असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. १४ मस्तक नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. १५ पाय असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. १६ पाय नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. १७

१८ श्वासोच्छ्वास न करणाऱ्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. १९ बोलता येणाऱ्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २० बोलता येत नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २१ डोळ्यांनी पाहता येत असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २२ डोळ्यांनी पाहता येत नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २३ कानांनी ऐकू येत असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २४ कानांनी ऐकू येत नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २५ मन असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २६ मन नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २७ प्रजोत्पादक वीर्य असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २८ प्रजोत्पादक वीर्य नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. २९ निरनिराळ्या प्रजांना ही आहुती अर्पण असो. ३० प्रजोत्पादन शक्तीला ही आहुती अर्पण असो. ३१ अंगावर केस असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ३२ अंगावर केस नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ३३ शरीरावर कातडी असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ३४ शरीरावर कातडी नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ३५ स्पर्शेन्द्रिय असलेल्या प्राण्याला ही आहुती असो. ३६ स्पर्शेन्द्रियरहित अशा प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ३७ शरीरात रक्त असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ३८ शरीरात रक्त नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ३९ शरीरात मांस असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४० शरीरात मांस नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४१ शरीरात स्नायू असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४२ शरीरात स्नायू नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४३ शरीरात अस्थी असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४४ शरीरात अस्थी नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४५ शरीरात चरबी असलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४६ शरीरात चरबी नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४७ शरीराच्या ठिकाणची अंगे कार्यक्षम असणाऱ्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४८ शरीराच्या ठिकाणची अंगे कार्यक्षम नसलेल्या प्राण्याला ही आहुती अर्पण असो. ४९ आत्म्याला ही आहुती अर्पण असो. ५० अनात्म्याला ही आहुती अर्पण असो. ५१ सर्व वस्तुमात्राला ही आहुती अर्पण असो. (अनुवाक १२).

१ हे मध्यम परिधे, प्रजापतिदेव तुला अग्नीच्या सन्निध नियुक्त करतो.

२ हे दक्षिण परिधे, तो प्रजापतिदेव, अग्नीच्या सन्निध तुला नियुक्त करतो. ३ हे उत्तरपरिधे, सर्वव्यापक असा विष्णू अग्नीच्या जवळ तुला नियोजित करो.या यज्ञाची समृध्दी व्हावी, मला सर्व प्राणी अनुकूलतेने वश व्हावेत, प्रजादिकांच्या प्राप्तीची माझी कामना पूर्ण व्हावी, आणि माझ्या आयुष्याची वृध्दी व्हावी, म्हणून हे परिधे, मी तुला अग्नीच्या सन्निध नियुक्त करतो. हे परिधे, प्राणवायूच्या, अपान वायूच्या व व्यान वायूच्या अनुकूलतेसाठी, त्याचप्रमाणे प्रभातकाल, धनसंपत्ती, भरपूर अन्न, कीर्ती, पश्वादिकांचा भरपूर लाभ, दूरवर ऐकू जाणारा शब्दोच्चार व सर्व दु:खांची नियुक्ती यांचा लाभ मला व्हावा म्हणून मी तुला अग्नीच्या सान्निध्यात नियुक्त करीत आहे.(अनुवाक १३)

१ गायत्री छंद, त्रिवृत् स्तोम, रथंतर साम व वसंतऋतू यांच्यासह असणाऱ्या अग्निदेवतेसाठी आठ कपालांवर भाजल्या जाणाऱ्या पुरोडाशाचा निर्वाप करावा. २ त्रिष्टुप् छंद, पंचदश स्तोम, बृहत् साम व ग्रीष्म ऋतू यांच्यासह असलेल्या इंद्रदेवतेसाठी अकरा कपालांवर भाजल्या जाणाऱ्या पुरोडाशाचा निर्वाप करावी. ३ जगती छंद, सप्तदश स्तोम, वैरूप साम व वर्षाऋतू यांच्यासह असलेल्या विश्वेदेवदेवतेसाठी बारा कपालांवर भाजल्या जाणाऱ्या पुरोडाशाचा निर्वाप करावा. ४ अनुष्टुप् छंद, एकविंशस्तोम, वैराज साम व शरद् ऋतू यांच्यासह असणाऱ्या मित्रावरुण देवतांसाठी आमिक्षा तयार करावी. ५ पंक्ती छंद, त्रिणव स्तोम, शाक्वर साम व हेमंत ऋतू यांच्यासह असलेल्या बृहस्पती देवतेकरता तांदुळांचा चरू शिजवावा. ६ अतिच्छंद नांवाचा छंद, त्रयस्त्रिंश स्तोम, रैवत साम आणि शिशिर ऋतू यांच्यासह असणाऱ्या सविता देवतेसाठी बारा कपालांवर भाजून तयार केल्या जाणाऱ्या पुरोडाशाचा निर्वाप करावा. ७ विष्णूची पत्नी असलेल्या अदिती देवतेसाठी चरू, ८ वैश्वानरगुणक अग्निदेवतेसाठी बारा कपालांवर भाजला जाणारा पुरोडाश, ९ अनुमती देवतेसाठी चरू, आणि १० 'क' या नांवाच्या देवतेसाठी एकाच कपालांवर भाजला जाणारा पुरोडाश तयार करावा. (अनुवाक १४).

आधानामध्ये स्थापित केलेल्या अग्नीच्या ठिकाणी अरणींचे मंथन करून उत्पन्न केलेला जो अग्नी मिसळला जातो, तो अग्नी आणि हविर्धान मंडपात आणून ठेवलेला वल्लीरूप सोमराजा या दोघांच्या पाहुणचारासाठीच अग्निषोमीयनामक पशूचा याग केला जात असतो. या यागाच्या रूपाने केलेल्या आतिथ्याच्या

रूपाने अग्नी व सोम हे दोन्हीही देव संतुष्ट होतात. निरनिराळ्या आकारांच्या पक्क्या विटांचे एकमेकांवर पांच थर मांडून जो चितिरूप अग्नी निर्माण केला जात असतो, तो स्वभावाने क्रूर असतो. अर्थात् विटा मांडून तयार केलेला तो चितिरूपी रुद्रसंज्ञक अग्नी मागील अनुवाकात सांगितल्याप्रमाणे दहा हवींचे निर्वपण करून त्या त्या देवतांना ते ते हवी जर समर्पण केले गेले नाहीत, तर अतिशय क्रुध्द होऊन तो यजमानाजवळ येतो व त्याच्या प्रजेचा व पशूंचा नाश करतो. परंतु, त्या चितिरूपी रुद्रसंज्ञक अग्नीच्या ठिकाणी पूर्वोक्त दहा हवींचे निर्वपण करून त्या हवींचे यजन केले असता, त्या अग्नीला त्याला हवा असलेला हविर्भाग देऊन यजमानाने शांत केल्यासारखे होते, आणि मग तो स्वकीय हविर्भाग दिल्याने संतुष्ट झालेला रुद्रसंज्ञक अग्नी क्रुध्द होऊन यजमानाजवळ येत नाही व त्याच्या प्रजेचा व पशूंचा नाश करीत नाही.

हा चितिरूपी अग्नी वसंतादि ऋतू, गायत्र्यादि छंद, त्रिवृत् इत्यादि स्तोम, रथंतर इत्यादि पृष्ठसंज्ञक स्तोत्रे (सामे) यांच्याकडून निर्माण केला जावा, असे म्हणतात. यास्तव, चितिरूपी अग्नी निर्माण करणाऱ्या यजमानाने जर पूर्वोक्त हवींचे निर्वपण करून त्यांचा चितिरूप अग्नीच्या ठिकाणी याग केला, म्हणजे त्या अग्नीला त्या त्या ऋतूंच्या, छंदांच्या, स्तोमांच्या, व पृष्ठस्तोत्रांच्या कडूनच यजमानाने निर्माण केल्यासारखे होते.

सोमवल्ली कुटून तिच्या रसाचे देवतांच्यासाठी यजन करणाऱ्या यजमानाने दिशा जिंकाव्या असे म्हणतात. यास्तव, पूर्वोक्त दहा हवींचा निर्वाप करून त्यांचा याग केला असता सोमयाग करणाऱ्या यजमानाने दहाही दिशांना जिंकल्यासारखे होते.

पूर्वोक्त दहा देवतांच्यासाठी दहा हवींचे यजन जिच्यामध्ये केले जाते त्या इष्टीस 'सर्वपृष्ठा' अशी संज्ञा आहे. या सर्वपृष्ठेष्टीचे अनुष्ठान करून पूर्वी देवांनी इंद्रासाठी यजन केले. ही इष्टी इंद्राला ऐश्वर्य प्राप्त करून देण्याला कारणभूत झाल्यामुळे या इष्टीस 'इंद्रसव' असे म्हटले जाते. याच इष्टीचे अनुष्ठान करून पूर्वकालीन मनुष्यांनी आद्य मानव अशा मनूचे यजन केले. त्यामुळे या सर्वपृष्ठेष्टीस 'मनुष्यसव' असेही नांव प्राप्त झाले. सारांश, या इष्टीचे माहात्म्य जाणून जो कोणी यजमान या सर्वपृष्ठेष्टीचे अनुष्ठान करतो,

तो देवांमध्ये इंद्र किंवा मनुष्यांमध्ये मनू ज्या ऐश्वर्याला प्राप्त झाला त्याच ऐश्वर्याला प्राप्त होतो.

या इष्टीमध्ये पुरोनुवाक्या ज्या करावयाच्या, त्या दिक्शब्दाने युक्त अशा कराव्यात. म्हणजे त्या यजमानाला सर्व दिशांच्या ठिकाणी विजय मिळवून देण्याला कारणभूत होतात. (अनुवाक १५).

१ श्वासोच्छ्वास आणि डोळ्यांची उघडझाप करणाऱ्या जगातील सर्व प्राण्यांचा जो स्वतःच्या भाग्याने एकटाच राजा झाला, आणि मनुष्यसमाजाचे व पशुसमुदायाचे एकमेव स्वामित्व ज्याने संपादन केले, त्या प्रजापतिदेवाचे आम्ही हविर्द्रव्याने पूजन करतो. हे सोमग्रहा, 'उपयाम' संज्ञक पार्थिव पात्रांमध्ये तू भरून घेतला जात आहेस. प्रजापतिदेवाला अत्यंत प्रिय अशा तुझे मी ग्रहण करीत आहे. हे प्रजापतिदेवा; तुझ्या उद्देशाने मी भरून घेतलेला हा महिमा नांवाचा सोमग्रह जणू द्युलोकरूपच आहे. आकाशात दिसत असणारी नक्षत्रे हे तुझेच रूप आहे. प्रकाशमान होणारा हा आदित्य हे तुझेच तेज आहे. हे सोमग्रहा, थोर अशा महिम्याने युक्त अशा त्या प्रजापतिदेवाला मी तुझी आहुती अर्पण करीत आहे. ही आहुती प्रजापतीला प्राप्त होवो. (अनुवाक १६).

१ जो प्रजापतिदेव सर्व प्राण्यांना शरीर व त्या शरीराच्या ठिकाणी कार्यक्षम असे बल देतो, ज्याच्या शिकवणीप्रमाणे सर्व देव वागत असतात आणि सर्व प्राण्यांचे जीवन आणि मरण छायेप्रमाणे ज्याच्या स्वाधीन आहे, त्या प्रजापतिदेवाला हविर्द्रव्य अर्पण करून आम्ही त्याचे पूजन करतो. हे सोमग्रहा, तू उपयामसंज्ञक पार्थिव पात्रांमध्ये भरून घेतला जात आहेस. प्रजापतिदेवाला अत्यंत प्रिय अशा तुझे मी ग्रहण करीत आहे. हे 'प्रजापतिदेवा, तुझा हा महिमानामक ग्रह पृथ्वीरूप आहे. या पृथ्वीवर उत्पन्न झालेल्या सर्व ओषधी व वनस्पती हे तुझेच विचित्र रूप आहे. अग्नी हा देखील तुझेच तेज आहे. हे सोमग्रहा अत्यंत महिम्याने युक्त अशा त्या प्रजापतिदेवाला मी तुझी आहुती अर्पण करीत आहे. ही आहुती प्रजापतिदेवाला प्राप्त होवो. (अनुवाक १७).

१ आमच्या राष्ट्रातील ब्राह्मणसमाजामध्ये प्रत्येक ब्राह्मण बहुश्रुत व सार्थवेदाध्ययनजन्य तेजाने संपन्न असा निपजो. २ आमच्या राष्ट्रात असलेल्या

क्षत्रियसमुदायातील प्रत्येक क्षत्रिय अचुक बाण मारणारा, शूर व महारथी असा उत्पन्न होवो. ३ आमच्या राष्ट्रातील गाई भरपूर दूध देणाऱ्या निपजोत. ४ आमच्या राष्ट्रातील प्रत्येक बैल नांगर व गाडी ओढण्यास समर्थ असो. ५ आमच्या राष्ट्रातील प्रत्येक घोडा शीघ्रगामी होवो. ६ आमच्या राष्ट्रातील प्रत्येक स्त्री सुरूप आणि सद्गुणी निपजो. ७ आमच्या राष्ट्रातील प्रत्येक यज्ञकर्त्या यजमानाला जयशाली, रथावर स्थिर राहून लढणारा, सभेमध्ये उत्कृष्ट वक्ता व तरुण असा पुत्र होवो. ८ आम्ही जेव्हा जेव्हा अपेक्षा करू तेव्हा तेव्हा आमच्या राष्ट्रात पर्जन्यवृष्टी होवो. ९ आमच्या राष्ट्रातील सर्व वृक्ष फलभाराने युक्त असोत व सर्व धान्ये भरपूर पिकोत. १० आमच्या राष्ट्रात आमचा योगक्षेम निरंतर उत्तम चालो. (अनुवाक १८).

१ हा अश्व वेगवान आहे. धावत धावत मजल मारणाऱ्या या अश्वाने पृथ्वीचे आक्रमण केले आहे. या शीघ्रगामी अश्वानेच या पृथ्वीवर अग्नीला व्यवहारनिर्वाहक केले आहे. २ वेगवान् व जलद धावणाऱ्या या अश्वाने अंतरिक्षाचे आक्रमण केले आहे. या वेगवान् अश्वानेच अंतरिक्षाच्या ठिकाणी वायूला व्यवहारनिर्वाहक केले आहे. ३ हा अश्व अत्यंत वेगवान् असून शीघ्रगामी अशा या अश्वानेच द्युलोकाचे आक्रमण केले आहे. त्या जलद धावणाऱ्या अश्वानेच द्युलोकाच्या ठिकाणी सूर्याला प्रकाशरूप व्यवहाराचे निर्वाहक केले आहे. ४ हा अश्व खरोखर वेगवान् आणि जलदीने धावणारा आहे. हे अश्वा, अग्नी हा तुझा योजक व सहायभूत असा आहे. यास्तव मी तुला स्पर्श करतो. तू माझे हे यज्ञकर्म निर्विघ्नपणे व शांततेने पार पाड. ५ हे अश्वा, वायू हा तुझा नियोजक व साहाय्यकर्ता आहे. म्हणून मी तुला स्पर्श करतो. माझे हे यज्ञकर्म तू निर्विघ्नतेने व शांततेने पार पाड. ६ हे अश्वा आदित्य हा तुझा योजक व साहाय्यक आहे. यास्तव, मी तुला स्पर्श करीत आहे. तू हे माझे यज्ञकर्म निर्विघ्नपणे व शांततेने पूर्णतेला ने. ७ हे अश्वा, तू प्राणवायूला दृढ करणारा आहेस. म्हणून माझ्या प्राणवायूला तू दृढ कर. ८ हे अश्वा, तू व्यान वायूला दृढ करणारा आहेस. यास्तव, माझ्या व्यान वायूला तू दृढ कर. ९ हे अश्वा तू अपान वायूला दृढ करणारा आहेस. यास्तव, माझ्या अपान वायूला तू दृढ कर. १० हे अश्वा तू चक्षुरूप आहेस. यास्तव, माझ्या ठिकाणी कार्यक्षम असे चक्षुरिंद्रिय स्थापन कर. ११ हे अश्वा तू श्रवणेंद्रियरूप आहेस. यास्तव, तू माझ्या ठिकाणी

कार्यक्षम असे श्रवणेंद्रिय स्थापन कर. १२ हे अश्वा तू आयुष्यरूप आहेस. यास्तव, तू माझ्या ठिकाणी आयुष्य स्थापन कर. (अनुवाक १९).

१ प्रत्येक धान्याचे बी अंकुराची उत्पत्ती करणारे असते. २ पर्जन्य वृष्टिकारक असो. ३ प्रत्येक धान्य शिजले जाण्यास योग्य असो. ४ सर्व वृक्ष उत्कृष्ट फळांनी लगडलेले असोत. ५ ही पृथ्वी लोकांना सुखाने राहण्यास व संचार करण्यास योग्य अशी असो. ६ अग्नी हा त्याची सुखाने उपासना करण्यास शक्य असो. ७ अंतरिक्ष सुखाने अध्यक्षता करणारे असो. अर्थात् धूमकेतू इत्यादि उत्पातांनी रहित असे असो. ८ वायू निरुपद्रवीपणाने संचार करणारा असो. ९ द्युलोक सुखाने राहण्यास योग्य असो. १० हा आदित्य उपद्रवरहित असा तपत राहो. ११ दिवस व रात्र ही दोघेही कल्पाच्या आरंभापासून जशी प्रवृत्त होत आली आहेत, तशीच यापुढेही प्रवृत्त होत राहोत. १२ अर्धमास हे नेमके पंधरा दिवसांचेच असोत. १३ महिने हे नेमके तीस दिवसांचेच असोत. १४ सर्व ऋतू त्यांच्या त्यांच्या लक्षणांनी युक्त असोत. १५ संवत्सर हा कोणासही पीडा न देता शांत असा असो. (अनुवाक २०).

१ अग्निदेवतेकरता अष्टाकपालात्मक पुरोडाश, २ सोमदेवतेकरता चरू, ३ सवितादेवतेकरता अष्टाकपालात्मक पुरोडाश, ४ पूषादेवतेकरता चरू, ५ रुद्रदेवतेकरता चरू तयार करून त्यांचा याग करावा. अश्व ज्या ठिकाणी ठाणबंद केला जातो त्या ठिकाणास 'मृगाखर' अशी संज्ञा आहे. अश्व जर मृगाखरावर आला नाही तर ६ वैश्वानर अग्निदेवतेकरता द्वादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. ७ पापविमोचक अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक पुरोडाशाचा याग करावा. ८ सूर्यदेवतेसाठी दूध व ९ वायू देवतेसाठी आज्य हे हविर्द्रव्य योजून त्याचा याग करावा. (अनुवाक २१).

१ पापविमोचक अशा अग्निदेवाकरता अष्टाकपालात्मक पुरोडाश, २ पापविमोचक अशा इंद्रदेवाकरता एकादशकपालात्मक पुरोडाश, ३ पापविमोचक अशा मित्र व वरुण या दोघा देवांच्याकरता आमिक्षा, ४ पापविमोचक अशा वायू व सविता या दोघा देवांच्याकरता चरू, ५ पापविमोचक अशा दोघा अश्विनीकुमारांच्यासाठी यवांच्या भाजक्या धाना, ६ पापविमोचक अशा मरुत्‌देवांच्याकरता सप्तकपालात्मक पुरोडाश, ७ पापविमोचक अशा विश्वेदेव

देवांच्या करता द्वादशकपालात्मक पुरोडाश, ८ अनुमती देवतेकरता चरू, ९ वैश्वानर अग्निदेवासाठी द्वादशकपालात्मक पुरोडाश व १० द्युलोक व पृथ्वी या दोन देवतांच्यासाठी द्विकपालात्मक पुरोडाश तयार करून त्यांचा याग करावा. (अनुवाक २२).

१ प्रत्येक यजमानाने अग्नीची मन:पूर्वक सेवा केली आहे व पृथ्वीचीही सेवा केली आहे. पृथ्वीसह अशा त्या अग्निदेवाने त्याची सेवा करणाऱ्या त्या त्या यजमानावर आजवर ज्याप्रकारे उपकार केले आहेत त्याचप्रकारे त्या देवाकडून मजवर ही कल्याणकारक असे उपकार केले जावोत. २ प्रत्येक यजमानाने वायुदेवाची व अंतरिक्षलोकाची मन:पूर्वक सेवा केली आहे. अंतरिक्षासह अशा त्या वायुदेवाने त्याची सेवा करणाऱ्या त्या त्या यजमानावर आजवर जसे उपकार केले आहेत, तसेच त्या देवाकडून मजवरही कल्याणकारक असे उपकार केले जावोत. ३ प्रत्येक यजमानाने सूर्याची व द्युलोकाची मन:पूर्वक सेवा केली आहे. द्युलोकासह अशा त्या सूर्यदेवाने त्याची सेवा करणाऱ्या त्या त्या यजमानावर आजपर्यंत जसे उपकार केले आहेत, तसेच त्या देवाकडून मजवरही कल्याणकारक असे उपकार केले जावोत. ४ प्रत्येक यजमानाने चंद्राची व नक्षत्रांची मन:पूर्वक आराधना केली आहे. नक्षत्रांच्या सह असलेल्या त्या चंद्रदेवाने त्याची आराधना करणाऱ्या त्या त्या यजमानावर आजवर जसे उपकार केले, तसेच त्या देवाकडून मजवरही कल्याणकारक असे उपकार केले जावोत. ५ प्रत्येक यजमानाने वरुणदेवाची व उदकांची मनोभावाने सेवा केली आहे. उदकांच्यासह अशा त्या वरुणदेवाने त्याची सेवा करणाऱ्या त्या त्या यजमानावर आजपर्यंत ज्या रीतीने उपकार केले आहेत, त्याच रीतीने त्या देवाकडून मजवरही कल्याणकारक असे उपकार केले जावोत. ६ प्रत्येक यजमानाने सामवेदाची व त्याचप्रमाणे ऋग्वेदाची अध्ययनरूपी उपासना मन:पूर्वक केली आहे. ऋग्वेदासह वर्तमान अशा त्या सामवेदाने त्याची अध्ययनरूपी उपासना करणाऱ्या त्या त्या यजमानावर ज्याप्रकारे आजवर उपकार केले आहेस, त्याचप्रमाणे त्या सामवेदाकडून मजवरही कल्याणकारक असे उपकार केले जावोत. ७ प्रत्येक यजमानाने ब्राह्मण समाजाची व क्षत्रिय समाजाची मन:पूर्वक सेवा केली आहे. क्षत्रियसमाजासह अशा त्या ब्राह्मणसमाजाने त्याची सेवा करणाऱ्या त्या त्या यजमानावर ज्याप्रकारे आजवर

उपकार केले आहेत, त्याचप्रकारे त्या ब्राह्मण समाजाकडून मजवरही कल्याणकारक
उपकार केले आहेत, त्याचप्रकारे त्या ब्राह्मण समाजाकडून मजवरही कल्याणकारक
उपकार केले जावोत. ८ प्रत्येक यजमानाने राजाची व त्याच्या प्रजेची कर्तव्यकर्मरूप सेवा मन:पूर्वक केली आहे. प्रजेसह वर्तमान असलेल्या राजाने त्याची कर्तव्यकर्मरूप सेवा करणाऱ्या त्या त्या यजमानावर आजवर ज्या रीतीने उपकार केले आहेत त्याच रीतीने त्या राजाकडून मजवरही कल्याणकारक असे उपकार केले जावोत. ९ प्रत्येक यजमानाने रथाची व त्याला जोडल्या जाणाऱ्या अश्वांची परिपालनरूप सेवा मन:पूर्वक केली आहे. अश्वांसह असलेल्या त्या रथाने त्याची परिपालनरूप सेवा करणाऱ्या त्या त्या यजमानावर ज्या प्रकारे उपकार केले आहेत, त्याचप्रकारे त्या रथाकडून मजवरही कल्याणकारक उपकार केले जावोत. १० सृष्टिकर्त्या प्रजापतीची व त्याने उत्पन्न केलेल्या पंचमहाभूतांची प्रत्येक यजमानाने मन:पूर्वक सेवा केली आहे. पंचमहाभूतांच्यासह असलेल्या प्रजापतिदेवाने त्याची सेवा करणाऱ्या त्या त्या यजमानावर आजवर जसे उपकार केले आहेत, तसेच त्या प्रजापतिदेवाकडून मजवरही कल्याणकारक उपकार केले जावोत. (अनुवाक २३).

१ हे सवितृदेवा, अंतरिक्षात विस्तार पावलेले तुझे जे पूर्वसिद्ध आणि धूलिरहित असे जाण्यायेण्याचे मार्ग आहेत, त्या अत्यंत सुगम मार्गांनी तू आज या यज्ञामध्ये ये आणि आमचे रक्षण कर. त्याचप्रमाणे हे सवितृदेवा, इतर यजमानांच्याहून आम्ही तुझी अधिक उपासना करणारे आहो, अशी तू देवांच्याजवळ आमची प्रशंसा कर. २ या भूलोकी निवास करणाऱ्या व भूलोकाला सुख देणाऱ्या तुज अग्निदेवाला मी नमस्कार करतो. हे अग्निदेवा, या यजमानाला या भूलोकाच्या ठिकाणी उत्तम स्थान प्राप्त करून दे. ३ अंतरिक्षलोकी निवास करणाऱ्या व अंतरिक्षलोकाला सुखविणाऱ्या तुज वायुदेवाला माझा नमस्कार असो. हे वायुदेवा, या यजमानाला अंतरिक्षलोकामध्ये तू उत्कृष्ट असे स्थान प्राप्त करून दे. ४ द्युलोकाचे ठिकाणी राहणाऱ्या व द्युलोकाला सुख देणाऱ्या तुज सूर्यदेवाला मी नमस्कार करतो. हे सूर्यदेवा, या यजमानाला तू द्युलोकामध्ये उत्तमस्थान संपादन करून दे. (अनुवाक २४).

जो कोणी ज्ञाता यज्ञयोग्य अशा या अश्वाचे मस्तक कोणते आहे,

हे जाणतो, तो मानवसमाजात शिरोभागी गणला जातो आणि यज्ञफलाचा भोक्ता होतो. उषःकाल हेच यज्ञयोग्य अशा अश्वाचे शिर असून सूर्य हा त्या यज्ञिय अश्वाचा नेत्र होय. वायू हाच त्या अश्वाचा प्राण असून चंद्र हा त्या अश्वाचे कर्णेन्द्रिय आहे. पूर्वइत्यादि चार दिशा हेच त्या यज्ञिय अश्वाचे चार पाय असून अवांतर दिशा या त्या अश्वाच्या पार्श्वभागी असणाऱ्या अस्थी होत. दिवस आणि रात्र ही त्या अश्वाच्या नेत्रांची उघडझाप असून शुक्लकृष्णरूप अर्धमास हे त्या अश्वाच्या हस्तपादादि अवयवांचे निरनिराळे भाग होत. बारा महिने हे त्या यज्ञिय अश्वाच्या शरीरातील अवयवांचे साधे असून वसंतादि ऋतू हे त्या अश्वाचे खूर इत्यादि अवयव होत. संवत्सरात्मक काल हा त्या यज्ञिय अश्वाच्या शरीराचा मध्यभाग असून सूर्याचे किरण हे त्या अश्वाच्या शरीरावरील केश होत. कृत्तिकादि नक्षत्रे हे त्या यज्ञिय अश्वाचे तेजस्वी असे स्वरूप असून आकाशात चमकणारे गुरू, शुक्र इत्यादि तारे हे त्या अश्वाच्या शरीरातील निरनिराळ्या भागांच्या अस्थी होत. परम विस्तीर्ण असे आकाश हे त्या यज्ञिय अश्वाच्या शरीरातील मांस असून सर्व ओषधी या त्या अश्वाच्या अंगावरील लव होत. पृथ्वीवर उगवलेल्या सर्व वनस्पती हे त्या यज्ञिय अश्वाच्या पुच्छाचे केश असून अग्नी हे त्या अश्वाचे मुख होय. वैश्वानरसंज्ञक अग्नी हे त्या अश्वाचे उघडलेले, आ पसरलेले मुख असून समुद्र हे त्याचे उदर आहे. अंतरिक्ष हे त्या यज्ञिय अश्वाचे गुदद्वार असून द्युलोक व पृथ्वी हे त्या अश्वाचे दोन अंड होत. सोमवल्ली कुटावयाचा बत्ता हे त्या अश्वाचे शिस्न असून सोमरस हे त्याचे रेत आहे. विजेचा कडकडाट हा जणू, तो अश्व जांभई देत असताना त्याच्या मुखातून निघणारा ध्वनी असून मेघांची गर्जना हा जणू, तो अश्व आळस झाडण्यासाठी आपले शरीर कापवीत असताना होणारा फडफड असा ध्वनी होय. पर्जन्यवृष्टी हे त्या अश्वाचे मूत्र असून वेदवाणी ही त्या अश्वाच्या खिंकाण्याचा आवाज आहे. दिवस हा अनुष्ठित केल्या जाणाऱ्या अश्वमेधक्रतूमध्ये यज्ञिय अश्वाचा संज्ञपन संस्कार होण्यापूर्वी चांदीच्या ग्रहपात्रात भरून घेतला जाणारा 'महिमा' नांवाचा सोमग्रह असून रात्र हा त्या अश्वाचा संज्ञपनसंस्कार झाल्यानंतर सुवर्णाच्या ग्रहपात्रात भरून घेतला जाणारा 'महिमा' नांवाचा सोमग्रह होय. महिमा नांवाचे हे दोन सोमग्रह हे अनुक्रमे यज्ञिय अश्वाच्या संज्ञपन संस्काराच्या पूर्वोत्तर यजन केले जात असतात. 'हय' जातीचा अश्व देवांना वाहून नेणारा

असून 'अर्वा' जातीचा यज्ञिय अश्व असुरांना वाहून नेत असतो. 'वाजी' जातीचा अश्व गंधर्वांना वाहून नेत असून सर्वसामान्य जातीचा 'अश्व' हा मनुष्यांना वाहून नेणारा आहे. विराट्रूप अशा या यज्ञिय अश्वाचे समुद्राप्रमाणे अपार असा परमात्मा, हेच उत्पत्तिस्थान असून वसतिस्थानही तेच आहे. (अनुवाक २५).

श्रीवेदपुरुषार्पणमस्तु। श्रीसरस्वत्यर्पणमस्तु। श्रीयोगेश्वरीसहित श्रीकालभैरव
गणपति गौरीसहित त्रिगुणात्मक प्रमुख पंचायतन देवतार्पणमस्तु। श्रीयज्ञनारायणार्पणमस्तु।
श्रीमातापितृचरणारविंदार्पणमस्तु। श्रीगुरूचरणारविंदार्पणमस्तु ।
सप्तत्युत्तर - अष्टादशशाके (१८७०) माघशुद्धसप्तम्यां
(रथसप्तम्यां) शनिवासरे सुप्रभातसमये समाप्तम् ।